शोधप्रकाशन ग्रंथमाला - ८१

# श्रीजगद्गुरू पंचाचार्य विजय

ओवीबद्ध मराठी पारायणग्रंथ

रचना

**शेषनारायण देवाप्पा पसारकर**

**शैवभारती शोधप्रतिष्ठान**

डी. ३५/७७, जंगमवाडी मठ,

वाराणसी (उत्तर प्रदेश) २२१ ००१

श्रीजगद्गुरू पंचाचार्य विजय (मराठी)
रचना : शे० दे० पसारकर

Shree Jagadguru Panchacharya Vijay (Marathi)
By S. D. Pasarkar

ISBN : 978-93-82639-21-3

प्रकाशक : शैवभारती शोधप्रतिष्ठान, जंगमवाडी मठ, वाराणसी (उत्तर प्रदेश). स्थिरभाष : (0542) 2450546

अक्षरसंयोजन : शिवशक्ती कम्प्यूटर प्रोसेस, जंगमवाडी मठ, वाराणसी (उत्तर प्रदेश) २२१ ००१

मुद्रक : बा०धों० कोरे, शिव ऑफसेट प्रिंटर्स, 'शिवसदन' माधवनगर रोड, सांगली. स्थिरभाष : (0233) 2644127, 2622504

© प्रकाशक

प्रथमावृत्ती : ९ ऑगस्ट २०१५ । प्रती ५,०००


मूल्य : एकशे पन्नास रुपये (१५० रुपये)

---

ग्रंथासाठी संपर्क

श्रीधर श्रीराम पैलवान, १७०४, सोमवार पेठ, भवानी गल्ली, तासगाव, जि० सांगली. चरभाष : 9527806750, 9372148096

एस० के० हिरेमठ, ५५/४०, शाहीर वस्ती, भवानी पेठ, सोलापूर. स्थिरभाष : (0217) 2727221 / चरभाष : 9960222151



श्रीरंभापुरीजगद्गुरू



श्रीउज्जयिनीजगद्गुरू



श्रीकेदारजगद्गुरू



श्रीशैलजगद्गुरू



श्रीकाशीजगद्गुरू

## श्रीजगद्गुरू पंचाचार्यांचे मंगलाशीर्वचन

वीरशैव मराठी साहित्याचे गाढे अभ्यासक, संशोधक, चिंतक आणि कवी डॉ० शेषनारायण देवाप्पा पसारकर यांनी 'श्रीजगद्गुरू पंचाचार्य विजय' हा ओवीबद्ध ग्रंथ रचून पूर्ण केला. हा ग्रंथ महाराष्ट्रीय वीरशैवांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. हा ग्रंथ म्हणजे एक अपूर्व कलाकृतीच होय. महाराष्ट्रीय वीरशैवांसाठी अशा पुण्यप्रद ओवीग्रंथाची नितांत आवश्यकता होती. ही ग्रंथरचना झाल्यामुळे महाराष्ट्रातील वीरशैवांच्या मनांतील अनेक वर्षांची अपेक्षा पूर्ण झाली असे वाटत आहे. आचार्य, गुरू, संत यांच्या ओवीबद्ध चरित्रांचे पारायण करण्याची परंपरा प्राचीन काळापासून महाराष्ट्रात रूढ आहे. प्रस्तुत ग्रंथामुळे ती अधिक दृढ होणार आहे.

सनातन वीरशैव धर्माचे मूलसंस्थापक जगद्गुरू पंचाचार्य होत. युगायुगांपासून त्यांची परंपरा चालत आलेली आहे. शिवाच्या आज्ञेनुसार त्यांनी प्रत्येक युगात लिंगांतून अवतार धारण केला आणि तत्कालीन ऋषिमहर्षींना, राजेमहाराजांना आणि सामान्य भक्तांना दीक्षासंस्कार देऊन त्यांना वीरशैव सिद्धान्ताचा उपदेश केला. त्यामुळे त्यांच्या जीवनाचे सार्थक झाले. या घटनेचा उल्लेख अनेक

ग्रंथांत आलेला आहे. काही घटना अलिखित असून त्या कर्णोपकर्णी लोकांपर्यंत पोहोचल्या आहेत. इतिहास जेवढा लिखित असतो त्यापेक्षा अधिक अलिखित स्वरूपात असतो. पंचाचार्यविषयक सर्व लिखित व अलिखित घटना शब्दबद्ध झाल्या पाहिजेत, असे आम्हाला वाटत होते. हे कार्य डॉ० शे० दे० पसारकर यांनी पूर्ण केले. डॉ० पसारकरांनी वीरशैव पंचपीठे, रेणुकविजय पुराण, शिवपुराण, स्कंदपुराण, श्रीसिद्धान्तशिखामणी, क्रियासार, कुमारसंभव, गीताप्रेसचे शिवविषयक विशेषांक, शिवागम आदी अनेक ग्रंथांचे अध्ययन करून त्यातील सारांश एकत्र केला आणि त्याच्या आधारे 'श्रीजगद्गुरू पंचाचार्य विजय' या ओवीबद्ध ग्रंथाची रचना केली.

या ग्रंथात युगक्रमानुसार जगद्गुरू पंचाचार्यांचे प्रकटन, त्यांनी केलेला सूत्रोपदेश, त्यांचे धर्मप्रबोधनकार्य, त्यांच्या अलौकिक लीला, कृतयुगापासून आजपर्यंत झालेल्या सर्व आचार्यांचे चरित्र व कार्य हे सर्व ग्रथित केलेले आहे. याशिवाय जगद्गुरू मूल पंचाचार्यांनी अगस्त्य, दधीची, व्यास, सानंद व दुर्वास या महर्षींना उपदेशिलेल्या पडविडी, वृष्टी, लंबन, मुक्तागुच्छ व पंचवर्ण या पंचसूत्रांचे विस्तृत विवेचन या ग्रंथात केलेले आहे. आतापर्यंत पंचसूत्रे एवढाच शब्द सर्वांना ज्ञात होता. परंतु पंचसूत्र म्हणजे नेमके काय याची कल्पना नव्हती. पंचसूत्रांच्या निगूढ अर्थांचे सविस्तर विश्लेषण या ग्रंथात प्रथमच करण्यात आले आहे. त्यामुळे हा ग्रंथ एक वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथ म्हणून निश्चितच सर्वमान्य ठरणार आहे. एवढेच नव्हे, तर प्रसंगानुसार या ग्रंथात वीरशैवांचे अष्टावरण, पंचाचार व षट्स्थल या सिद्धान्तांचे अतिशय सुंदर व सुगम विवेचन केलेले आहे. मराठीतील ओवीबद्ध चरित्रग्रंथांत वीरशैव सिद्धान्ताचे असे विवेचन प्रथमच करण्यात आलेले आहे. त्यामुळे हा ग्रंथ केवळ चरित्रपर ग्रंथ नसून एक श्रेष्ठ दार्शनिक ग्रंथदेखील आहे, याचा प्रत्यय वाचकांना आल्यावाचून राहणार नाही. आचार्यांच्या चरित्रलीलांबरोबर त्यांच्या अमूल्य सूत्रोपदेशाचा अलभ्य लाभ या ग्रंथाच्या पारायणकर्त्यांना मिळणार आहे, हे एक सौभाग्यच होय.

डॉ० शे० दे० पसारकर यांनी यापूर्वी 'जन्म हा अखेरचा', 'श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत', 'श्रीसिद्धान्तशिखामणी अभंगगाथा',

‘श्रीमन्मथचरितामृत’, ‘श्रीरमतेरामकथामृत’, ‘अभंग सिद्धायन’ इत्यादी दार्शनिक ग्रंथ व संतचरित्रे लिहून महाराष्ट्रात नावलौकिक मिळविला आहे. त्यांची लेखणी बहुआयामी आहे. कादंबरी, कविता, नाटक, अनुवाद, संशोधन, संतकाव्यविवेचन, प्राकृतगाथाभाष्य, संतचरित्र, ग्रंथसंपादन अशा विविध लेखनप्रातांत ती लीलया संचार करते. कादंबरीकार, कवी, नाटककार, गद्य ललितलेखक, संशोधक, संपादक अशा अनेक भूमिका पसारकरांनी पार पाडल्या आहेत. आता त्यांनी काशीजंगमवाडी मठात निवास करून ग्रांथिक आणि मौखिक सामग्रीच्या आधारे प्रत्येक पीठाची परंपरा आणि कार्य प्रत्येकी दोन अध्यायांमध्ये ओवीबद्ध केले आहे. त्यांची ओवीरचना प्रासादिक, रसाळ व प्रवाही आहे, याचा प्रत्यय वाचकांना या आधीच आलेला आहे. भाविक भक्तांनी त्यांच्या अन्य साहित्यरचनांप्रमाणेच ‘श्रीजगद्गुरू पंचाचार्य विजय’ ह्या काव्यकृतीचेही पारायण व अभ्यास करून ज्ञानलाभ करून घ्यावा.

प्रस्तुत ग्रंथात एकूण अकरा अध्याय असून वीरशैवधर्माची व पंचपीठांची भूमिका पहिल्या अध्यायात स्पष्ट केली आहे. दुसऱ्या-तिसऱ्या अध्यायांत श्रीमद् रंभापुरी वीरपीठाची, चौथ्या-पाचव्या अध्यायांत श्रीमद् उज्जयिनी सद्धर्मपीठाची, सहाव्या-सातव्या अध्यायांत श्रीमद् हिमवत्केदार वैराग्यपीठाची, आठव्या-नवव्या अध्यायांत श्रीमद् गिरिराज सूर्यपीठाची आणि दहाव्या-अकराव्या अध्यायांत श्रीमत् काशी ज्ञानपीठाची- अशा पंचपीठांच्या आचार्यपरंपरा, आचार्यांचा उपदेश व पीठांचा इतिहास इत्यादी कथाभाग अत्यंत रसाळ शैलीत ओवीबद्ध केलेला आहे. चतुर्युगांतील पंचाचार्यांचे चरित्र, लीला व उपदेश काव्यामध्ये ग्रथित करणारा ग्रंथ आजपर्यंत उपलब्ध नव्हता. महाराष्ट्रीय वीरशैवांच्या महद्भाग्याने श्रीजगद्गुरू पंचाचार्यांचे ओवीबद्ध चरित्र सर्वप्रथम मराठी भाषेत रचले जाऊन ते प्रकाशित होत आहे. जगद्गुरू मूल पंचाचार्यांच्या व आजपर्यंत झालेल्या सर्व आचार्यांच्या चरित्रलीलांचे वर्णन करणारा हा प्रासादिक ग्रंथ असल्यामुळे या ग्रंथाचे भक्तिभावाने पारायण केले तर जगद्गुरू पंचाचार्यांबद्दल भक्तिभावना वृद्धिंगत होऊन त्यांचा कृपाशीर्वाद प्राप्त होईल. म्हणून सर्व सद्भक्तांनी या प्रासादिक ग्रंथाचे स्वागत करून त्याचे भक्तियुक्त अंत:करणाने पारायण करावे आणि वीरशैवांचे

दुर्लभ तत्त्वज्ञान जाणून घेऊन जन्मसार्थक करून घ्यावे. श्रावण महिन्यात, नवरात्रात, महाशिवरात्रीच्या पर्वकाळी, पीठांतील आचार्यांच्या व शिवाचार्यांच्या मठांतील पारंपरिक धार्मिक कार्याच्या प्रसंगी या ओवीबद्ध प्रासादिक ग्रंथाचे सद्भक्तांनी पारायण करावे. प्रवचनकारांनी या ग्रंथविषयावर प्रवचने करून भक्त-भाविकांना श्रवणानंदाचा लाभ मिळवून द्यावा.

या ग्रंथनिर्मितीत डॉ० शे० दे० पसारकरांच्या धर्मपत्नी सौ० उषा पसारकर यांनी संगणकीय अक्षरलेखन करून मोलाचे योगदान दिले आहे. म्हणून या प्रसंगी सर्व विद्यमान पंचाचार्य या दांपत्याला अनंत मंगलाशीर्वाद प्रदान करीत आहोत. जगद्गुरू मूल पंचाचार्यांच्या कृपाशीर्वादाने उभयतांना उदंड आयुष्य व उत्तम आरोग्य प्राप्त होवो आणि त्यांच्याकडून अधिकाधिक वीरशैव साहित्याची सेवा निरंतर घडत राहो हा मंगलाशीर्वाद. त्यांच्या कन्या सौ० केतकी विवेक अनसिंगकर व सौ० अबोली बसवराज तंगशेट्टी यांना आणि त्यांच्या संपूर्ण परिवारांस अनंत मंगलाशीर्वाद.

या ग्रंथाची मुद्रणसेवा करणारे सद्भक्त, पारायण करणारे श्रद्धाळू भक्त, मुद्रक या सर्वांना जगद्गुरू पंचाचार्यांचे मंगलाशीर्वाद.

**इत्याशिष:**

# लाभले जन्मसाफल्य...

श्रीगुरुकृपेनेच माझ्या हातून ग्रंथरचना झाली, अशी माझी दृढ श्रद्धा आहे. प्रत्येक रचनेसाठी काही ना काही निमित्त घडले. १९८५ मध्ये डॉ० चंद्रशेखर कपाळे व श्री० शांतितीर्थ स्वामी यांच्यासह मी कपिलधारला गेलो होतो. डोंगराच्या मध्यावरच्या पायवाटेवरून चालताना अचानक वरून एक दगड निखळला आणि माझ्या पायासमोर पडून गडगडत खाली खोल दरीत जाऊन पडला. एक पाऊल पुढे पडले असते तर माझा कपाळमोक्ष निश्चित होता. या घटनेने घाबरलेल्या कपाळेसरांनी माझा हात घट्ट पकडला आणि म्हणाले, ''पसारकर, तुम्हाला मन्मथस्वामींनी वाचवलं. त्यांना तुमच्याकडून काही सेवा करून घ्यायची असेल!'' डॉ० कपाळेंचे शब्द मी विसरू शकलो नाही. मन्मथस्वामींविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'श्रीमन्मथचरितामृत' हे ओवीबद्ध चरित्र लिहून मी ते मन्मथस्वामींना अर्पण केले.

मराठवाड्यातील कडोळी (ता० सेनगाव, जि० हिंगोली) येथे होऊन गेलेले शिवयोगी श्रीरमतेराम महाराज हे माझ्या आई-वडिलांचे गुरू. माझ्या जन्माआधीच त्यांनी समाधी घेतली होती. पण आईने ओल्या डोळ्यांनी सांगितलेल्या त्यांच्या आठवणी मी बालपणी भाविकतेने ऐकल्या होत्या. श्रीभीमाशंकर महाराज हे त्यांचे उत्तराधिकारी. त्यांच्या काळात बहुजन समाजात रमतेराम महाराजांविषयी श्रद्धाभाव वाढत गेला आणि श्रीरमतेरामांचे मूळ रूप- त्यांचे वीरशैवत्व- कालांतराने लोप पावते की काय, असे भय मला वाटू लागले. म्हणून श्रीभीमाशंकर महाराजांना सांगून त्यांच्या इच्छेप्रमाणे मी 'श्रीरमतेरामकथामृत' हे ओवीबद्ध चरित्र लिहिले आणि श्रीरमतेराम महाराजांच्या जंगमरूपाचा त्यात स्पष्ट निर्देश केला.

'जन्म हा अखेरचा', 'श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत' आणि 'श्रीसिद्धान्तशिखामणी अभंगगाथा' या ग्रंथांच्या जन्मकथा त्या त्या ग्रंथांतील प्रास्ताविकांत मी सांगितल्या आहेत. प्रस्तुत 'श्रीजगद्‌गुरू पंचाचार्य विजय' या ग्रंथरचनेसाठीही एक निमित्त घडले. १९९५ मध्ये डॉ० चंद्रशेखर कपाळे आणि मी काशीला जंगमवाडी मठात गेलो होतो. तेव्हा कपाळे सहज म्हणाले की, ''पसारकर, तुम्ही ओघवती

ओवीरचना करू शकता. तुम्ही श्रीविश्वाराध्यांचे चरित्र आणि काशीपीठाची परंपरा ओवीबद्ध केली तर छान होईल.'' मलाही ते पटले आणि कैलासमंटपात बसून मी मंगलाचरणाच्या अकरा ओव्या लिहून काढल्या. पुढे अनेक व्यापांत त्याकडे दुर्लक्ष झाले आणि वर्षामागून वर्षे निघून गेली. माझ्या हातून ते काम काही पूर्ण झाले नाही.

प०पू० श्रीकाशीजगद्गुरू डॉ० चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींनी 'पीठारोहण-रौप्यमहोत्सवाच्या काळात काशीला येऊन एखादी ग्रंथरचना करा' अशी प्रेमळ आज्ञा केली. श्रीविश्वाराध्यांचे चरित्र लिहायचे मनात होतेच. आम्ही उभयता काशीला गेलो आणि पूर्वकल्पनेप्रमाणे 'श्रीविश्वाराध्य विजय' नामक ग्रंथ लिहिण्याच्या निमित्ताने पहिला अध्याय लिहून काढला. प०पू० महास्वामीजींना तो वाचून दाखवला. तो ऐकल्यावर महास्वामीजी सहज म्हणाले, 'केवळ विश्वाराध्य ह्या एका आचार्यांवरच ग्रंथ लिहिण्यापेक्षा पाचही आचार्यांवर लिहा.' झाले, ग्रंथविषय विस्तारला. तो निश्चित झाला. त्याप्रमाणे अनेक ग्रंथ, पुराणसंदर्भ, चरित्रकोश, ज्ञानकोश, गीताप्रेसचे शिवविषयक विशेषांक आणि मुख्यत: श्रीकाशीमहास्वामीजींनी पूर्वाश्रमात लिहिलेला 'वीरशैव पंचपीठ परंपरे' हा ग्रंथ अशा सर्व सामग्रीच्या आधारे अकरा अध्यायांचा, २८५३ ओव्यांचा हा 'श्रीजगद्गुरू पंचाचार्य विजय' ग्रंथ श्रीगुरुकृपेने लिहून पूर्ण झाला.

हा एक काव्यग्रंथ आहे. भाविकांना वीरशैवधर्म, त्याचे मूल संस्थापक, त्यांनी प्रतिपादन केलेली सूत्रे, तत्त्वज्ञान, कथा अशा साऱ्यांचा रंजक परिचय घडविण्याचा प्रयत्न येथे केला आहे. षट्स्थल, अष्टावरण, व पंचाचार हे विषय योग्य त्या ठिकाणी समाविष्ट केलेले आहेत. 'पंचसूत्रकृतो' असे पंचाचार्यांचे वर्णन सर्वांनी ऐकलेले असते, परंतु पंचसूत्रे म्हणजे नेमके काय हे माहीत नसते. प०पू० श्रीकाशीमहास्वामीजींनी त्यावर प्रकाश टाकला. त्यांनी पडविडी, वृष्टी, लंबन, मुक्तागुच्छ आणि पंचवर्ण या पंचसूत्रांविषयी जे मला सांगितले ते या ग्रंथात शब्दबद्ध केले आहे. ब्रह्मसूत्रे, भक्तिसूत्रे यांप्रमाणेच पंचाचार्यांनी उपदेशिलेली ही पाच सूत्रे आहेत. त्यांपैकी पंचवर्ण महासूत्र व त्यावरील भाष्य काशीपीठाने ग्रंथरूपाने प्रकाशित केले आहे. या सूत्रांच्या स्पष्टीकरणासाठी काशीस्थित विद्वज्जनांची आणि संस्कृत पंडित श्री० शिवाप्पा खके यांची बहुमोल मदत झाली आहे. पंचसूत्रांचे स्पष्टीकरण मराठी भाषेत आणि तेही ओवीछंदात या ग्रंथात सर्वप्रथम आले आहे, हे नमूद

करणे आवश्यक आहे.

मानवाची निर्मिती कोट्यवधी वर्षांपूर्वी झाली. आपला ज्ञात इतिहास मात्र काही हजार वर्षांपूर्वीचा आहे. त्या तुलनेत लिपीचा शोधही अलीकडचा. म्हणून लिखित रूपापेक्षाही मौखिक आणि रूढी-परंपरेतूनच इतिहास आपल्यापर्यंत पोहोचला. जगद्गुरू पंचाचार्यांनी वीरशैवधर्माची स्थापना केली, असे परंपरा मानते. त्यांची पीठे आणि त्या पीठांचे शाखामठ शेकडो-हजारो वर्षांपासून अस्तित्वात असून त्यांपैकी बरेच अजूनही कार्यरत आहेत. आचार्यपरंपरेविषयी मिळालेली सर्व माहिती क्रमवार लिहून कथा-उपकथांनी सजवून या ग्रंथात वाचकांसमोर ठेवली आहे. हा पारायणग्रंथ असल्यामुळे साहाजिकच यात रंजकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे.

श्रीमन्मथस्वामी, शांतलिंगस्वामी, लिंगेश्वर, बसवलिंग, लक्ष्मण महाराज आदी सर्व महाराष्ट्रीय वीरशैव संत हे पंचाचार्यपरंपरेतून आलेले आहेत. मराठीतील वीरशैव वाङ्मय हे आचार्यपरंपरेतील संत-भक्तकवींनी समृद्ध केले आहे. महाराष्ट्रात पंचपीठांच्या सर्व शाखामठांच्या पूज्य शिवाचार्यांनी ही आचार्यपरंपरा जागृत ठेवली, जोपासली आणि सर्वसामान्य भक्तांपर्यंत पोहोचवली. यामुळे सर्व शिवाचार्यांनी महाराष्ट्रीय वीरशैवांना उपकृत करून ठेवले आहे. याबरोबरच गावागावांतील जंगम-माहेश्वरांनीही ही परंपरा जागृत ठेवण्याचे महत्कार्य केले. महाराष्ट्रातील सद्भक्तांनी आपले गुरुगोत्र, पीठ इत्यादी सर्व श्रीगुरूकडून समजून घेऊन त्याविषयी सदैव निष्ठाभक्ती बाळगली आहे. याप्रमाणे आचार्यपरंपरा शिवाचार्य, जंगम आणि भक्त या सर्वांमुळे महाराष्ट्रात हजारो वर्षांपासून दृढमूल होऊन अक्षुण्ण राहिली. या सर्वांबद्दल माझ्या मनात कृतज्ञतेची भावना नांदत आहे. पंचाचार्यविषयक अधिकृत ग्रंथ मराठीत उपलब्ध नसताना देखील केवळ रूढीच्या बळावर ही परंपरा टिकून राहिली याचे नवल वाटते आणि 'शास्त्राद् रूढिर्बलियसी।' या विधानाची सत्यता पटते.

प०पू० श्रीकाशीमहास्वामीजींच्या कृपाशीर्वादाने मी खरेच भारावून आणि हेलावून गेलो आहे. केवळ माझीच नव्हे, तर माझ्या सर्व पूर्वजांची पूर्वपुण्याईच त्यांच्या रूपाने माझ्यापुढे समूर्त झाली, अशी माझी भावना आहे. त्यांची आज्ञा आणि कृपाशीर्वाद नसता तर माझ्याकडून ग्रंथलेखन झाले असते असे मला वाटत नाही. त्यांच्या उत्कट इच्छेमुळेच ही ग्रंथनिर्मिती झाली आहे. त्याप्रमाणेच

प०पू० श्रीरंभापुरी महास्वामीजी, प०पू० श्रीउज्जयिनी महास्वामीजी, प०पू० श्रीकेदार महास्वामीजी आणि प०पू० श्री श्रीशैल महास्वामीजी यांचेही शुभाशीर्वाद मला लाभले आहेत. जगद्गुरू पंचाचार्यांच्या चरणी अनंत प्रणिपात. माझ्या मनातली प्रामाणिक भावना मात्र अशीच आहे-

**जन्मोजन्मीचे पुण्यफळ। मातापित्यांचे संस्कार प्रेमळ।**
**आणि श्रीगुरुकृपेचे बळ। लाभले जन्मसाफल्य ।।**

ग्रंथासाठी अनेक सुहृदांचे अनेक प्रकारचे साहाय्य मिळाले. त्यांचा केवळ कृतज्ञतापूर्वक नामोल्लेख करतो. श्रीमती नलिनी चिरमे वहिनी, सर्वश्री० पंचाक्षरी लिगाडे, प्रवीण स्वामी, माधव स्वामी, सागर हिरेमठ (वाराणसी), भीमाशंकर जंगम (अंबरनाथ), सोमनाथ स्वामी (साखरखेर्डा), वसंतराव लवंगे (नरखेड, सोलापूर), उमेश खके (चारठाणा) इत्यादी.

आमचे संस्कृतज्ञ मित्र पं० शिवाप्पा खके (चारठाणा, जि० परभणी) यांनी आत्मीयतेने ग्रंथाची मुद्रिते वाचून मौलिक सूचना केल्या. त्यांचा मी ऋणी आहे. माझी पत्नी सौ० उषा हिने अक्षरलेखनाचे कार्य निर्दोषपणे पार पाडले. ग्रंथमुद्रणासाठी शैवभारती शोधप्रतिष्ठानचे कार्यवाह डॉ० जी० सी० केंडदमठ आणि मुद्रक श्री० बाबूराव कोरे (सांगली) यांचे साहाय्य झाले. या सर्वांविषयी कृतज्ञता.

औसा (जि० लातूर) येथील श्री १०८ ष०ब्र० शांतवीरलिंग शिवाचार्य स्वामीजींच्या इच्छेनुसार त्यांच्या मठातील भव्य कार्यक्रमात या ग्रंथाचा प्रथम लोकार्पणसोहळा साजरा होत आहे. त्याबद्दल ष०ब्र० औसेकर महाराजांना कृतज्ञतापूर्वक नमस्कार.

आचार्यपरंपरेवर अपार श्रद्धा ठेवणाऱ्या भाविकांसमोर ही कृती नम्रपणे ठेवत आहे.

**शे० दे० पसारकर**

'उषास्वप्न', १२६ ब, मार्कंडेय नगर,
सोलापूर (महाराष्ट्र) ४१३००३

स्थिरभाष : 0217 - 260 23 01
चरभाष : 09420 780 570 / 08087 559 904

३१ जुलै २०१५ (गुरुपौणिमा)

।। श्रीमज्जगद्गुरु पंचाचार्याः प्रसीदन्तु ।।

# ।। श्रीजगद्गुरु पंचाचार्य विजय ।।

## प्रारंभ

## विषयानुक्रमणिका


| अध्याय | | विषय | | | ओवीसंख्या | | पृ०क्र० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अध्याय पहिला | ................ | पूर्वपीठिका | | ..... | १७० | ..... | १ |
| अध्याय दुसरा | ................ | श्रीरंभापुरीपीठ, वीरसिंहासन | (पूर्वार्ध) | ..... | २०८ | ..... | १७ |
| अध्याय तिसरा | ................ | श्रीरंभापुरीपीठ ... | (उत्तरार्ध) | ..... | ३६५ | ..... | ३७ |
| अध्याय चौथा | ................ | श्रीउज्जयिनीपीठ, सद्धर्मसिंहासन | (पूर्वार्ध) | ..... | २०८ | ..... | ६९ |
| अध्याय पाचवा | ................ | श्रीउज्जयिनीपीठ ... | (उत्तरार्ध) | ..... | २४८ | ..... | ८९ |
| अध्याय सहावा | ................ | श्रीकेदारपीठ, वैराग्यसिंहासन | (पूर्वार्ध) | ..... | १७५ | ..... | १११ |
| अध्याय सातवा | ................ | श्रीकेदारपीठ ... | (उत्तरार्ध) | ..... | ३०९ | ..... | १२७ |
| अध्याय आठवा | ................ | श्रीशैलपीठ, सूर्यसिंहासन | (पूर्वार्ध) | ..... | १८३ | ..... | १५५ |
| अध्याय नववा | ................ | श्रीशैलपीठ ... | (उत्तरार्ध) | ..... | २६६ | ..... | १७३ |
| अध्याय दहावा | ................ | श्रीकाशीपीठ, ज्ञानसिंहासन | (पूर्वार्ध) | ..... | ३३१ | ..... | १९९ |
| अध्याय अकरावा | ................ | श्रीकाशीपीठ ... | (उत्तरार्ध) | ..... | ३९० | ..... | २२९ |
| | | | | | एकूण **२८५३** | | |
| | | श्रीजगद्‌गुरू पंचाचार्यांची आरती | | ..... | | ..... | २६५ |

# अध्याय पहिला

## पूर्वपीठिका

मंगलाचरण, ग्रंथप्रस्ताव (ओवी १-४१), शिवसभा, शिवशक्ति-एकरूपत्व (४२-६२), पंच शिवगणवर्णन (६३-७६), शिव-पार्वती संवाद (७७-११८) शिवगणांना आज्ञा (११९-१६४), उपसंहार (१६५-१७०)

# अध्याय पहिला

॥ श्रीगणेशाय नमः॥ श्रीसरस्वत्यै नमः॥ श्रीजगद्गुरु पंचाचार्येभ्यो नमः॥

॥ श्रीउमामहेश्वराभ्यां नमः॥ श्रीमन्मथस्वामिने नमः॥

पंचाननतनूद्भूतान् पंचाक्षरमनूपमान्। पंचसूत्रकृतो वंदे पंचाचार्यान् जगद्गुरून्॥

ॐ नमो जी लंबोदरा। विशालबुद्धे विद्यासागरा। तुझ्या कृपेचा किंचित् वारा। स्फूर्तिदायक आम्हांसी॥१॥ गजवदना तुझे सुंदर। रूप मोहक मनोहर। पाहता येई अनिवार। भरती भक्तिसागराला॥२॥ कार्यारंभी तुला वंदिता। सिद्धी येतसे दृष्टिपथा। गणनायक तू विघ्नहर्ता। म्हणूनि तुला प्रार्थितो॥३॥ आरंभिले ग्रंथलेखन। ते कृपेने करवी पूर्ण। तोषवी देऊनि समाधान। मने भाविक श्रोत्यांची॥४॥ श्रवणसुखाच्या सागरात। डुंबू दे भक्तचित्ते निवांत। कथा ऐकूनि वाचूनि कृतार्थ। जीवन व्हावे सकलांचे॥५॥ विश्वमोहिनी सरस्वती। सकल सारस्वतांची स्फूर्ती। वंदितो माते वसावे चित्ती। सूक्ष्मरूपे माझिया॥६॥ तुझा स्पर्श होता निर्मल। बहरते साहित्याची वेल। तिला

पडे स्वप्नभूल। आभाळउंची गाठाया॥७॥ तुझ्या पदी जे नत झाले। त्यांचे भाग्य उदया आले। लोकमान्यता लाधूनि धाले। अढळ लोकमानसी॥८॥ म्हणूनि मजला करूनि धीट। सोपी करावी अवघड वाट। जिव्हाग्री वसूनि करवी पाठ। पंचाचार्य चरित्राचा॥९॥ रससिद्ध नाही लेखणी। आणिक दुर्बळ माझी वाणी। तव कृपेने बहरूनी। पाझरेलचि निश्चित॥१०॥ जय जय शिवा परब्रह्मा। अतर्क्य तू निगमागमा। 'नेति नेति' हीच सीमा। झाली तुझ्या वर्णनाची॥११॥ तुझे करिता रूपवर्णन। वेदागमांसी पडले मौन। तेथे मजसम बुद्धिहीन। कोण गेला लागूनी?॥१२॥ परि येथे एक आधार। भोळा चक्रवर्ती तू उदार। शुद्ध भावे वंदिता अपार। कृपावर्षाव करितोस॥१३॥ आम्ही पामर सामान्य जन। नाही योगादी मार्गांचे ज्ञान। भोळ्या भावे केवळ भजन। करणे इतुके जाणतो॥१४॥ तुझे नाम आशुतोष। अल्प भक्तीने तुज संतोष। अशी ऐकिली आम्ही विशेष। महिमा तुझी ग्रंथांतरी॥१५॥ तरी कृपा करूनि शिवा। जाणूनि घेई माझ्या भावा। ग्रंथसंकल्प सिद्धीस न्यावा। इतुके तुला मागणे॥१६॥ शिवस्वरूप परिपूर्ण। पंच शिवगण महान। त्यांचेच मी चरित्रगायन। आता येथे आरंभिले॥१७॥ माझ्या मनीचा हा हेत। पुरवावयास तू समर्थ। तुझ्या कृपास्पर्शे निश्चित। झरेल माझी लेखणी॥१८॥ भक्तवत्सला दीनानाथा। तुझ्या पदी ठेवितो माथा। अभय देऊनि मज

समर्था। करवी बोलता सप्रेमे॥१९॥ नमू पंचाचार्य महान। मूल आणिक विद्यमान। त्यांच्या पादपद्मी नमन। करितो मी भक्तिभावे॥२०॥ श्रीकाशीज्ञानसिंहासनी। जणू उगवला ज्ञानतरणी। जगद्‌गुरू श्रीचंद्रशेखर ज्ञानी। त्यांचे चरण वंदिले॥२१॥ श्रीपंचाचार्य यशोगाथा। आणावी भक्तश्रवणपथा। तोषवावे भक्तजनचित्ता। असे मज आज्ञापिले॥२२॥ जगद्‌गुरूंची आज्ञा प्रमाण। शिरसावंद्य मजलागून। म्हणूनि वंदूनि त्यांचे चरण। ग्रंथलेखन आरंभिले॥२३॥ त्यांच्या कृपासिंचने निर्मळ। बहरली माझी साहित्यवेल। शिवाद्वैततेजे आभाळ। अंतरीचे प्रकाशले॥२४॥ दक्ष राहूनि सर्वकाळ। माय रक्षिते तान्हे बाळ। तसा कटाक्ष त्यांचा केवळ। मज पोषितो रक्षितो॥२५॥ त्यांची आज्ञा बलवत्तर। मजला नेईल पैलपार। याच श्रद्धाबळे निर्धार। केला ग्रंथरचनेचा॥२६॥ वीरशैव साहित्यप्रांती नवे। काही घडताहे असे जाणवे। म्हणूनि वाटे आपण व्हावे। साक्षी नव्या घटनेचा॥२७॥ जय जय जगद्‌गुरू महास्वामी। चरणी सदैव लीन आम्ही। वसावे आमुच्या अंतर्यामी। प्रेरक होऊनि कार्याचा॥२८॥ ज्यांची योगलीला अगाध। ते नमिले महास्वामी पलसिद्ध। श्रीगुरू सिद्धलिंगस्वामी प्रसिद्ध। नत चरणी त्यांच्या मी॥२९॥ प्रभुदेव बसवेश्वर। सर्व शिवशरणांशी नमस्कार। ज्ञानेश्वरादी संत थोर। अत्यादरे वंदिले॥३०॥ मन्मथस्वामी शांतलिंग। लिंगेश्वर बसवलिंग। लक्ष्मणादी शिवसंत

साष्टांग। नमिले मी आदरे॥३१॥ माय-पित्यांचे श्रीगुरू परम। कडोळीचे स्वामी श्रीरमतेराम। त्यांच्या चरणी दंडवत् प्रणाम। माझा असो सर्वदा॥३२॥ श्रोतिया वाचका प्रेमे वंदन। द्यावे कथेकडे अवधान। जी श्रवण करिता पूर्ण। फिटेल पारणे कर्णांचे॥३३॥ वीरशैवधर्म महान। आगमोक्त आणि पुरातन। कराया मानवमात्राचे कल्याण। पंचाचार्यांनी स्थापिला॥३४॥ जातिभेदास नाही स्थान। असो ब्राह्मण वा अन्य कोण। स्त्री पुरुष येथे समान। दीक्षा मिळे सर्वांना॥३५॥ हृदयीची उत्कट शिवभक्ती। पाहूनि श्रीगुरू दीक्षा देती। शिष्याची जात असो कोणती। तिची न गणती या धर्मी॥३६॥ शिवदीक्षा घ्यावया पात्र। पुरुषाइतुकी स्त्रीही पवित्र। समरूप शिव-शक्ती हे सूत्र। मान्य धर्मामध्ये या॥३७॥ जो जो जन्मा आला जीव। त्याच्या अंतरी नांदतो शिव। दिसे जड जगत् सर्व। तेही पूर्ण शिवरूप॥३८॥ विश्व सुंदर कलाकृती। शिव-शक्तीची ती निर्मिती। जे जे दिसे दृष्टीपुढती। ते सत्य शिव सुंदर॥३९॥ असा समग्र समताविचार। पुरस्कारिला येथे निरंतर। सर्व प्राणिमात्रांस आधार। द्यावया समर्थ धर्म हा॥४०॥ शिवाज्ञेने भूमंडळी। या धर्माची स्थापना झाली। तीच निवेदीन सगळी। पुराकथा श्रोतयांसी॥४१॥ कैलासशिखरी रम्य स्थळी। एकदा शिवसभा भरली। अंबेसह शिव चंद्रमौळी। विराजिले उच्चासनी॥४२॥ भस्मोद्धूलित शुभ्र शरीर। कंठी

विलसे सर्पहार। गंगा आणिक चंद्रकोर। जटेठायी शोभले॥४३॥ गळा रुद्राक्षांची माळ। कांती सूर्यासम तेजाळ। बाहू-मनगटांवरी निर्मळ। रुद्राक्षभूषणे शोभती॥४४॥ त्रिशूल डमरू करी धारण। कटीस गजचर्म वसन। दक्षिण कर उंचावून। आशिष देती सकलांसी॥४५॥ वाम चरण दुमडून। खाली सोडून दक्षिण चरण। अंतरी पूर्ण आत्मलीन। विराजिले शिवब्रह्म॥४६॥ पुष्परसास्वादी भ्रमर। तल्लीन जसा निरंतर। तसे आत्मानंदी रुचिर। लीन शिव परमात्मा॥४७॥ शिवप्रभूंच्या वामभागी। विराजली उमा तन्वंगी। विद्युल्लतेसम सर्वांगी। तेज अपार दाटले॥४८॥ भाळी त्रिपुंड्र सुंदर। कृष्णघनासम केशभार। रुळे रुद्राक्षांचा हार। कंठी अति साजिरा॥४९॥ नयनी प्रकटे चंद्रबिंब। चिरयौवनी काया चिंब। जणू अमृतभरले डाळिंब। कोमल अधरी फुललेले॥५०॥ मंजुळ स्वरमाधुर्याने। सप्तसूर होती दीनवाणे। रूपलावण्यापुढती उणे। विश्वातले सौंदर्य॥५१॥ दिव्य सौंदर्याची पुतळी। जगन्माता उमा शोभली। तिच्या वत्सल पदराखाली। सर्व पोषिली जीवयोनी॥५२॥ असे मायपिता प्रेमळ। जन्मा घातले विश्वबाळ। त्याचा केला प्रतिपाळ। सर्वकाळ स्नेहाने॥५३॥ शिव पार्वती दिसती दोन। परि ते एकरूप पूर्ण। जसे नाही भिन्नपण। चंद्र आणि प्रभेत॥५४॥ दोन टिपऱ्या एक नाद। ओठ दोन एक शब्द। दोन फु ले एक गंध। तसे दोघे एकरूप ॥५५॥ गुळामधूनि

गोडवा। कोणी वेगळा करावा?। कापरातूनि काढावा। गंध कसा वेगळा?॥५६॥ तसे शिव आणि शक्ती। जरी भिन्न तत्त्वे भासती। परि सूर्य आणि दीप्ती-। समान एकतत्त्व ते॥५७॥ तेज हाती धराया जाता। समग्र दीपचि येई हाता। तसे शक्तितत्त्व उमजता। शिवतत्त्वचि आकळे॥५८॥ शिव-शक्ती दोहोंतून। एकचि नांदे शिवपण। भक्तिवृद्धीसाठी जाण। हे दंपती शोभले॥५९॥ शिवसभा भरली दाट। शिवस्तुती गाती भाट। देव गंधर्व ऋषी श्रेष्ठ। उत्कंठित बसलेले॥६०॥ देवकन्या सौंदर्यमूर्ती। उमामहेश्वरांस अर्चिती। अप्सरा देवांगना दाविती। पदलालित्य आपुले॥६१॥ होई शिवनामाचा गजर। दुमदुमूनि गेले अंबर। शिवपार्वतीवरती स्थिर। नेत्र पूर्ण खिळलेले॥६२॥ सभेत बसलेले शिवगण। त्यांची गणना करील कोण?। त्यात मुख्य पाच जण। होते गणनायक ते॥६३॥ रेणुक, दारुक, घंटाकर्ण। धेनुकर्ण नि विश्वकर्ण। पंचाक्षरस्वरूपी पूर्ण। पंच शिवगण हे॥६४॥ सृष्टि-स्थिति-संहार। या कार्यात ते अग्रेसर। शिवाद्वैतानंदे अपार। परिपूर्ण तृप्त ते॥६५॥ वेदविद्येत विशारद। घेती शिवागमज्ञानास्वाद। विवेचनात ते प्रसिद्ध। वेदान्त-सारसर्वस्वाच्या॥६६॥ कैलासी जितुके शिवगण। त्यात विख्यात हे परिपूर्ण। मलमायादी पाशांतून। मुक्त सर्वस्वी झालेले॥६७॥ अणिमादी अष्टसिद्धी। त्यांच्या ओळंगती पदी। नित्यमुक्त निरवधी। नित्यसिद्ध शुद्ध ते॥६८॥

निष्कलंक निरहंकार। निरंकुश पराक्रमी वीर। भवरोगमहावैद्य चतुर। लिंगांगज्ञानसंपन्न॥६९॥ मस्तकी इष्टलिंगधारण। लिंगपूजेत परायण। अंग-लिंगस्थलज्ञान। बुद्धीमध्ये मुरलेले॥७०॥ भस्मतत्त्वविवेकी पूर्ण। सर्वांगी केले भस्मोद्धूलन। रुद्राक्षमंडित त्रिपुंड्ररेखन। स्वयंरुद्रस्वरूप॥७१॥ भवभाराने भयाक्रांत। देव आणि मनुष्यजात। त्यांचे प्रतिपालक समस्त। शिवगण पाच हे॥७२॥ दंडकौपिनकंथादी पंचमुद्रा। ते धारण करिती सर्वदा। चतुराश्रमांचे गुरू, आपदा। निवारिती सकलांची॥७३॥ वीरशैवधर्मसंस्थापक। ज्ञानचक्रवर्ती नि:शंक। वीरमाहेश्वरांत देख। पूर्ण सार्वभौम ते॥७४॥ ते वीरशैव महाचार्यगण। शिवपंचमुखोत्पन्न। शिवयोगविद्येत परिपूर्ण। जटामुकुटधारक॥७५॥ ते सर्वतंत्रस्वतंत्र। स्वच्छंदे विचरती सर्वत्र। स्वेच्छाधारी स्कंदादी गोत्र। त्यांचे गुरुरूप ते॥७६॥ असे सर्वसामर्थ्ययुक्त। शिवगण तेथे उपस्थित। सर्व जहाले उत्कंठित। शिवशब्द ऐकावया॥७७॥ कमलनेत्र मिटूनि शांत। शिव बसलेले ध्यानस्थ। नामगजराने आसमंत। गेला सर्व भारूनी॥७८॥ शिवे उघडता आपुले नेत्र। सभा स्तब्धली क्षणमात्र। थांबले सारे गीतस्तोत्र। कर्णी प्राण साठले॥७९॥ शिव परब्रह्म आशुतोष। मुखावरी उमटली चिंतारेष। ती पाहताक्षणी मानस। पार्वतीचे डहुळले॥८०॥ म्हणे 'स्वामी जगन्नाथा। विश्वभार वाहता माथा। ब्रह्मांडावरी

तुमची सत्ता। स्वामी तुम्ही जगाचे॥८१॥ तुम्हा शरण येता भक्त। त्याचे दु:ख हरिता त्वरित। जन्ममरणातून मुक्त। करिता मोक्ष देऊनी॥८२॥ तुमच्या प्रसन्न चर्येवरी। मज का भासे चिंतालहरी?। कोणता विचार ह्दयांतरी। नाथा मला सांगा ना'॥८३॥ दृष्टी रोखूनि पार्वतीवर। म्हणती 'तू खरीच चतुर। कोणा नकळे अशी क्षणभर। चिंतारेघ चमकली॥८४॥ तुझ्या सूक्ष्म दृष्टीतून। सुटेनाच हलकी खूण। धरेचे मूक आक्रंदन। आले कर्णी माझिया॥८५॥ अधर्म-अन्यायाने संत्रस्त। झाले पृथ्वीवासी समस्त। विचार-आचाराचे व्यस्त। तेथे प्रमाण जहाले॥८६॥ संतसज्जन सर्व लोक। दु:खार्णवी डुबती देख। जाति-पंथभेदांनी अनेक। तेथे उच्छाद मांडिला॥८७॥ भंगले शील नि कौमार्य। थयथया नाचतो अन्याय। पाहूनि हिंसाचार क्रौर्य। विवेक गेला देशोधडी॥८८॥ अवर्षण-दुष्काळाने। जळूनि गेली अवघी राने। उपासमारीने जिणे। नरकप्राय जहाले॥८९॥ सरितांचे झाले ओहळ। तृष्णेने धरिले रूप विक्राळ। तेणे तोल सुटूनि सकळ। चौर्य क्रौर्य वाढले॥९०॥ सरले मानव्य सर्व । लोपला अवघा बंधुभाव। मित्रत्वाचे पुसले नाव। शत्रुवत् वर्तती॥९१॥ सहनशील जरी धरती। पोषिते सकल जीवजाती। तरी तिची सहनशक्ती। आता पूर्ण संपली॥९२॥ पुत्र होता वामाचारी। माता रडे कुढे अंतरी। तशी उच्छाद पाहूनि धरित्री। मूकपणे आक्रंदते॥९३॥ उमे तिचे

मूक क्रंदन। उमटले माझ्या अंतरी पूर्ण। म्हणूनि चिंतारेष स्पर्शून। गेली मुख माझे हे'॥९४॥ शिवसभा होऊनि स्तब्ध। ऐके शिवाचा शब्दन् शब्द। पार्वतीमुखावरी खेद। दिसू लागे किंचित्॥९५॥ धरेची दु:खकथा ऐकून। सभा गेली हेलावून। उमटू लागले अधूनमधून। दु:खभरले सुस्कारे॥९६॥ पार्वती म्हणे 'जगन्नाथा। ऐकून धरेची दु:खवार्ता। माझा मन:सिंधू पुरता। गेला आज ढवळूनी॥९७॥ सकल जीव आपुली लेकरे। पशू पक्षी मानव सारे। त्यात मानवच का अनुसरे। वाट एकटा अधर्माची?॥९८॥ पशू पक्षी प्राणी सर्व। त्यागिती ना आपुला स्वभाव। नियत आचाराची शीव। नच कधी ओलांडिती॥९९॥ कृत आणि त्रेतायुगांत। शिवगणे होऊनि आविर्भूत। तुमच्या आज्ञेने वीरशैवमत। स्थापियले भूवरी॥१००॥ आचार-विचारांची शिकवण। दिली सर्व मानवांलागून। षट्स्थल पंचाचार बोधून। शिवाचार रुजविला॥१०१॥ तरी अधर्म-वाटेवरती। का चालते मानवजाती?। गूढ हेचि मजप्रती। उलगडेना प्राणनाथा'॥१०२॥ पार्वतीची ऐकूनि शंका। मुखी उमटली स्मितरेखा। शिव म्हणती 'मृत्युलोका-। माजी मानव वेगळा॥१०३॥ प्रकृतिधर्मानुसार। वर्तती पशू पक्षी जलचर। बुद्धिबळ लाभले अपार। केवळ मानवजातीस॥१०४॥ पशु-पक्षी-प्राण्यांहून। तो स्वत:स समजे महान। विचारस्वातंत्र्याचे वरदान। त्याला आहे लाभले॥१०५॥ तो स्वतंत्र

कर्माचरणात। म्हणूनि वर्तती मन:पूत। जपतो स्वार्थ आणि स्वहित। आपुल्या बुद्धीप्रमाणे॥१०६॥ पार्वती म्हणूनि मानवास। करावा लागे धर्मोपदेश। अन्य प्राणिजगतास। तो करावा लागेना॥१०७॥ कृत-त्रेतायुगी जाण। पंचाचार्यांनी अवतरून। वीरशैवधर्म स्थापून। सदाचार बोधिला॥१०८॥ मानवाहाती देऊनि लिंग। शिवभक्ती जागविली अभंग। शिवरूप चराचर जग। हा बोध पेरिला मनोमनी॥१०९॥ सदाचाराचे प्रवर्तन। केवळ धर्मचि करितो जाण। द्वेष-क्रोधासी निखंदून। मनांतून टाकितो॥११०॥ जागवूनि आत्मभाव। समान सर्व प्राणी मानव। शिकवूनि त्यांची लावितो नाव। मुक्तिपैलतीराशी॥१११॥ हे सर्वचि आधी घडले। मानव आत्मभावे वर्तले। भजन-पूजनी रमूनि गेले। कृत-त्रेतायुगांत॥११२॥ परंतु सरले त्रेतायुग। पुन्हा आंधळे झाले जग। आणि आक्रंदनाचा प्रसंग। धरेवरी ओढवला॥११३॥ उताराकडे जलाची धाव। तसा असे मनुष्यस्वभाव। अधर्माकडे धावे सदैव। झुगारूनि बंधने॥११४॥ त्रेतायुग सरत आले। म्हणूनि पार्वती सारे घडले। आता द्वापरयुगाचे लागले। वेध मृत्युलोकास॥११५॥ पुन्हा धर्म स्थापायाकारणे। शिवगणा आहे पाठविणे। त्यांच्या उपदेशामृते दुखणे। निमेल त्रस्त धरणीचे'॥११६॥ शिवप्रभूंची अमृतवाणी। माधुर्य जागवी अंत:करणी। ग्रीवा डोलडोलवूनी। शिवसभा ऐकिते॥११७॥ उमा पावली समाधान। म्हणे 'धन्य

देवा आपण। आता धरेचे दु:ख दारुण। दूर करावे तत्काळ'॥११८॥ शिवाने करिता नेत्रसंकेत। पंच शिवगण उठले त्वरित। साष्टांग घातले दंडवत। तिष्ठती कर जोडूनी॥११९॥ म्हणती 'स्वामी कैलासनाथा। आपुली आज्ञा वंद्य माथा। नेमूनि द्यावी आम्हा समर्था। देश आणिक शिवलिंगे'॥१२०॥ उभवूनिया दक्षिण कर। आशीर्वाद देती शंकर। म्हणती 'तुम्ही पंचगण चतुर। अंश माझे सर्वथा॥१२१॥ रेणुका तू प्रथम ऐक। तेलंगदेशी ग्राम सुरेख। कोल्लिपाकी नामक एक। तेथे सोमेश्वरलिंग असे॥१२२॥ एकाक्षरनामे कृतयुगात। एकवक्त्र नामे त्रेतायुगात। त्याच लिंगातूनि आविर्भूत। होऊनि तू कार्य केले॥१२३॥ आता द्वापरयुगी त्याठायी। रेणुकनामे अवतार घेई। वीरशैवमत स्थापूनि मही-। वरी वीरत्व वाढवी॥१२४॥ 'आज्ञा प्रमाण' म्हणून रेणुक। मागे सरले पाऊल एक। मग उभे ठाकले दारुक। ऐकावया शिवाज्ञा॥१२५॥ शिव म्हणती 'उज्जयिनी पुरी। तेथे सिद्धेश्वरलिंग वटक्षेत्री। तेथे अवतरित व्हावे सत्वरी। दारुकाचार्य नावाने॥१२६॥ द्व्यक्षरनामे कृतयुगी। द्विवक्त्रनामे त्रेतायुगी। तेथे अवतरूनि तू जगी। बोधिला मानवा सद्धर्म॥१२७॥ द्वापरी तेथेचि अवतार। घेऊनि बोधावा शिवाचार। उजळावे भक्तांचे अंतर। सद्धर्माच्या प्रकाशाने॥१२८॥ 'जी जी स्वामी' म्हणून। दारुक सरले पाउले दोन। पुढे येऊनि घंटाकर्ण। नमस्कारिती शिवाला॥१२९॥

शिव म्हणती ‘क्षेत्र द्राक्षाराम। तेथे रामनाथलिंग मनोरम। त्र्यक्षर त्रिवक्त्र घेऊनि नाम। अवतरला कृत-त्रेतायुगी॥१३०॥ त्याच लिंगातूनि सांप्रत। घंटाकर्ण नामे व्हावे अवतरित। वीरशैवमत स्थापूनि समस्त। जना वैराग्य बोधावे’॥१३१॥ ‘आज्ञा प्रमाण देवा’ म्हणून। मागे सरले घंटाकर्ण। मग शिवापुढे धेनुकर्ण। उभे राहिले बद्धपाणि॥१३२॥ शिव म्हणती ‘श्रीशैलक्षेत्र। तेथे मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग पवित्र। त्यातूनि चतुरक्षर चतुर्वक्त्र। नामे अवतरला कृत-त्रेती॥१३३॥ आता धेनुकर्ण नाव घेऊन। अवतरावे त्याच लिंगातून। धर्म स्थापून सूर्यासमान। तेजवृत्ती रुजवावी’॥१३४॥ ‘जी जी नाथा’ म्हणत पुढती। धेनुकर्ण मागे येती। विश्वकर्ण पुढे ठाकती। जोडूनिया द्वयपाणि॥१३५॥ शिव बोलती मंद हसून। ‘विश्वकर्णा तू ज्ञानसंपन्न। काशीक्षेत्री वसे महान। विश्वेश्वर ज्योतिर्लिंग॥१३६॥ कृतयुगात पंचाक्षर। त्रेतायुगात पंचवक्त्र। नामे धारण करूनि तू अवतार। घेतला याच लिंगातूनी॥१३७॥ द्वापरयुगी विश्वेश्वरलिंगातून। विश्वकर्ण नाम घेऊन। अवतार करावा धारण। वीरशैवमत स्थापावे॥१३८॥ पवित्र वस्तू ज्ञानाइतुकी। नाही नाही या त्रिलोकी। जगी मोक्षसाधने जितुकी। त्यात ज्ञान सर्वश्रेष्ठ॥१३९॥ शिवाचार रूढवी जगात। लोकांस करी ज्ञानवंत। ज्ञानदानाइतुके शाश्वत। त्रिलोकी दुजे दान नाही॥१४०॥ स्वस्वरूपाचे होता ज्ञान। षड्विकार

गळती मनातून। ज्ञानानेच सर्वकल्याण। मानवाचे होतसे॥१४१॥ ज्ञानपीठ नामे समस्त। जगती पीठ होईल विख्यात। तू वीरशैवधर्मरीत। जनी पूर्ण रूढवावी'॥१४२॥ 'आज्ञा शिरसावंद्य' म्हणूनी। उभे राहिले बद्धपाणि। शिवप्रभूंची अमृतवाणी। बोधी पंचगणांसी॥१४३॥ सकला शिवागमविचार। शिव बोधिती सविस्तर। मूलज्ञानी तरी निवले अंतर। पंच शिवगणांचे॥१४४॥ शिव म्हणती 'आगमविचार। त्याचा जगी करावा प्रसार। लिंगदीक्षा देऊनि नारीनर। उद्धरावे सकळीक॥१४५॥ पंचगणांनी पृथ्वीवर। धर्म स्थापिला म्हणतील नर। तरी 'पाचामुखी परमेश्वर'। हे वचन ध्यानी धरावे॥१४६॥ पंचाचार्यांच्या मुखांतून। मी शिवच बोलतो जाण। मुखे पाच स्वर पण। एकचि माझा असे की॥१४७॥ आणखी एक सांगतो गुज। पाच पीठांचे पाच ध्वज। परि त्यांचे अंतरंग सहज। एकचि असे जाणावे॥१४८॥ रंभापुरीचा हरिद्वर्ण। ध्वज असेल शोभायमान। हिरवा रंग करितो सूचन। सुफलता-समृद्धीचे॥१४९॥ कृषीमध्ये डोलता पीक। उजळे कृषीवलाचे मुख। अन्नानेच पोषिती देख। देह प्राणिमात्रांचे॥१५०॥ वृक्ष फुलती हिरवेगार। त्यांचा जीवनास आधार। तेणे वायूचा संचार। सर्वदूर होतसे॥१५१॥ उज्जयिनीपीठाचा ध्वज रक्तवर्ण। तो करितो त्यागवृत्तीचे सूचन। सांगे समृद्धीचे प्रयोजन। नसे एका जीवासाठी॥१५२॥ समृद्धीचा उपयोग। करूनि सुखवावे

अवघे जग। द्यावे रुधिरही येता प्रसंग। जीवास वाचविण्याचा॥१५३॥ आकाशाचे व्यापकपण। आणि सागराचे गंभीरपण। या दोहोंचे करी सूचन। केदारपीठाचा ध्वज निळा॥१५४॥ लौकिक आणि पारमार्थिक। व्यवहार करायासाठी चोख। ईश्वराने मन नामक। इंद्रिय दिले मानवाला॥१५५॥ मन आकाशासम विशाल। समुद्रासम गंभीर सखोल। करूनि मुक्तिवैभव जवळ। आणावे असे सांगतो॥१५६॥ श्रीशैलपीठाचा ध्वज शुभ्र। कथितो शुद्धता सात्त्विकता सुंदर। अंतर्बाह्य असावे समग्र। शुद्ध सात्त्विक सांगतो॥१५७॥ काशीपीठाचा ध्वज पीतवर्ण। तो परिपक्वतेचे लक्षण। सांगे मन पक्व झाल्यावाचून। ज्ञानप्राप्ती शक्य नव्हे॥१५८॥ पर्ण उगवता दिसे तांबडे। मग त्यावरी हिरवा रंग चढे। अंती ते पिकता पिवळे पडे। हीच असे पक्वता॥१५९॥ समृद्धी, त्याग, विशालता। शुद्धता आणि परिपक्वता। ही पंचतत्त्वे उपदेशिती सर्वथा। पंचपीठांचे पाच ध्वज॥१६०॥ आणखी तुम्हा शिवगणा। सांगतो काही आंतरखुणा। पंचभूतांचे अधिपती जाणा। तुम्ही पाच शिवगण॥१६१॥ रंभापुरीचे पृथ्वीतत्त्व। उज्जयिनीचे जलतत्त्व। केदारपीठाचे तेजस्तत्त्व। वायुतत्त्व श्रीशैलचे॥१६२॥ काशीपीठाचे तत्त्व आकाश। असे तुम्ही पंचतत्त्वांचे अधीश। पाचभौतिक देह अशेष। लाभले मानवमात्राला॥१६३॥ म्हणूनि जातिकुल न पाहता। मानवास उपदेशावे सर्वथा। समग्र मानवजातीस

पुरता। करावा तुम्ही उपदेश'॥१६४॥ असे शिवगणांस बोधून। उभे राहिले पंचानन। तत्क्षणी शिवसभा उठून। सकल उभी राहिली॥१६५॥ पार्वतीसह कैलासनाथ। गेले आपुल्या अंत:पुरात। शिवनामघोषे आसमंत। दुमदुमूनि राहिला॥१६६॥ पंचगणांनी मनोमन। शिवप्रभूंशी केले वंदन। आणि पुढे अवतारधारण। करावया सिद्ध झाले॥१६७॥ वीरशैव धर्मस्थापनेमागील। निवेदिली ही भूमिका सकल। ऐकूनि वाचूनि उजळेल। ज्ञानानंद श्रोतृमनी॥१६८॥ श्रीकाशीज्ञानसिंहासनाधीश्वर। जगद्गुरू महास्वामी श्रीचंद्रशेखर। त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर। रचितो शेषनारायण॥१६९॥ श्रीजगद्गुरू पंचाचार्य विजय रसाळ। परिसोत भाविक भक्त प्रेमळ। शिवभक्तमने व्हावी प्रफुल्ल। प्रथमोऽध्याय गोड हा॥१७०॥

॥ श्रीजगद्गुरु पंचाचार्यार्पणमस्तु ॥

□□

# अध्याय दुसरा

## श्रीरंभापुरीपीठ, वीरसिंहासन (पूर्वार्ध)

मंगलाचरण (ओवी १-७), लिंगोद्भव स्पष्टीकरण (८-२६), ज० रेणुकाचार्यांचे लिंगावतरण (२७-४४), ज० रेणुकाचार्य-भक्तसंवाद (४५-६०), मलयगिरीकडे प्रस्थान (६१-६६), अगस्त्यमहर्षींची कथा (६७-११५), ज० रेणुकाचार्यांचे आगमन, मलयपर्वतवर्णन (११६-१२०), अगस्त्यास रेणुकदर्शन, स्वागत (१२१-१२७), म० अगस्त्यांची शंका, लिंगधारण (१२८-१३३), पडविडि-सूत्रबोध, गुरु-शिष्याची भावावस्था (१३४-१३९), म० अगस्त्यकृत सूत्रविस्तार व धन्यता (१४०-१६२), ज० रेणुकांची आज्ञा (१६३-१६६), लंकानगरीतील लीला (१६७-१८९), ज० रेणुकांचे कार्य व ऐक्य (१९०-२०२), उपसंहार (२०३-२०८)

# अध्याय दुसरा

॥ श्रीगणेशाय नम:॥ श्रीजगद्‌गुरु रेणुकाचार्याय नम:॥

जय जय शिवा नागभूषणा। हिमनगजामाता उमारमणा। भूतपते सृष्टिकारणा। आनंद-वनविलासा॥१॥ सांबशिवा महादेवा। प्रणाम माझा स्वीकारावा। आणि आशीर्वाद द्यावा। मज ग्रंथरचनेचा॥२॥ तुझ्या नावे मारिता हाका। दुर्घट मार्ग होतो निका। पैलतीर गाठते नौका। संकल्पांची भक्तांच्या॥३॥ सामर्थ्य शून्य अंगातले। तरी मी लेखन आरंभिले। शिवा तुझ्या कृपाबळे। होईल पूर्ण निश्चित॥४॥ माझा होऊनि पाठीराखा। देवा माझी लाज राखा। निवारावी भयशंका। माझ्या मनीची दयाळा॥५॥ असो श्रोतेहो सावधान। मागील अध्यायी झाले कथन। शिवाज्ञेने पंच शिवगण। अवतार घ्यावया प्रवर्तले॥६॥ कोण्या लिंगातूनि कोण्या ठायी। ते प्रकट झाले दिव्यदेही। ते तुम्हांप्रती लवलाही। विस्ताराने सांगतो॥७॥ पंच शिवगण लिंगोद्‌भव। प्राकट्य त्यांचे अभिनव। शुद्ध अंत:करणाने हे सर्व। घ्यावे लागे जाणूनी॥८॥ लिंगातून झाले प्रकट। हे बुद्धीला कळेना नीट। भेद

वसतो मनी स्पष्ट। हे जड आणि चेतन हे॥९॥ जडातूनि झाले चेतन। तर्कबुद्धी मानी अप्रमाण। परि अद्‌भुत विश्वघटना पूर्ण। आकळिली ना कोणासी॥१०॥ पाषाणावरी न उगवे काही। सर्वमान्य हे असे तरीही। विहिरीच्या चिऱ्यावरती पाही। पिंपळपाने डोलती॥११॥ विश्वघटना अत्यद्‌भुत। तिचा न कवणा लागे अंत। तेथे मानवी बुद्धिसामर्थ्य। पडे तोकडे आजही॥१२॥ शिवमय असे सकल जगत्। उद्‌घोषिती शिवागम समस्त। शिवतत्त्व चैतन्याचा स्रोत। विश्व पूर्ण शिवरूप॥१३॥ जोवरी आहे भेददृष्टी। तोवरी चेतन-जड सृष्टी। मानवा लाभता अद्वैतदृष्टी। भेद मुळात संपतो॥१४॥ मग कोठले जड-चेतन?। सर्वचि शिवस्वरूप पूर्ण। प्रकटणे शिवलिंगातून। नवल येथे कोणते?॥१५॥ अत्यंत गूढ जे चैतन्य। त्याला 'जड' म्हणती जन। चर्मदृष्टीस जे जड भासे जाण। ते चेतन मूलतः॥१६॥ विश्वातील कणाकणांत। व्यापूनि राहिला भगवंत। या वचनाचा हाच अर्थ। विश्व चैतन्यमय असे॥१७॥ सामान्य शिला आणिक लिंग। यांमध्ये वसतो शंकर अभंग। परि शिलेहूनही शिवलिंग। विशेष गुणमंडित॥१८॥ देहदृष्टीने माणसे समान। पण संस्कार होता होती भिन्न। एक प्राकृत दुजा संस्कारसंपन्न। सहज दृष्टीस जाणवे॥१९॥ शिलेतून लिंग घडविले। त्यावरी पूर्ण संस्कार केले। उपरी मंदिरी प्रतिष्ठापिले। मंत्रघोषपूर्वक॥२०॥ असंख्य भक्तांची श्रद्धाभक्ती। एकवटली

लिंगावरती। तेणे शिवलिंगात शक्ती। असे सामान्य शिलेहून॥२१॥ जो शिवलिंगास म्हणे शिला। नर मानितो श्रीगुरूला। उच्छिष्ट म्हणे तीर्थप्रसादाला। पडे तो घोर नरकात॥२२॥ संतवचन हे ध्यानी घ्यावे। शिवलिंगास जड न मानावे। ते स्थूल दृष्टीने न पाहावे। शिव वसे म्हणूनी॥२३॥ अशा चिन्मय लिंगांतून। प्रकटले पंच शिवगण। त्यांचे झाले नाही जनन। ध्यानी घ्यावे लागते॥२४॥ प्राकट्य आणिक जनन। या दोहोंचे अर्थ भिन्न। ते न घेता समजून। वाद व्यर्थ घालिती॥२५॥ बालभक्त प्रह्लादासाठी। स्तंभातून प्रकटला जगजेठी। प्रकटले मार्कंडेयासाठी। लिंगातून शंकर॥२६॥ असे योगबळे पंच शिवगण। प्रकटले पाच लिंगांतून। प्रथम रेणुकगणाची पूर्ण। निवेदितो कहाणी॥२७॥ शिवाज्ञा घेऊनिया भूलोकी। पातले रेणुकगण विवेकी। सोमनाथमंदिरी कोल्लिपाकी। जमले होते भक्तगण॥२८॥ प्रात:काळी शिवभक्तगण। करिती शिवनामस्मरण। दोन बाहू उभारून। टाळ्या प्रेमे वाजविती॥२९॥ जय जय शिवा करुणावतारा। भक्तजनमानसविहारा। तत्पुरुषा अर्धनारी-नटेश्वरा। भाललोचना गिरीशा॥३०॥ पय:फेनधवला जगज्जीवना। षडास्यजनका कामदहना। विश्वव्यापका उमारमणा। भुजगभूषणा परब्रह्मा॥३१॥ वेदागमवंद्या ब्रह्मानंदा। अपरिमिता आनंदकंदा। भवभयांतका जगदानंदा। सर्गस्थित्यंतकारणा॥३२॥ आम्ही तुझे सद्भक्तगण। पादपद्मी तुझ्या

लीन। तव कृपाकटाक्षाने जीवन। आमुचे देवा बहरले॥३३॥ तुझ्या कृपेचा वरदहस्त। आमुच्या मस्तकी राहो सतत। तव नामातचि लीन चित्त। सदा आमुचे असू दे॥३४॥ अशी भक्त करिती स्तुती। आनंदविभोर होऊनि नाचती। हर्षे टाळ्या पिटूनि घुमती। शिवहर शिवहर नादात॥३५॥ क्षणात थरथरले मंदिर। गर्जूनि उठले अवघे अंबर। जणू विद्युल्लता घनघोर। मंदिरावरी कोसळली॥३६॥ लिंगी दाटले अद्भुत तेज। दीपले भक्तांचे नेत्र सहज। घुमावी महासागराची गाज। तसे मंदिर दुमदुमले॥३७॥ गाभाऱ्यातील प्रकाशामुळे। जणू नेत्रा अंधत्व आले। कर्णपटल बधिर झाले। अद्भुत ध्वनिकल्लोळे॥३८॥ असे लोटता काही क्षण। तेज ध्वनी निमाले पूर्ण। लिंगातूनि प्रकटली प्रसन्न। मूर्ती शिवगणाची॥३९॥ भस्मोद्धूलित शुभ्र शरीर। जणू प्रकटला कर्पूरगौर। रुद्राक्षभूषणे सर्वांगावर। रुळती अति साजिरी॥४०॥ मस्तकी घन जटाभार। त्यावरी विराजिले इष्टलिंग मनोहर। भाळी त्रिपुंड्र शोभे शुभ्र। हरित् कंथा कमरेस॥४१॥ दिव्य कांती सूर्यासमान। नेत्री दाटली कृपा सघन। कर झाले शोभायमान। दंड-कमंडलूंनी॥४२॥ अशी पाहता दिव्यमूर्ती। मन:सिंधूस आली भरती। भक्तिलाटांनी चिंब भिजती। मने सर्व भक्तांची॥४३॥ कोणासही न उरले भान। लोटले चरणावरी भक्तजन। चरणस्पर्शे मनोमन। अनुभविती

धन्यता॥४४॥ मग लोटता काही काळ। स्वस्थचित्त जहाले सकळ। म्हणती 'महाराजा आम्ही नवल। आज येथे देखिले॥४५॥ सोमनाथ लिंगातून। आपण प्रकटला शिवगण। आपण कोण आला कोठून। हे न ठाऊक आम्हांसी॥४६॥ लिंगातूनि प्रकट झाले। आजवरी न कर्णी आले। हे अद्भुत आज पाहिले। आज आमुच्या नेत्रांनी॥४७॥ तरी महाराजा आम्हा बोधून। करावे पूर्ण समाधान। आतुरले आमुचे कर्ण। शब्द आपले ऐकावया'॥४८॥ रेणुका दिधले उच्चासन। त्यावरी बसले शिवगण। शांत स्वरे बोलती हसून। देऊनि आशिष सकलांना॥४९॥ 'मी रेणुक गणनायक। पंच शिवगणांतील एक। सिद्धवंशसमूहात प्रमुख। शिवाज्ञे आलो भूतली॥५०॥ त्रेतायुग आता सरले। भूवरी द्वापरयुग अवतरले। मानव सगळे विस्मरले। धर्माचरण पूर्णतः॥५१॥ वायूमध्ये विरे कर्पूर। तसा सरला सदाचार। शत्रुवत् वर्तती नर। आत्मभाव विसरूनी॥५२॥ दर्पणावरी साठता धूळ। मलिन प्रतिमा दिसे केवळ। तसे हरवूनि आत्ममूळ। रतले विकृताचरणात॥५३॥ शिवप्रभूंची सर्व लेकरे। मुळात शिवांशचि सारे। अज्ञान-अहंकाराच्या भरे। स्वस्वरूप विसरले॥५४॥ त्यांना द्यावया आत्मभान। मी अवतरलो लिंगातून। मलयगिरीवरी महान। वीरपीठ आमुचे॥५५॥ त्या वीरपीठाकडून। करावे धर्मप्रबोधन। वीरशैवधर्म सनातन। रूढवावा भूतली॥५६॥ देऊनि लिंगदीक्षा

मानवा। आत्मभाव जागा करावा। वीरवृत्तीने आचरावा। त्यांनी पूर्ण शिवाचार॥५७॥ या कार्यास्तव शिवाज्ञेने। माझे झाले भूतली येणे। मलयपर्वताकडे त्वरेने। जाणे आहे मज आता॥५८॥ अशा अधर्मग्रस्त काळात। तुम्हांसारिखे काही भक्त। शिवभक्तीची निर्मल ज्योत। तेवत ठेविती निष्ठेने॥५९॥ हे पाहूनि जहाला मोद। घ्यावा भक्तिरसाचा स्वाद। कल्याणमस्तु मंगलाशीर्वाद। देऊनि तुम्हा निघतो मी'॥६०॥ असे बोलूनि क्षणभर एक। स्तब्ध जहाले आचार्य रेणुक। कोण्या ऋषीस बोधावे देख। विचार करिती मानसी॥६१॥ जाणे आहे मलयपर्वती। तेथे मुनी अगस्त्य वसती। विनय-सौजन्याची मूर्ती। तपोनिष्ठ विवेकी॥६२॥ पूर्वी स्कंदे शिवधर्मोत्तर। शास्त्र बोधायाचा केला विचार। तेधवा अगस्त्यास साचार। निवडूनि पूर्ण बोध केला॥६३॥ वेदागमांचे करूनि मंथन। सारसर्वस्व केले ग्रहण। अंतरी पूर्ण आत्मलीन। सिद्धिप्राप्त अगस्त्य॥६४॥ अशा बुद्धिनिष्ठ महर्षीस। करावा शिवसिद्धान्तोपदेश। तेणे उजळेल जगी प्रकाश। सदाचार-सद्धर्माचा॥६५॥ असा निश्चय करूनि पूर्ण। स्वस्थ जहाले रेणुकगण। मग आकाशमार्गे केले गमन। मलयगिरीच्या दिशेने॥६६॥ श्रोतेहो सांगेन तुम्हा संक्षिप्त। महर्षी अगस्त्याचा वृत्तांत। कळेल मग का अगस्त्याप्रत। रेणुकांनी बोधिले?॥६७॥ पूर्वी धरेवरी राजा नहुष। त्याला इंद्रपदाची आस। शत अश्वमेध यज्ञ

विशेष। त्याने केले यथासांग॥६८॥ शत यज्ञ पूर्ण करिता। इंद्रपद आले हाता। अहंकारे भरूनि पुरता। भडकला माथा तयाचा॥६९॥ मग पालखीमध्ये बसून। निघाला कराया स्वर्गारोहण। सप्तर्षींस पाचारून। पालखी दिली खांद्यावरी॥७०॥ त्यात एक अगस्त्य मुनी। निघाले स्कंधी पालखी घेऊनी। त्यांची देहयष्टी ठेंगणी। अन्य ऋषींच्या तुलनेने॥७१॥ नहुष जहाला उतावीळ। म्हणे 'चला वायुवेगे सकळ। कधी बसेन इंद्रपदी अढळ। असे मजला जहाले॥७२॥ पृथ्वीवरी मी श्रेष्ठ नृपती। संपादिली मी दिगंत कीर्ती। दुर्लभ इंद्रपदाची प्राप्ती। मजला केवळ जहाली'॥७३॥ 'सर्प सर्प' म्हणजे चला चला। ऋषींस म्हणे वेळोवेळा। राजदंडाने ऋषिदेहाला। टोचे पशूसारखा॥७४॥ अगस्त्यांची मूर्ती लहान। त्यांचे पाऊल पडे सान। भरभरा चालणे जमे न। तेणे नहुष क्षोभला॥७५॥ 'सर्प सर्प' असे ओरडत। अगस्त्यासी मारिली लाथ। तत्क्षणी क्षोभले अगस्त्य शांत। टाकिली खाली पालखी॥७६॥ पूज्य मुनींच्या अवमानामुळे। नहुषाचे सर्व पुण्य सरले। इंद्रपद हातातूनि गेले। झाला सामान्य मानव॥७७॥ अगस्त्यासी आला कोप। नहुषाला दिधला शाप। 'नहुषा म्हणसी सर्प सर्प। सर्परूप होशील तू'॥७८॥ तत्क्षणी सर्व पालटले। नहुष सर्प होऊनि डोले। क्रोधामुळे उणे झाले। पुण्य शत यज्ञांचे॥७९॥ अशी कथा आहे पुराणी। क्रोधे केवढी होते हानी।

बोधिते सर्व मनुजांलागूनी। नहुषाची ही कथा॥८०॥ असो काशीक्षेत्र पवित्र। तेथे जगाचे जीवनसूत्र। विश्वेश्वररूपाने त्रिनेत्र। सर्वकाळ नांदतसे॥८१॥ त्या काशीक्षेत्री महान। होता अगस्त्याश्रम प्रसन्न। वैरभाव विसरून। सर्व प्राणी नांदती॥८२॥ उत्तर दक्षिण आर्यावर्त। त्याच्या मध्यभागी स्थित। होता विंध्याचल पर्वत। अगस्त्यशिष्य साजिरा॥८३॥ एकदा नारद ब्रह्मपुत्र। गेले विंध्याचली पवित्र। वनश्री पाहूनि त्यांचे नेत्र। सुखावले अपार॥८४॥ मनुष्यरूपे विंध्य आला। कर जोडूनि उभा राहिला। म्हणे 'आज लाभ झाला। ऋषिपदरजाचा॥८५॥ आपण थोर योगीश्वर। आणिक मीही धराधर। माझे पूर्वपुण्य अपार। आज झाले फलद्रूप'॥८६॥ नारद म्हणती 'गिरिवरा। अहंकार हा नव्हे बरा। पृथ्वीवरती मेरू खरा। सर्वोच्च आहे धराधर'॥८७॥ विंध्य म्हणे रागावून। 'मीच धराधर उंच महान। मेरूहूनही उंच होऊन। मी दाखवीन तुम्हांस'॥८८॥ विंध्यपर्वतास डिवचून। नारद गेले पुढे निघून। विंध्य गर्वाने दिनोदिन। चढू लागला आकाशी॥८९॥ उत्तर दक्षिण दोन भाग। विंध्यामुळे झाले विलग। चिंताक्रांत जहाले जग। देव मानव सर्वही॥९०॥ अगस्त्यशिष्य विंध्यपर्वत। म्हणूनि गेले अगस्त्याश्रमात। सादर वंदूनि सर्व वृत्त। त्यांच्या कर्णी घातले॥९१॥ म्हणती 'तुमचा शिष्य विंध्य। तो जहाला भिंत अभेद्य। केला दक्षिणमार्ग अवरुद्ध। मुने तुमच्या

शिष्याने॥९२॥ मुने आपण सर्वज्ञानी। मार्ग काढावा यामधूनी। विंध्य शिष्यवरा बोधूनी। संकटमोचन करावे'॥९३॥ अगस्त्य म्हणती 'मी येथे कुशल। गंगास्नान करितो त्रिकाल। विश्वेश्वरदर्शनात काळ। घालवितो आनंदे॥९४॥ तुमचे कराया संकटमोचन। त्यागावे लागेल आनंदकानन। विंध्यास जाता ओलांडून। पुन्हा परत येता नये॥९५॥ गंगा-विश्वनाथाचा वियोग। मज अखंड भोगणे भाग। पुन्हा त्यांच्या दर्शनाचा प्रसंग। येणे नाही या जन्मी॥९६॥ परि तुमची व्याकुळता। पाहून भोगीन मोदे व्यथा'। असे बोलूनि केली सिद्धता। दक्षिणदेशी जाण्याची॥९७॥ पत्नीसह दक्षिणेकडे। त्यांचे एकेक पाऊल पडे। मार्गी चालता आला पुढे। आडवा विंध्यपर्वत॥९८॥ गुरूस पाहून झाला हर्षित। केला प्रणाम दंडवत। अंबर स्पर्शणारी शिखरे समस्त। झुकली प्रणाम करिताना॥९९॥ जेव्हा विंध्य खाली झुकला। दक्षिणमार्ग झाला खुला। उत्तर दक्षिण भेद मिटला। एक झाला आर्यावर्त॥१००॥ करिता साष्टांग नमस्कार। 'ऊठ' म्हणेना गुरू जोवर। शिष्याने खाली पडूनि तोवर। तसेच राहावे लागते॥१०१॥ श्रीगुरू अगस्त्यासमोर। विंध्याने घातला नमस्कार। त्यास 'ऊठ' न म्हणता मुनिवर। तसेच गेले निघूनी॥१०२॥ अगस्त्य मुनी दक्षिणेकडून। पुन्हा नाही आले परतून। विंध्यही राहिला तसाच झुकून। आजवरी, ही पुराकथा॥१०३॥ असे विंध्यास नमविले।

अगस्त्य दक्षिणदेशी गेले। तव तेथे काय वर्तले। नवल तेही सांगतो॥१०४॥ वातापी इल्वल दानव प्रबळ। त्यांनी माजविला कल्लोळ। मायावी रूपे घेऊनि सकळ। मानवसत्र आरंभिले॥१०५॥ इल्वल घेऊनि गृहस्थरूप। यात्रिकाचे आतिथ्य करी खूप। वातापी घेऊनि अन्नरूप। शिरे त्याच्या उदरात॥१०६॥ इल्वल हाक मारी त्यास। उदर फाडूनि येई राक्षस। असा वाटसरूंना त्रास। राक्षसांनी दिला बहू॥१०७॥ अगस्त्यावरी तोच प्रयोग। त्यांनी केला यथासांग। भोजन केल्यावरती मग। पोट फुगू लागले॥१०८॥ अगस्त्य मुनी महाज्ञानी। त्यांच्या ध्यानी आली करणी। भस्म लावूनि पोटावरूनी। हात सहज फिरविला॥१०९॥ 'जीर्णो भव' असे म्हणता। वातापी जठरी पचला पुरता। पुन्हा न आला जगी मागुता। नरसंहार कराया॥११०॥ असेच कालकेय दानव। त्यांनी त्रासिले देव-मानव। संहार करूनि लपती सर्व। समुद्राच्या उदरात॥१११॥ समुद्र पूर्ण शोषिल्याविना। त्यांचा नाश करिता येईना। म्हणूनि देवांनी केली प्रार्थना। अगस्त्यापुढे जाऊनी॥११२॥ त्यांनी एकाच आचमनात। समुद्रजल प्राशिले समस्त। मग सापडले चिखलात। कालकेय राक्षस॥११३॥ देवांनी त्यांचा वध करून। केले मानवसंकटमोचन। मलयपर्वती आश्रम स्थापून। अगस्त्य राहिले पत्नीसह॥११४॥ अशी अगस्त्यमुनीची महती। सांगितली श्रोतयांप्रती।

आता पुढे मलयपर्वती। काय घडले ते ऐका॥११५॥ अगस्त्यास बोधावे आपण। असा मनी विचार करून। आकाशमार्गे कोल्लिपाकीहून। रेणुक आले मलयावरी॥११६॥ निसर्गसुंदर मलयाचली। बहरूनि डोलती वृक्षवेली। विविध पुष्पगंधे घमघमली। तेथली गिरिकंदरे॥११७॥ पर्वताच्या गूढ गुहांतून। योगसाधनी ऋषी लीन। मंद स्वरातील शिवस्मरण। कर्णावरी ये हलकेच॥११८॥ घन वृक्षांनी वेढलेला। तेथे अगस्त्याश्रम वसलेला। फुलझाडांना ऋषिबाला। जल घालिती सप्रेमे॥११९॥ आश्रमाच्या सभोवताली। बागडिती हरीणपाडसे कोवळी। क्षणात उधळूनि अंतराळी। दडती वृक्षराजीत॥१२०॥ चंदनतरूखाली आसन। घालून बसले अगस्त्य महान। ऋषिसमूह त्यांना वेढून। शांतचित्ते बसलेला॥१२१॥ उडुगणांत शोभे चंद्र। की शिवगणांत भालचंद्र। तसे ऋषिसमूहात भद्र। शोभती मुनी अगस्त्य॥१२२॥ क्षणभर त्यांची दृष्टी वळली। तोच रेणुकमूर्ती दिसली। क्षणात सर्व ओळख पटली। उठले आसनावरून॥१२३॥ आनंद सामावेना मनी। लगबगे सामोरी आले मुनी। प्रणाम दंडवत घालूनी। कर जोडूनि तिष्ठती॥१२४॥ म्हणती 'गणेश्वरा साक्षात्। आपण दर्शन दिले येथ। माझे धन्य झाले जीवित। मजसम नाही सभाग्य॥१२५॥ पर्णकुटीत स्वामिया यावे। आम्हा सकला धन्य करावे। आम्हांस वीरशैवशास्त्र बोधावे। समूळ आणि संपूर्ण'॥१२६॥ रेणुक

आश्रमात गेले। लोपामुद्रेने पद प्रक्षाळिले। उच्चासनावरती बसविले। पूजन केले यथासांग॥१२७॥ अगस्त्य म्हणती रेणुकांस। 'नाना आगमांचा केला अभ्यास। परि संभ्रमित झाले मानस। मतमतांतरे पाहूनी॥१२८॥ तरी जे परिसता शास्त्र थोर। मम चित्तभ्रम होईल दूर। ते कृपा करूनि मजवर। आज मजला बोधावे'॥१२९॥ अगस्त्याचे निर्मल मन। पाहूनि रेणुक झाले प्रसन्न। म्हणती 'सूत्ररूपाने करीन। तुला उपदेश यावेळी॥१३०॥ त्याचे करूनि चिंतन-मनन। घ्यावास तू गूढार्थ जाणून। मग हे शिवशास्त्र परिपूर्ण। जगी प्रकट करावे॥१३१॥ परि सूत्र बोधण्याआधी। करावा लागेल दीक्षाविधी। लिंगधारण करिता सिद्धी। तुला पुरती लाभेल'॥१३२॥ वेधा मांत्री क्रिया तीन। दीक्षा अगस्त्यासी देऊन। विधिवत् करूनि लिंगधारण। सूत्रबोध आरंभिला॥१३३॥ गुरू आणि शिष्य स्वस्थ। क्षणैक झाले एकचित्त। रेणुकांनी अगस्त्यकर्णात। 'पडविडी' सूत्र प्रेरिले॥१३४॥ एकसुरातील वीणा दोन। त्यातील एक छेडिता कोण। मग दुसऱ्याही वीणेतून। तोच नाद झंकारतो॥१३५॥ तसे गुरुशिष्य समचित्त। होता, न सांगता कळे गूढार्थ। पडविडी सूत्राचा पूर्ण भावार्थ। अगस्त्यास उमजला॥१३६॥ दोन्ही हृदये एक झाली। मग सहज मौनाची कळे बोली। शिवाद्वैतावस्थाच लाभली। दोघांसही तेधवा॥१३७॥ असा लोटला कितीक काळ। गुरु-शिष्य बसले निश्चल।

न्याहाळिती ऋषी सकळ। आंतरगुज दोघांचे॥१३८॥ मग भान आले क्षणमात्र। त्यांनी उघडिले आपुले नेत्र। अगस्त्यनयनी गूढ पवित्र। दिसे काही दाटलेले॥१३९॥ अगस्त्य बोलती कर जोडून। 'जगद्गुरो झाले धन्य जीवन। आज उगवला अमृतक्षण। तुमच्या उपदेशाने॥१४०॥ 'पडविडी' हे सूत्र बोधिले। तेणे हृदयाकाश उजळून गेले। मज जन्मसाफल्य लाधले। ठरलो श्रेष्ठ ऋषींत॥१४१॥ आपण बोधूनि पदविधी। जणू बसविले परमपदी। मज जे उमजले ते आधी। निवेदितो तुम्हांपुढे॥१४२॥ पद म्हणजे परमपद। जे अनिर्वचनीय स्वयंसिद्ध। जे प्राप्त कराया सिद्ध प्रबुद्ध। जीवन पणा लाविती॥१४३॥ ते शुद्ध बुद्ध नित्य मुक्त। ब्रह्मांडापल्याडचे त्रिकालाबाधित। ते बृहद् सूक्ष्म गुणातीत। चहु वाचांपलीकडले॥१४४॥ ते शांत निरंजन सनातन। सर्वज्ञ आणि सर्वशक्तिमान। निर्विकार निराकार निर्गुण। सच्चिदानंदस्वरूप॥१४५॥ ते अद्वितीय अनिर्देश्य। जगत्कारण निरंकुश। प्रमाणागोचर अविनाश। स्वयंप्रकाश विश्वोतीर्ण॥१४६॥ ते विश्वरूप विश्वातीत। देशवस्तु-कालविरहित। ब्रह्मांडा अंतर्बाह्य व्याप्त। एकमेव परब्रह्म॥१४७॥ ते पद प्राप्त करायासाठी। साधना करिती आटाआटी। जपतपाची बंधने मोठी। घेती अंगी लादूनी॥१४८॥ गणेश्वरा या परमपदी। बसावया करणे लागे विधी। ती साधनापद्धती बुद्धि-। पूर्वक आपण निवेदिली॥१४९॥ जन्मोजन्मी

पुण्यसंचय। करूनि करावा पापक्षय। मनचि पूर्ण निरामय। व्हावे गंगोत्रीसारखे॥१५०॥ अशा परिशुद्ध अंतरात। श्रद्धाभक्ती होई उदित। पिंडस्थली होऊनि भक्त। आरंभितो प्रवास॥१५१॥ बीजामध्ये वसतो अंकुर। तसा जीवाहृदयी वसे शंकर। असा होई साक्षात्कार। पिंडस्थली भक्तासी॥१५२॥ देहेंद्रिये-बुद्धीहून। आत्मा वेगळा परिपूर्ण। 'मी' आणि 'माझे' हे भिन्नपण। त्याच्या प्रकाशे बुद्धीत॥१५३॥ नित्य-अनित्यवस्तुविवेक। जागे त्याच्या अंतरी चोख। इह-स्वर्गभोग क्षणिक। प्रत्ययास त्याच्या ये॥१५४॥ देह अनित्य आत्मा नित्य। क्षणभंगुर मित्र, द्रव्य समस्त। हे जाणूनि विषयसुखात। होई उदासीन सहजचि॥१५५॥ मग श्रीगुरूचे धरी पाय। सर्वभावे शरण जाय। सेवा करूनि त्यांचे अभय। मिळवी मन राखूनी॥१५६॥ गुरू करिती शिवसंस्कार। बोधिती षट्स्थल पंचाचार। लिंगदीक्षा देऊनि थोर। त्याची महिमा सांगती॥१५७॥ पंचाक्षरमंत्र महान। उपदेशिती कर्णी पूर्ण। जपपद्धती विवरून। त्यास मार्गी लाविती॥१५८॥ भस्म-रुद्राक्ष करूनि धारण। नित्य जपणे मंत्र महान। लिंगधारण लिंगपूजन। यात रमे भक्त तो॥१५९॥ मग परमपदाकडे। त्याचे एकेक पाऊल पडे। षट्स्थले लंघूनि त्याला घडे। प्राप्ती परमपदाची॥१६०॥ परमपदप्राप्तीचे जे साधन। तोच हा विधी परमपावन। गणेश्वरा उमजला पूर्ण। मज तुमच्या कृपेने॥१६१॥ असे हे

पडविडिसूत्र। अंतरी प्रकाशले पवित्र। असावे आपुले कृपाछत्र। मम मस्तकी सर्वदा'॥१६२॥ संतोषूनि म्हणती रेणुक। 'अगस्त्या शिष्योत्तमा ऐक। सूत्रप्रसार करूनि त्रिलोक। टाकी आता भारूनी॥१६३॥ लिंगदीक्षित होता जन। उजळेल शिवाचार पावन। तेणे चित्ता लागूनि वळण। नष्ट होईल अनाचार॥१६४॥ परस्परांतील सरले मैत्र। जन वर्तती विक्षिप्त विचित्र। त्यांना बोधूनि आत्मसूत्र। सन्मार्गावरी आणावे॥१६५॥ अंतर्बाह्य व्यापिला शिव। अशी होता पूर्ण जाणीव। मानवचि मग होईल देव। या सूत्राच्या प्रभावाने'॥१६६॥ असे बोधिले अगस्त्य मुनिवर। स्वीकारिला पूजोपचार। मग रेणुक आकाशमार्गे सत्वर। आले लंकानगरीत॥१६७॥ रेणुकाचार्य आले आले। असे सर्वत्र विदित झाले। लंकानगरीचे सकळ जमले। दर्शनास्तव पौरजन॥१६८॥ भस्मोद्धूलित शरीराकृती। भासे दुजा कैलासपती। रुद्राक्षांच्या माळा रुळती। कंठामध्ये साजिऱ्या॥१६९॥ तेज:पुंज मुखमंडल। भाळी विलसे त्रिपुंड्र धवल। आजानुबाहू नेत्र विशाल। कमलदलासारिखे॥१७०॥ पाहूनि असे रूप सुंदर। संतुष्ट जहाले नारीनर। पद स्पर्शूनि धन्यता अपार। अनुभविती मानसी॥१७१॥ लंकानरेश बिभीषण। वार्ता कळताच आला धावून। भक्तिभावे वंदूनि चरण। प्रार्थी

रेणुकाचार्यांसी॥१७२॥ अत्यादरे प्रासादात। घेऊनि आला वाजतगाजत। उच्चासनी बसवूनि समस्त। पूजोपचारे पूजिले॥१७३॥ मग म्हणे द्वय कर जोडून। 'आपण प्रत्यक्ष शिवगण। पूर्वपुण्ये तुमचे चरण। आज पाहिले नेत्रांनी॥१७४॥ पदस्पर्शाने लंका पुनीत। राक्षसवंश झाला कृतार्थ। खराच ठरलो भाग्यवंत। आज मी या जगामध्ये'॥१७५॥ असे भक्तिभावे बोलून। जगद्गुरूंचे वंदी चरण। मग मंद घुमावा घन। तसे रेणुक बोलले॥१७६॥ 'बिभीषणा तू सर्वज्ञ शांत। रावणभ्राता भाग्यवंत। तुझा कीर्तिडिंडिम जगात। दुमदुमतो सर्वत्र॥१७७॥ दुर्लभ जगी जी शिवभक्ती। ती स्थिर वसे तुझ्या चित्ती। धर्माचरणी तुझी प्रवृत्ती। तशी अध्यात्मशास्त्रातही॥१७८॥ ती पाहूनि मी झालो प्रसन्न। तरी माग काही वरदान। तुझे ईप्सित मी पुरवीन। असेल मंगल निश्चित ते'॥१७९॥ बिभीषण म्हणे गणनाथा। रावण माझा ज्येष्ठ भ्राता। शिवभक्तांमध्ये सर्वथा। सर्वश्रेष्ठ होता तो॥१८०॥ इंद्रादी देव दाती तृण। धरूनि त्याला आले शरण। राज्यवैभव गमावून। दास बनले तयाचे॥१८१॥ पुढे होऊनि चारित्र्यहत। सीतेस केले अपहृत। मग रामाने वधिला रणात। पडला विकल भूमीवरी॥१८२॥ तेव्हा कंठी धरूनि प्राण। बोलला मजशी होऊनि दीन। 'बिभीषणा माझी अपूर्ण।

एक कामना राहिली॥१८३॥ दैवे जहालो मी पराभूत। मृत्यू उभा पुढे मूर्तिमंत। नवकोट लिंगे स्थापणे लंकेत। असा संकल्प केला मी॥१८४॥ सहा कोटी झाली स्थापून। तीन कोटी राहिली अजून। माझा संकल्प करावा पूर्ण। देई मजला वचन हे'॥१८५॥ रावणास मी वचन दिले। आणि त्याने प्राण सोडिले। परि अजून नाही झाले। दिलेले वचन पूर्ण ते॥१८६॥ तीन कोटी लिंगे स्थापन। कराया आचार्य कोणी मिळे न। तरी आचार्य होऊनि आपण। इच्छा मनीची पुरवावी'॥१८७॥ ऐकूनि बिभीषणाचे वचन। तथास्तु म्हणती रेणुकगण। मग त्रिकोटी आचार्यरूपे घेऊन। लिंगे स्थापिली यथाविधी॥१८८॥ अशक्य जे ते शक्य झाले। बिभीषणाचे मन संतोषले। कृपाशीर्वाद देऊनि पावले। अंतर्धान जगद्‌गुरू॥१८९॥ श्रोतेहो ही सत्य कहाणी। त्याचे प्रमाण पाहावे नयनी। श्रीलंकेत जाफना प्रांती अजूनी। किरुमलै नामे ग्राम आहे॥१९०॥ तेथे रेणुकाश्रम, रेणुकवन। रेणुकस्मृती जपती अजून। वीरशैवांची वस्ती पूर्ण। हीच कहाणी सांगते॥१९१॥ बोधिले जना शिवाद्वैत। रूढविले जगी वीरशैवमत। सहवासाने केले कृतार्थ। कित्येक सद्‌भक्तांसी॥१९२॥ नास्तिक दर्शनास खंडिले। सिद्धसमूहांस जिंकिले। आपुले सामर्थ्य दाखविले। पाखंडी

दुराचाऱ्यांना॥१९३॥ शिवसिद्धान्त प्रतिष्ठापून। मग शिवसामरस्याची कांक्षा धरून। जवळ केले मूलस्थान। कोल्लिपाक आपुले॥१९४॥ रेणुकाचार्य आले आले। वृत्त असे कानी पडले। दर्शनास्तव भक्त जमले। सोमनाथमंदिरी॥१९५॥ उभे राहूनि बद्धपाणि। रेणुक स्तविती शूलपाणि। पाहती नेत्र विस्फारूनी। भक्त काय घडते ते॥१९६॥ 'देवाधिदेवा उमापती। तू सकल जगताचा अधिपती। कारण तू विश्वाच्या उत्पत्ती। स्थिती आणि लयासी॥१९७॥ हे परमेश्वरा रक्ष रक्ष। हे पार्वतीपते रक्ष रक्ष। केला भूमंडळी प्रत्यक्ष। तुझ्या आज्ञेने संचार॥१९८॥ तुझ्या स्वरूपी सामावून। घेई सत्वर न लगता क्षण'। तोच सोमेश्वरलिंगातून। स्वर गंभीर उमटला॥१९९॥ 'येई महानुभाव वत्सा त्वरित। तव भक्तीने मी प्रसन्नचित्त। ये ये ये' असा मंदिरात। घुमूनि नाद राहिला॥२००॥ तत्क्षणी फाकले लिंगातून। तेज:पुंज दिव्य किरण। रेणुकमूर्ती तळपून। सामावली लिंगात॥२०१॥ शिवयोगी होऊनि चकित। होते स्तुतिस्तोत्रे गात। भक्तगण असता पाहात। लिंगी झाले एकरूप॥२०२॥ रेणुकांनी अगस्त्यालागून। जो सूत्रबोध केला महान। तोच विवरिला पुढती पूर्ण। शिवयोगी शिवाचार्यांनी॥२०३॥ घेऊनि शिवागमांचा आधार। त्याच सूत्राचा केला विस्तार। ज्यात ग्रथिला

तो ग्रंथ थोर। 'श्रीसिद्धान्तशिखामणी'॥२०४॥ श्रोतेहो रेणुक जीवनकहाणी। पूर्ण निवेदिली तुम्हालागूनी। पुढे रेवणसिद्ध नाम घेऊनी। कलियुगात प्रकटले॥२०५॥ त्यांनी विचरूनि महीवर। केले लीलाचमत्कार। ते पुढील अध्यायी सार-। रूपे सांगेन श्रोत्यांना॥२०६॥ श्रीकाशी-ज्ञानसिंहासनाधीश्वर। जगद्गुरू महास्वामी श्रीचंद्रशेखर। त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर। रचितो शेषनारायण॥२०७॥ श्रीजगद्गुरू पंचाचार्य विजय रसाळ। परिसोत भाविक भक्त प्रेमळ। शिवभक्तमने व्हावी प्रफुल्ल। द्वितीयोऽध्याय गोड हा॥२०८॥

॥ श्रीजगद्गुरु पंचाचार्यार्पणमस्तु॥

□□

# अध्याय तिसरा

## श्रीरंभापुरीपीठ, वीरसिंहासन (उत्तरार्ध)

मंगलाचरण, पूर्वसूत्र (ओवी १-११), वीरपीठ (१२-१४), वीरभद्र-कथा (१५-५२), ज० रेवणसिद्ध-माहात्म्य (५६-६७), आद्य शंकराचार्यांना लिंगप्रदान कथा (६८-१२८), ज० रेवणसिद्धांची भ्रमंती (१२९-१३३), वरदराज शिरकंपन कथा (१३४-१८१), यक्षदंपती उद्धार कथा (१८२-२१०), राजा विक्रमास खड्गप्रदान (२११-२२१), गोरक्षगर्वहरण कथा (२२२-२६८), गोरक्षास लिंगदीक्षा व तत्त्वोपदेश (२६९-२९६), सिद्धरामेश्वर जन्मभविष्य कथन (२९७-३३०), अवतारसमाप्ती व स्मृतिस्थाने (३३१-३३८), ज० श्रीरंभापुरीपीठाधीश्वर व त्यांचे कार्य (३३९-३६१), उपसंहार(३६२-३६५)

# अध्याय तिसरा

॥ श्रीगणेशाय नम:॥ श्रीजगद्‌गुरु रेवणाराध्याय नम:॥

जय जय शिवा अजनीश्वरा। त्रिपुरांतका विश्वेश्वरा। भस्मोद्धूलितविग्रहा कठोरा। सोम-सूर्याग्नि-लोचना॥१॥ विश्वनाथा विश्वव्यापका। परशुहस्ता मदनांतका। दक्षाध्वरहरा सात्त्विका। सहस्रपदा महादेवा॥२॥ तुझे नाम घेता वदनी। विघ्ने पळती दशदिशांनी। क्षणार्धात जाय उजळूनी। अंधारवाट सामोरी॥३॥ हाती धरिता दिवटी सानुली। अंधार पळे आल्या पावली। मग तेजोनिधीपुढती खेळी। त्याची कशी चालेल?॥४॥ तसे अज्ञानतमाचे जाळे। फिटे तुझ्या नामामुळे। चित्ताकाश होऊनि मोकळे। भरे ज्ञानप्रकाशाने॥५॥ तुझ्या नामाचे घेऊनि बळ। माझी चालली वाटचाल। तुझे लाभता पाठबळ। भीती मला कशाची?॥६॥ म्हणूनि तू साह्य व्हावे। मनोरथ माझे पूर्ण करावे। मजकडूनि गाऊनि घ्यावे। पंचाचार्यमाहात्म्य॥७॥ असो श्रोतेहो गताध्यायात। द्वापरयुगाची कथिली मात। रेणुकाचार्यांची महिमा विख्यात। श्रवणपथा आणिली॥८॥ अगस्त्यमुनीस परमपवित्र। रेणुके बोधिले

पडविडी सूत्र। ते परिसूनि धाले श्रोत्र। अगस्त्यादी ऋषींचे ॥९॥ मग बोधूनि नारीनर। शिवभक्तीचा केला प्रसार। वीरसिंहासन भूषवूनि थोर। आबालवृद्ध उद्धरिले॥१०॥ अंती सोमेश्वरलिंगात। विलीन झाले क्षणार्धात। रेणुकाचार्यांचे हे विख्यात। चरित्र तुम्ही ऐकिले॥११॥ चिक्कमगळूर प्रांती कर्नाटकात। रंभापुरीपीठ अवस्थित। वीरपीठ नामेही सांप्रत। त्यास जन संबोधिती॥१२॥ पूर्वदिशा, पडविडी सूत्र। अश्वत्थदंड, वीरगोत्र। कंथा हरित्वर्ण पवित्र। बीजमंत्र 'न'कार असे॥१३॥ शिवपुत्र वीरभद्र। तोच गोत्रपुरुष थोर। त्याचे विलक्षण चरित्र। वर्णिले शिवपुराणी॥१४॥ तेच येथे करू वर्णन। मग कलियुगीची कथा सांगेन। आता द्यावे अवधान। वीरभद्रकथेकडे॥१५॥ दक्षकन्या दाक्षायणी। जी शिवाची सहचारिणी। 'सती' नामे शिवपुराणी। असे सर्वविख्यात॥१६॥ दक्ष ब्रह्मदेवाचा सुत। कैलासनाथ त्याचा जामात। परि शंकराप्रती त्याचे चित्त। पूर्ण दूषित झालेले॥१७॥ ज्यास वंदिती विष्णू विधी। त्या शिवशंकरास निंदी। शिवनिंदेत कुटिल बुद्धी। परमावधी गाठली॥१८॥ म्हणे 'फासतो चिताभस्म। कटीस वेढितो गजचर्म। नंदीबैल वाहन परम। बसून हिंडे सर्वत्र॥१९॥ स्मशानचि याचे घर। गळा घालितो सर्पहार। भूतप्रेते याचे सहचर। भिक्षा मागे कवटीत॥२०॥ जटेतूनि सर्वकाळ। खळखळ करीत वाहे जळ। विरूप नेत्री याने विक्राळ। प्रलयाग्नीस

राखिले॥२१॥ यास कधी क्रोध येईल। वाटे अवघे जगचि जाळील। याच्या मायबापाचे मूळ। कोणा सांगता येईना'॥२२॥ असा दक्ष सदासर्वदा। कुटिल भावे करी निंदा। देव म्हणती 'येणे विपदा। तुझ्यावरी ओढवेल॥२३॥ शिव सकळ जगाचा नाथ। नेणसी त्याचा महिमा अद्भुत। थाऱ्यावरी तुझे चित्त। नाही दक्षा राहिले'॥२४॥ परि त्यांचा करूनि अव्हेर। म्हणे 'कोण लागून गेला शंकर?। त्याने मूढपणे देऊनि वर। दैत्य सर्व माजविले॥२५॥ मला न वाटे त्याचे भय। तो माझे करील काय?। जे मूर्ख तेच त्याचे पाय। सर्वकाळ वंदिती'॥२६॥ असा होऊनिया उन्मत्त। झाला शिवनिंदेत रत। एकदा महायज्ञ अद्भुत। त्याने सदनी आरंभिला॥२७॥ ब्रह्माविष्णुइंद्रादी देव। सन्माने आमंत्रिले सर्व। परि एकमात्र सदाशिव। अव्हेरिला पूर्णपणे॥२८॥ शिवास नेदिता आमंत्रण। पाचारिले जामात आन। एका सतीस वगळून। सर्व दुहिता आमंत्रिल्या॥२९॥ सतीस कळता यज्ञवार्ता। तिने विनविले कैलासनाथा। म्हणे 'स्वामी घाईत पुरता। पिता असेल विसरला॥३०॥ यज्ञ इतुका महान। तेणे राहिले नसेल भान। पतींसह मम भगिनी येऊन। राहिल्या असे ऐकिले॥३१॥ तरी मी जाऊनि तेथवर। पाहीन काय झाला प्रकार। मजला आज्ञा द्यावी सत्वर। संतोषूनि प्राणनाथा'॥३२॥ शिव म्हणती 'प्रिये ऐक। तुझा पिता विक्षिप्त एक। माझा द्वेष करितो निंदक।

अपमानील तुला गे॥३३॥ ज्याच्या अंतरी द्वेष प्रचंड। त्याचे पाहू नयेच तोंड। जाता तेथे केवळ वितंड। वाद होणे निश्चित'॥३४॥ तितुक्यात येऊनि नारदमुनी। म्हणती 'जावया पितृसदनी। मानापमानाची शंका मनी। आणू नये कदापि'॥३५॥ मग बसूनि नंदीवरी। सती गेली पितयाघरी। पाहे तव यज्ञमंडप सुरवरी। भरूनि पुरता गेलेला॥३६॥ पूज्य स्थानी बसले देव। विराजिल्या भगिनी सर्व। केवळ सतीस नाही ठाव। तिष्ठे यज्ञद्वारात॥३७॥ नंदीवरूनि उतरून। पितयासमोर पाहे जाऊन। तोच त्याने आपुले वदन। दुसरीकडे वळविले॥३८॥ क्षणार्धात उमजे सती। की अपमानिला आपुला पती। क्रोधे वळली भृकुटी वरती। नेत्री दाटला अंगार॥३९॥ थरथर कोमल देह कापला। अंगी स्वेदप्रवाह दाटला। निमिषार्धात देह झोकिला। यज्ञकुंडात तेधवा॥४०॥ कोसळावी वीज अविलंब। तसा उसळला आगडोंब। भयशंकित होऊनि जग। म्हणे ब्रह्मांड बुडाले॥४१॥ शंकरास कळली मात। संतप्त झाला कैलासनाथ। जटा सोडूनि आपटीत। आवेशाने तेधवा॥४२॥ तोच हाक फोडूनि अद्भुत। वीरभद्र प्रकटला अकस्मात। शिवाज्ञा घेऊनि आला त्वरित। दक्षयज्ञमंडपी॥४३॥ म्हणे 'दक्षा महामूर्खा। नष्टा दुष्टा शिवनिंदका। पाहतो आता तुला सखा। कोण येथे वाचवितो?'॥४४॥ हाती घेऊनि तीक्ष्ण तलवार। क्रोधे छेदिले दक्षशिर। रगडूनि केले चूरचूर।

पायातळी तेधवा॥४५॥ पूषाचे दात पाडिले। भगाचे नेत्र फोडिले। पाय धरूनि आपटिले। देव ऋत्विज कितीतरी॥४६॥ किती एकांचे प्राण गेले। कितीक पायातळी तुडविले। रक्तमांसाचे पूर्ण पसरले। राज्य यज्ञमंडपी॥४७॥ दक्षकुयज्ञ विध्वंसून। कैलासी परतले शिवगण। मग ब्रह्मदेवाने प्रार्थून। तोषविले शिवाला॥४८॥ ब्रह्मा म्हणे 'माझा सुत। दक्ष वर्तला पूर्ण विपरीत। माझे पितृमन करा शांत। दक्षा जिवंत करूनिया'॥४९॥ आशुतोष शिवशंकर। तोषूनि म्हणे 'आणा शिर'। वीरभद्र म्हणे 'केले चूर। पायातळी रगडूनी'॥५०॥ मग लावूनि मेषवदन। दक्षास दिधले जीवदान। तोही शिवास गेला शरण। द्वेषबुद्धी त्यागूनी॥५१॥ शिवे पूर्ण संतोषून। वीरभद्रास केले शिवगण। सेनापतिपद देऊन। त्यास तेथे सन्मानिले॥५२॥ पुराणीची ही वीरभद्रकथा। श्रोतेहो आणिली श्रवणपथा। हा वीरभद्रचि असे सर्वथा। गोत्रपुरुष वीरपीठाचा॥५३॥ या पीठाच्या शिवाचार्यांकडूनी। लिंगधारण केले ज्यांनी। त्यांना गोत्र पुसता कोणी। वीरगोत्र सांगावे॥५४॥ आपुल्या दीक्षागुरूंचे जे गोत्र। तेच शिष्यांचे असे गोत्र। यात संदेह अणुमात्र। कोणी बाळगू नये कधी॥५५॥ आता कलियुगीची कथा सांगेन। परिसा एकाग्र करूनि मन। रेणुकांनी केला धारण। अवतार कलियुगात॥५६॥ सोमनाथ लिंगातून। त्यांचे जहाले अवतरण। रेवणाराध्य, रेवणसिद्ध अभिधान।

ख्यात झाले जगात॥५७॥ वीरसिंहासन भूषविले। शिवभक्तीचा गंध दरवळे। लिंगदीक्षा घेऊनि डोले। लोक शिवनामात॥५८॥ सद्विचार-सदाचारज्योत। पेटविली मनामनांत। अनुग्रह देऊनि समर्थ। भक्त शिष्य घडविले॥५९॥ जसा पेरितो कृषीवल। सुबीज मऊ भूमीत निर्मल। मग त्यास लाभता ओल। अंकुरतो सर्वांगे॥६०॥ तसे शुद्धान्त:करणी जन। जगद्गुरू पाहाती न्याहाळून। त्यांना करवूनि लिंगधारण। पंचाचार बोधिती॥६१॥ सुमनी पेरिता सदाचार। पिके सद्धर्म अनिवार। मग रास पडे अपार। शिवाद्वैत-धान्याची॥६२॥ आत्मैक्यबुद्धी होता दृढ। संसाराचे उकले गूढ। मी-तू वेगळा हे रूढ। दूर होई अज्ञान॥६३॥ शिवदृष्टी लाभली ज्याला। संसार सर्व शिवरूप त्याला। तेथे द्वैतासी नाही उरला। थारा कुठे किंचित्॥६४॥ अशी पेटवीत आत्मज्योत। रेवणसिद्ध भ्रमती जगात। विरोधरहित वीरशैवरीत। जागविती मनोमनी॥६५॥ चौदाशे वर्षे भूमीवर। केले लीलाचमत्कार। रेणुकपुराणामाजी समग्र। ग्रथित आहे सर्वही॥६६॥ ते चरित्र विस्तृत सकळ। वर्णावयास नाही वेळ। कळावयास काही त्यातील। वानगीदाखल सांगतो॥६७॥ वैदिकधर्माचे शिरोमणी। आद्य शंकराचार्य महाज्ञानी। केरळप्रांती जन्म घेऊनी। भारतभर संचारले॥६८॥ बालपणी मुखोद्गत। वेदशास्त्रे केली समस्त। वेदान्तशास्त्र मथूनि अद्वैत। नवनीत दिले जनांसी॥६९॥

प्रस्थानत्रयीवर भाष्ये रचून। केले केवलाद्वैताचे प्रतिपादन। पूर्ण निष्ठेने धर्मप्रबोधन। केले आर्यावर्तात॥७०॥ मंडनमिश्रासी केला शास्त्रार्थ। त्यास शिकविला वेदान्त। चार दिशांना केली स्थापित। समर्थ पीठे आपुली॥७१॥ द्वारकेस द्वारकापीठ। शृंगेरीस शारदापीठ। जगन्नाथपुरीस गोवर्धनपीठ। ज्योतिर्पीठ बद्रिकाश्रमी॥७२॥ कुप्रवृत्तीस रोधून। केले शुद्ध धर्मप्रबोधन। जागविला मनामनांतून। सद्विचार सद्धर्म॥७३॥ ते प्रत्यक्ष शिवावतार। अशी प्रसिद्धी पावले थोर। साधनासमयी आला विचार। की व्हावे शिवदर्शन॥७४॥ शिवदर्शन व्हावयासाठी। झाले मनातून कष्टी। लिंगार्चन हाच शेवटी। विचार रुचे मनाला॥७५॥ कराया आर्यधर्मोद्धार। स्थापाया अद्वैतमत भूवर। शिवप्रभूंची कृपा निरंतर। शिरावर असावी॥७६॥ म्हणूनि श्रीशैलासी गेले। पाताळगंगेत सुस्नात झाले। पूजाद्रव्ये घेऊनि आले। मल्लिकार्जुनमंदिरी॥७७॥ षोडशोपचारे मल्लिकार्जुन। पूजिला अति तन्मय होऊन। शिवनामघोषाने गर्जून। गेले अवघे मंदिर॥७८॥ शिव शिव म्हणता वेळोवेळा। प्रेमाश्रू दाटूनि आले डोळा। अवचित वाहे घळाघळा। आनंदजळ अनिवार॥७९॥ कर जोडूनि लिंगापुढती। भावुक होऊनि उभे तिष्ठती। शिवानंदलहर दाटून चित्ती। शब्द लागती प्रसवू॥८०॥ ‘शिवा आनंदलहरी सघन। तुमच्या चरित्सरितेमधून। पापपंकाचे प्रक्षालन। करीत वेगे निघावी॥८१॥

संसारभ्रमणतापशमन। करीत वाहावी बुद्धिपाटातून। माझिया हृदयगुहेत शिरून। तेथे पूर्ण स्थिर व्हावी॥८२॥ क्षमापूनि सर्व अपराध। माझे तोडावे भवबंध। ब्रह्माविष्णु देवांचे पद। मी न मागतो सदाशिवा॥८३॥ द्यावे इतुके पूजाफल। तुमच्या चरणी व्हावे अढळ। तुम्हा अर्पावी अशी अमोल। वस्तू नाही मजपाशी॥८४॥ अमृतचंद्रमा तुमच्या शिरी। ऋद्धिसिद्धी तिष्ठती दारी। धनपती कुबेर शेजारी। मग मी तुम्हा काय अर्पू?॥८५॥ मजजवळी केवळ जाण। भावभरले आहे मन। ते मी अर्पितो स्वीकारून। कृतार्थ करावे मजलागी॥८६॥ काय मागू तुजलागून। मजला कोडे पडे गहन। म्हणू जर मज देई भोजन। तरी हलाहल तुजपाशी॥८७॥ वस्त्र मागावे अंगभर। तर तू स्वत: दिगंबर। जरी मागू अलंकार। तरी सर्पहार गळ्यात॥८८॥ द्यावया वस्तू सांसारिक। तुझ्यापाशी नाही एक। मात्र भक्ती अलौकिक। द्यावयास समर्थ तू॥८९॥ म्हणूनि तुझे चरणकमल। वसावे मनी सर्वकाळ। अनन्यभक्तीची मला घाल। भिक्षा आज शिवा ही'॥९०॥ असे गाता शिवस्तोत्र। सात्त्विक भावे फुलले गात्र। नेत्रांतून वाहे पवित्र। आनंदजळ अविरत॥९१॥ नमस्कारूनि ज्योतिर्लिंग। मग बाहेर आले सवेग। परि शिवदर्शनाची तगमग। नाही शांत जहाली॥९२॥ शोधूनिया एकांतस्थान। स्थिर बसले घालूनि आसन। आरंभिली तपश्चर्या दारुण। शिवस्मरण करीत॥९३॥ कंदमुळे फलाहार।

करीत राहिले निरंतर। तरी होईना साक्षात्कार। म्हणूनि तेही वर्जिले॥९४॥ प्राशूनिया शुद्ध जल। मग थोडा कंठिला काळ। पुढे जल त्यजूनि निर्जल। आरंभिला उपवास॥९५॥ परशिवदर्शनाचे आर्त। मनी सदैव होते जागृत। षण्मास उलटता अकस्मात। अंतर्वाणी निनादली॥९६॥ 'शंकरा मी झालो प्रसन्न। तुज निश्चित देईन दर्शन। पण करावे भावे अर्चन। चंद्रमौळीश्वराचे॥९७॥ मलयपर्वती वीरपीठ। तेथे रेवणसिद्ध गणश्रेष्ठ। वसती शिवाचारनिष्ठ। वीरशैव जगद्गुरू॥९८॥ त्वरेने जाई त्यांच्यासमोर। करी श्रद्धेने नमस्कार। मग ते लिंग चंद्रमौळीश्वर। तुज प्रदान करतील॥९९॥ अर्चिता चंद्रमौळीश्वरा। मी प्रकट होईन शंकरा। तुझ्या दृष्टिपुढे खरा। मार्ग प्रशस्त होईल॥१००॥ तुझ्याकडूनि जे घडेल। ते महत्कार्य ठरेल। तुझा कीर्तिडिंडिम झडेल। यावच्चंद्रदिवाकरौ'॥१०१॥ अशी अंतर्वाणी ऐकता। परम संतोष झाला चित्ता। लगबगे उठूनि मलयपंथा। लक्षित वेगे निघाले॥१०२॥ वीरपीठ दृष्टीसमोर। दिसताच केला नमस्कार। आत प्रवेशूनि सत्वर। रेवणसिद्धांस भेटले॥१०३॥ आजानुबाहू देह बलदंड। करी शोभला अश्वत्थदंड। भस्मोद्धूलित, भाळी त्रिपुंड्र। विलसे शशीसमान॥१०४॥ हरित् वस्त्र देहावर। सघन दाढी जटाभार। रुद्राक्षमंडित सुकुमार। करामध्ये कमंडलू॥१०५॥ असे आचार्य देखताक्षणी। संतोष दाटला शंकरमनी। रेवणसिद्धही

अंतर्ज्ञानी। ओळखिले शंकराचार्य॥१०६॥ जो तिष्ठतो दृष्टिसमोर। तो शिवाचा लीलावतार। अद्वैतमतमंडनास्तव भूवर। आला असे जाणिले॥१०७॥ मग त्यांचे आतिथ्य केले। शंकराचार्यांस सन्मानिले। शंकरांनी वंदिली पाउले। जगद्‌गुरूंची तेधवा॥१०८॥ चंद्रसूर्याची व्हावी भेट। तसा जहाला तेथे थाट। की गंगायमुना एकवट। होऊनि जहाला प्रयाग॥१०९॥ परस्परांसी नमस्कारून। पुसिले क्षेमवर्तमान। वेदान्त-सिद्धान्ताची गहन। चर्चा तेथे रंगली॥११०॥ एका सुरात वीणा दोन। सुरेल जाव्या झंकारून। तसे जहाले आदानप्रदान। विचारांचे दोघांत॥१११॥ द्वैत असो वा अद्वैत। वेदान्त असो वा सिद्धान्त। मार्ग भिन्न परि निश्चित। गन्तव्य त्यांचे एकचि॥११२॥ सरिता दिसती भिन्न भिन्न। वाहती भिन्न प्रदेशांतून। परि अंती समरसून। जाती एका सागरात॥११३॥ तशी धर्म, मते निराळी। जरी दिसती वेगवेगळी। तरी अंती येऊनि मिळाली। परब्रह्मसागरी॥११४॥ संसारी पाहता एकच व्यक्ती। जोपासते अनेक नाती। पुत्र पिता बंधू पती। होऊनिया वावरते॥११५॥ तसे परब्रह्मतत्त्व एक। त्याची नामरूपे अनेक। शिव-विष्णुरूपांनी देख। तेच एक प्रकाशते॥११६॥ ज्या रूपाचा केला स्वीकार। त्यासचि भजावे निरंतर। कदापि न करावा तिरस्कार। अन्य ब्रह्मरूपांचा॥११७॥ एकनिष्ठेने अर्चन करिता। मोक्ष सहजचि येई हाता। जसे एकेठायी खणता।

मिळे झरा भूमीत॥११८॥ दहा ठायी थोडे खणले। तरी ते श्रम व्यर्थ गेले। म्हणूनि चित्त पाहिजे वाहिले। एकदेवतोपासनी॥११९॥ असा विवेक जागता निर्मल। गळूनि पडे भेदपटल। मग जाणवे जगती सकल। एकचि ब्रह्म प्रकाशते॥१२०॥ द्वैत आणि अद्वैत मत। प्रतिपादिले वेदान्तात। मात्र साधिला सिद्धान्तात। सर्वश्रुतिसमन्वय॥१२१॥ बिंदू सिंधूचा अंश असे। बिंदुरूपे तो भिन्न भासे। जव तो सिंधूत समरसे। तेव्हा सिंधुरूपचि॥१२२॥ वेदान्ती असो वा सिद्धान्ती। दोघांनाही एकच गती। प्रतिपादनाच्या रीती। असती मात्र वेगळ्या॥१२३॥ असा ब्रह्मविद्यासंवाद। रंगूनि जहाला परमानंद। संतोषूनि रेवणसिद्ध। म्हणती 'तुज काय हवे?'॥१२४॥ शंकर म्हणती 'द्यावे मुनिवर। मज लिंग चंद्रमौळीश्वर। त्याचे अर्चन निरंतर। करावे ही शिवाज्ञा'॥१२५॥ मग चंद्रमौळीश्वर लिंग। जगद्गुरूंनी अर्पिले सवेग। निरोप घेऊनि आपुला मार्ग। शंकरांनी चोखाळला॥१२६॥ लिंगार्चन करूनि सिद्ध। जहाले शंकराचार्य प्रसिद्ध। इतिहासाने शब्दबद्ध। त्यांचे केले महत्कार्य॥१२७॥ चंद्रमौळीश्वराचे अर्चन। श्रृंगेरीपीठात होते अजून। वीरपीठात विद्यमान। लिंगप्रदान मूर्ती असे॥१२८॥ तीरावरील वृक्ष पोसून। जीवमात्राची भागवी तहान। अशी गंगा होऊनि जीवन। राहे सर्व जगताची॥१२९॥ तशी करुणा घेऊनि हृदयी। रेवण क्रमती गावोगावी। ग्रामे नगरे पट्टणे

पायी। न्याहाळिती हिंडूनी॥१३०॥ ओळखूनि आंतरखुणा। लिंगदीक्षा देती जना। करू लागले समाजरचना। जातिवर्णविरहित॥१३१॥ मनी भक्तीचा फुले अंकुर। तो पात्र शिवार्चनास नर। जातिवर्णाश्रम अधिकार। येथे नसे कोणता॥१३२॥ यारे सारे लहान थोर। नारी असो वा असो नर। इष्टलिंगाचा करिता स्वीकार। मग उद्धार निश्चित॥१३३॥ अशी सर्वत्र समता पेरीत। शिवभक्तीची दीक्षा देत। रेवण आले भ्रमत हिंडत। मोक्षदायिनी कांचीला॥१३४॥ काशी, कांची, अवंतिका। मथुरा, माया, द्वारका। अयोध्या ह्या सप्तपुरी देखा। पुराणांतरी प्रसिद्ध॥१३५॥ ह्या नगरीचा भूपाल। त्यास संबोधिती चोळ। न्यायनीतीने वर्ते प्रेमळ। प्रजा मानूनि पुत्रवत्॥१३६॥ वरदराज नगरदैवत। त्यास वंदिती पौर समस्त। त्याच्या दृष्टीखाली सतत। नगर सर्व वावरे॥१३७॥ लीला दाखवाया लोकांस। रेवणे घेतला भिक्षुकवेष। वेड्यापरी चाळे विशेष। आरंभिले नगरात॥१३८॥ अंगी चिंध्या गुंडाळून। खदखदा हसे अकारण। कधी धोंडा हाती घेऊन। श्वानापाठी धावती॥१३९॥ कधी बोलावे असंबद्ध। कोणा न कळे एक शब्द। कधी नाचावे अनिर्बंध। हातवारे करीत॥१४०॥ वेडा आला म्हणत सारे। पाठी लागती पोरेटोरे। तोही विक्षिप्त हातवारे। करीत त्यांना चेतवी॥१४१॥ समूहाची वेगळी मनःस्थिती। त्याला कोणी नसे सारथी। मनःपूत वर्तन करिती। नच क्षिती

बाळगता॥१४२॥ एकेदिनी तसे घडले। वेडा म्हणूनि खूप मारिले। वरदराजमंदिरी टाकिले। नेऊनि राजसैनिकांनी॥१४३॥ भूमीवर पडता शिर। फुटूनि बाहेर येई रुधिर। वेदनेने अवघे शरीर। कंप पावू लागले॥१४४॥ तत्क्षणी घडला चमत्कार। मूर्तीचे कापू लागले शिर। अतिवृद्धाचे हले थरथर। तसे हले मूर्तीचे॥१४५॥ सर्वत्र फुटले वर्तमान। पाहावया धावती नगरजन। थक्क होती शिरकंपन। पाहून स्थावर मूर्तीचे॥१४६॥ आला चोळ नगरभूपाल। झाला स्तंभित आणि विव्हल। मनी म्हणे 'काय खेळ। आज मूर्तीने मांडिला!'॥१४७॥ मग संतमहंत पाचारिले। त्यांनी नाना उपाय केले। परि कंपन नाही थांबले। झोप उडाली नृपाची॥१४८॥ अन्नावरची उडे वासना। जिवा क्षणभर चैन पडेना। म्हणे 'नकळे काय जाणा। घडला हातून अपराध?॥१४९॥ वरदराज मूर्ती स्थावर। तिचे मस्तक हले थरथर। असा आजवरी चमत्कार। ऐकिला नाही कधीच'॥१५०॥ राजा असता चिंताग्रस्त। अवचित झाला स्वप्नदृष्टान्त। शिव प्रकटूनि म्हणती 'अनर्थ। घडला तुझ्या नगरीत॥१५१॥ रेवणसिद्ध माझा अंश। भ्रमे घेऊनि भिक्षुकवेष। तव प्रजेने दिधला त्रास। राजा त्यास अपार॥१५२॥ वेडा म्हणूनि मारहाण। करून मंदिरी टाकिले नेऊन। त्याचे फुटले मस्तक म्हणून। शिर कापते मूर्तीचे॥१५३॥ रेवण प्रत्यक्ष शिवरूप। जने त्याला दिधला ताप। म्हणूनि

सुटला थरकाप। देवमूर्तीस भूपाळा॥१५४॥ जेथे होते संतनिंदा। तेथे येणे आहे विपदा। म्हणूनि वंदावे सदासर्वदा। संतपदा अहर्निश॥१५५॥ जरी माणूस साधारण। त्याचाही न करावा अपमान। पिपिलिका वा इंद्रवाहन। समान जीवरूपाने॥१५६॥ आपापल्या कर्माप्रमाणे। जीवांस जगती जन्म घेणे। जीव दुखविता लागे फेडणे। निश्चितचि कर्म ते॥१५७॥ रेवण प्रत्यक्ष माझा अंश। आला तुम्हा परीक्षायास। त्याला तुम्ही दिला त्रास। त्याचे फळ कंपन हे'॥१५८॥ असे बोलता बोलताक्षणी। अंतर्धानले पिनाकपाणि। नृपही नेत्र उघडूनी। म्हणे काय घडले हे॥१५९॥ भला जहाला स्वप्नबोध। आमुचा कळला अपराध। प्रभाती उठूनि घेतला शोध। महात्म्याचा सर्वत्र॥१६०॥ शोधिता राजदूतांनी बहुत। एका भग्न मंदिरात। स्वत:शीच बडबडत। वेडा पाहिला बसलेला॥१६१॥ त्यास नेता नृपापुढे। नृपती दंडवत् पडे। म्हणे 'महाराजा आम्हाकडे। पाहा कृपादृष्टीने॥१६२॥ तुमची महिमा ऊर्जस्वल। कर्णी आली होती सकळ। पण अज्ञानाचे पडळ। आले होते बुद्धीवरी॥१६३॥ शिवस्वरूप तुम्ही उदारा। अपराधाची क्षमा करा। जशी सांभाळते लेकरा। माय तसे सांभाळा॥१६४॥ आपणास छळले खूप। तेणे मूर्तिशिर पावते कंप। केले उपाय परि फलद्रूप। नसे एकही जहाला॥१६५॥ तरी रेवणसिद्धेश्वरा। आमुचे संकट वारा वारा। तुमच्या कृपेचा शीतल वारा। दग्ध मनासी मिळू

द्या' ॥१६६॥ राजयाचे ऐकून शब्द। संतुष्टले रेवणसिद्ध। म्हणती 'तुम्हा व्हावा बोध। म्हणूनि लीला आचरलो॥१६७॥ जगद्गुरुरूपे मिरवीत। आलो असतो नगरात। तरी देखल्या देवा दंडवत। तुम्ही असते घातले॥१६८॥ सभ्यपणाची घालूनि खोळ। माणूस मिरवतो सर्वकाळ। ती गळताक्षणी आतील। विरूपता ये बाहेरी॥१६९॥ आत एक बाहेर एक। असा मनुष्यस्वभाव देख। शुद्ध सुवर्णासम चोख। अंतर्बाह्य नसे तो॥१७०॥ तो व्हावा तसा याचसाठी। साधना करिती आटाआटी। धर्मशास्त्राचे असे शेवटी। लक्ष्य हेचि राजेंद्रा॥१७१॥ माझे मस्तक जने फोडिले। म्हणूनि मूर्तीचे शिर हाले। अघटित असे का हे घडले। काय संबंध दोघांत?॥१७२॥ असा तुम्हांस पडला प्रश्न। त्याला भेदबुद्धीच कारण। मूर्ती स्थावर मी चेतन। हा भेद बुद्धीत मुरलेला॥१७३॥ जगातील जीव प्रत्येक। मूलत: शिवस्वरूप देख। त्याच्या देहास देता दु:ख। अंतरात्मा दुखावतो॥१७४॥ पशू पक्षी वनस्पती। त्याही अंती दुखावती। म्हणूनि चर अचर जीवयाती। दुखवू नये कदापि॥१७५॥ दृष्टीपुढे जे दिसे जड। तेही चैतन्य असे गूढ। दृश्यादृश्य अवघे ब्रह्मांड। पूर्ण असे शिवरूप॥१७६॥ मी प्रकटलो लिंगातून। मज दु:ख देता दारुण। स्थावर मूर्तीचे शिरकंपन। होणे स्वाभाविक हे' ॥१७७॥ जगद्गुरूंचे ऐकता वचन। राये धरिले दृढ चरण। म्हणे 'महाराजा हे ज्ञान। आज झाले

आम्हांसी ॥१७८॥ आता आपण व्हावे प्रसन्न। थांबवावे शिरकंपन। यापुढती करीन वर्तन। समदृष्टीने गुरुदेवा' ॥१७९॥ मग जगद्‌गुरूंसी गौरविले। समस्त मंदिरात गेले। रेवणे स्पर्श करताच थांबले। मूर्तीचे शिरकंपन॥१८०॥ झाला शिवनामघोष अद्‌भुत। दुमदुमला अवघा आसमंत। राजा प्रजा झाले नत। जगद्‌गुरूंच्या चरणांवरी॥१८१॥ असे करूनि लीलावर्तन। शिवभक्तांसी दीक्षा देऊन। रेवणसिद्ध करीत भ्रमण। आले मासणूर गावात॥१८२॥ तेथे भीमेच्या तीरावर। देखिले प्राचीन शिवमंदिर। वृक्षलतावेष्टित सुंदर। एक रम्य तपोवन॥१८३॥ मंदिराच्या प्रवेशद्वारी। वाट अडवून उभा पुजारी। म्हणे 'महाराजा सायंप्रहरी। जाऊ नये देवळात॥१८४॥ गावामध्ये कोण्या गृही। विसावा घ्यावा लवलाही। येईल प्राणसंकट पाही। येथे रात्र कंठिता'॥१८५॥ रेवण म्हणती 'वाटे नवल। मंदिर मन:शांतीचे स्थल। जग रक्षितो देवच सकळ। देवद्वारी भय काय?'॥१८६॥ पुजारी म्हणे 'द्यावे लक्ष। मंदिरापुढे द्वय वटवृक्ष। त्यावरी वसती दोन यक्ष। राक्षसरूपे स्वामिया॥१८७॥ दिनभरी मत्कुण होऊन। वृक्षफटीत बसती दडून। विक्राळ राक्षसरूप धरून। येती मध्यरात्रीस॥१८८॥ येथे जो विसावला यात्रिक। त्यास भक्षिती भयानक। तेणे रात्री येथे लोक। थांबती ना कोणीच' ॥१८९॥ हसून बोलती जगद्‌गुरू। 'नकोस काही चिंता करू। जो भवसागरीचे तारू। तो शिव येथला

अधिष्ठाता॥१९०॥ त्याचे हाती जीवनसूत्र। आपण सारे निमित्तमात्र। तो जीवांस रक्षितो मैत्र-। भावे सदासर्वदा॥१९१॥ मज प्राणाची नाही खंत। तू गृहासी जाय निश्चिंत। जो स्मशानी वसे सतत। तो शिव माझा प्राणसखा'॥१९२॥ झाला प्राणावरी उदार। असा मानसी करूनि विचार। पुजारी होऊनि चिंतातुर। गेला आपुल्या गृहासी॥१९३॥ मंदिरप्राकारात शांत। विसावले रेवण निवांत। मध्यरात्री घडले अद्‌भुत। मत्कुण झाले राक्षस॥१९४॥ दीर्घस्वरे फोडिता हाक। तृतीय नेत्र उघडती देख। क्षणार्धात जळूनि खाक। झाले दोन्ही राक्षस॥१९५॥ त्यांचे होऊनि लोहगोळे। रेवणचरणांपाशी पडले। उजाडताच लोक आले। नवल करिती मानसी॥१९६॥ म्हणती 'खरा महात्मा थोर। याने निर्दाळिले असुर। भयरहित केले मंदिर। विघ्न थोर वारिले॥१९७॥ रेवणचरण नमस्कारूनी। करू लागले हर्षध्वनी। पुजारीही आनंदूनी। करी हर्षे जयकार॥१९८॥ रेवणसिद्ध अंतर्ज्ञानी। जना सांगती यक्षकहाणी। 'हे राक्षस दोन्ही पतिपत्नी। होते यक्षदंपती॥१९९॥ या पवित्र तपोवनात। क्रीडले होऊनि कामासक्त। कोणी पाहील याची खंत। नाही किंचित् बाळगली॥२००॥ सकाळ मध्यान्ह सायंकाळ। नाही पाहिली काळवेळ। रतिक्रीडेत सर्वकाळ। मग्न होऊनि राहिले॥२०१॥ लाटेमागून यावी लाट। तसे भोगिती भोग सुसाट। एक यती तपोनिष्ठ। त्याने त्यांना शापिले॥२०२॥

‘यक्षा तू हीन अमंगळ। कामासक्त उच्छृंखल। विपरीत तुझे वर्तन सकळ। दिवसा जनांसमोर॥२०३॥ तुम्ही उभयता राक्षस व्हाल। मृत्युलोकी जन्म घ्याल। असह्य दु:ख तेथे भोगाल। असा देतो शाप मी’॥२०४॥ मग दोघे सावध होऊन। दृढ यतीचे धरिती चरण। म्हणती ‘महाराज आमुच्याकडून। घडला जघन्य अपराध॥२०५॥ पुन्हा असे न करू वर्तन। जहाला पश्चात्ताप पूर्ण। उ:शाप द्यावा आम्हालागून’। आक्रंदती उभयता॥२०६॥ द्रवूनि यती बोले वचन। प्रायश्चित्त घेतल्यावाचून। जगी सुटला नाही कोण। तुम्ही नाही अपवाद॥२०७॥ पुढे बहुत लोटता काळ। येथे रेवणसिद्ध येतील। त्यांच्या कृपेने तुम्ही व्हाल। मुक्त माझ्या शापातूनी’॥२०८॥ मग होती दिवसा मत्कुण। रात्री असुररूप धरून। जगती हिंसाचार करून। अधम योनी भोगिती’॥२०९॥ ऐकूनि अशी यक्षकथा। आनंद झाला लोकचित्ता। जयजयकारे घुमला पुरता। आसमंत त्यावेळी॥२१०॥ मग लोहारा बोलावून। त्यास लोहगोळे देऊन। बनविली दोन खड्गे तीक्ष्ण। एक रोविले सरितेत॥२११॥ दुजे खड्ग घेऊनि हाती। आशिष देऊनि सकलांप्रती। भ्रमण करीत प्रांतोप्रांती। आले उज्जयिनी पुरीस॥२१२॥ तेथे राजा विक्रमाने। उभारूनि गुढ्यातोरणे। स्वागतातिथ्य आनंदाने। केले जगद्गुरूंचे॥२१३॥ आपुल्या हातीचे खड्ग तीक्ष्ण। विक्रमास केले प्रदान। म्हणती ‘या खड्गे

विलक्षण। गाजवशील पराक्रम॥२१४॥ आमुच्या करी शोभे शास्त्र। बाळगणे न योग्य शस्त्र। तुज रक्षिणे आहे मात्र। संतसज्जन सर्व प्रजा॥२१५॥ तरी हे शस्त्र करी धरून। दुष्ट शक्तीस करी शासन। दुर्बल आणिक संतजन। यांचे रक्षण करी सदा'॥२१६॥ राजा झाला नतमस्तक। शस्त्र स्वीकारिले विनयपूर्वक। म्हणे 'उज्जयिनीस आहे एक। सद्धर्मपीठ प्राचीन'॥२१७॥ हास्यमुखे बोलती रेवण। 'राया सर्वज्ञात हे जाण। वटक्षेत्री सनातन। वसे सद्धर्मपीठ हे'॥२१८॥ मग राजासह रेवण गेले। जगद्गुरू मरुळसिद्धांस भेटले। पाहताच नमस्कारिले। परस्परांस दोघांनी॥२१९॥ मनी दाटला परमानंद। रंगला शिवविद्यासंवाद। आंतरगुज केले विशद। मन करूनि मोकळे॥२२०॥ आदरे आतिथ्य स्वीकारून। रेवणसिद्ध करिती प्रस्थान। सृष्टिशोभा न्याहाळीत दक्षिण। मार्गावरी निघाले॥२२१॥ असे सहज भ्रमता भ्रमत। पातले करवीर नगरीत। जेथे महालक्ष्मी सदोदित। वास करी आनंदे॥२२२॥ शिवलिंग घेऊनि माथा। तेथे उभी जगन्माता। कृपापाखर घालीत भक्तां-। वरी सदासर्वदा॥२२३॥ महालक्ष्मी वैभवसंपन्न। पाहूनि गेले आनंदून। ती शिरी करूनि लिंगधारण। दाखवी शिवमाहात्म्य॥२२४॥ भिक्षुकवेषे नगरी भ्रमता। जाणवे लोकमनीची व्यथा। गोरक्ष राज्य करी सर्वथा। राणी लक्कम्मासमवेत॥२२५॥ नीतिन्याय उल्लंघून। प्रजेस पीडा देई दारुण। मुळी

राहिले नाही भान। की आपण प्रजापालक॥२२६॥ राज्यात माजली अंदाधुंदी। जो तो संतसज्जना निंदी। स्त्रियांची होई पदोपदी । मानहानी शीलभंग॥२२७॥ कुटिल विद्येस लाभला लौकिक। राजसभेत बसती मांत्रिक। दारी येता कोणी भिक्षुक। त्याचा करिती अपमान॥२२८॥ जसा अध:पतित राजा। तशीच वर्तू लागे प्रजा। सर्वत्र होई गाजावाजा। चोऱ्या आणि भांडणांचा॥२२९॥ असे पाहून उन्मत्तपण। कष्टी जहाले मनी रेवण। मनी योजिले द्यावी शिकवण। नृपास राज्यनीतीची॥२३०॥ मग निर्भयपणे गेले। राजद्वारी उभे राहिले। 'भिक्षां देहि' असे गर्जले। हाक घुमली प्रासादी॥२३१॥ गोरक्षकर्णी पडता हाक। त्याचे खवळले मस्तक। म्हणे कोण नतद्रष्ट देख। राजभुवनी प्रवेशला?॥२३२॥ येऊनि माझ्या राजद्वारी। कोण उभा राहिला भिकारी। त्याच्या अंगी आली खरी। कोठूनि ही हिंमत?'॥२३३॥ झोपाळ्यावर झुलत झुलत। करी मनीचा संताप व्यक्त। राणीस म्हणे 'छेदी हात। भिकारड्याचा शस्त्राने'॥२३४॥ असे बोलूनि शस्त्र दिले। राणीचे चित्त गडबडले। म्हणे 'महाराज दारी आले। भिक्षुक नव्हे शिवयोगी॥२३५॥ त्याचा सन्मान करणे सोडून। भलते काय आरंभिले आपण। शिवयोगी तृप्त होता पूर्ण। शंकर स्वये तुष्टतो'॥२३६॥ राणी बोलता अवचित। गोरक्षाचे खवळले पित्त। म्हणे 'दीड शहाणे चुलीत। घाल तुझे विचार॥२३७॥ मी या

देशीचा सार्वभौम। नृपती आहे सर्वोत्तम। हे ध्यानी ठेवावे प्रथम। मग अक्कल पाजळावी॥२३८॥ चल हे घे हाती शस्त्र। छेद त्याचे दोन्ही कर। ममाज्ञेचा केला जर। भंग तर पाहा तू'॥२३९॥ मनी होऊनि घाबरी। तिने शस्त्र घेतले करी। आणिक येऊनि उभी दारी। रेवणापुढे राहिली॥२४०॥ म्हणे 'महाराज माझा पती। त्याची अहंकारे फिरली मती। पतिव्रता मी आज्ञा मजप्रती। पाळणे लागे तयाची॥२४१॥ धनधान्याच्या राशी गृहात। परंतु आमुचे दरिद्री चित्त। म्हणूनि स्वीकारावी शांत। मने शस्त्रभिक्षा ही'॥२४२॥ हसूनि पुढे केले कर। त्यावर राणीने ठेविले शस्त्र। दृष्टी टाकता शस्त्रावर। क्षणात गेले वितळूनी॥२४३॥ ओंजळीमधील लोहरस। रेवण प्राशिती सावकाश। तत्क्षणी घडला विशेष। चमत्कार प्रासादी॥२४४॥ विद्युल्लतेसम लखलखीत। खड्ग येऊनि अकस्मात। शिरले गोरक्षवक्षःस्थळात। पडला झोपाळ्यावरूनी॥२४५॥ हृदयी हात धरूनि पडे। असह्य वेदनेने तडफडे। जळाबाहेरी मीन धडपडे। तसा लोळे भूमीवरी॥२४६॥ म्हणे 'धावा धावा कोणी। राजवैद्यास आणा झणी। हृदय फुटो पाहे क्षणी। मरण दिसे डोळ्यांस॥२४७॥ महालक्ष्मी माझे आई। व्यथा नच ही सहन होई। माये मजला दूर नेई। असह्य वेदनेपासून'॥२४८॥ असा अनिवार पाहूनि शोक। लक्कमास पडला धाक। काय लोपतो सौभाग्यतिलक। विचारे झाली

घाबरी॥२४९॥ राजवैद्य धावत आले। नानापरीचे उपाय केले। हृदयशल्य नाही सरले। काही केल्या नृपाचे॥२५०॥ जो जो वैद्य करी उपाय। तो तो व्यथा वाढत जाय। राजा गोरक्ष रडे धाय। मोकलून क्षणोक्षणी॥२५१॥ राणी शोकसागरी बुडाली। धावत लक्ष्मीमंदिरी गेली। पदर पसरूनि म्हणे 'माउली। वाचवी माझे सौभाग्य॥२५२॥ तुझ्या चरणी सर्वकाळ। सदैव नत आमुचे कूळ। आज अवचित आला काळ। ग्रासू पाहे सौभाग्य॥२५३॥ पती वागला अनिर्बंध। त्याने दुखविले संत सिद्ध। परि त्यात माझा अपराध। असे सांग कोणता?॥२५४॥ तो जर झाला गतप्राण। तर माझा वाली सांग कोण?। शिक्षा का ही मजलागून?'। बोलून फोडिला हंबरडा॥२५५॥ तोच हृदयी अंतर्वाणी। मंद पडली राणीकर्णी। छळिले रेवणसिद्धांलागूनी। म्हणूनि घडले विपरीत॥२५६॥ त्यांचे धरिता चरणकमल। पतिहृदयशल्य सरेल। त्याहूनही भवव्यथा समूळ। हरिती ते सामर्थ्ये'॥२५७॥ अशी परिसता दिव्य वाणी। राणीने शोधून रेवणमुनी। चरण धरूनि आसवांनी। केला पदाभिषेक॥२५८॥ तिने शब्दही न उच्चारता। त्यांनी जाणली तिची व्यथा। म्हणती 'तुझ्या पतीस पुरता। धडा भला शिकविला॥२५९॥ दुर्जनास जी भाषा उमगे। त्याच भाषेत बोलावे लागे। व्यथा भोगिल्याविण अंगे। नकळे दु:ख दुसऱ्याचे॥२६०॥ शब्दोपदेश असता केला। त्याने असता

अव्हेरिला। परंतु हृदयातल्या कळा। त्याला शहाणा करतील' ॥२६१॥ असे बोलूनि राणीसंगती। राजप्रासादी आले यती। देखताच चरणांवरती। लोळण घेई गोरक्ष॥२६२॥ म्हणे 'चुकलो चुकलो नाथा। लागलो मी मरणपंथा। मीच भीक मागतो आता। तुम्हांपुढे प्राणाची॥२६३॥ बुद्धीवरती पडळ आले। भिकारी म्हणूनि हिणविले। पण आता मजसी कळले। मीच खरा भिकारी॥२६४॥ या असह्य वेदनेतून। मुक्त करावे मला आपण। मग मी निश्चित करीन वर्तन। आपल्या शब्दांप्रमाणे' ॥२६५॥ रेवणांनी प्रसन्नपणे। हृदय स्पर्शिले सहजपणे। क्षणार्धात निघे त्वरेने। खड्ग हृदयाबाहेरी॥२६६॥ गोरक्षाची हृदयव्यथा। सरूनि सामान्य झाला पुरता। वारंवार झुकवी माथा। रेवणपदी मनोभावे॥२६७॥ रेवणसिद्धांचा केला गौरव। नमस्कारिती राणी राव। प्रजाजनही मिळूनि सर्व। लोटांगणे घालती॥२६८॥ बैसवूनि उच्चासनी। परमादरे पूजिले मुनी। लिंगदीक्षा राजा राणी। नमस्कारूनि मागती॥२६९॥ दुसरे दिनी प्रात:काळी। सिद्धांच्या लिंगपूजावेळी। राजासह राणी आली। धूतवस्त्रे लेऊनी॥२७०॥ शुभ्र त्रिपुंड्र शोभे भाळी। मुखी शिवनामावळी। भस्मरुद्राक्षधारणे झाली। वपू रेखीव निर्मळ॥२७१॥ घातला साष्टांग दंडवत। म्हणती 'झालो भवरोगग्रस्त। शिवज्ञानसिंधू तुम्ही भाग्यवंत। आचार्या आम्हा रक्षावे॥२७२॥ शरण आलो सर्वभावे। आम्हा

गुरुदेवा तारावे। आणव माया कार्मिक नाशावे। त्रिमल आमच्या अंगीचे॥२७३॥ इष्टलिंगदीक्षा देऊन। करावे उपकृत पूर्ण। यास्तव शिरसाष्टांग वंदन। आपल्या पदी घातले॥२७४॥ कृपादृष्टीने रेवण पाहती। मस्तकांवरी हस्त ठेविती। शिवतत्त्वास जागविती। त्यांच्या अंतर्यामीच्या॥२७५॥ अशी वेधादीक्षा देऊन। करूनि पंचकलश स्थापन। सर्व क्रियाविधी करून। लिंगधारण करविले॥२७६॥ सप्तकोटी मंत्रांत पवित्र। जो शिव-भक्तांमधील सूत्र। तो उपदेशिला महामंत्र। पंचाक्षर कर्णांत॥२७७॥ शिवजीवकलासामरस्ययुक्त। इष्टलिंग देऊनि करात। म्हणती 'ऐका एकाग्र चित्त। करूनि माझा उपदेश॥२७८॥ तुम्ही केले लिंगधारण। हे तुमचे प्राणलिंग जाण। करावे शरीरावरी धारण। सदैव प्राणासारखे॥२७९॥ कसाही येवो पुढती प्रसंग। पण शरीर आणिक इष्टलिंग। यांचा किंचित्कालही वियोग। न व्हावा हे पाहावे॥२८०॥ अनवधानाने होता अलग। करावा लागे प्राणत्याग। म्हणूनि शरीर आणि लिंग। यांचा संबंध जपावा॥२८१॥ निवारूनि संसारपाश अनिष्ट। देते शिवसामरस्य इष्ट। तेणे इष्टलिंग हे स्पष्ट। यास आहे अभिधान॥२८२॥ लिंगधारणेविण शरीर। ते प्रेतचि जाणावे साचार। वीरशैव तो नव्हे नर। पिशाच्चरूप जाणावा॥२८३॥ देहावरती इष्टलिंग। हृदयामध्ये प्राणलिंग। आणि भावनारूपी अभंग। भावलिंग जाणावे॥२८४॥ उपभोगार्थ जे जे पदार्थ। ते आधी करावे लिंगार्पित। मग सेवावे श्रद्धायुक्त। शिवप्रसाद म्हणूनी॥२८५॥

सुख दु:ख हर्ष खेद। तोही मानावा लिंगप्रसाद। सर्वचि भोग्यविषय प्रसाद-। रूप झाले पाहिजे॥२८६॥ लिंग हाच जीवप्राण। मानूनि जो वर्ते पूर्ण। तोचि निश्चित जाणा महान। वीरशैव साधक॥२८७॥ लिंगासम गुरू जंगम। भजावे अंतरी धरूनि प्रेम। शिवच घेऊनि गुरु-जंगम। रूपे आला जाणावे॥२८८॥ धारण करणे भस्म त्रिपुंड्र। यात पडू नयेचि खंड। भस्माविण जे राहे अखंड। भाल धिक्करणीय ते॥२८९॥ रुद्राक्षभूषणे शोभावे शरीर। नित्य जपावा पंचाक्षर। गुरु-जंगमांचा निरंतर। तीर्थ-प्रसाद सेवावा॥२९०॥ अशी वीरशैव जीवनरीत। अंगी बाणवावी समस्त। ती आचरिता होईल निश्चित। प्राप्त शिवसामरस्य॥२९१॥ सर्वांभूती नांदतो शिव। असा येईल अनुभव। आप पर हा भेदभाव। मनातून गळेल॥२९२॥ मी न स्वामी आहे सेवक। प्रजापालन कर्तव्य एक। असा जागेल दृढ विवेक। प्रजा निर्भय नांदेल॥२९३॥ मग अन्याय अत्याचार। होतील येथून तडीपार। स्वर्गच जणू मनोहर। तुझे राज्य होईल'॥२९४॥ अशी मधुर रेवणवाणी। प्राण ओतून ऐके कर्णी। वारंवार त्यांच्या चरणी। झुके राजा गोरक्ष॥२९५॥ म्हणे 'भाग्य उदया आले। जगद्गुरूंनी आज बोधिले। शब्द नोलांडिता पावले। माझी पुढे पडतील'॥२९६॥ सकला देऊनि आशीर्वाद। प्रस्थान करिती रेवणसिद्ध। ठायीठायी शिवानंद। पेरीत पुढे निघाले॥२९७॥ सवे मिळाले शिष्य नाना।

त्यांनी सिद्ध केला मेणा। आत बसवूनि जगद्गुरूंना। स्कंधी वाहती आनंदे॥२९८॥ विटे, रेणावी, मंगळवेढे। मार्गे चालती भक्त गाढे। भीमा ओलांडूनि पलीकडे। नाम गर्जत निघाले॥२९९॥ सोन्नलिगेच्या सीमेवर। मेणा थांबविला क्षणभर। जगद्गुरू उतरले सत्वर। मेण्यातून खालती॥३००॥ भूमीस करीत नमस्कार। अनवाणीच निघाले समोर। अवाक् होऊनि पाहे भिरभिर। शिष्यसमूह मागूनी॥३०१॥ वारंवार भूमीस वंदन। करीत पुढे चालती आपण। अचंबित शिष्य मागून। त्यांना लागती अनुसरू॥३०२॥ एकाने धीर एकवटून। जगद्गुरूंस केला प्रश्न। 'महाराज करिता भूमिवंदन। अनवाणी का हे कळेना॥३०३॥ तुमच्या चरणी झुकती लोक। भक्त मुनी राजे धनिक। मग आजच आपण अचानक। काय अलौकिक मांडले?॥३०४॥ समोर दिसते गाव लहान। आम्हा भासते साधारण। वसे कोणी देवता महान। असे नाही ऐकिले॥३०५॥ आपुले वर्तन भासे विचित्र। पाहून आमचे थिजले नेत्र। आम्हा सांगावे क्षणमात्र। थांबून याचे कारण'॥३०६॥ क्षणैक थांबून रेवण हसले। म्हणती 'तुम्हा नाही कळले। उमटतील मंगल पाउले। सिद्धयोग्याची भूवर ह्या॥३०७॥ त्याच्या हृदयीच्या करुणेत। चिंब भिजतील मने आर्त। गाजेल तो या जगतात। योगिकुल-चक्रवर्ती॥३०८॥ त्याचे जेथे पडेल पाऊल। तेथे वसंतवैभव फुलेल। त्याची शब्दवचने होतील।

मंत्ररूप साजिरी॥३०९॥ तो ज्या दगडा करील स्पर्श। त्यात देवता करतील वास। त्याचे पद ज्या लागेल जलास। तीर्थरूप ते होईल॥३१०॥ त्याच्या करुणेने निर्माण। होईल जलाशय विस्तीर्ण। तो होऊनि राहील जीवन। पशु-वृक्ष-मानवांचे॥३११॥ असा महाशिवयोगी शुभंकर। या गावी घेईल अवतार। गाजेल अवघे दिगंतर। या गावाच्या कीर्तीने॥३१२॥ म्हणूनि मी वारंवार। ह्या भूमीस करितो नमस्कार'। परिसूनि निवले अंतर। सर्व शंकित शिष्यांचे॥३१३॥ शिष्य म्हणती 'गुरुदेवा। जेथे प्रकटेल तो दिव्य ठेवा। ते गृह आम्हांस दाखवा। आम्ही अनुभवू धन्यता'॥३१४॥ 'अवश्य' म्हणूनि त्वरितगती। घेऊनि शिष्यसमूह संगती। मुद्दगौडाच्या वाड्यापुढती। येऊनि उभे ठाकले॥३१५॥ गजबज काय झाली म्हणून। मुद्दगौडा पाहती येऊन। तो शिवासम दिसती रेवण। शिवगणांत शोभलेले॥३१६॥ साठ वर्षांची सुगला आली। समूह पाहून चकित झाली। आत वळता तोच गर्जली। जगद्‌गुरूंची दिव्य वाणी॥३१७॥ 'थांब सुगले माते क्षणैक। माझी भविष्यवाणी ऐक। तुझ्या उदरी जगन्नायक। शिव घेईल जन्म गे'॥३१८॥ असे बोलूनि तिचे उदर। नमूनि स्पर्शिले हळुवार। पाहता हा अवघा प्रकार। संकोचली मानसी॥३१९॥ नमस्कारूनि बोले मंद। म्हणे 'स्वामिया झाले वृद्ध। ऋतू सरूनि लोटले अब्द। केस पूर्ण धवळले॥३२०॥ अवघे तारुण्य

गेले सरून। नाही पाहिले पुत्रवदन। वृद्धपणी का दाविता किरण। मज पुत्रजन्माचा?'॥३२१॥ रेवण बोलती हसून 'माते। निसर्गचक्र हे असेच भ्रमते। परि त्यावरी पूर्ण असते। नियंत्रण शिवाचे॥३२२॥ त्याच्या जरी मनी येते। पाषाणावरी पर्ण उगवते। जगन्नियंता तो घडवील ते। शंका मनी धरू नको॥३२३॥ तुझ्या उदरी येईल शिव। त्याच्या प्रभावे वाढेल गाव। जगतात गाजेल नाव। सोन्नलिगे गावाचे॥३२४॥ बाळ होईल सुकुमार। नाव ठेव सिद्धरामेश्वर। याचा पडू नये विसर। होईल तुमचे कल्याण'॥३२५॥ असे केले भविष्यकथन। पादपूजादी स्वीकारून। जगद्गुरूंनी केले गमन। आपुल्या वीरपीठाकडे॥३२६॥ सुगला मुद्दगौडा भाग्यवान। त्यांचे संचित फळले महान। उदरी सिद्धरामेश्वर येऊन। कीर्ती जहाली दिगंती॥३२७॥ सिद्धरामेश्वरांचे चरित्र। महाकवी राघवांकांनी पवित्र। वर्णिले 'श्रीसिद्धरामचारित्र'। नामे कन्नड भाषेत॥३२८॥ तेचि महाराष्ट्रभाषेत। शिवदासांनी सोलापुरात। ग्रथिले ओवीछंदात। श्रीसिद्धेश्वरपुराण॥३२९॥ भाविकांनी ते पाहावे। सिद्धरामांचे दर्शन घ्यावे। सिद्धरामांचे अनुभवावे। थोरपण अंतरी॥३३०॥ असो रेवणसिद्धांनी बहुत। लीला आचरिल्या अद्भुत। बिज्जलाचा गर्व त्वरित। हरिला स्वसामर्थ्याने॥३३१॥ उन्मत्त होता खर्पर योगिनी। तिचा नक्षा उतरविला झणी। चोळ-कल्लीनाथास बोधूनि। शिवसिद्धान्त

विवरिला॥३३२॥ चौदा शतके भूमीवर। केला अविरत संचार। शिवदीक्षा देऊनि अपार। नारी नर उद्धरिले॥३३३॥ अंती पट्टशिष्य रुद्रमुनीश्वर। त्यांना देऊनि पीठाधिकार। कोल्लिपाकीत सोमेश्वर। लिंगी झाले विलीन॥३३४॥ रेवणसिद्धांची पवित्र स्मृती। अजून जागते प्रांतोप्रांती। त्यांची मंदिरे साक्ष देती। महाराष्ट्र-कर्नाटकात॥३३५॥ बंगळुरू प्रांती होसपेटेजवळ। रेवणसिद्धेश्वरबेट्टा देऊळ। गुलबर्गा प्रांती रेवणसिद्ध रटकल। तुमकूरपाशी सिद्धनबेट्टा॥३३६॥ शिवगंगा क्षेत्र, होर्ती विजापूर। येथे रेवणसिद्धेश्वर मंदिर। सिद्धरामांचे सोलापूर। तेथेही मंदिर नांदते॥३३७॥ विटा, रेणावी, माचणूर। या ठायी रेवणसिद्ध मंदिर। अशी आचार्यस्मृती मधुर। अजून जागते भूतली॥३३८॥ वीरपीठावरी अनेकानेक। तपस्वी आचार्य झाले देख। वीरशैव-सिद्धान्तध्वज सुरेख। त्यांनी जगी उभविला॥३३९॥ रुद्रमुनी शिवाचार्य जाण। एक आचार्य गेले होऊन। त्यांनी रचिले 'कालज्ञान'। ग्रंथ आहे प्रसिद्ध॥३४०॥ रुद्रमुनी शिवाचार्यांपासून। एकशे वीस आचार्यांनी महान। भूषविले वीरसिंहासन। ख्यात केले जगात॥३४१॥ एकशे एकविसावे पीठाधीश्वर। प्रसन्नरेणुक वीरसोमेश्वर। पीठ सांभाळूनि विस्तार। करिती धर्मकार्याचा॥३४२॥ एकशे तेरावे आचार्य। जगद्गुरू श्रीचंद्रशेखर। त्यांच्या काळी चामराज वडियार। आले मैसूरभूपती॥३४३॥ पुढे श्रीजगद्गुरू पंचाक्षर। नंतर

जगद्‌गुरू शिवानंद राजेंद्र। त्या काळी कृष्णराज वडियार। यांनी घेतला आशीर्वाद॥३४४॥ तैसेच जयचामराज वडियार। नत झाले आचार्यांसमोर। अशी आहे वीरपीठावर। निष्ठा मैसूर-भूपतींची॥३४५॥ पुढील जगद्‌गुरू वीरगंगाधर। लिंगपूजनी अतितत्पर। गंगीभावी येथे थोर। त्यांनी केली तपश्चर्या॥३४६॥ स्थापिले लक्ष्मेश्वरजवळ। मुक्तिमंदिर पुण्यस्थळ। तपोभूमी मानूनि काळ। केला तेथे व्यतीत॥३४७॥ त्यांचे भव्य इष्टलिंगपूजन। ठरले भाविकांचे आकर्षण। अवर्षणग्रस्त प्रांती घन। वर्षविले तपस्येने॥३४८॥ 'मुक्तिमंदिर महर्षी' ठरले। त्याच नामे ख्यात झाले। अंगी कडकडीत वैराग्य भरले। सर्व त्यागिले वैभव॥३४९॥ तरट वस्त्र, घोंगडे शरीरी। बिल्वफळांची माला करी। मडके, सोटा, योगदंड खरी। हीच त्यांची आभूषणे॥३५०॥ असा वेष अलौकिक। पाहून दीपती भक्तलोक। वैराग्य जाणूनि करिती कौतुक। आहे 'चिंध्यांचा राजा' हा॥३५१॥ लक्ष बिल्वार्चन-दीपोत्सव। सहस्र कुंभाभिषेक अभिनव। सहस्र अड्डपालखी उत्सव। वाखाणिला भक्तांनी॥३५२॥ सहस्र मंटप करूनि सिद्ध। आत शिवाचार्य-बटुवृंद। बसवूनि पूजूनि ते असती वंद्य। दाखविले भक्तजना॥३५३॥ एक सहस्र अड्डपालख्यांतून। मिरविले शिवाचार्य बटुगण। सर्व गुरुरूप आचार्यासमान। असती हे दाविले॥३५४॥ पुढे वैरागमठाचे स्वामी पंचाक्षर। त्यांनी

स्वीकारिला पीठाधिकार। वीररुद्रमुनिदेव शिवाचार्य। नामे ख्याती पावले॥३५५॥ श्रावणमासी तपोनुष्ठान। महाराष्ट्री केले प्रबोधन। आशीर्वचने मराठीतून। करून झाले प्रसिद्ध॥३५६॥ पीठाचे संवर्धन केले। भक्तनिवासभुवन निर्मिले। बहुजनोपयोगी झाले। कार्य त्यांच्याकडून॥३५७॥ हळ्याळचे सिद्धलिंग शिवाचार्य। झाले एकशे एकविसावे पीठाचार्य। प्रसन्नरेणुक वीरसोमेश्वर नाव। साक्षेपे पीठ सांभाळती॥३५८॥ काव्यसाहित्यादी संस्कृत। परीक्षांत केले यश प्राप्त। अभ्यासूनि वेदान्त सिद्धान्त। त्यात प्राविण्य संपादिले॥३५९॥ महाद्वार, सभागृह बांधिले। वसतिगृह निर्मिले। शिक्षणकेंद्रे प्रकाशनादी केले। कार्ये अशी बहुविध॥३६०॥ पीठाचा दसरा दरबार। सांस्कृतिक सोहळा होतो सुंदर। कर्नाटकात धर्मप्रसार। करिती पूर्ण निष्ठेने॥३६१॥ अशी वीरपीठाची महती। निवेदिली श्रोतयांप्रती। आता पुढे सांगेन ख्याती। श्रीउज्जयिनीपीठाची॥३६२॥ संक्षेप करीन म्हणता जाण। विस्तारले थोडे कथन। तरी श्रोत्यांनी उपसाहून। द्यावे अवधान कथेकडे॥३६३॥ श्रीकाशीज्ञानसिंहासनाधीश्वर। जगद्गुरू महास्वामी श्रीचंद्रशेखर। त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर। रचितो शेषनारायण॥३६४॥ श्रीजगद्गुरू पंचाचार्य विजय रसाळ। परिसोत भाविक भक्त प्रेमळ। शिवभक्तमने व्हावी उत्फुल्ल। तृतीयोऽध्याय गोड हा॥३६५॥

॥ श्रीजगद्गुरु पंचाचार्यार्पणमस्तु॥

# अध्याय चौथा

## श्रीउज्जयिनीपीठ, सद्धर्मसिंहासन (पूर्वार्ध)

मंगलाचरण (ओवी १-५), महाकालेश्वर प्रकटन कथा (६-२४), ज० दारुकाचार्यांचे लिंगावतरण व राजा-भक्तांशी संवाद (२५-४३), राजास लिंगदीक्षा व तत्त्वोपदेश (४४-६५), राजाचे धन्योद्गार (६६-७१), नैमिष्यारण्याकडे प्रयाण, नैमिष्यारण्य वर्णन (७२-८३), ज० दारुकाचार्य-दधीची भेट, जगद्गुरूंचा सत्कार (८४-८९), दारुक-दधीची संवाद (९०-१०४), दधीचीस लिंगधारण व वृष्टिसूत्रोपदेश (१०५-१६८), म० दधीचींचे धन्योद्गार (१६९-१७२), ज० दारुकाचार्यांचे कार्य व अवतारसमाप्ती (१७३-१७५), म० दधीचींचे अस्थिदान : कथा (१७६-२०३), उपसंहार (२०४-२०८)

# अध्याय चौथा

॥ श्रीगणेशाय नमः॥ श्रीजगद्‌गुरु दारुकाचार्याय नमः॥

जय जय शिवा नीललोहिता। शिपिविष्टा अंबिकानाथा। शशिशेखरा शंभो अनंता। अंधकासुर-सूदना॥१॥ वृषभारूढा सामप्रिया। विष्णुवल्लभा स्वरमया। भक्तवत्सला शिवाप्रिया। उग्रा दुर्धर्षा शितिकंठा॥२॥ देवा तुझ्या इच्छेवाचून। न होय तृणाचेही निर्माण। जगराहाटी चालते संपूर्ण। केवळ तुझ्या प्रेरणेने॥३॥ म्हणूनि हृदयी माझ्या शिवा। वसूनि माझा सांभाळ करावा। आणि पुढती पुढती चालवा। गाडा ग्रंथरचनेचा॥४॥ हलाहलास कंठी धरून। पार पाडिले समुद्रमंथन। त्यापुढे माझे कार्य लहान। पूर्ण होईल तव कृपे॥५॥ गताध्यायी कथिले पूर्ण। श्रीवीरपीठाचे महिमान। आता श्रोतेहो निवेदीन। महिमा सद्धर्मपीठाची॥६॥ मालवदेशी होते मनोहर। विक्रमादित्याचे सुंदर नगर। क्षिप्रातीरी उज्जयिनीपुर। दुजे नाव अवंती॥७॥ जो कालाचाही काल असे। महाकालेश्वर तेथे वसे। ज्योतिर्लिंगरूपाने करीतसे। रक्षण आपुल्या भक्तांचे॥८॥ महाकालेश्वराची कहाणी। कथिली

आहे शिवपुराणी। तीच अति संक्षिप्त करूनी। तुम्हांप्रती सांगतो॥९॥ मानवांस जी मोक्षदायक। त्या अवंती नगरीत एक। वसे विप्र वेदप्रिय नामक। कर्मानुष्ठानी रत सदा॥१०॥ देवप्रिय, मेधाप्रिय, सुकृत। आणि चौथा नामे सुव्रत। असे विप्रासी चार सुत। होते वेदपरायण॥११॥ दूषण नामक असुर जाण। ब्रह्मवराने उन्मत्त होऊन। धर्म आणि धर्मात्म्यांवरी आक्रमण। करू लागला द्वेषाने॥१२॥ सबळ घेऊनि सेनाभार। आला चालूनि अवंतीवर। करू लागला अत्याचार। सज्जन प्रजा-जनांवरी॥१३॥ भयग्रस्त झाले सकल जन। परि न भ्याले चौघेजण। करू लागले शिवस्मरण। शांतपणे एके ठायी॥१४॥ असुर घेऊनि आला सेना। ध्यानमग्न पाहिले चौघांना। सेनेस म्हणे 'मारा हाणा। फोडा यांची मस्तके'॥१५॥ पुढती धावताच सैनिक। लिंगातून ध्वनी प्रकटे भयानक। तेणे गरगरू लागले मस्तक। दुष्ट दूषण असुराचे॥१६॥ सुटला वादळी झंझावात। असुर गेला मागे सरपटत। विवर पडूनि प्रकटले त्यात। शिव विकटरूपाने॥१७॥ आभाळ फाटूनि पडावी वीज। तसा कर्कश करूनि आवाज। म्हणे 'असुरा आलो आज। काळाचाही काळ मी॥१८॥ तुला येथे गाडीन भूमीत। किंवा करीन भस्मसात। महाकाल मी आलो भक्त-। रक्षणार्थ या ठायी'॥१९॥ मग विकट करिता हुंकार। सेनेसहित जळाला असुर। भयमुक्त जहाले अवघे नगर। भक्त सज्जन

आनंदले॥२०॥ अग्निस्पर्शे कापूर जळे। तसे नाशिले असुर सगळे। ब्राह्मण भक्तांनी स्तवन केले। महाकालेश्वराचे॥२१॥ शिव म्हणती 'मागावा वर'। भक्त म्हणती जोडूनि कर। 'आपण येथेचि निरंतर। राहावे भक्तरक्षणार्थ॥२२॥ दर्शन घेता भक्तांप्रती। द्यावी देवा सायुज्य मुक्ती'। 'तथास्तु' म्हणूनि कैलासपती। लिंगरूपे स्थिरावले॥२३॥ असे उज्जयिनी नगरीत। झाले महालिंग आविर्भूत। तेचि जगी झाले विख्यात। महाकालेश्वर ज्योतिर्लिंग॥२४॥ अशी प्रसिद्ध उज्जयिनीपुरी। तेथे वटक्षेत्र क्षिप्रातीरी। तेथील भूमी व्यापिली सारी। वटछायेने सर्वदा॥२५॥ श्रीसिद्धेश्वरलिंग प्राचीन। वसे अनादिकालापासून। युगीयुगी याच लिंगातून। दारुक घेती अवतार॥२६॥ द्वापरयुगी शिवभक्तजन। जमले करिती शिवकीर्तन। हर्षोल्हासाने शिवनामस्मरण। चालले करतालांसह॥२७॥ नामस्मरणी झाले धुंद। हृदयी दाटला ब्रह्मानंद। गर्भगृहात घुमे नाद। शिवहर शिवहर जय शंभो॥२८॥ अवचित तडकून जावे आभाळ। तसा उसळला ध्वनिकल्लोळ। लिंगातूनि फाकली तेजाळ। किरणे अद्भुत तेधवा॥२९॥ निमिषार्धात लिंगातून। मूर्ती प्रकटली अतीव प्रसन्न। ती दिसताक्षणी नयन। विस्फारले भक्तांचे॥३०॥ सर्वांगी चर्चिली विभूती। त्रिपुंड्र शोभे भाळावरती। ओशाळावी चंद्रदीप्ती। तसे तेज मुखावरी॥३१॥ कंठी विलसती रुद्राक्षमाळा। रक्तवर्णी कंथा कटीला। इष्टलिंग भूषवी

जटेला। करी दंड कमंडलू॥३२॥ अशी पाहता दिव्यमूर्ती। हालवू विसरले नेत्रपाती। विस्मयचकित अनिमिष बघती। भक्त शिवगणाकडे॥३३॥ मनी दाटला भक्तिभाव। लगबगे सामोरी घेती धाव। चरण वंदूनि घेती अनुभव। पूर्ण जन्मसाफल्याचा॥३४॥ वार्ता कळताच वायुगती। धावत आला देशीचा नृपती। सहपरिवार चरणांवरती। ठेवी माथा भक्तीने॥३५॥ म्हणे 'स्वामिया वटक्षेत्रात। जने पाहिले आज अद्भुत। लिंगातूनि प्रकटला अवचित। आपण दिव्यदेहाने॥३६॥ आज उगवला सुवर्णदिन। उज्जयिनी खरीच भाग्यवान। आपण कोण प्रकटाया कारण। काय आम्हा सांगावे'॥३७॥ नृपास देऊनि आशीर्वाद। शिवगण बोलती गंभीर शब्द। जसा शिवालयी घुमे पडसाद। मंद शिव-स्मरणाचा॥३८॥ 'मी दारुक शिवाचा गण। शिवाज्ञेने अवतरलो लिंगातून। करावया पुन:प्रतिष्ठापन। वीरशैवधर्माचे॥३९॥ कृत आणि त्रेतायुगांत। येथेच झालो होतो अवतरित। द्व्यक्षर, द्विवक्त्र नामे जगात। कार्य केले तेधवा॥४०॥ आता उगवले द्वापरयुग। धर्माचार विसरले जग। पुन्हा स्थापूनि सद्धर्ममार्ग। उद्धरिणे जनांसी॥४१॥ वटक्षेत्री असे महान। सद्धर्मपीठ विराजमान। येथूनीच कार्य पूर्ण। झाले पूर्वयुगांत॥४२॥ आता येथून पुन्हा नव्याने। मानवा लिंगदीक्षा देणे। त्यांना सन्मार्गबोध करणे। कार्य कराया हे आलो'॥४३॥ 'धन्य धन्य स्वामी' म्हणून। राये वंदिले शिवगणचरण। म्हणे

माझिया प्रासादी येऊन। पुनीत आम्हा करावे।।४४।। मुक्त मने करावी परीक्षा। आणिक द्यावी लिंगदीक्षा। धर्माचारप्रबोधभिक्षा। घाला माझ्या पदरात।।४५।। राजियाची प्रार्थना ऐकून। संतोषले दारुक गण। म्हणती 'राया तुझे वर्तन। असे न्यायोचितचि।।४६।। तुझे उज्जयिनी अवंती नगर। प्रसिद्ध जहाले सर्वदूर। न्यायनीतीचा धरूनि पदर। तुझे शासन चालते।।४७।। राजधर्मी पूर्ण निपुण। जाणसी प्रजेची वेदना पूर्ण। म्हणूनि चालते गुणगान। तुझे आर्यावर्तात'।।४८।। उपरी राये सदनी नेले। दारुकांचे आतिथ्य केले। यथासांग पूजूनि घेतले। पादोदक सकलांनी।।४९।। शक्तिपात चिन्हे न्याहाळून। राजास केले लिंगधारण। षट्स्थल आणि अष्टावरण। पंचाचार निरूपिले।।५०।। सप्तकोटी मंत्रांत जो पवित्र। तो उपदेशिला पंचाक्षरमंत्र। मग म्हणती 'राया श्रोत्र। देई माझ्या बोलाकडे।।५१।। करी दिले जे इष्टलिंग। तेच तुझे प्राणलिंग। देहापासूनि ते विलग। करू नको कदापि।।५२।। जसा शरीरी राहतो प्राण। तसेच हे इष्टलिंग जाण। प्राणासारखे करी धारण। देहावरी सर्वदा।।५३।। देहापासूनि होता विलग। करावा लागे प्राणत्याग। म्हणूनि देह आणि लिंग-। संबंध लागे जपावा।।५४।। देहावरी इष्टलिंग। हृदयी वसे प्राणलिंग। आणि असे भावलिंग। भावनेत जाण तू।।५५।। उपभोग्य जे जे पदार्थ। ते आधी करूनि लिंगार्पित। मग स्वीकारणे उचित।

लिंगप्रसाद म्हणूनिया॥५६॥ सुखदु:खादी जे जे मिळे। ते प्रसादचि मानी सगळे। लिंगसत्तेनेच हले डोले। अवघा विश्वसंसार॥५७॥ शिव 'लिंग', जीव 'अंग'। ही जाणीव असावी अभंग। लिंगरूप होता अंग। तेच लिंगांगसामरस्य॥५८॥ सुगंध जो निराकार। तोच कापूररूपे साकार। तसा शिवचि गुरुरूपे भूवर। अवतरला हे जाण तू॥५९॥ 'लिंग'रूपे आराध्य होतो। 'गुरु'रूपे दीक्षा देतो। 'जंगम' होऊनि बोधितो। तोच सर्व शिवाचार॥६०॥ गुरू, लिंग, जंगम तीन। म्हणूनि मानावे एकसमान। त्यांच्यात अधिक-उणेपण। करू नये कदापि॥६१॥ नित्य करावे लिंगार्चन। भोग स्वीकारी प्रसाद मानून। तुजला उपदेशिला महान। महामंत्र पंचाक्षरी॥६२॥ येवो कितीही आपदा विपदा। मंत्रजप करावा सर्वदा। राज्य चालवी परि कदा। खंड यात पडू नये॥६३॥ शिव स्वामी आपण सेवक। हा विचार दृढ व्हावा एक। मग राज्यमदाने कधी विवेक। सुटेनाच बुद्धीतूनी॥६४॥ अष्टावरण घेई जाणून। पंचाचारांचे करी पालन। षट्स्थलसाधना करिता पूर्ण। मुक्ती लाभेल या जन्मी'॥६५॥ असा दारुके उपदेशिला। नृपती पूर्ण तृप्त झाला। चरण वंदूनि म्हणे 'दयाळा। मजला आज धन्य केले॥६६॥ वीरशैवसिद्धान्तकिरणे सकळ। माझे विकसले मनोकमळ। गेला अज्ञानतमोमळ। निघूनिया मनातून॥६७॥ तुमची अमोघ वर्षली वाणी। चिंब मनाची झाली धरणी।

तत्त्वबीजांची केली पेरणी। करूनि कृपा गुरुदेवा॥६८॥ आता अपार ती पिकेल। सद्विचार धान्य बहरेल। सेवूनि पूर्ण तृप्त होईल। भूमीवरी जनलोक'॥६९॥ असे बोलूनि नृपवर। चरण वंदी वारंवार। आधीच प्रजाहितात तत्पर। वरी घेतली लिंगदीक्षा॥७०॥ त्याचे राज्य स्वर्ग होईल। आणि स्वये इंद्र शोभेल। यात कोणते असे नवल। घडणे अटळ केवळ हे॥७१॥ असा बोधिल्यावरी नृपवर। दारुक मनी करिती विचार। वृष्टिसूत्राचा करावा प्रसार। जनकल्याण व्हावया॥७२॥ कोणास बोधावे करिता विचार। दधीची स्मरले दृष्टिसमोर। नैमिषारण्यात ते निरंतर। वसती आश्रम स्थापूनी॥७३॥ परम तपस्वी परमज्ञानी। करुणावत्सल सत्यवचनी। ब्रह्मनिष्ठ वेदागमपठणी। रत सदासर्वदा ते॥७४॥ त्यांना बोधावे सूत्र महान। असा दृढ निश्चय करून। आकाशमार्गे दारुक गण। निघाले नैमिषारण्याकडे॥७५॥ श्रोतेहो कराया धर्मस्थापन। देवादिकांनी निवडिले स्थान। तेचि नैमिषारण्य महान। पुराणांतरी प्रसिद्ध॥७६॥ साठ सहस्र ऋषी समस्त। मग्न येथे शिवयोगात। असे कथिले पुराणांत। स्थानमाहात्म्य येथले॥७७॥ सुतशौनकादी ऋषिगणे। येथेचि कथिली अष्टादश पुराणे। गाइले येथे मुक्तपणे। सौतीने महाभारत॥७८॥ नैमिषारण्यात द्वापरयुगी। वसती सिद्ध ऋषी योगी। पुराणश्रवणी यज्ञयागी। योगसाधनी निमग्न॥७९॥ वृक्ष दाटले अपरिमित।

सूर्यकिरण शिरेना आत। उत्तुंग वृक्ष स्पर्शू पाहात। नभी नक्षत्रतारकांसी॥८०॥ ठायी ठायी कवटाळून। वेली वृक्षास टाकिती जखडून। जणू सांगती आम्हा त्यागून। जाऊ नका नभांतरी॥८१॥ वट अश्वत्थ औदुंबर। बिल्व नारळी देवदार। फळ-फुलवृक्षांनी अपार। नैमिषारण्य बहरले॥८२॥ अश्वत्थाच्या गर्द छायेत। दधीची बसले होते शांत। गंधे भारूनि होता वाहात। वायू मंदगतीने॥८३॥ भोवती ऋषिगणांचा मेळा। शास्त्रचर्चेत होता रमला। तितुक्यात तेथे अवलीला। दारुकाचार्य प्रकटले॥८४॥ दारुकास पाहताक्षणी। दधीची उठले आसनावरूनी। वेगे येऊनि वंदन करूनी। बद्धपाणि तिष्ठले॥८५॥ म्हणती 'गणेश्वरा आपुले। नैमिषारण्यी पाऊल पडले। भाग्यच आमचे उदया आले। असे मजला वाटते॥८६॥ की सहज तुडविता वाट। लाभावा अवचित सुवर्णघट। कंठ कोरडा होता तट। दिसावा पुण्यसरितेचा॥८७॥ तसे नसता मनीमानसी। दर्शनलाभ झाला आम्हांसी। आपण येऊनि आश्रमासी। धन्य सकळांना करावे'॥८८॥ पर्णकुटीत नेऊनि मग। दारुकांस पूजिले यथासांग। पादोदक घेऊनि मुनिवर्ग। संतुष्ट जहाला मानसी॥८९॥ दधीची बोलती कर जोडून। 'आम्ही खरेच भाग्यवान। अभ्यासिली मी शास्त्रे संपूर्ण। परि समाधान होईना॥९०॥ जगी कोठून जीव येती। कसे येती कोठे जाती। त्यांची कशी गती अगती। हे न कळले पूर्णत:॥९१॥ तरी आपण

आम्हा बोधावे। शंकासमाधान करावे। आणि कृतार्थपण द्यावे। जीवनास माझिया'॥९२॥ उभारूनिया दक्षिण कर। आशीर्वाद देती गणेश्वर। म्हणती 'दधीची तू खरोखर। ज्ञाता षट्शास्त्रांचा॥९३॥ न्याय, वैशेषिक, सांख्यशास्त्र। पूर्वमीमांसा, वेदान्त पवित्र। या शास्त्राभ्यासात सर्वत्र। तू प्राविण्य संपादिले॥९४॥ द्वैत, अद्वैत, विशिष्टाद्वैत। मतांतरे ही तुजला ज्ञात। आस्तिक नास्तिक आदी दर्शनांत। तुझी मती राहाटली॥९५॥ शिवे मज बोधिले वृष्टिसूत्र। ते या सर्वांत अतिपवित्र। ते बुद्धिगम्य होताच नेत्र। पूर्ण ज्ञानाचे विकसती॥९६॥ आम्ही पंच शिवगणांनी। कृत-त्रेतायुगी अवतरूनी। शिवाद्वैताचार बोधूनी। उद्धरिले जीवांना॥९७॥ आता उगवले युग द्वापर। जहाले मानव सैरभैर। त्यांना बोधावया शिवाचार। पुन्हा आलो भूवरी॥९८॥ करावया हे कार्य पूर्ण। तुझ्यासारखा समर्थ कोण?। यास्तव तुजला उपदेशीन। वृष्टिसूत्र पूर्णपणे॥९९॥ वृष्टिसूत्र जाणता पूर्ण। होईल शंकेचे समाधान। एकाग्र होऊनि अवधान। देई माझ्या बोलाकडे'॥१००॥ जगद्गुरूंची ऐकता वाणी। अश्रू दाटले दधीचिनयनी। म्हणती 'धन्य केले अवनी-। वरी मजला गुरुदेवे॥१०१॥ कोणती फळली जन्मपुण्याई। ते मज मुळी ठाऊक नाही। याच जन्मी याच देही। मुक्ती मला लाभली॥१०२॥ जनकल्याणी देह झिजावा। यासम अन्य वर न बरवा। आपुल्या भाग्याचा हेवा।

करावा आज आपण॥१०३॥ गणेश्वरा मी झालो सिद्ध। सुखे आपण करावा बोध। आज्ञेनुसार करीन प्रसिद्ध। जगी वृष्टिसूत्र मी'॥१०४॥ दारुकाचार्यांनी यथासांग। विधिवत् दिधले इष्टलिंग। शिवाद्वैत बोधूनि अभंग। शिष्य केला दधीची॥१०५॥ मग एकाग्र करूनि चित्त। सर्वेन्द्रिये आणिली कर्णात। बोधिती घनगंभीर स्वरात। दारुकाचार्य दधीचींना॥१०६॥ 'जीव, जगत्, ईश्वर। बंध, मोक्ष हे पंचप्रकार। दर्शनशास्त्रांत निरंतर। यांवरी चर्चा चालते॥१०७॥ जीव म्हणजे कोण असे। जगत् सत्य की आभासे?। ईश्वराचे रूप कसे। साकार की निराकार?॥१०८॥ बंध म्हणजे नेमके काय?। मोक्ष खरा की कल्पनामय?। फेर धरिती होऊनि तन्मय। याच प्रश्नांभोवती॥१०९॥ दधीची हे प्रश्न निर्माण। व्हावयास एकच कारण। पृथ्वीवरी झाले जनन। जीवात्म्यांचे असंख्य॥११०॥ सागरावरी उठती तरंग। अग्नीतूनि निघती स्फुल्लिंग। तसे परतत्त्वाचेच अंशभाग। असती जीव समग्र॥१११॥ स्त्रीपुरुषमीलनातून। जगी जीवाचे होते जनन। हे सत्य तरी येतो कोठून। त्यांच्या देहामध्ये तो?॥११२॥ सूक्ष्म जीव जगी असंख्य। देह घ्यावया असती उत्सुक। स्त्रीपुरुषदेही शिरूनि देख। जन्म घेती भूवरी॥११३॥ जीव असे अन्नरसमय। असे सांगती श्रुती सर्व। संचरे अन्नरसातूनि जीव। मातृ-पितृदेहांत॥११४॥ जलचि जीवांचे असे जीवन। जलातचि जीवांचे होई

जनन। जलचि करिते त्याचे पोषण। जलावाचून तो जगेना॥११५॥ जलामुळे पिकते धरणी। धान्यामुळे जगती प्राणी। जलचर, पक्षी, वनस्पती योनी। जलामुळेच जिवंत॥११६॥ असे जीवनदायी जल। वृष्टिद्वारे वर्षे सकळ। तोच जीवनाधार सबळ। पूर्ण घ्यावे जाणूनी॥११७॥ वृष्टिद्वारे आकाशातून। जीव पृथ्वीवरी येऊन। जाती अन्नरसाच्या द्वारे जाण। देही मायपित्याच्या॥११८॥ मग त्यांच्याद्वारे देखणे गोंडस। रूप घेऊनि येती जन्मास। असा जीवाचा कथिला प्रवास। उपनिषद् ग्रंथांतरी॥११९॥ जीवस्वरूपाचे होणे ज्ञान। हेचि वृष्टिसूत्र जाण। वृष्टि-अन्नरस-जनन। असा जन्मप्रवास हा॥१२०॥ जीवात्म्याच्या उपभोगासाठी। शिवे निर्मिली सकल सृष्टी। सृष्टिरूपाने तोच परमेष्ठी। एकमेव प्रकाशतो॥१२१॥ जीव, जगत् ईश्वर सकल। ही परतत्त्वाचीच रूपे केवळ। परि अविद्येने आले पडळ। दृष्टीवर जीवत्वाचे॥१२२॥ जीवाठायी अणुभाव येऊन। तो स्वत:स समजे लहान। प्रत्यक्ष शिवस्वरूप असून। स्वत:स जीव मानतो॥१२३॥ यास म्हणती आणवमल। दुसरा असे मायामल। तो जीवबुद्धीत सकल। भेदभाव पेरितो॥१२४॥ मी वेगळा, तो वेगळा। तो परका, हा आपुला। असा भेदबुद्धीने बांधिला। सृष्टीकडे पाहतो॥१२५॥ तिसऱ्या कार्मिक मलामुळे। तो कर्माचरणाकडे वळे। आचरूनि शुभाशुभ कर्मे मळे। त्याची फळे भोगीतसे॥१२६॥ बेडूक फसे चिखलात। तसा

गुंततो कर्मजालात। कर्मफळे भोगाया सतत। भ्रमे जन्मजन्मांतरी॥१२७॥ जीव मुळात असे शिवमय। त्यास वेढिती हे मलत्रय। मग जीवापाठी भवभय। लागे भुतासारखे॥१२८॥ त्यातून सुटका होण्यासाठी। करणे लागे आटाआटी। जीवभाव हाच शेवटी। दु:खाचे मूळ कारण॥१२९॥ शुभ अशुभ कर्मांमुळे। जीवाला पुन:पुन्हा जन्म मिळे। जन्मजन्मांतराचे सगळे। मूळ कारण कर्मचि॥१३०॥ चौऱ्यांशी लक्ष योनींमधून। जीवास करणे लाभे भ्रमण। कर्मानुसार देह धारण। करावा लागे निमूटपणे॥१३१॥ ठेगणे उंच लठ्ठ बारीक। जसे शरीर असे देख। त्याच मापाचा पोशाख। घालावा लागे माणसाला॥१३२॥ तसे ज्याचे जसे कर्म। तसाच त्याला मिळे जन्म। देव मनुष्य तिर्यक् होऊन। भोग लागती भोगावे॥१३३॥ पुण्याधिक्याने देव होणे। पापाधिक्याने पामर योनी भोगणे। पुण्यपाप समान होता जन्मणे। मनुष्य योनीत इहलोकी॥१३४॥ परि त्यात मनुष्यजन्म। असे एक श्रेष्ठतम। तोच देतो पद परम। प्राप्त करून जीवाला॥१३५॥ करूनि आत्मानात्मविचार। शक्य आचरिणे शिवाचार। म्हणूनि मुक्तीचे महाद्वार। म्हणती मनुष्यजन्माला॥१३६॥ खरे पाहता जन्म घेणे। हेच जीवाचे खरे दुखणे। ते टाळावया लागे करणे। जन्मोजन्मी तपश्चर्या॥१३७॥ वाहावया दु:खाची गोणी। जीवास मिळते मनुष्ययोनी। आप्तसोयऱ्यांची गाऱ्हाणी। सर्वदा लागे ऐकावी॥१३८॥

पुत्रकलत्रांची भांडणे। यातच अर्धमेले होणे। जातिवर्णांमुळे भोगणे। मनस्ताप जीवाला॥१३९॥ मानखंडना घरीदारी। आप्त तेचि होती वैरी। किंचित् सुख संसारी परी। दु:ख ओझे अफाट॥१४०॥ त्रितापांचा जाच अपार। पाठी रोगांचा भस्मासुर। वय वाढे तसे द्वार। जवळ येई मरणाचे॥१४१॥ जन्म हेचि दु:खमूळ। असे सांगती शास्त्रे सकळ। पण तरीही मुक्ती केवळ। लाभे मनुष्यजन्मातच॥१४२॥ कोसळला दु:खाचा डोंगर। तरी धीरपणे साहतो नर। कारण त्याच्या अंतरी स्थिर। शिव आत्मरूपाने॥१४३॥ म्हणूनि दधीची सावध ऐक। मनुष्यजन्मचि मुक्तिदायक। त्याच्या अंतरी जागे विवेक। तसा न अन्य प्राण्यांच्या॥१४४॥ श्रीगुरूस शरण जाऊन। धर्मरहस्य घ्यावे जाणून। लिंगदीक्षा घेऊनि जीवन। लिंगमय करावे॥१४५॥ सुखदु:ख हर्षखेद। तो मानावा शिवप्रसाद। दु:खद जन्म मग होतो सुखद। असे माहात्म्य धर्माचे॥१४६॥ शिवस्वरूप जगत् पूर्ण। असे दृढ येता भान। आप पर हा भेद विरून। सर्वांतरी शिव दिसे॥१४७॥ कमलपत्रावरला थेंब। त्याला कोण म्हणेल 'थांब'। ओघळून जाईल अविलंब। तसा देह अस्थिर॥१४८॥ देह जन्मला ज्या क्षणास। तत्क्षणी सुरू झाला प्रवास। वय वाढे तसतसा फास। जवळ येई यमाचा॥१४९॥ ज्यांनी इतरा दिले जीवदान। त्यांना चुकले नाही मरण। दुर्जन असो वा संतसज्जन। यांना मरण

अटळचि॥१५०॥ असे भान ज्याला आले। त्याचे उघडिले ज्ञानडोळे। विषयकर्दमी तो न लोळे। वळे आत्मरूपाकडे॥१५१॥ अंतरीची आत्मज्योत। त्याला करी आकर्षित। तिच्या तेजाने प्रकाशित। होई पूर्ण जीवन॥१५२॥ केशाग्राच्या शतांशासमान। आत्मा अंतरी प्रकाशमान। दीप एके ठायी राहून। जसा उजळी पूर्ण गृह॥१५३॥ तसे अंतरीचे चैतन्य। राहिले सर्व शरीर व्यापून। या अनुभवाने त्याचे मन। बहरूनि येई घडोघडी॥१५४॥ त्याचा मावळून जीवभाव। अंतरी जागे आत्मभाव। जाणतो ज्यास शरीर हे नाव। ते मी नाही निश्चित॥१५५॥ शरीराची स्रवती नवद्वारे। व्याधी येताचि तो थरथरे। निष्प्राण झाल्यावरी घाबरे। होती लोक स्पर्शिताना॥१५६॥ उघडे अस्थी रक्त मांस। पाहता मनी दाटे किळस। परि झाकून टाकिले त्यास। वरी त्वचा पांघरूनी॥१५७॥ असा आधिव्याधीने ग्रासला। ज्याच्या पाठी मृत्यू लागला। तो देह मी नव्हे, आतला। शुद्ध मुक्त आत्मा मी॥१५८॥ अविद्येने तो देहधारी। दिसे सुखदु:खे भोगितो सारी। कोणी नर म्हणे कोणी नारी। परि तो नारी, नर नव्हे॥१५९॥ ज्या देही तो वसे देख। त्या देहाने त्याची ओळख। परि देहभोग सुखदु:ख। शुद्धात्म्यास स्पर्शेना॥१६०॥ सूर्य बिंबे गढूळ जलात। परि मळाने न होय लिप्त। तशी देहकर्मे समस्त। आत्म्यापासून वेगळी॥१६१॥ पक्षी घरट्यामध्ये राहे। पण घरट्यापासून

वेगळा आहे। तसा आत्मा देह नव्हे। जरी देहात वसे तो॥१६२॥ भेदबुद्धीचे जे कारण। ते नष्ट होताचि अज्ञान। आत्माच परमात्मा होऊन। स्वयंरूपे प्रकाशतो॥१६३॥ मलसंबंधविरहित। जो विश्वाचा आधार समस्त। छत्तीस तत्त्वांच्याही अतीत। सर्वश्रेष्ठ परम आत्मा॥१६४॥ महाकाश एकचि पूर्ण। घटाघटांत दिसे भिन्न। तसा असंख्य जीवदेहांतून। एक नांदतो परमात्मा॥१६५॥ श्रीगुरूपदेशे तत्त्वता। शिवाद्वैताचा अनुभव येता। मग लिंगांगसामरस्य हाता। येणे आहे सहजचि॥१६६॥ दधीची जो वृष्टीतून। जीव जगी झाला निर्माण। त्याचे स्वरूप विकास पूर्ण। कथन केला विवरूनी॥१६७॥ हेचि पूर्ण वृष्टिसूत्र। जगती प्रकट करी सर्वत्र। तेणे उद्धरतील जीवमात्र। ओळखूनि आत्मरूप'॥१६८॥ असा दारुक-दधीचीसंवाद। महर्षीस झाला पूर्ण बोध। भोवती बसलेला ऋषिवृंद। आनंदला मनस्वी॥१६९॥ दधीची म्हणे 'महास्वामी। उपदेशे जहालो धन्य मी। तुमच्या आज्ञेने करीन भूमी-। वरी प्रकट वृष्टिसूत्र॥१७०॥ आज पुण्य आले फळा। येऊनि बोधिले अवलीला। माझा संभ्रम जाऊनि मला। झाला बोध अमृताचा॥१७१॥ वीरशैवधर्म परमपावन। तेणे लाभेल शिवज्ञान। सर्वार्थांनि जाईल उजळून। जीवन जनलोकांचे'॥१७२॥ देऊनि आशिष

मंगलदायक। पुढे जावया निघाले दारुक। वंदिले चरण भक्तिपूर्वक। ऋषिगणांनी तयांचे॥१७३॥ मध्य-उत्तर आर्यावर्ती। दारुक भ्रमले प्रांतोप्रांती। दीक्षा देऊनि शिवभक्ती। लोकमानसी जागविली॥१७४॥ अनेक वर्षे देहधारण। करूनि भूषविले सद्धर्मसिंहासन। अंती वटक्षेत्री येऊन। लिंगी जहाले एकरूप॥१७५॥ दारुकशिष्य दधीची महर्षी। तेही भ्रमले भारतवर्षी। रूढविला शिवाचार लोकमानसी। बोधूनिया वृष्टिसूत्र॥१७६॥ याच वृष्टिसूत्रावरती। दधीचींनी रचिली 'वृत्ती'। तेणे शिवाद्वैत जगती। परिपूर्ण प्रकाशले॥१७७॥ मग अंती आश्रमी येऊन। शिवपूजन शिवचिंतन। करीत राहिले कालक्रमण। मोदे नैमिषारण्यात॥१७८॥ पुढे इंद्रशत्रू वृत्रासुर। मातला करीत अत्याचार। गांजिले देव मानव अपार। त्याने दुष्ट बुद्धीने॥१७९॥ येताचि करी थयथयाट। वाहवी नररुधिराचे पाट। देवांसी केले स्थानभ्रष्ट। झाले भयभीत सर्वही॥१८०॥ निज आसुरी सामर्थ्याने। अवघे विश्व व्यापिले त्याने। त्राहि माम् करीत भयाने। देव मानव धावती॥१८१॥ मग विष्णुपुढती जाऊन। प्रार्थिती सर्व देवगण। 'प्रभो वाचवावे यातून। आम्हा देव-मानवांना॥१८२॥ वधावया असुरास। उपाय सापडेना आम्हांस। केले कितीतरी प्रयास। तरी जिताच राहिला'॥१८३॥ प्रसन्नचित्ते विष्णू

बोलती। ‘तुम्हा अशक्य काय जगती?। घडले देवासुर संग्राम किती। त्यात देवचि जिंकले॥१८४॥ देवांनीच हताश व्हावे। मग मानवांनी काय करावे?। ते निजरक्षणार्थ मनोभावे। प्रार्थिती देवदेवतांशी॥१८५॥ वृत्रासुरांस वधायास। उपाय सांगतो एक तुम्हांस। दधीची मुनीच्या आश्रमास। तुम्ही जावे सकलांनी॥१८६॥ विद्या, तप आणि व्रत। त्यांनी आचरिले यथार्थ। ब्रह्मज्ञानाने जीवन्मुक्त। सर्वस्वाने जहाले ते॥१८७॥ दारुकाचार्यांनी अतिपवित्र। त्यांना उपदेशिले वृष्टिसूत्र। अभ्यासे त्या गात्रन् गात्र। दृढ त्यांचे जहाले॥१८८॥ तुम्ही जाऊनि त्यांच्यासमोर। याचना करूनि मागा शरीर। त्यांच्या अस्थीपासूनि प्रखर। तुम्ही वज्रास्त्र निर्मावि॥१८९॥ त्या वज्राच्या प्रभावाने। उखडा वृत्रासुराचे ठाणे। मगचि भयमुक्त जिणे। तुम्हा सर्वांना लाभेल'॥१९०॥ ‘अवश्य' म्हणूनि निघाले देव। ठाकले दधीचीपुढे सर्व। वृत्रासुराचा दुष्ट स्वभाव। कथन केला सर्वही॥१९१॥ मागताचि देहदान। दधीची बोलले मंद हसून। ‘करावया लोककल्याण। मी सिद्धचि पूर्णतः॥१९२॥ तपाचरणाने झिजले शरीर। परि ते आहे क्षणभंगुर। जाणतो काळप्रभावे त्यावर। येणे आहे मरणकळा॥१९३॥ वृष्टिसूत्राध्ययनामुळे। देहपाताचे भय न उरले। सत्कार्यास्तव शरीर वेचले। तरी जहाले

सार्थक॥१९४॥ घ्या घ्या करितो देहदान। वाचवा जीवमात्रांचे प्राण। वृत्रासुराचे प्राणहरण। तुम्ही सत्वर करावे'॥१९५॥ असे बोलूनि आपुले नेत्र। दधीचींनी मिटले क्षणमात्र। अंतरी स्मरूनि वृष्टिसूत्र। प्राण तत्काळ त्यागिले॥१९६॥ दधीचींच्या अस्थींपासून। विश्वकर्म्यानि प्रयत्न करून। प्रलयंकर वज्र निर्माण। केले अति सायासे॥१९७॥ देवदेवतांनी वज्रास्त्र निर्मिले। वृत्रासुराच्या कानी आले। भयकंपित होऊनि पळे। दडला पाताळकंदरी॥१९८॥ धाविन्नले इंद्रादी सुर। बाहेर खेचिला वृत्रासुर। त्याच्याशी मांडिला घनघोर। संग्राम इंद्राने तेधवा॥१९९॥ अंती फेकूनि वज्रशूल। भेदिले त्याचे कंठ कपाळ। यमसदनी पाठविला खळ। निर्विघ्न केली धरित्री॥२००॥ नरसंहाराच्या भीती-। पासूनि मुक्त झाली क्षिती। देव मानव पुनश्च वर्तती। निर्वेधपणे कर्ममार्ग॥२०१॥ देहदानकर्ते पहिले। दधीची ख्यातकीर्त झाले। दारुकाचार्यांचे शिष्य ठरले। वृष्टिसूत्राचे प्रचारक॥२०२॥ अशी दधीची मुनीची कहाणी। वर्णिली पुराणोपपुराणी। तीच श्रोतियांच्या कर्णी। कथिली अतिसंक्षेपे॥२०३॥ अशा सिद्ध ऋषीस बोधून। प्रसिद्धी पावले सद्धर्मसिंहासन। तपोनिष्ठ वैराग्यशील महान। जगद्गुरूंनी भूषविले॥२०४॥ याच पीठाचा पुढील इतिहास। सांगेन श्रोतेहो तुम्हांस।

ऐकताच तोषेल मानस। पूर्ण हर्षभराने॥२०५॥ पुराणेतिहासातून। शोधिता सापडती सुवर्णकण। तेणे पीठाचा इतिहास पूर्ण। जागा होई मनात॥२०६॥ श्रीकाशीज्ञानसिंहासनाधीश्वर। जगद्‌गुरू महास्वामी श्रीचंद्रशेखर। त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर। रचितो शेषनारायण॥२०७॥ श्रीजगद्‌गुरू पंचाचार्य विजय रसाळ। परिसोत भाविक भक्त प्रेमळ। शिवभक्तमने व्हावी प्रफुल्ल। चतुर्थोऽध्याय गोड हा॥२०८॥

**॥ श्रीजगद्‌गुरु पंचाचार्यार्पणमस्तु ॥**

□□

# अध्याय पाचवा

## श्रीउज्जयिनीपीठ, सद्धर्मसिंहासन (उत्तरार्ध)

मंगलाचरण. पूर्वसूत्र (ओवी १-९), ज० मरुळाराध्यांचे लिंगावतरण, रूपवर्णन (१०-१७), राजा श्रौतपादाची यज्ञकथा (१८-७३), पंचाचार-उपदेश (१९-७३), श्रौतपादाने व्यक्त केलेली धन्यता (१५४-१५७), ज० मरुळाराध्यांचा देशसंचार व अवतारसमाप्ती (१५८-१६५), ज० उज्जयिनीपीठाधीश्वर व त्यांचे कार्य (१६६-२३१), नंदिगणाची कथा (२३२-२४५), उपसंहार (२४६-२४७)

# अध्याय पाचवा

॥ श्रीगणेशाय नमः॥ श्रीजगद्‌गुरु मरुळाराध्याय नमः॥

नमू शंकरा व्योमकेशा। अष्टमूर्ते मृडा त्रिलोकेशा। अजा अपवर्गप्रदाय गिरीशा। गिरिप्रिया वृषांका॥१॥ भक्तवत्सला सोमा शर्वा। अनघा भर्गा भीमा भवा। विरूपाक्षा हविषा वामदेवा। यज्ञपते सर्वज्ञा॥२॥ तुझ्या कृपाकटाक्षबळे। उघडती भक्तांचे मिटले डोळे। आणि ज्ञानप्रकाश उजळे। त्यांच्या अंतरंगात॥३॥ फुले उमलती वृक्ष डोलती। पवन वाहतो मंदगती। तारे ग्रह नक्षत्रे भ्रमती। येती जाती जीवमात्र॥४॥ अंतर्यामी वसूनि स्थिर। तूच चालविसी चराचर। पाहता अफाट विश्वविस्तार। तुझे जाणवे सामर्थ्य॥५॥ मी करतो हा असे वृथा। अहंकार माझा सर्वथा। तूच कर्ता आणि करविता। आणि बोलविता धनीही॥६॥ म्हणूनिया हे ग्रंथलेखन। तुझे तूच घेई करवून। यात माझी भूमिका पूर्ण। असे लेखनिकाची॥७॥ श्रोतेहो कथिली गताध्यायी। श्रीदारुकाचार्यांची थोरवी। दधीचीने प्रसार केला मही-। वरी वृष्टिसूत्राचा॥८॥ पुढे सरूनि द्वापरयुग। भूवरी अवतरले कलियुग। पुन्हा अवतरणाचा प्रसंग। आला दारुक गणावरी॥९॥ मध्यप्रांती मनोहर। क्षिप्रानदी तीरावर।

उज्जयिनी प्रसिद्ध नगर। क्षेत्र महाकालेश्वराचे॥१०॥ तेथे सिद्धेश्वर लिंगातून। पुनश्च प्रकटले शिवगण। भूषविले सद्धर्म सिंहासन। गाजू लागले धर्मपीठ॥११॥ मरुळाराध्य या नावे। जागर आरंभिला स्वभावे। लोक वंदूनि मनोभावे। दीक्षा घेती विधियुक्त॥१२॥ शिरी शोभे जटाभार। कंठी रुळे रुद्राक्षहार। जटेत इष्टलिंग सुंदर। निष्कलंक विराजे॥१३॥ कटीस कंथा रक्तवर्ण। भस्मे शरीर शोभायमान। भाळी विलसे त्रिपुंड्र पूर्ण। रेखीव आणि सुस्पष्ट॥१४॥ पलाशदंड वामकरी। ताम्र कमंडलू दक्षिणकरी। अशी शोभली मूर्ती साजिरी। मरुळाराध्याचार्यांची॥१५॥ वैराग्यसंपन्न शिवज्ञानी। परम कारुणिक सत्यवचनी। निष्कलंक चंद्र गगनी। जसे तरणी तापहीन॥१६॥ अंगी शिवज्ञान मुराले। जसे तेजाने वस्त्र वेढले। तसे पूर्ण रसरसले। तपस्तेजाने आचार्य॥१७॥ अष्टावरण पंचाचार। आणिक षट्स्थलसिद्धान्त थोर। उपदेशूनि नारी नर। सकला देती लिंगदीक्षा॥१८॥ मग तेथे काय घडले। तेही तुम्हा कथितो सगळे। जगद्गुरूंनी वाचविले। प्राण मुक्या पशूंचे॥१९॥ उज्जयिनीचा भूपाळ। श्रौतपाद नामे प्रबळ। एकदा झाला उतावीळ। स्वर्गाच्या अभिलाषेने॥२०॥ त्याने आरंभिला याग। कापू लागले प्राणिजग। जिवांवर बेतला प्रसंग। मुक्या दीन प्राण्यांच्या॥२१॥ यज्ञाचे निमित्त करून। चालू झाले अभक्ष्यभक्षण। आणिक ते मदिरापान। सोमरसाच्या नावाने॥२२॥

मुक्या प्राण्यांचे रक्त। वाहावया सर्वदा स्वस्त। यज्ञकाळात मस्त। याज्ञिक स्वर्ग अनुभविती॥२३॥ राजा बोले दळ हाले। तेथे कोण कोणास बोले?। सर्व प्रजाजन गुंतले। यज्ञप्रसाद भक्षावया॥२४॥ अजापुत्राच्या रुधिराने। अशी रंगली यज्ञायने। स्वर्गलाभाच्या आशेने। नरक केला भूमीवरी॥२५॥ लहान असो वा महान। मुंगी असो वा इंद्रवाहन। प्रत्येकालाच पूर्ण जीवन। जगण्याचा असे अधिकार॥२६॥ जीवजंतू असो की स्थावर। चर असो वा असो अचर। ती कलाकृतीच मनोहर। असे ईशनिर्मित॥२७॥ तिला भग्न करण्याचा। अधिकार नाही मानवाचा। परि विसर पडतो याचा। बुद्धिपुरस्सर सर्वांना॥२८॥ जिभेचे लाड पुरवाया। कितीक जीव गेले वाया। मानवी इतिहासात या। गोठले आर्त हंबरडे॥२९॥ शिल्पांचे फुटले नाकडोळे। पाहूनि जे हळहळले। त्यांचेही काळीज नाही हलले। जिवंत शिल्प भंगताना॥३०॥ मानवनिर्मित पाषाणलेणी। तशी ईशाने निर्मिली जीवयोनी। ती भंगण्याचा कोणी। दिला मानवा अधिकार?॥३१॥ परि हे सारे विसरले। यज्ञात थैमान मांडिले। यज्ञ हे दारुण ठरले। काळदूत प्राण्यांसी॥३२॥ श्रौतपादाच्या यज्ञकाली। अशी प्राणिहिंसा मांडली। ती कानांवरती गेली। मरुळाराध्य जगद्गुरूंच्या॥३३॥ हृदय अति द्रवू लागले। डोळ्यांस अश्रूबिंदू आले। उठूनिया यज्ञस्थळी गेले। निर्भयपणे महास्वामी॥३४॥ पाहती तो यज्ञवेदीवर। उभे मुके

जनावर। वेदमंत्रांचा उच्चार। उत्साहोन्मादे चालला॥३५॥ यज्ञातील धुरामुळे। अवघे यज्ञभवन कोंदले। याज्ञिकांचे नाकडोळे। वाहत होते भरूनी॥३६॥ श्रद्धेने श्रौतपाद भूपती। हविर्द्रव्ये घेऊनि हाती। राणीसह आहुती। अर्पीतसे यज्ञात॥३७॥ जगद्गुरू आले आले। असे त्यास विदित झाले। क्षणार्धात वेदमंत्र थांबले। सारे पाहती टकमक॥३८॥ राजा देऊनि उत्थापन। म्हणे 'आले शिवगण। यावे यावे स्वामी' म्हणून। हात जोडून राहिला॥३९॥ महास्वामीस उच्चासन दिले। राजाराणीने प्रार्थिले। 'महाराजा आगमन झाले। किमर्थ यज्ञमंडपी?'॥४०॥ शिरी शुभ्र जटाभार। दाढी रुळे वक्षावर। काषायवस्त्रे अंगावर। जटेमध्ये इष्टलिंग॥४१॥ त्रिपुंड्र भाळी शोभला। सर्वांगी रुळती रुद्राक्षमाळा। भस्मविलेपित जणू आला। कैलासाहूनि शिवचि॥४२॥ अशी तेज:पुंज मूर्ती। पाहूनि जन आल्हादती। श्रौतपादाच्या मुखावरती। उभे होते प्रश्नचिन्ह॥४३॥ श्रौतपादास लक्षून। जगद्गुरू बोलती हसून। 'तुझ्या यज्ञामध्ये विघ्न। राया आम्ही आणले॥४४॥ तुझ्या यज्ञातील धूर। पोचला असेल स्वर्गावर। डोळे चोळत शचीवर। असेल तेथे बसलेला॥४५॥ रिते करूनि निजसिंहासन। त्यावरी तुजला बसवून। जाईल स्वर्गच सोडून। असे मजला वाटते॥४६॥ तुझी स्वर्गाची अभिलाषा। किती करी प्राणिहिंसा?। हिंसा करूनिया असा। कोणा स्वर्ग मिळाला?॥४७॥ अरे तू या देशीचा

राजा। येथील सारी तुझी प्रजा। तिला रक्षावे की सजा। द्यावी तू अकारण?॥४८॥ हे मुके प्राणिजग सारे। तुझी प्रजा नाही का रे?। यांची हिंसा अविचारे। करितोस का दयाळा?॥४९॥ तुजला म्हणती भूपाळ। भूमीवरती जे दुर्बळ। त्यांचा करावा प्रतिपाळ। हा असे राजधर्म ॥५०॥ परि राजधर्म त्यागून। तुजला हवे स्वर्गारोहण। तुझ्या स्वर्गलाभासाठी प्राण। द्यावे का मुक्या प्राण्यांनी?॥५१॥ रक्षक बनता भक्षक। प्राण जाती हकनाक। मुक्या प्रजेचा संहारक। झालासी तू श्रौतपादा॥५२॥ तुला भूपाल म्हणू कसे?। तुला स्वर्गाचे लागले पिसे। स्वर्गाचेच भूत बसे। तुझ्या मानगुटीवरी॥५३॥ क्षयातिशयाने युक्त। स्वर्गभोग क्षणिक समस्त। पुण्यक्षय होताच परत। यावे लागे मृत्युलोकी॥५४॥ अशा स्वर्गाचे वेड तुला। म्हणूनि हा यज्ञ आरंभिला। फास लाविला गळा। सर्व मुक्या प्राण्यांच्या॥५५॥ बळ असेल तुझ्या हाती। तरी स्वर्ग आण भूवरती। फुलू फळू दे जीवजाती। निर्भय तुझ्या राज्यात॥५६॥ तुझे राज्य स्वर्ग व्हावे। प्रजाजन देव व्हावे। आणि तू होऊनि राहावे। इंद्र तुझ्या राज्याचा॥५७॥ हे सोडूनि आकाशातला। स्वर्ग तुला हवा कशाला?। आणखीही एक भूपाळा। ठेव ध्यानामध्ये तू॥५८॥ परोपकार पुण्य महान। पाप म्हणजे परपीडन। सांग प्राणिहिंसा करून। तुला स्वर्ग मिळेल का?॥५९॥ स्वर्ग हे पुण्याचे फळ। तू आचरतोसी पाप निखळ। पापाचरणाने केवळ। कसा लाभेल

स्वर्ग बा?॥६०॥ म्हणूनि थांबवी यज्ञकर्म। समजूनि घे यातील वर्म। प्रजापालन तुझा धर्म। विसरू नको कधीही'॥६१॥ महास्वामींच्या खड्या बोलाने। उघडिली राजाची नयने। जी भरली होती धुराने। आंधळ्या स्वर्गप्रेमाच्या॥६२॥ डोळे वाहती घळघळा। हृदयकोश शुद्ध झाला। नमस्कारूनि म्हणे 'दयाळा। आज झाला खरा बोध॥६३॥ धरेचा स्वर्ग बनविणे। हे सोडूनि आंधळेपणे। स्वर्गलाभाच्या इच्छेने। किती जीव मारिले॥६४॥ प्रजेचा असूनि रक्षणकर्ता। मी ठरलो प्राणहर्ता। माझ्या जीवनात वार्ता। आता नाही पुण्याची॥६५॥ मुके जीव किती छळले। त्यांचे प्राणघात केले। झाले माझे तोंड काळे। आज आले समजूनी॥६६॥ राज्य करण्याची योग्यता। माझी नाही स्वामिनाथा। प्रायश्चित्त घेईन आता। स्वीकारूनि संन्यास'॥६७॥ असे बोलून वारंवार। पडे महास्वामींच्या चरणांवर। त्याला उठवूनि वर। मरुळाराध्य बोलती॥६८॥ 'राया घेई समजून। तुझा धर्म प्रजापालन। तुला संन्यासग्रहण। उचित नाही सर्वथा॥६९॥ राजाने घ्यावा संन्यास। मग कोणी रक्षावे प्रजेस?। संन्याशाने राजवेष। घ्यावा का भगवे त्यागूनी?॥७०॥ प्रजेचे करणे हित। हेचि तुला प्रायश्चित्त। आजपासूनि अनुचित। कर्म कोणते करू नको'॥७१॥ असे शब्द प्रेमभरले। श्रौतपादाने कर्णी ऐकिले। त्याचे ज्ञानचक्षू उघडिले। उपदेशाने जगद्गुरूंच्या॥७२॥ म्हणे 'महास्वामी तारा तारा।

आता माझे गुरुत्व पत्करा। उपदेशूनि मला करा। आपुला शिष्य सत्वर'॥७३॥ मग मरुळाराध्ये जाण। राजास करविले लिंगधारण। पंचाक्षरी मंत्र देऊन। जीवन केले कृतार्थ ॥७४॥ सर्व षट्स्थले निरोपून। पंचाचार अष्टावरण। सांगितले विवरून। शिवभक्ती प्रेरिली॥७५॥ मग म्हणती 'राया ऐक। सांगेन पंचाचार सुरेख। ते आचरिता जीवन लख्ख। होईल स्फटिकासारखे॥७६॥ केवळ जाणल्याने तत्त्वज्ञान। जीवनी नाही परिवर्तन। ज्ञानासवेचि आचरण। शुद्ध करावे लागते॥७७॥ आकाशी करावया उड्डाण। पक्ष्यास लागती पंख दोन। एक छेदिला तरी सांग कोण। पक्षी उडू शकेल?॥७८॥ म्हणूनि श्रीगुरुचरणी बसावे। धर्मतत्त्व जाणूनि घ्यावे। आणि प्रमादरहित करावे। त्यासमान आचरण॥७९॥ ज्ञान-क्रियेचा संगम होता। लिंगांगसामरस्य येई हाता। ज्ञानशून्य कर्मे आचरिता। ते न लाभे कधीच॥८०॥ इष्टलिंग म्हणजे कोण?। त्याचे कशास करावे पूजन?। कशासाठी घ्यावा करून। मुक्तिलाभ जन्मात?॥८१॥ हे जाणूनि पूर्ण घ्यावे। मगच पूजादी आचरावे। अन्यथा ते सर्व समजावे। आहे आंधळे आचरण॥८२॥ कोठे जायचे नाही निश्चित। तरी क्रमीत चालला पंथ। असे दिशाशून्य व्यर्थ। कर्म ज्ञानावाचूनी॥८३॥ इष्टलिंग हे शिवप्रतीक। पूजिता होती शिव जीव एक । हे जरी असे पूर्ण ठाऊक। परि न घडे आचरण॥८४॥ तरी ते ज्ञान जाण व्यर्थ। तो

केवळ ग्रंथपंडित। बुद्धी प्रगल्भ पण असमर्थ। चालावया पाय त्याचे॥८५॥ ज्ञानशून्य आचरण सगळे। राया जाण पूर्ण आंधळे। आणि आचारशून्य पांगळे। ज्ञान जाणावे पूर्णत:॥८६॥ ज्ञान-कर्माचा समन्वय। घडवितो जीवनी अभ्युदय। केवळ त्यानेच लाभ होय। लिंगांगसामरस्याचा॥८७॥ धारण करिता अलंकार। दिसे देहलता सुंदर। तसे अंतर्बाह्य होई समग्र। आचरणाने जीवन॥८८॥ ज्यास चोरीना कोणी चोर। असा आचार अलंकार। जो हरवेचना जीवनभर। असा आगळा दागिना॥८९॥ उभे आडवे धागे विणून। जसे वस्त्र होते निर्माण। तसे ज्ञानाचरणाने जीवन। ज्याने विणले तो धन्य॥९०॥ लिंगाचार, सदाचार। शिवाचार, गणाचार। आणिक एक भृत्याचार। पंचाचार असती हे॥९१॥ ज्याने जीवनी हे बाणविले। त्याचे जीवन धन्य झाले। तुजसी संक्षेपाने सगळे। निवेदितो आता मी॥९२॥ नित्य इष्टलिंगार्चन करणे। त्याच्या चिंतनध्यानात रमणे। लिंगमयचि जीवन होणे। हाच असे लिंगाचार॥९३॥ इष्टलिंगाहून मोठे। दैवत जगी नाही कोठे। अशा भावनेने राहाटे। तोच खरा लिंगाचारी॥९४॥ लिंगसत्तेने आगम वेद। मानवास करिती आत्मबोध। सूर्य चंद्र तारे बहुविध। भ्रमती लिंगसत्तेने॥९५॥ लिंगाज्ञेने वाहते वारे। गर्जती डोलती सागर सारे। ब्रह्मांडचि अवघे फिरे। लिंगामुळे भूपाळा॥९६॥ अशा अनन्यनिष्ठेकरून। ज्याचे

सर्वदा होते वर्तन। लिंगाचारी तोच जाण। असे वर्तणे लिंगाचार॥९७॥ अणुमात्र नसे दुराचार। त्यासचि म्हणती सदाचार। तोच श्रेष्ठ अलंकार। असे धन-धर्मही॥९८॥ जीवाचा घेऊ नये प्राण। सर्वदा बोलावे सत्यवचन। अचौर्य वृत्तीने करणे वर्तन। ब्रह्मचर्य पाळावे॥९९॥ भूतमात्री दया असावी। अपराधांची क्षमा करावी। गरजवंतास सदा द्यावी। मदत आणि आधार॥१००॥ पूजा जप आणि ध्यान। यांत सर्वदा व्हावे मग्न। अशा दशधर्मांचे पालन। हाच राया सदाचार॥१०१॥ सद्‌गुरूंच्या दीक्षेमुळे। मनी दिव्यभाव उजळे। पत्नी पुत्र आप्त सगळे। करावे लिंगदीक्षित॥१०२॥ लिंग भस्म रुद्राक्ष शिवचिन्हे। धारण करावी आनंदाने। भक्तिवृद्धीसाठी करणे। शिवध्यान गुणकीर्तन॥१०३॥ लिंगपूजा केल्यावाचून। करू नये काही ग्रहण। इष्टलिंगास करूनि अर्पण। अन्नप्रसाद सेवावा॥१०४॥ लिंगास अर्पिलेला पदार्थ। तो त्यागू नयेचि किंचित्। गुरुलिंगजंगमांस उचित। पाहावे समदृष्टीने॥१०५॥ ही सदाचाराची लक्षणे। आचरावी पूर्ण निष्ठेने। आता सांगेन संक्षेपाने। शिवाचार तुजलागी॥१०६॥ जी जी कर्मे करितो नाना। ती सर्व शिवाची आराधना। अशी सदैव बाळगणे भावना। हाच जाण शिवाचार॥१०७॥ अंतर्बाह्य होणे शुद्ध। हाच शिवाचार प्रसिद्ध। गृही आणले फळ मूळ कंद। अथवा अन्य पदार्थ॥१०८॥ त्यावरी करूनि भस्मसिंचन।

शुद्ध करूनि करावे सेवन। करू नये केल्यावाचून। शुद्ध पदार्थ कोणता॥१०९॥ घर शेत शिवलिंगांकित। भांडी, तृण, काष्ठे, विडा पदार्थ। भस्म प्रोक्षूनि सेवावे समस्त। पूर्ण शुद्ध करूनिया॥११०॥ केवळ शिवदीक्षिताचे अन्न। प्रेमादरे करावे ग्रहण। गोदुग्धापासून जे निर्माण। होय तेच स्वीकारावे॥१११॥ सर्व त्यागून काम्यकर्म। निष्कामपणे आचरावा धर्म। प्राणिमात्रांविषयी प्रेम। सदा मनी बाळगावे॥११२॥ सकळ त्यागूनि कामना। मनी रुजवावी शिवभावना। मरू नये मार्गी चालताना। पायातळी जीवजंतू॥११३॥ शास्त्रनिर्दिष्ट काळी उचित। लिंगाराधनी व्हावे रत। बीभत्स कठोर दांभिक अनृत। शब्द नये उच्चारू॥११४॥ करावी सदा संतसंगती। असावे सद्भक्तचि भोवती। असे वर्तणे हीच रीती। असे शिवाचाराची॥११५॥ गणाचाराची चौसष्ट लक्षणे। समजून घ्यावी पूर्णपणे। प्रमादरहित कसे वर्तणे। तेही संक्षिप्त सांगतो॥११६॥ शिवकार्यास्तव द्यावा प्राण। शिवलिंगाचे-भक्तांचे करावे रक्षण। शिवनिंदकाचे करावे हनन। अथवा त्यास शापावे॥११७॥ जेथे शिवनिंदेचे भय। तेथे ठेवू नये पाय। ते स्थान त्यागणे हाच उपाय। अंतिम अवलंबावा॥११८॥ वाचेने यथार्थ बोलावे। असत्य बोलणे टाळावे। वेदागमादी अभ्यासावे। प्रशंसावे भक्त, गुरू॥११९॥ अन्य देवा प्रशंसू नये। आत्मस्तुती करू नये। देव-मानवा निंदू नये। चुकूनही

कदापि ॥१२०॥ गुरुलिंगजंगमा वंदावे। शिवपूजाद्रव्य मेळवावे। गुरुलिंगादींना पूजावे। करावी पूजा जप सदा ॥१२१॥ गुरुजंगमांच्या दिशेने। चालत जावे भक्तिभावाने। प्रदक्षिणा घालून जमविणे। सकळ पूजासामग्री ॥१२२॥ पूजासमयी बसावे स्थिर। इष्टलिंग रुळावे शरीरावर। लिंगस्पर्शे गात्रन् गात्र। अवघे व्हावे रोमांचित ॥१२३॥ लिंगाकडे असावे डोळे। पाहता पाहता व्हावे ओले। अविश्रांत पाहिजे घडले। इष्टलिंगानुसंधान ॥१२४॥ केवळ लिंगास अर्पिला पदार्थ। तोच सेवावा भक्तियुक्त। फूल केले लिंगार्पित। तेच प्रेमे हुंगावे ॥१२५॥ गुरु-लिंग-भक्तस्तोत्रे। नित्य ऐकावी आपुल्या श्रोत्रे। त्यांची निंदावचने अपवित्रे। ऐकू नये कदापि ॥१२६॥ गुरुलिंगजंगमप्रसाद। घेऊनि काया करावी शुद्ध। निषिद्ध विषय त्यागूनि निरोध। इंद्रियांचा करावा ॥१२७॥ होता अस्पृश्य वस्तुस्पर्श। स्नाने शुद्ध करावे देहास। वीरशैव-संस्काररहित माणूस। त्याचा संपर्क टाळावा ॥१२८॥ लिंग रुद्राक्ष आणि विभूती। सदा असावे शरीरावरती। संकल्पू नये कदापि चित्ती। निषिद्ध भोग-विलास ॥१२९॥ भक्तीविण अन्य विषयी। कदापिही प्रीती नसावी। अधर्माकडे क्रोधे वळावी। भृकुटी, नको शत्रूवर ॥१३०॥ धनाचा लोभ मनी नसो। पण शिवपूजेचा मात्र असो। स्त्रीपुत्रांचा मोह नसो। पण असो भक्तांचा ॥१३१॥ इंद्रियांचा करावा मत्सर। व्यक्तीचा नसावा तिळभर। धर्म-

प्रपंचपालनी तत्पर। असावे पण उतू नये॥१३२॥ गुरुजंगमांचे गुणावगुण। न पाहावे कधी न्याहाळून। मुक्या जीवास न करावे पीडन। त्यांचे दु:ख साहू नये॥१३३॥ पुढिलाचे न दुखावे मन। असेच असावे बोलणे वर्तन। शत्रुमित्रासमवेत समान। भावे सदा वर्तावे॥१३४॥ गुरूपदिष्ट आगमनिगम। यांवरी विश्वासावे परम। आपत्काळी आपुला धर्म। त्यागू नये कदापि॥१३५॥ शत्रूसही क्षमापावे। भोगरहित चित्त असावे। वाणी-क्रियेने घडू नये। किंचित्‌ही प्रमाद॥१३६॥ शिवसंकल्पे भरावे मन। नको परद्रव्याचे अपहरण। इच्छित घडेना तरी समाधान। मनी पूर्ण असावे॥१३७॥ शिवनामरूप स्मरावे। तेच सर्वदा चिंतीत जावे। पादसेवा करूनि तोषवावे। परशिवाचे अंतर॥१३८॥ करावे शिव-मानसपूजन। सदैव वंदावे शिवचरण। मी शिवाचा दास मानून। तसे वर्तन करावे॥१३९॥ मंगलस्वरूप परशिव। हाच माझा सखा सदैव। या भावनेने सर्वस्व। त्यास अर्पण करावे॥१४०॥ मूलमंत्राचा मानसजप। करावा, ध्यावे दिव्य शिवरूप। अखंड तैलधारेसम निष्पाप। मन केंद्रित करावे॥१४१॥ शांत नंदादीपासमान। शिवाठायी दृढ ठेवावे मन। सोऽहंभावे ध्यात मनातून। इंद्रियव्यापार दवडावा॥१४२॥ अखंड शिवानुसंधान चिंतन। करीत शिवच व्हावे आपण। विश्व आत्मरूप जाणून। शिवानंदी लीन व्हावे॥१४३॥ गणाचाराची शीले चौसष्ट। राजा तुज निवेदिली

स्पष्ट। ही आचरे तो जाण वरिष्ठ। भक्तराजशिरोमणी॥१४४॥ आता अंतिम जो आचार। तो निवेदीन भृत्याचार। विनम्रता हेच सार। असे आचाराचे ह्या॥१४५॥ शिव आणि शिवरूपांशी। ज्ञानदायक सद्गुरूशी। विनम्रपणे अहर्निशी। वागावे सेवाभावाने॥१४६॥ जंगम आणिक शिवभक्त। संत सज्जन जीवन्मुक्त। यांचा मी सेवक फक्त। अशी असावी भावना॥१४७॥ जगतातील जीवजाती। ही सर्व शिवाची संतती। शिवभक्ताविण श्रेष्ठ जगती। अन्य नाही मानावे॥१४८॥ दरिद्री असो वा श्रीमंत। ब्राह्मण असो वा पतित। समभावाने त्यांच्यासमवेत। सदोदित वागावे॥१४९॥ भृत्यभाव बाणता अंगी। अहंकाराची ठेचते नांगी। आणि प्रकटे अंगोपांगी। नित्य सर्वात्मभावना॥१५०॥ पंचाचाराचे करणे पालन। हेच स्नेह-बंधुत्वास आमंत्रण। मत्सर द्वेष नाशूनि दुर्गुण। शांतिसाम्राज्य स्थापणे॥१५१॥ राया करणे लिंगधारण। हे जरी आहे धर्मलक्षण। तरी समतेचा मंत्र त्यातून। दिला वीरशैवधर्माने॥१५२॥ जो आचरितो पंचाचार। तो कदापि करीना संहार। 'सर्वं शिवमयं जगत्' हे सूत्र। दृढ धरी हृदयात'॥१५३॥ जगद्गुरूंची अमृतवाणी। ऐकून डोळा आले पाणी। सद्गदित होऊन लागे चरणी। श्रौतपाद तेधवा॥१५४॥ म्हणे 'धन्य झाले जीवन। आचार्यांचे लाधले चरण। उपदेशाने माझे श्रवण। तृप्त पूर्ण जहाले॥१५५॥ आता वीरशैवभक्त

म्हणून। सर्वभावे करीन वर्तन। आप्तसोयरा प्रजेस मानीन। चरण स्मरीन आपुले'॥१५६॥ मग राजाने सन्मानिले। विधिपूर्वक पूजन केले। प्रसाद-पादोदक घेतले। जगद्गुरूंचे श्रद्धेने॥१५७॥ पुढे आरंभिला संचार। जनांस बोधीत शिवाचार। दारुकवनी प्रवेशूनि ऋषिवर। मरुळाराध्ये बोधिले॥१५८॥ तपश्चर्येस बैसले वनी। चरणी लागती ऋषिमुनी। मग काशीक्षेत्री येऊनी। विश्वाराध्यांसी भेटले॥१५९॥ पुण्यभूमी काशीक्षेत्र। तेथे ज्ञानसिंहासन पवित्र। जगद्गुरू विश्वाराध्यरूपे त्रिनेत्र। वसे ज्ञानभास्कर॥१६०॥ त्यांच्यासवे चर्चिला सिद्धान्त। पुढे गेले केदारक्षेत्रात। जगद्गुरू एकोरामाराध्यांसमवेत। भेटूनि केले मंथन॥१६१॥ गौरीकुंडात करिता स्नान। प्रकटला दिव्य बटू जाण। त्यास अंगीकारूनि अभिधान। दिले मुक्तिमुनी असे॥१६२॥ काश्मीरदेशी केले गमन। तेथे ऋषिसमूहास बोधून। सरस्वतीपीठ स्थापून। निघाले दक्षिण दिशेने॥१६३॥ उपरी येऊनि श्रीशैलास। भेटले पंडिताराध्यांस। मग जाऊन रंभापुरीस। राहिले रेवणाराध्यांसवे॥१६४॥ अंती उज्जयिनी क्षेत्री येऊन। मुक्तिमुनीस पीठाधिकार देऊन। सिद्धेश्वरलिंगी झाले विलीन। संपविला अवतार॥१६५॥ मुक्तिमुनींनंतर सिद्धमुनी। शिवमुनींद्रमुनी, शांतमुनी। भवभूतिमुनी, दुसरे मुक्तिमुनी। अशी जहाली परंपरा॥१६६॥ अशा जगद्गुरूंनी महान। भूषविले

सद्धर्मसिंहासन। वीरशैवधर्माचे महिमान। वाढविले सर्वकाळ॥१६७॥ उज्जयिनीपीठाची ख्याती। त्यांनी वृद्धिंगत केली दिगंती। वीरशैवाचरण धर्मरीती। सर्व लोकांस बोधिली॥१६८॥ पंधरावे जगद्‌गुरू शंभुमुनी। असता सद्धर्मसिंहासनी। जैनराजा वीरसेन हानी। करू लागला पीठाची॥१६९॥ शंभुमुनींनी सैन्य जमवून। पळविला राजा वीरसेन। पण कलहास कंटाळून। वास केला अरण्यात॥१७०॥ त्यांचे शिष्य मरुळसिद्ध। महाशिवयोगी प्रसिद्ध। जगद्‌गुरुत्व पत्करूनि सिद्ध। झाले पीठ राखावया॥१७१॥ परि राजाच्या उपद्रवामुळे। उज्जयिनी नगर त्यागिले। दंडकारण्यातूनि आले। दक्षिणदेशी शिष्यांसह॥१७२॥ पुढे कन्नड प्रदेशात। दुजे नगर वसविले अद्‌भुत। तेथे सद्धर्मपीठ विख्यात। जगद्‌गुरूंनी स्थापिले॥१७३॥ नवे नगर ते अभिनव। उज्जयिनी हेच ठेविले नाव। तेथे लिंगमूर्ती सर्व। प्रतिष्ठापिल्या आणूनी॥१७४॥ पीठाआतील सर्व भाग। सजविला सांगोपांग। दुजी उज्जयिनीच सर्वांग-। सुंदरतेने उभविली॥१७५॥ 'हंपीचे देऊळ बाहेरून। उज्जयिनी मठ पाहावा आतून'। अशी आहे प्रचलित म्हण। अजूनि कर्नाटकात॥१७६॥ कर्नाटकी बळ्ळारी प्रांतात। उज्जयिनीपीठ विराजित। शतकानुशतके साक्ष देत। सद्धर्माच्या प्रसाराची॥१७७॥ दक्षिणदेशी करिता प्रयाण। महाराष्ट्री भ्रमले स्थानोस्थान। तेणे उज्जयिनी शाखामठ स्थापन। महाराष्ट्रात बहू झाले॥१७८॥ राष्ट्रकूट वरंगलादी राजकुले। उज्जयिनीपीठापुढती झुकले। भुवनैकमल्ल सोमेश्वराने

दिले। एकशे वीस मठ दान॥१७९॥ भक्त-राजांचे पुरवीत अर्थ। भ्रमले ग्रामे नगरे समस्त। वरंगल, हंपी, कूडलसंगमात। कप्पनगुड्ड, हरपुरीस॥१८०॥ तेथे बहू जैन धर्मीयांना। जगद्गुरूंनी करविली लिंगधारणा। पुढती श्रीसिद्धपंडिताना। पीठाधिकार सोपविला॥१८१॥ सिद्धपंडितांनंतर। सिद्धलिंग शिवाचार्यांस अधिकार। पुढे शिवाचार्य श्रीसिद्धेश्वर। नंतर सिद्धनाथाराध्य॥१८२॥ सिद्धनाथाराध्यांनी पीठाधिकार। सोपविला मरुळाराध्यावर। त्यांनी अंती सिद्धमल्लेश्वर। यांना केला अभिषेक॥१८३॥ सिद्धमल्लांनी तपोबळेकरून। अवर्षणकाली वर्षविले घन। आशीर्वादे झाली संतान-। प्राप्ती अनेक भक्तांना॥१८४॥ बिज्जेगौड, बसवनायक। बुल्लनृपाल, ॐकारनायक। प्रौढ देवरायादी प्रमुख। राजांस झाली संतती॥१८५॥ प्रौढरायाचा अमात्य। लक्कण दंडेश विख्यात। 'शिवतत्त्वचिंतामणी' ग्रंथ। रचून ठरला गुरुप्रिय॥१८६॥ मरुळसिद्ध नामे दलित। जगद्गुरुचरणी लागला भक्त। त्याच्या भक्तिसाठी दलितवस्तीत। उभारिले देवालय॥१८७॥ त्याला नेमिले देवालयात। करण्यास पूजापाठ समस्त। पुढे शरण म्हणूनि व्यतीत। काळ कंठिला तयाने॥१८८॥ श्रीसिद्धमल्लेश्वरानंतर। विराजिले शिवाचार्य सिद्धेश्वर। असे एकशे अकरा पीठावर। होऊन गेले आचार्य॥१८९॥ विद्यमान एकशे बारावे पीठाचार्य। जगद्गुरू सिद्धलिंग राजदेशिकेंद्र शिवाचार्य। विद्याव्यासंगी धर्मप्रबोधकार्य। करिती एकनिष्ठेने॥१९०॥ एकशे आठवे पीठाधिपती। जगद्गुरू

सिद्धलिंग शिवाचार्य यती। यांनी धर्मपीठाची उन्नती। केली बहुता परींनी॥१९१॥ नंदा, भद्रा, सुरभी आणिक। सुशीला, सुमना ह्या देख। पंचरंगी गायी सुरेख। त्यांनी प्रेमे पाळिल्या॥१९२॥ त्यांच्या पवित्र गोमयातून। विभूतीचे करिती निर्माण। त्या विभूतीनेच संपूर्ण। भूषविती सर्वांग॥१९३॥ बळ्ळारी प्रांती पडला दुष्काळ। तेव्हा आचरिले अनुष्ठान प्रबळ। मेघवर्षाव करूनि सकळ। नारी नर तुष्टविले॥१९४॥ केदार, रंभापुरीपीठांत। केले सुयोग्य बटूंना अधिष्ठित। महागोशाळा, पंचाचार्य मंटप समस्त। निर्मिले प्रयत्नाने॥१९५॥ स्थापिली पाठशाळा संस्कृत। लिहविले विद्वानांकडून ग्रंथ। ते सर्व करूनि प्रकाशित। बहुमोल कार्य केले॥१९६॥ मद्रास वीरशैव विद्यावर्धक। संघ स्थापिला प्रयत्नपूर्वक। तोच विस्तारूनि एक। झाला वटवृक्ष विशाल॥१९७॥ काशीनाथशास्त्री पंडित। त्यांच्या शिरी ठेविला कृपाहस्त। 'पंचाचार्यप्रभा' मासिक अविरत। चालविण्यास साह्य केले॥१९८॥ वारद संस्कृत पाठशालेस। आणिक शिवयोग मंदिरास। अर्थसाहाय्य करूनि विशेष। दिधला कृपाशीर्वाद॥१९९॥ शके अठराशे तिसात। झाले पंचाचार्य संमेलन काशीत। तेथे बहुमोल केले पारित। ठराव महास्वामींनी॥२००॥ बळ्ळारी, बार्शी, सोलापूर। मंगळवेढे, पल्लागट्टी, बिरूर। आदी स्थानी करूनि संचार। भक्तजनांस बोधिले॥२०१॥ बार्शी गावी असता भ्रमत। मार्गावरी देखिले अद्‌भुत। सर्प आणि मुंगसाचे तेथ। भांडण होते चालले॥२०२॥ परस्परांस चावे

घेती। कोणी वर कोणी खालती। मार्गी थांबून नवल पाहती। डोळे फाडून जन सर्व॥२०३॥ जगद्गुरू थांबून बोलले। 'अरे तुम्ही हे काय मांडिले?। तुमचा तमाशा पाहती सगळे। रिकामटेकडे हे लोक॥२०४॥ होवो भांडण कोठे काही। यांना पाहण्याचीच घाई। या बघ्या जमातीस तुम्हीही। का दाखविता तमाशा?'॥२०५॥ ऐकता जगद्गुरूंचे शब्द। मुक्या जीवा जणू झाला बोध। क्षणात थांबवून आपुले द्वंद्व। निघून गेले वाटेने॥२०६॥ बघे जमलेले सकळ। करू लागले याचे नवल। म्हणती 'प्राण्यांसही कळे समूळ। वाणी जगद्गुरूंची॥२०७॥ असे बहुतापरी करून कार्य। लिंगैक्य जहाले पीठाचार्य। पुढती त्रिलोचन शिवाचार्य। पीठावरी विराजले॥२०८॥ सिद्धेश्वर राजदेशिकेंद्र शिवाचार्य। या नामे उदंड केले कार्य। स्थापिली शाळा, महाविद्यालय। सद्धर्मप्रभा त्रैमासिक॥२०९॥ पुढती मरुळाराध्य शिवाचार्य। झाले एकशे दहावे पीठाचार्य। संस्कृत वेदपाठशाळादी कार्य। केले बहुजनोपयोगी॥२१०॥ रेणुकगीतेचे भाषांतर। आंग्लभाषेत करविले सुंदर। उपनिषदे, ब्रह्मसूत्र सिद्धान्तपर। केले बहु प्रकाशित॥२११॥ एकशे अकरावे पीठाधीश्वर। झाले मरुळसिद्ध राजदेशिकेंद्र। प्रकाशने, पीठाचा जीर्णोद्धार। कार्य पार पाडिले॥२१२॥ मध्यप्रांती उज्जयिनी नगर। तेथे संपादिली भूमी सुंदर। मूळ पीठाचा जीर्णोद्धार। करावया आरंभिले॥२१३॥ दर्शन मंदिर बांधवून। निर्मिले मरुळसिद्ध मंगलभवन। पूर्वाचार्यांचे समाधिस्थान। तेही कार्य पूर्ण केले॥२१४॥ त्यांच्या पश्चात्

एकशे बारावे। पीठाधिपती विराजिले नवे। सिद्धलिंग राजदेशिकेंद्र या नावे। पीठ पूर्ण सांभाळिती॥२१५॥ ख्रिस्ताब्द एकोणिसशे एकोणऐंशीत। मल्लिकार्जुन-रत्नम्माच्या उदरात। कर्नाटकात मुदेनूरी ग्रामात। जन्मले बाळ देखणे॥२१६॥ राजेंद्र स्वामी मठद। या नावे जहाले प्रसिद्ध। ज्ञान संपादूनि पुढती सिद्ध। झाले तरुण वयात॥२१७॥ मुदेनुरात गेले बालपण। झाले तेथे प्राथमिक शिक्षण। बेळगाव-हरिहरास जाऊन। घेतले शिक्षण माध्यमिक॥२१८॥ उच्च शिक्षण होनाळी हिरेकल्मठात। स्नातक संपादिली मैसुरात। स्नातकोत्तर पदवी तत्त्वज्ञानात। घेतली मानसगंगोत्रीमध्ये॥२१९॥ हिरेकल्मठात घेतले। उत्तम संस्कृत शिक्षण आगळे। शिवयोगाचेही संस्कार झाले। प्राप्त त्याच ठिकाणी॥२२०॥ ख्रिस्ताब्द एकोणिसशे त्र्याण्णवात। मुदेनूर-मठावरी झाले अभिषिक्त। प्रवचने करूनि केली प्राप्त। कीर्ती कर्नाटकामध्ये॥२२१॥ ख्रिस्ताब्द वीसशे अकरात। रंभापुरी, श्रीशैल, काशी या आचार्यांच्या सान्निध्यात। उज्जयिनीपीठावरी अभिषिक्त। जहाले महासन्निधी॥२२२॥ निर्मिली भव्य भक्तभवने। लाविली सामुदायिक लग्ने। त्यासाठी वाहती उदारपणे। सर्व आर्थिक भारही॥२२३॥ महाराष्ट्र-आंध्र-कर्नाटकात। केली आशीर्वचने अगणित। अन्नदासोहाची व्यवस्था पीठात। केली भक्तगणांसाठी॥२२४॥ पन्नास माध्यमिक विद्यालये। चार पदवीपूर्व महाविद्यालये। पदवी आणि शिक्षण महाविद्यालये। चालती पीठाच्या वतीने॥२२५॥ वेद

पाठशाला, तंत्र विद्यालय। पाचशे विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह। त्यांच्यासाठी अन्नदासोह। केली अशी व्यवस्था॥२२६॥ मरुळसिद्ध मंदिर शिखरास। तैलाभिषेक करिती विशेष। भक्तांठायी अपूर्व उल्हास। संचारतो त्याकाळी॥२२७॥ असे उज्जयिनीपीठ समृद्ध। ते सांभाळिती आचार्य प्रसिद्ध। त्यांचा संक्षिप्त वृत्तांत विशद। केला जिज्ञासू श्रोत्यांसाठी॥२२८॥ उज्जयिनीपीठाचा इतिहास। श्रोतेहो कथिला तुम्हांस। न्यून ते न्यावे पूर्णत्वास। असे तुम्हांस प्रार्थितो॥२२९॥ सद्धर्मपीठ आज सांप्रत। उज्जयिनीपीठ नामे प्रख्यात। दारुक शिवाचार्यांनी स्थापित। केले आहे युगीयुगी॥२३०॥ कंथा रक्तवर्ण पवित्र। पलाशदंड, नंदिगोत्र। ताम्र कमंडलू, वृष्टिसूत्र। बीजमंत्र 'म'कार॥२३१॥ या पीठाच्या शिवाचार्यांकडूनी। लिंगदीक्षा घेतली ज्यांनी। त्यांना विचारिता गोत्र कोणी। नंदिगोत्र सांगावे॥२३२॥ ह्या नंदिगणाची कथा। संक्षिप्त रूपे सांगेन आता। शिलाद मुनी कंठीत असता। वैराग्यपूर्ण जीवन॥२३३॥ एकदा स्वप्नी येऊनि पितर। म्हणती 'तू कुलदीपक साचार। वैराग्यवृत्तीने जीवनभर। कसा असा राहशी?॥२३४॥ तुला प्रसवली माता प्रेमळ। की वाढावी आपुली वंशवेल। कुलधारा खंडित होणे अटळ। तुझ्या तपाचरणाने'॥२३५॥ पितराच्या दु:खद बोले। शिलाद मुनीस भान आले। परि वैराग्यरंगी रंगले। चित्त त्यांचे संपूर्ण॥२३६॥ मग व्हावा अयोनिज पुत्र। प्रार्थिला देवराज इंद्र। तो म्हणे 'ही शक्ती वसे समग्र। केवळ अंगी शंकराच्या'॥२३७॥ शंकरा करावया

प्रसन्न। शिलाद आरंभिती तपाचरण। शिव तुष्टून म्हणती ‘होईन। मीच पुत्र अयोनिज’॥२३८॥ नांगरिता यज्ञभूमी। पुत्र लाभला सुलक्षणी। केले ‘नंदी’ नाम ठेवूनी। त्याचे पालनपोषण॥२३९॥ जातकर्मादी संस्कार केले। वेदशास्त्रादी पढविले। मित्र, वरुण मुनी आले। सातव्या वर्षी पाहण्यास॥२४०॥ त्यांनी कथन केले भविष्य। याचे वर्षभरचि आयुष्य। ऐकता कवळूनि नंदीस। रडू लागले शिलाद॥२४१॥ नंदी म्हणे ‘नको रुदन। मला येणे नाही मरण। शंकरास करूनि प्रसन्न। जिंकीन मी मृत्यूला’॥२४२॥ त्याने दुष्कर आचरिले तप। हृदयी ध्याइले शिवरूप। करिता पंचाक्षरीचा जप। शिव झाले प्रसन्न॥२४३॥ म्हणती ‘तू माझ्यासमान। अमर अक्षय होशील पूर्ण। होशील प्रिय सुहृद जाण। आणि गणनायक’॥२४४॥ नंदीस गणनायक केले। शिवसान्निध्य अखंड लाभले। असे नंदिश्वराचे वर्णिले। महिमान शिवपुराणी॥२४५॥ नित्य राहे शिवाजवळ। हाच नंदिगण प्रबळ। असे गोत्रपुरुष सकळ। उज्जयिनीपीठ शिष्यांचा॥२४६॥ श्रीकाशीज्ञानसिंहासनाधीश्वर। जगद्गुरू महास्वामी श्रीचंद्रशेखर। त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर। रचितो शेषनारायण॥२४७॥ श्रीजगद्गुरू पंचाचार्य विजय रसाळ। परिसोत भाविक भक्त प्रेमळ। शिवभक्तमने व्हावी प्रफुल्ल। पंचमोऽध्याय गोड हा॥२४८॥

॥ श्रीजगद्गुरु पंचाचार्यार्पणमस्तु ॥

# अध्याय सहावा

## श्रीकेदारपीठ, वैराग्यसिंहासन (पूर्वार्ध)

मंगलाचरण (ओवी १-६), केदारक्षेत्र माहात्म्य (७-१४), केदारेश्वरलिंग : प्रकटन कथा (१५-४२), उखीमठ (४३-४७), ज० घंटाकर्णाचार्यांचे लिंगावतरण व भक्तांस उपदेश (४८-६३), काशीकडे प्रयाण, म० व्यासांना सूत्रबोध करण्याचा विचार (६४-७०), म० व्यासांची जन्मकथा व थोरपण (७१-१११), व्यासाश्रम वर्णन (११२-११४), ज० घंटाकर्ण-व्यास भेट व संवाद (११५-१३७), म० व्यासांना लिंगदीक्षा, लंबनसूत्रोपदेश (१३८-१६७), म० व्यासांचे धन्योद्गार (१६८-१७१), उपसंहार (१७२-१७५)

# अध्याय सहावा

॥ श्रीगणेशाय नमः॥ श्रीजगद्‌गुरु घंटाकर्णाचार्याय नमः॥

नमू शिवा ललाटाक्षा। कालकाला विरूपाक्षा। श्रीकंठा कवचधारका सहस्राक्षा। प्रमथाधिपा सूक्ष्मतनू॥१॥ तुझिया भजनी प्रेमभरे। रतले भुलूनि संसारफेरे। त्यांच्यासाठी उघडिली दारे। मोक्षश्रीची दयाळा॥२॥ नको ऐश्वर्य नको धन। नाचती प्रेमे उचंबळून। त्यांच्या हृदयातच ठाण। तू सदैव मांडिले॥३॥ जे पुढे न करिती झोळी। त्यांना राखतोस चंद्रमौळी। ज्यांना हवी पुरणपोळी। त्यांना सदा टाळतो॥४॥ गाठी नसता काही ज्ञान। आरंभिले मीही कीर्तन। ते रंगेल की पडेल न्यून। नाही केला विचार॥५॥ सूर लागला पूर्वेकडे। माझे गाणे पश्चिमेकडे। घडेल काही किंवा विघडे। चिंता त्याची सोडली॥६॥ असो श्रोतेहो गताध्यायात। सद्धर्मपीठाची महिमा विख्यात। इतिहासाची साक्ष घेत। तुम्हांपुढे ठेविली॥७॥ आता केदारक्षेत्री महान। जे विराजे वैराग्यसिंहासन। त्याची कथा, महिमान। यथाशक्ती सांगतो॥८॥ उत्तरदिशेस हिमाचल। आर्यावर्ताचा तट विशाल। भाविकांचे परम श्रद्धास्थल। शोभे हिम पांघरूनी॥९॥ असंख्य ऋषिमुनींनी महान। तेथे तपश्चर्या आचरून।

हिमालयाचा कणन् कण। केला परमपवित्र॥१०॥ उखीमठ, गुप्तकाशी, केदारनाथ। गौरीकुंड, गोपेश्वर, तुंगनाथ। सोन-रुद्रप्रयाग, बद्रिनाथ। कालीमठ, कल्पेश्वर॥११॥ काली शिव, त्रियुगी नारायण। मध्यमहेश्वरादी पवित्र स्थाने। धरूनि हृदी मिरवी अभिमाने। हिमाचल उत्तुंग॥१२॥ पवित्र हिमालयाच्या कुशीत। शोभे केदारक्षेत्र विख्यात। ज्योतिर्लिंगरूपे साक्षात। तेथे वास करी शिव॥१३॥ अनादि कालापासून। तेथे शिवाचे अधिष्ठान। लिंगरूपे प्रकटावया कारण। घडले काय सांगतो॥१४॥ महाभारत युद्ध घडले। कौरव नामशेष झाले। कुलक्षय होऊनि ठरले। विजयी पाच पांडव॥१५॥ न्यायास्तव झाला संघर्ष। परि कुलचि नाशले नि:शेष। विषाद भरूनि मनी विशेष। व्याकुळता दाटली॥१६॥ गुरू पितामह बांधव। मुले नातू शालक सर्व। वधूनि आपुले झाले नाव। कलंकित जगतात॥१७॥ घडले गोत्रहत्येचे पाप। याचा जहाला पश्चात्ताप। किती राजे सैनिक निष्पाप। मेले रणी हातून॥१८॥ असा मनी भरला विषाद। पाच पांडव झाले गद्‌गद। म्हणती लाभणे मोक्षपद। दूर आता आम्हांसी॥१९॥ मग व्यासांना गेले शरण। वंदिले भावे त्यांचे चरण। म्हणती 'महाराजा पापहरण। कसे होईल ते सांगा'॥२०॥ व्यास म्हणती 'शरण्य एक। शिव तोच ब्रह्मांडनायक। त्याचेच चाले लीलानाटक। पात्रे आपण खेळातली॥२१॥ त्याला सर्वभावे शरण। जाऊनि करावे लिंगार्चन। तोच मुक्ती देईल पूर्ण। महत्पापातून ह्या॥२२॥ श्रेष्ठ मंदाकिनी नद्यांत।

केदारपर्वती वाहे अविरत। तिचा प्रवाह अनेक धारांत। होतो विभक्त ज्याठायी॥२३॥ तेथे विश्वनायक शिव। सवे घेऊनि शिवगण सर्व। वास करिती सुखे सदैव। कोणा नसेचि ठाऊक॥२४॥ तेथे जाऊनि शिवदर्शन। करूनि केले लिंगार्चन। तरीच तुमचे पापहरण। होईल निश्चित जाणावे'॥२५॥ पांडवे ऐकूनि व्यासवाणी। निघाले त्यांचे चरण वंदूनी। प्रथम काशीक्षेत्री जाऊनी। वंदू पाहती विश्वेश्वरा॥२६॥ कुलघातकी आले पाहून। विश्वनाथ देईना दर्शन। मग दु:खी अंत:करणे तेथून। गेले केदारदिशेने॥२७॥ पांडव येता पाहून त्वरित। शिव काशीत झाले गुप्त। पुढती ते ग्राम झाले ख्यात। 'गुप्तकाशी' नावाने॥२८॥ केदारपर्वती शिवभगवान। महिषरूप करूनि धारण। करू लागले सहज विचरण। महिषरूपी गणांसह॥२९॥ पांडव केदारास आले। महिष-कळपास न्याहाळिले। त्यात भीमास दिसले आगळे। रूप एक महिषाचे॥३०॥ त्याने ओळखिले हाच शिव। घेतली त्याच्याकडे धाव। महिषाने पाहताच पांडव। भूमीत मुख खुपसले॥३१॥ महिष शिरू पाहे भूमीत। तोच भीम धावला त्वरित। त्याचे पुच्छ धरिले करात। दृढ आपल्या बळाने॥३२॥ पांडवांनी केली स्तुती। आशुतोष कैलासपती। भोळा सांबचि त्यास म्हणती। झाला प्रसन्न तत्काळ॥३३॥ पांडवांनी केली पूजा। भावे प्रार्थिले वृषभध्वजा। म्हणती 'वाचवावे महाराजा। आम्हा गोत्रहत्येतून'॥३४॥ भोळा सांब संतोषून। म्हणे 'झाले पापहरण। आता तुम्ही स्वर्गारोहण। याच

मार्गे करावे'।।३५।। मनोभावे शिवास पुजून। पांडवांनी केले स्वर्गारोहण। त्यांच्या भक्तीसाठी जाण। शिव झाले लिंगरूप।।३६।। तेच ज्योतिर्लिंग केदारेश्वर। महिषपृष्ठरूपाने स्थिर। झाले द्यावयास निरंतर। मोक्षपद भक्तांसी।।३७।। नसे शिवलिंगाकृती समान। असे हे लिंग विलक्षण। महिषरूपी शिवाचा जाण। असे अनघड पृष्ठभाग।।३८।। पाच ठायी जहाले स्थिर। केदारघाटीत पंचकेदार। मुख्य लिंग केदारेश्वर। पाठ असे ती महिषाची।।३९।। लिंग मध्यमहेश्वर। तेथे नाभिरूप मनोहर। तुंगनाथ लिंगाठायी स्थिर। बाहू आणि हृदय।।४०।। रुद्रनाथ म्हणजे मुख। कल्पेश्वरी जटा सुरेख। असे पंचकेदार देख। केदारघाटीत स्थिरावले।।४१।। महिषरूपाची निरंतर। स्मृती जागविती पंचकेदार। ती कथा पाहावी समग्र। पुराणांतरी भाविकांनी।।४२।। याच केदारक्षेत्री महान। आहे वैराग्यसिंहासन। सांप्रत त्याचे अधिष्ठान। आहे उखीमठात।।४३।। हिमवर्षा होता बहुत। केदारक्षेत्र लोपे हिमात। तेव्हा केदारमूर्ती उखीमठात। पूजिती विधिवत् स्थापूनी।।४४।। द्राक्षारामक्षेत्री रामनाथ। ज्यास दुजे नाव भीमनाथ। त्या लिंगातून झाले अवतरित। घंटाकर्ण युगीयुगी।।४५।। कृतयुगी त्र्यक्षर शिवाचार्य। या नावे प्रकटले आचार्य। राजा मांधातास वीरशैवीय। तत्त्वे सर्व बोधिली।।४६।। माधांताने उत्तरकाळी। काही वर्षे गुरुगृही कंठिली। तेणे त्यांची मूर्ती स्थापिली। दिसे आजही पीठात।।४७।। द्वापरयुगात घंटाकर्ण। नामे प्रकटले शिवगण। भृंगिगोत्र, सूत्र लंबन। वेणुदंड, निळी

कंथा॥४८॥ अकस्मात प्रकटता लिंगातून। भक्तांचे विस्फारले नयन। अघटित काय घडले म्हणून। टकमक पाहू लागले॥४९॥ तेज:पुंज भव्य मूर्ती। भस्म चर्चिले अंगावरती। रुद्राक्षमाळा कंठी रुळती। शिरी शोभे जटाभार॥५०॥ इष्टलिंग मस्तकावरी। वेणुदंड, कमंडलू करी। नीलकंथा वेढिली शरीरी। आजानुबाहू महाराज॥५१॥ अशी पाहता मूर्ती साजिरी। भक्त लोटले चरणांवरी। म्हणती 'महाराज दिव्य शरीरी। आपण आला कोठून?'॥५२॥ शिवगणा दिधले उच्चासन। विनम्र बसले भक्तगण। दक्षिण कर उभारून। सकला देती शुभाशिष॥५३॥ म्हणती 'पातले द्वापरयुग। आला अवतरणाचा प्रसंग। इथेच प्रकटूनि केला बोध। कृत-त्रेतायुगांत॥५४॥ शिवप्रभूंचे असंख्य गण। त्यात एक मी घंटाकर्ण। अवतरलो ह्या लिंगातून। शिवाज्ञेने भक्तहो॥५५॥ केदारक्षेत्री आमुचे महान। आहे वैराग्यसिंहासन। पीठाद्वारे त्या प्रबोधन। करणे आहे आम्हांसी॥५६॥ त्रेतायुग आता सरले। लोक अनाचारी रतले। त्यांचे उघडावे लागती डोळे। धर्ममार्ग बोधूनी॥५७॥ कुटुंब, नाती राहिली स्थिर। तरीच होई समाजोद्धार। ती नाशिता केवळ नर। होईल पशू द्विपाद॥५८॥ धर्मतत्त्वे घेता उमजून। तदनुसार केले वर्तन। तरीच समाजस्वास्थ्य पूर्ण। टिकून राहील भूवरी॥५९॥ जो तो वागू लागे मन:पूत। तरी अनर्थ घडणे निश्चित। म्हणून दाखववावा लागे पंथ। मानवजातीस

धर्माचा॥६०॥ करावया समाजरक्षण। मानवा द्यावया आत्मभान। शिवाज्ञेने माझे प्रकटन। झाले जाणा भूवरी॥६१॥ उपरी बोधीन व्यासमुनी। हृदयी निनादेल शिववाणी। तोच बोध ते ग्रंथ रचूनी। देतील मानवमात्रासी'॥६२॥ ऐकूनि अमृतभरली वचने। आनंदली भक्तांची मने। चरण वंदूनि हर्षभराने। करू लागले जयकार॥६३॥ सकल भक्तांस आशिष देऊन। जगद्गुरूंनी आरंभिले भ्रमण। केदारक्षेत्री प्रथम जाऊन। सांभाळिला पीठाधिकार॥६४॥ मग बोधाया लोक सगळे। मार्ग चालती त्यांची पावले। वने उपवने क्रमीत आले। पवित्र काशीक्षेत्रात॥६५॥ काशीक्षेत्री उत्तरवाहिनी। होऊनि संथ वाहे स्वर्धुनी। नितळ जळ पाहता नयनी। मनी अपार आनंदले॥६६॥ गंगातीरी थांबले क्षणभर। पुढे न्याहाळिती पैलपार। तव तेथे व्यासाश्रम मनोहर। शांत सुंदर देखिला॥६७॥ शिवे बोधिले लंबनसूत्र। ते व्यासमुनीस देऊनि पवित्र। त्यांच्या करवी मानवमात्र। बोधूनिया उद्धरावे॥६८॥ व्यास महर्षी शास्त्रवेत्ता। ब्रह्मविद्येचा पूर्ण ज्ञाता। पुराणग्रंथांचा रचयिता। सर्वमान्य भूतली॥६९॥ त्यांच्याद्वारे होईल भूवर। लंबनसूत्राचा पूर्ण प्रसार। असा मानसी करूनि विचार। आचार्य निघाले त्याकडे॥७०॥ श्रोतेहो येथे थोडे थांबून। पाहू वेदव्यासांचे महिमान। जो सत्यवतीहृदयरत्न। नंदन पराशराचा॥७१॥ व्यासऋषींची जन्मकहाणी। श्रुत झालेली कर्णोकर्णी। तीच येथे संक्षेप करूनी।

तुम्हांप्रती सांगतो॥७२॥ तपोनिष्ठ ऋषी पराशर। स्वच्छंदे भ्रमती भूमीवर। भ्रमत आले यमुनातीरावर। उभे राहिले क्षणैक॥७३॥ पुढे घेऊनि जल अफाट। यमुना उभी अडवून वाट। विचार पडला पैलकाठ। कसा आता गाठावा?॥७४॥ आजूबाजूस दृष्टी फिरली। तोच नौका तेथे दिसली। तीवर धीवरकन्या कोवळी। सुंदर बसली पाहती॥७५॥ तिच्यापाशी बोलती जाऊन। 'हे सुंदरी तू असशी कोण?। काय करिशी येथे बसून। नौकेमध्ये एकटी?'॥७६॥ तव ती म्हणे 'मी धीवरदुहिता। गावी गेला माझा पिता। त्याचे कार्य करण्याकरिता। येथे आहे बसले मी॥७७॥ यात्रिका नेणे पैलतीरी। व्यवसाय आहे आमुच्या घरी। आपणासही नेऊनि सत्वरी। सोडीन पैलपार मी'॥७८॥ तिचे शब्द ऐकूनि मंजुळ। ऋषिमनी सूक्ष्म उठली कळ। म्हणती न दवडिता काळ। 'घेऊनि जाई पैलतीरी'॥७९॥ नौकेमध्ये मुनी बसले। डोलत डोलत नौका चाले। ऋषी एकटक पाहात राहिले। वल्हविणारी सुंदरी॥८०॥ श्यामल कोमल देहकांती। अंगी यौवनाची भरती। नेत्रकटाक्ष जणू भासती। कामबाण मदनाचे॥८१॥ हरिणीसारखे सुंदर डोळे। ओठांवरी डाळिंब फुलले। सर्वांगाने कमळ उमले। तशी अंगे विकसली॥८२॥ वल्ही मारी वेगे वेगे। तेणे कमनीय दिसती अंगे। स्वेद कपोली दाटू लागे। चिंब जहाले सर्वांग॥८३॥ जणू मोतियांची जाळी। लेइली सौंदर्याची पुतळी। ऋषिमानसी गजबज

झाली। काम जागला मनात॥८४॥ मध्यावरती आली नाव। ऋषी तपस्या भुलले सर्व। तिचे निरखिती हावभाव। कामव्याकुळ दृष्टीने॥८५॥ तीही मध्येच हसून मंद। नेत्रकटाक्ष टाकी धुंद। तेणे ढासळला मनोबंध। पराशराचा क्षणात॥८६॥ म्हणती कर धरूनि 'सखये। रममाण होई माझ्यासवे। मला न क्षणभर आता राहावे। तुझ्या सहवासावाचून'॥८७॥ ती होऊनि अचंबित। म्हणे 'मुनिवरा काय अघटित। तुम्हासम तपोनिष्ठाने येथ। आज येथे मांडिले?॥८८॥ मी कनिष्ठ कुळीची लेक। तुम्ही उच्चकुलीन सात्त्विक। पंकी फसला दर्दुर हाक। फोडी तसे बोलता॥८९॥ अंग दुर्गंधीने भरले। हिणवती 'मत्स्यगंधा' सगळे। विवाहाविण जरी मी रमले। तरी भंगेल कौमार्य॥९०॥ असा न करावा अविचार। तुम्हा मी नेईन नदीपार। मग आपण जावे सत्वर। नियत कार्य करण्यास'॥९१॥ ऋषी आहाळले कामानळे। म्हणती 'अन्य काही नकळे। तारुण्य-सौंदर्याच्या पुतळे। माझा शांतव कामाग्नी॥९२॥ मजसी रमता तुझे शरीर। होईल सुगंधित समग्र। एक योजनपर्यंत दूर। जाईल सुगंध देहाचा॥९३॥ नाव विसरूनि मत्स्यगंधा। लोक म्हणतील 'योजनगंधा'। काळमाथ्यावरी सदा। तुझे नाव उमटेल॥९४॥ मजशी करता अंगसंग। तुझे कौमार्य न पावे भंग। माझे योगबळ अथांग। अनुभवशील स्वये तू'॥९५॥ परिसूनि पराशराची वाणी। अधोवदन सलज्ज

रमणी। म्हणे 'आकाशी तळपे तरणी। रात्र नाही जहाली॥९६॥ दिवसाढवळ्या उघड्यावरती। कसे रमावे तुम्हासंगती?। स्त्रीजातीस प्रिय अती। निशेमधला अंधार'॥९७॥ मग पराशराने योगबळे। अवतीभवती धुके निर्मिले। आणिक दोघे यथेच्छ रमले। नौकेमध्ये तेथवा॥९८॥ पूर्ण तृप्त होऊनि पराशर। म्हणती 'तुजसी होईल कुमार। त्याचा गाजेल पृथ्वीवर। कीर्तिडिंडिम उज्ज्वल'॥९९॥ असा तिजसी देऊनि वर। उतरले नौकेतूनि तीरावर। आणि गेले निघूनि सत्वर। नियत आपुल्या मार्गानि॥१००॥ मत्स्यगंधा तीच सत्यवती। पुढे जहाली गर्भवती। प्रसवली गोंडस बाळ पुढती। सुंदर आणि सावळे॥१०१॥ हेच बाळ पुढे जगात। 'व्यास' नामे झाले विख्यात। प्रज्ञाप्रतिभेचा अद्‌भुत। प्रत्यय आला जगास॥१०२॥ यमुनाद्वीपात झाले जनन। म्हणून म्हणती 'द्वैपायन'। वर्ण श्यामल म्हणूनि 'कृष्ण'। ठरले 'कृष्णद्वैपायन'॥१०३॥ केला वेदांचा विकास। म्हणूनि नाम 'वेदव्यास'। बदरिकाश्रमी केला वास। ठरले 'बादरायण'॥१०४॥ अश्वत्थामा, बळी, हनुमान। कृप, परशुराम, बिभीषण। यांच्यासह सातवे जाण। व्यास ठरले चिरंजीव॥१०५॥ पूर्वी एकच होता वेद। त्याचे व्यासांनी केले भेद। ऋक्, यजु:, साम, अथर्ववेद। चार शाखा निर्मिल्या॥१०६॥ पैल, जैमिन, वैशंपायन। चौथा सुमंतु मुनी जाण। ह्या शिष्यांस बोधूनि प्रवर्तन। केले चतु:शाखांचे॥१०७॥

निर्मिली ब्रह्मसूत्रे पवित्र। ती जगती गाजली सर्वत्र। कौरव-पांडवकथा समग्र। महाभारती वर्णिली॥१०८॥ अष्टादश पुराणे रचून। केला पंचमवेद निर्माण। नीति-भूतदयेची शिकवण। दिली त्यातून मानवांस॥१०९॥ व्यासप्रतिभेने स्पर्शिले नाही। असे न जगती उरले काही। 'व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम्' पाही। असे वचन प्रसिद्ध॥११०॥ असे प्रज्ञा-प्रतिभेचे धनी। अलौकिक प्रसिद्ध व्यासमुनी। त्यांना बोधावे असा मनी। विचार करिती जगद्गुरू॥१११॥ काशीक्षेत्री गंगातटी। व्यासपर्णकुटी गोमटी। ज्या ज्या ठायी पडे दृष्टी। वृक्षसृष्टी दाटली॥११२॥ तरू फळभारे वाकले। डोलती वेलींवरती फुले। विहगांच्या मंजुळ बोले। आसमंत निनादला॥११३॥ असे प्रसन्न वातावरण। वृक्षातळी व्यासांचे आसन। ऋषिसमूहासमवेत गहन। वेदान्तचर्चा चालली॥११४॥ चर्चा आली असता भरात। जगद्गुरू प्रकटले अकस्मात। त्यांना पाहताच त्वरित। उठले व्यासमहर्षी॥११५॥ अंतर्ज्ञाने पूर्ण जाणले। की जगद्गुरू आश्रमी आले। उच्चासन देऊनि वंदिले। चरण त्यांचे श्रद्धेने॥११६॥ नम्रभावे बसूनि पुढती। म्हणती 'भाग्य उजळले किती। आचार्यपदस्पर्शे माती। धन्य जहाली येथली॥११७॥ जलावाचून सुकता कंठ। अवचित दिसावा गंगातट। अन्नाची पाहता वाट। अमृतताट लाभावे॥११८॥ तसे आज येथे घडले। लाधली आचार्यांची पाउले। नेत्र आमुचे

धन्य झाले। दर्शन आपुले घेऊनी'॥११९॥ मग दिधला आशीर्वाद। म्हणती 'व्यासा तू पूर्णसिद्ध। तूच जगता केला बोध। ग्रंथ विविध निर्मूनी॥१२०॥ शिवाज्ञेने आलो भूवर। कराया लंबनसूत्र प्रसार। त्याचिया श्रवणे नारीनर। उद्धरतील भूवरी॥१२१॥ पशुपक्ष्यांहूनि आगळा। बुद्धिबळे मानव ठरला। त्याच्याठायी विवेक भरला। शिवप्रभूंनी पूर्णत:॥१२२॥ आहार निद्रा मैथुन भय। यातचि भ्रमती प्राणी सर्व। मानवाची मात्र धाव। असे त्याच्यापल्याड॥१२३॥ आपुल्या नियत परिघात। वावरे प्राणिजग समस्त। मानव मात्र असे समर्थ। अदृश्य तेही पाहण्यास॥१२४॥ स्थूल दृष्टीस दिसेना शिव। परि सर्वांतरी त्याचा ठाव। या सूक्ष्म तत्त्वाचा अनुभव। घ्यावया तो समर्थ॥१२५॥ उताराकडे जलाची धाव। तसा त्याचा असे स्वभाव। दुष्कर्मरत होऊनि घाव। घालू शके सृष्टीवरी॥१२६॥ त्यास राखावया संयत। बोध करणे क्रमप्राप्त। तेणे सृष्टिचक्र अबाधित। शिवनिर्मित राहील'॥१२७॥ जगद्गुरूंचे ऐकूनि शब्द। दाटला व्यासमानसी आनंद। म्हणती 'आमुच्या दैवे सिद्ध-। चरण आम्हा लाभले॥१२८॥ सर्वांतरी व्यापिले ब्रह्म। रूपा आणिले ग्रंथी परम। तरीही मजला ते अगम्य। अजून आहे वाटते॥१२९॥ त्याच्या रूपवर्णनाप्रती। समर्थ नाही शब्दशक्ती। शब्दभ्रमचि दाटला चित्ती। असे मती सांगते॥१३०॥ तरी सदया कृपा करून। माझे करावे

समाधान। आणि शब्दभ्रमातून। सोडवण करावी'॥१३१॥ जगद्गुरू बोलती हसून। 'व्यासा तू धर्मवक्ता महान। तुजला ज्ञात नाही ते ज्ञान। नसे पृथ्वीतलावरी॥१३२॥ जग उद्धरायासाठी। तुझी चालली आटाआटी। निमित्त होऊनि जगासाठी। तू प्रश्न विचारिला॥१३३॥ करीन तुजला तत्त्वबोध। विवरीन लंबनसूत्र अगाध। शिवरूपचि त्यात विशद। केले अगम्य अगोचर॥१३४॥ परि ते सूत्र बोधण्याआधी। करावा लागे दीक्षाविधी। लिंगांगी नसे त्यास कधी। सूत्रबोध करू नये॥१३५॥ पडविडीसूत्रबोधामुळे। मानवा साधनमार्ग कळे। वृष्टिसूत्रबोधे आकळे। जीवस्वरूप पूर्णत:॥१३६॥ शिवस्वरूपाचे परिपूर्ण। लंबनसूत्र बोधिते ज्ञान। ते तुज बोधीन लिंगधारण-। विधी पूर्ण केल्यावरी'॥१३७॥ वेदव्यासांनी विधिपूर्वक। आचार्या प्रार्थिले विनयपूर्वक। लिंगदीक्षा घेऊनि चोख। लिंग बांधिले कंठात॥१३८॥ मग उभय कर जोडून। स्वीकारिले पूर्ण मौन। घंटाकर्णाचार्यांनी लंबन-। सूत्रबोध आरंभिला॥१३९॥ म्हणती 'व्यासा तुजला ज्ञात। परब्रह्म म्हणती वेदान्तात। शास्त्रे ज्याचे करिती सतत। प्रतिपादन पुन:पुन्हा॥१४०॥ ते परब्रह्म म्हणजे शिव। ज्यास वंदिती देव-मानव। त्याच्याविण कशास ठाव। अन्य नाही विश्वात॥१४१॥ स्वये असूनि निराधार। ते जहाले सर्वाधार। त्याच्या प्रेरणेने व्यवहार। ब्रह्मांडाचा चालतो॥१४२॥ ब्रह्मांडात असूनि ख्यात।

तरीही ते ब्रह्मांडातीत। विश्वरूपे प्रकटूनि अलिप्त। जगव्यवहारापासूनी॥१४३॥ त्याच्या केवळ प्रेरणेमुळे। अवघे ब्रह्मांड हले डोले। पण ते कदापि न मळे। कर्ममलाने किंचित्॥१४४॥ तो परशिवच असे 'लंबन'। समस्त सृष्टीचे आलंबन। ज्यावरी आहे अवलंबून। चित् अचित् चराचर॥१४५॥ सृष्टिनिर्मिती अगोदर। तो एकमेव होता सर्वेश्वर। सृष्टिनिर्मिती झाल्यावर। तोच असे अवस्थित॥१४६॥ सृष्टी जाता विलयास। अंती तोच राहील शेष। येणे-असणे-निमणे दोष। त्याच्याठायी नसती हे॥१४७॥ सागर दिसे तरंगाकार। तरंग लोपता पुन्हा स्थिर। तसा दिसे विश्वाकार। परि विकारी नसे तो॥१४८॥ आकाश जसे अविकारी। मळेना रंगेना कोणेपरी। त्याला स्पर्शिणे आजवरी। शक्य न झाले कोणास॥१४९॥ तसा विश्वी असूनि व्याप्त। तरीही शिव विश्वातीत। आकाश ब्रह्मांडास आधारभूत। त्याचा आधार परशिव॥१५०॥ आकाशाचा आदि अंत। आजवरी न कोणा ज्ञात। शिव आकाशापल्याड स्थित। त्याचा कसा कळेल?॥१५१॥ तो आकाशाचेही आकाश। निरंजन आणि निर्विशेष। त्याहूनी परमोच्च विशेष। दुजे काही असेना॥१५२॥ 'लंबन' म्हणजे लांब, उंच। सर्वव्यापक परमोच्च। ज्याच्याहूनि अधिक उच्च। नसे तेच 'लंबन'॥१५३॥ शिवरूपाचे शोधाया मूळ। विष्णूने धुंडिले सप्त पाताळ। परि श्रमचि झाले केवळ। मूळ नाही मिळाले॥१५४॥

लिंगाचे शोधाया मस्तक। ब्रह्माने धुंडिले सप्त स्वर्लोक। परि पदरी पडले एक। नैराश्यचि केवळ॥१५५॥ असा शिव सर्वोच्च, लंबन। त्याचा आदि अंत मिळणे कठीण। तो अगम्य अगोचर अप्रमाण। व्यापूनि उरला दशांगुळे॥१५६॥ तो शुद्ध बुद्ध नित्य मुक्त। सर्वज्ञ सर्वशक्तिमान शांत। बृहत् सूक्ष्म वाचातीत। निर्विकार निर्गुण॥१५७॥ तो स्वयंप्रकाश विश्वोत्तीर्ण। निरंजन आणि सनातन। निरंकुश जगत्कारण। विश्वरूप सर्वात्मा॥१५८॥ तो अनिर्देश्य अद्वितीय। ब्रह्मांडी व्याप्त अंतर्बाह्य। त्रिकालाबाधित अनिर्वचनीय। सच्चिदानंदस्वरूप॥१५९॥ देशकालवस्तुभेद। त्याहूनि अलिप्त तो स्वयंसिद्ध। त्याचा लाभ हे परमपद। जन्मसार्थक सकलांचे॥१६०॥ त्या लंबनरूप शिवासाठी। योगी आचरिती तपे कोटी। त्यास पाहाया हृदयसंपुटी। भक्त नाचती कीर्तनी॥१६१॥ शिवस्वरूप आहे 'लंबन'। बोधिते हे सूत्र महान। शिवचि ब्रह्मांडाचे जीवन। आदि आणि मध्यान्ती॥१६२॥ छत्तीस तत्त्वरूपी तरंग। ज्यावरी उठती लहरती अभंग। तो चित्सागर ज्याचा संग। जीवा आनंददायक॥१६३॥ विश्व त्याचिया तेजे उजळे। त्याचा मोद जीवामुखी खेळे। त्याचे अस्तित्व पूर्ण दरवळे। घमघमीत सर्वत्र॥१६४॥ ज्यास परब्रह्म ठेविले नाव। तोच जाणावा 'लंबन' शिव। याची होता पूर्ण जाणीव। उरेना भवभय किंचित्॥१६५॥ व्यासा मज जे शिवे बोधिले। तेच

आज तुज निरोपिले। सूत्रप्रसार करूनि सगळे। मानव करावे संतुष्ट' ॥१६६॥ अशी वर्षता अमृतवाणी। चिंब मनाची झाली धरणी। नेत्री आसवे घेऊनि चरणी। व्यास लागले सप्रेमे॥१६७॥ म्हणती 'आचार्या जे होते ज्ञात। ते अधिकचि झाले वृद्धिंगत। शर्करा मिळूनि दुग्धात। झाले मधुर अधिक ते॥१६८॥ शिवाचे लंबनरूप खरे। आपण रूपा आणिले सारे। झालो आपुल्या उपकारे। तृप्त संतुष्ट पूर्ण मी॥१६९॥ आपल्या आज्ञेनुसार लंबन-। सूत्रप्रसार जगती करीन। आपले चरण हृदयी स्थापीन। सदैव पुढे माझिया॥१७०॥ भ्रम किंचित् मनातला। आपण पूर्णतः निवारिला। आणि प्रशांत केले मला। संदेहमुक्त झालो मी'॥१७१॥ व्यासऋषींचे ऐकूनि शब्द। संतोषले एकोराम सिद्ध। सर्वांना देऊनि आशीर्वाद। निघाले वैराग्यपीठाकडे॥१७२॥ असे गूढ लंबनसूत्र। व्यासास बोधिले परमपवित्र। कथा परिसता श्रोत्र। धाले पूर्ण श्रोत्यांचे॥१७३॥ श्रीकाशीज्ञानसिंहासनाधीश्वर। जगद्गुरू महास्वामी श्रीचंद्रशेखर। त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर। रचितो शेषनारायण॥१७४॥ श्रीजगद्गुरू पंचाचार्य विजय रसाळ। परिसोत भाविक भक्त प्रेमळ। शिवभक्तमने व्हावी उत्फुल्ल। षष्ठोऽध्याय गोड हा॥१७५॥

॥ श्रीजगद्गुरु पंचाचार्यार्पणमस्तु ॥

□□

# अध्याय सातवा

## श्रीकेदारपीठ, वैराग्यसिंहासन (उत्तरार्ध)

मंगलाचरण, पूर्वसूत्र (ओवी १-७), उषामठ (८-१३), उषा-अनिरुद्ध कथा (१४-८२), उषेचे पीठात आगमन व प्रार्थना (८३-८७), आचार्यांचे उत्तर, उषा-अनिरुद्धांस लिंगदीक्षा (८८-९७), अष्टावरणाचा उपदेश (९८-२६३), उषेची धन्यता व इच्छा (२६४-२६८), उषामठाचे निर्माण (२६९-२७१), ज० एकोरामाराध्यांचे कार्य व अवतारसमाप्ती (२७२-२७३), ज० केदारपीठाधिपती व त्यांचे कार्य (२७४-३०६), उपसंहार (३०७-३०९)

# अध्याय सातवा

॥ श्रीगणेशाय नमः॥ श्रीजगद्‌गुरु एकोरामाराध्याय नमः॥

जय जय शिवा जटाधरा। कैलासवासिया दिगंबरा। अनेकात्मका परमेश्वरा। भूतपते पशुपते॥१॥ नकळत वाहती बिल्वदला। त्यांच्या उद्धरिसी कुळा। तुझ्यासारखा देव भोळा। अन्य नाही पाहिला॥२॥ मृगयामिषे व्याध कोणी। बिल्वपत्रे टाकी खुडोनी। वृक्षातळीचे लिंग नयनी। त्याने नाही पाहिले॥३॥ तितुक्यानेही होऊनि प्रसन्न। त्याला कैलासी गेलास घेऊन। हड हड बोले बोबडी भिल्लीण। तिलाही तुवा उद्धरिले॥४॥ मग जे जाणिवपूर्वक अर्चन। करिती तुझे गुणसंकीर्तन। त्यांचे करशील सर्वकल्याण। यात नवल कोणते?॥५॥ असा भोळा परि समर्थ। तू शिवशंकर उमानाथ। माझ्या मनीचे पुरवी अर्थ। ग्रंथरथ चालवी॥६॥ श्रोतेहो पूर्वाध्यायी ऐकिले। केदारलिंग प्रकट झाले। व्यास महर्षींना बोधिले। आचार्यांनी लंबनसूत्र॥७॥ आता अवधारा कथा पुढे। जिचा मनास मोह पडे। उषामठाचे सांगेन थोडे। महिमान जिज्ञासू श्रोतया॥८॥ केदार हिमालयात आहे। षण्मास हिमाच्छादित राहे। तेथे जाणे शक्य नव्हे। कोणासही त्या काळी॥९॥ तेणे खाली उखीमठात।

केदारपीठ आहे स्थित। केदारपूजा शीतकालात। केली जाते पीठातच॥१०॥ वैराग्यसिंहासनी अधिष्ठित। एकोरामाराध्य कलियुगात। त्यांनी उत्तर आर्यावर्तात। केला धर्मप्रसार॥११॥ बाणासुराची कन्या वेल्हाळ। उषादेवी नामे प्रेमळ। तिने व्यतीत केला काळ। राहून येथे गुरुगृही॥१२॥ गुरुऋणातून व्हावया मुक्त। तिने बांधविला मठ प्रशस्त। 'उषामठ' नामे झाला विख्यात। बोलीभाषेत 'उखीमठ'॥१३॥ शोणितपूरचा राजा असुर। नाव त्याचे बाणासुर। सहस्रबाहू शिवभक्त थोर। होता पुत्र बलीचा॥१४॥ त्याची कन्या रूपवती। उषा नामे गाजली दिगंती। पुराणेतिहासांनी प्रीति-। कथा तिची रंगविली॥१५॥ अंगी यौवन बहरा आले। राजहंसी समान चाले। तिची उमटताच पाउले। फुले वसंतवैभव॥१६॥ केतकीसम वर्ण तेजाळ। मस्तकी कृष्णघनाचा डौल। रुचिर व्हावे बिंबाफळ। तसे ओठ रसरसले॥१७॥ ती हसता शुभ्र दशने। जणू भासती तारांगणे। हास्याचे टपोर चांदणे। जणू पडले भोवती॥१८॥ डोहासमान नितळ डोळे। अमृतात शब्द घोळले। ऐकताच स्वर कोवळे। वाटे वीणा झंकारली॥१९॥ आधीच सौंदर्याची पुतळी। वरी तारुण्यकळा बहरली। तिच्या लावण्याची नव्हाळी। आनंदवी रसिकांना॥२०॥ रूपगर्विता अशी सुंदर। हृदयी वेधिला मदनशर। तेणे चंचल झाले अंतर। रमली स्वप्नजगात॥२१॥ एकेदिनी सख्यांसंगती।

जलक्रीडेस गेली युवती। तेथे देखिले शिव-पार्वती। क्रीडा करिती आनंदे॥२२॥ शिवरूपे करूनि धारण। उभे राहिले शिवाचे गण। रूपे पार्वतीची घेऊन। अप्सराही पातल्या॥२३॥ शिव-पार्वतीसम नाटक। करूनि रिझविती जगन्नायक। शिव-पार्वती करिती कौतुक। टाळ्या पिटती हर्षाने॥२४॥ गायन वादन करिती नृत्य। शिवलीलेचे रंगविती नाट्य। शिव-शक्तीस रमविती भृत्य। पाहूनि सर्व तोषती॥२५॥ असा रंगला आनंदसोहळा। उषा न्याहाळी प्रेमे डोळा। मनी म्हणे किती भरला। आहे जीवनी आनंद॥२६॥ पतीसवे जी रमे सती। ती स्त्री केवढी भाग्यवती। येईल कधी हा रम्य अती। जीवनी प्रसंग माझिया॥२७॥ असे अंतरी चाले चिंतन। जगन्मातेने जाणली खूण। उषेस निकट पाचारून। धरिले प्रेमे हृदयाशी॥२८॥ हळूच कर्णी म्हणे 'सखे। स्त्रियांस अशी लाभती सुखे। पतीसंगती क्रीडता कौतुके। मिळे अपार आनंद॥२९॥ तुझ्या मनी जे दाटले गुज। ते मज ज्ञात झाले सहज। असा सुखानुभव येईल तुज। स्वप्नामध्ये राजसे॥३०॥ दाट होता मध्यरात्र। स्वप्नी येईल राजपुत्र। सुखवील तुझे गात्रन् गात्र। चरमसुखाने प्रेमले॥३१॥ तोच तुझा होईल पती। हे गुज ठेवी आपुल्या चित्ती'। असे बोलून उषेस पुढती। आलिंगिले सप्रेमे॥३२॥ पार्वतीचे ऐकूनि वचन। गेली मानसी आनंदून। धुंदीतच आली परतून। सख्यांसह स्वगृही॥३३॥ असे लोटले काही दिन।

सौधावरी केले शयन। मध्यरात्र दाटली गहन। स्वप्न पडे उषेला॥३४॥ राजबिंडे रूप लोभस। शुभलक्षणी कुरळे केस। सुदृढ देखणा असा पुरुष। आला तिच्या स्वप्नात॥३५॥ त्याने प्रेमचेष्टा आरंभिता। कंपित झाली देहलता। बाहुपाशी त्याने घेता। चूर झाली लज्जेने॥३६॥ लाटांवरी याव्या लाटा। तशा चालल्या प्रणयचेष्टा। विरघळूनि पुरुषश्रेष्ठा। तिने देह अर्पिला॥३७॥ सुखसागरी करिता शयन। युगांचेही होती क्षण। अशी क्रीडेतच गेली सरून। रात्र आणि स्वप्नही॥३८॥ प्रात:काळी उघडी डोळे। भासे अंग सारे शिणले। त्याचे रूप मनात ठसले। रस न उरला कशात॥३९॥ त्या दिवसापासूनि विशेष। तिच्या मनास लागे ध्यास। पक्वान्नाचा रुचिर घास। घशाखाली उतरेना॥४०॥ त्यागिले सकल नृत्य गायन। नावडे भोजन पान शयन। राहे एकान्तात बसून। नयन शून्यी लागले॥४१॥ तिची पाहून अशी अवस्था। मातेस बहु पडली चिंता। राजवैद्यास म्हणे माता। 'करा हिचा उपचार'॥४२॥ त्याने औषधपाणी दिले। परि सारे विफल झाले। हिचे शून्यात लागले डोळे। पाहीनाच कोणाकडे॥४३॥ सखी चित्रलेखा नामक। जाऊनि पुढती झाली सन्मुख। म्हणे 'सखये कोणते दु:ख। ते मज आज सांगावे॥४४॥ जरी कुढून मनी ठेवशील। तरी हृदय फुटो येईल। मज सांगता हलकी होईल। हृदयग्रंथी तुझी गे'॥४५॥ उषा सांगे स्फुंदस्फुंदूनी। चित्रलेखेस

स्वप्नकहाणी। म्हणे 'तो मज भेटवा कोणी। सोडीन अन्यथा प्राण मी' ॥४६॥ स्वप्नी येऊनि दिधले सुख। परि कोण तो नाही ठाऊक। त्याने हरिली तहान भूक। प्रेमांधळीच मज केले' ॥४७॥ चित्रलेखा वदे हसून। चित्रकलेत मी प्रवीण। देव-मानव-गंधर्वांची रेखून। चित्रे आणीन तुजपुढे॥४८॥ ती सर्व पाहावी न्याहाळून। सांग त्यामध्ये आहे कोण। मग त्याला पुढे आणून। करीन उभा तुझ्यापुढे' ॥४९॥ चित्रलेखेचे ऐकता शब्द। दाटे उषामुखी आनंद। म्हणे 'सखे तुझे सुखद। बोल मला भासती॥५०॥ दु:खकाळी देतसे धीर। तिलाच मैत्री म्हणती चतुर। चित्र रेखूनि येई सत्वर। चित्रपट्ट घेऊनी॥५१॥ मग लोटले काही दिन। चित्रपट्ट आली घेऊन। अधीरतेने न्याहाळून। उषा पाहू लागली॥५२॥ देवता दानव गंधर्व। विद्याधर यक्षादी सर्व। त्वरे पाहूनि यदुवंशीय। न्याहाळी राजे राजपुत्र॥५३॥ बलराम कृष्ण महाबली। प्रद्युम्नावरी दृष्टी फिरली। पुढे पाहता तिथेच खिळली। अनिरुद्धाच्या चित्रावर॥५४॥ आश्चर्याने बसे पाहात। मुखी चित्कार फुटे क्षणात। म्हणे 'सखये हाच स्वप्नात। आला पुरुष माझिया॥५५॥ हाच स्वप्नी झाला रत। यानेच चोरिले माझे चित्त। काहीही करून भेटव त्वरित। माझा सखा जिवाचा' ॥५६॥ चित्रलेखा म्हणे 'ऐक। हा न सामान्य प्रद्युम्न-लेक। कृष्णपौत्र यदुकुलतिलक। अनिरुद्ध श्रेष्ठ पराक्रमी॥५७॥ समुद्रात द्वारका पुरी।

विश्वकर्म्यांनि निर्मिली साजिरी। तेथे यदुकुल सेना सारी। घेऊनि वसे निर्भय॥५८॥ श्रीकृष्णसुत प्रद्युम्न। त्याचा हा अनिरुद्ध नंदन। तुला त्याचे घडले दर्शन। शक्य न अन्य कोणासी॥५९॥ त्या अभेद्य नगरात। प्रवेश करणे दुरापास्त। 'उभा करीन तुझ्या पुढ्यात'। असे शब्द बोलले॥६०॥ पण तो आता घेते मागे। मज हे अशक्य भासे जिवलगे। स्वप्नछायेमागे मागे। भ्रमणे सोड व्यर्थ हे'॥६१॥ उषामुखीचे लोपे हसू। डोळ्यांमध्ये दाटले आसू। म्हणे 'नकोस परिहासू। सखे मज अशी तू॥६२॥ तू असशी आकाशगामिनी। आणि स्वेच्छादेहधारिणी। काहीतरी उपाय करूनी। पुरवी माझा मनोरथ॥६३॥ नातरी या क्षणी देते प्राण। तुजवर माझी हत्या घालीन। विनवूनि मैत्रीची आण। तुला घालिते आज मी॥६४॥ दूती माझी होऊनि विशेष। भेटून माझ्या प्रियतमास। सांग तुझ्याविण ती प्राणास। त्यागून जगास सोडील'॥६५॥ असे बोलता फुटला बांध। स्फुंदून स्फुंदून हरपे शुद्ध। चित्रलेखेने केले सावध। जल शिंपून मुखावरी॥६६॥ म्हणे 'आता होवो काही। अनिरुद्धाच्या जाईन गृही। त्याला आणेन अथवा मीही। मुख काळे करीन'॥६७॥ आली मनोवेगे द्वारकेत। नारद भेटले अकस्मात। त्यांना कथिली सर्व मात। केली साह्यार्थ प्रार्थना॥६८॥ गुप्तसिद्धी त्यांनी दिली। अदृश्यरूपे पाहत निघाली। अनिरुद्धाच्या प्रासादी आली। पाहू लागली

न्याहाळूनी॥६९॥ पुढे नर्तिका करिते नर्तन। मंजुळ स्वरे करिते गायन। तिकडे त्याचे नाही मन। तो बसलेला विमनस्क॥७०॥ दूती ओळखे त्याचे गुपित। झाला उषेवर अनुरक्त। तिच्यासारखे याचे चित्त। भ्रमले स्वप्नदर्शने॥७१॥ मग सोडून रूप गुप्त। प्रकटली पुढे अकस्मात। म्हणे 'तुम्ही देखिली स्वप्नात। तिची सखी मी चित्रलेखा'॥७२॥ उषा सखीची विरहकहाणी। घातली अनिरुद्धाच्या कर्णी। तो म्हणे 'मीही व्याकुळ मनी। तिच्या स्वप्नदर्शनाने॥७३॥ ती कृशकटी गजगामिनी। आहे रोमरंध्री भरूनी। तिला केधवा पाहीन नयनी। असेच मजला जहाले'॥७४॥ त्याला गुप्तरूपे घेऊन संगे। शोणितपुरा आली वेगे। प्रियेसी पाहताच तो सर्वांगे। अंतर्बाह्य रोमांचला॥७५॥ एकान्तात झाली भेटी। प्रेमावेशे पडली मिठी। प्रेमचेष्टा गुजगोष्टी। अमर्याद रंगल्या॥७६॥ उषामहाली आहे लपून। राजबिंडा कोणी तरुण। कर्णोपकर्णी ही वार्ता होऊन। कळली बाणासुरास॥७७॥ ऐकताच तापले मस्तक। वधावया धाडिले सैनिक। परि प्रतापी यदुकुलतिलक। हरला नाही अनिरुद्ध॥७८॥ स्वये आला बाणासुर। सर्पबंधनी बांधला सत्वर। वार्ता कळता शोणितपुरावर। चालून आले यादव॥७९॥ संग्राम जहाला घनघोर। तेथे हरला बाणासुर। मग सामंजस्ये परस्पर। जोडिले नातेबंधन॥८०॥ साक्षी ठेवूनि विप्र देव। उषा-अनिरुद्धाचा

केला विवाह। स्नुषेस घेऊनि गेले सर्व। द्वारकेस यादव ते॥८१॥ उषा-अनिरुद्धाची प्रेमकहाणी। रंगविली पुराणोपुराणी। तीच नवे शब्द गुंफूनी। तुम्हांप्रती निवेदिली॥८२॥ पुढे घेऊनि अनिरुद्धास। उषा आली गुरुगृहास। वंदूनि जगद्गुरुचरणांस। बसली स्थिर चित्ताने ॥८३॥ म्हणे 'गुरुदेवा बालपणी। येथेच रतले विद्याध्ययनी। अंगे गुरुसेवा करूनी। अनुभविली धन्यता॥८४॥ पुढे अंगी तारुण्य आले। संयोगे प्रेमबंधनी पडले। गृहस्थाश्रमी पूर्ण रमले। आता आले प्रौढत्व॥८५॥ बालपणीचा अनुभव पाही। विसरेनाच केल्या काही। म्हणूनि पतिसह गुरुगृही। आले प्रौढ वयात॥८६॥ बालमना जे नाही कळले। ते पुनश्च सांगा आम्हा सगळे। नम्र होऊनि दारी आले। अंगीकारा गुरुदेवा'॥८७॥ शिवभक्त बाणकन्या उषा। आता द्वारकाधीशाची स्नुषा। तिची भक्ती पाहता तोषा। भरती आली आचार्यमनी॥८८॥ उषामुखीची ऐकूनि स्तुती। आचार्य संतोषून बोलती। 'बालपणीची भक्तिप्रीती। अजून आहे जागृत॥८९॥ बालमनावरी जे कोरिले। जाणावे ते अक्षर झाले। काहीकेल्या जाई न पुसले। जन्मभरी ते किंचित्॥९०॥ लिंग, वय, जाती कोणती। असो, वसावी निर्मळ भक्ती। तीच घेऊनि जाते अंती। भक्ता शिवासमीप॥९१॥ जलप्रलय अटळ होणे। मग आधीच शिकावे पोहणे। आल्यावरी जो पाहू म्हणे। त्याचे मरण निश्चित॥९२॥ तसे हाती

असता जीवन। करावी शिवपूजा-जपध्यान। पुढे उभे ठाकिता मरण। शक्य न करणे काहीच ॥९३॥ ऐनवेळी जो पाहीन म्हणे। त्याचे निरर्थकच बोलणे। जपाभ्यास केला जेणे। त्याचा साजरा अंतिम क्षण ॥९४॥ तुम्ही उभयता होऊनि सावध। आत्मकल्याणा झाला सिद्ध। करीन शिवाद्वैतबोध। लिंगदीक्षा देऊनी' ॥९५॥ असे बोल स्नेहभरले। ऐकूनि दोघे सद्‌गदित झाले। मनोभावे चरण वंदिले। जगद्‌गुरूंचे उभयतांनी ॥९६॥ वेधा, मांत्री, क्रिया तीन। दीक्षा उभयतांस देऊन। केले इष्टलिंगधारण। महामंत्र उपदेशिला ॥९७॥ आचार्य म्हणती 'सावधपणे। अवधारावे माझे बोलणे। आता निरूपीन अष्टावरणे। जीवन नियत करण्यास ॥९८॥ झाकणे आणि घालणे कुंपण। 'आवरणा'चे हे अर्थ दोन। थंडीवाऱ्यापासून रक्षण। कराया वस्त्रे पांघरती ॥९९॥ नग्नता न पडावी दृष्टीस। म्हणूनि झाकती देहास। वस्त्राने लाभे देहलतेस। कमनीयता आगळी ॥१००॥ कृषीवल कुंपण शेताभोवती। घालूनि राखे पीक शेती। तेणे आवरणेचि असती। वस्त्रे आणि कुंपणे ॥१०१॥ तसेच हे अष्टावरण। अशुभ अनिष्ट प्रवृत्तींपासून। करूनि साधकाचे रक्षण। सौंदर्यवर्धन करिते ॥१०२॥ काम क्रोध मद मत्सर। लोभमोहादी षड्‌विकार। साधकास छळती अपार। धर्माचरण करिताना ॥१०३॥ त्यांच्यापासून रक्षण कराया। आणि देखणी दिसावी काया। हेचि असे प्रयोजन या। आठ

आवरणांचे॥१०४॥ शिरस्त्राण आणि चिलखत। योद्ध्यास रक्षिती रणांगणात। तसेच परमार्थव्यवहारात। साधकास हे रक्षिते॥१०५॥ हस्तपादनेत्रादी अंगांद्वारे। शरीरव्यापार चालती सारे। तसे परमार्थव्यवहारी खरे। साह्य होती आवरणे॥१०६॥ तेणे 'रक्षाकवच' म्हणती। साधकाची 'अंगे' मानिती। परशिवासमीप द्रुतगती। जाणे शक्य ह्यांमुळे॥१०७॥ गुरू, लिंग आणि जंगम। मंत्र, रुद्राक्ष आणि भस्म। प्रसाद, पादोदक ही परम। असती अष्ट आवरणे॥१०८॥ पूजनीय असती पहिली तीन। दुसरी तीन पूजासाधन। आणि जाणावी अंतिम दोन। पूजाफळे पवित्र॥१०९॥ 'लिंग' म्हणजे शिव महान। 'अंग' म्हणजे जीव सान। 'लिंगा'त 'अंग' समरसे पूर्ण। तेच 'लिंगांगसामरस्य'॥११०॥ हे सामरस्य साधण्यासाठी। जीवाची चाले धडपड मोठी। त्याच्या साधनेत खोटी। येऊ न देती आवरणे॥१११॥ पहिले आवरण गुरू। अष्टावरणाचा मूलाधारू। त्याच्याविण ना कोणी तारू। शके भवसागरी॥११२॥ तोच पाळितो बोधितो। हृदयातला देव दावितो। हात ठेवूनि सांत्वन करितो। पाठीवरी दु:खात॥११३॥ शिव परब्रह्म आहे श्रेष्ठ। पण त्याची कधी व्हावी भेट?। गुरू भेटे बोले स्पष्ट। करी शंकासमाधान॥११४॥ कधी डोळा लागे झरू। होई आधारच गुरू। हात पाठीवर फिरू। लागे प्रेमभराने॥११५॥ म्हणूनि शिवाहूनि अधिक। गुरूस

मानिती भक्तलोक। त्याच्याठायी घेती देख। दर्शन परशिवाचे॥११६॥ शिव आद्यगुरू असती। केली वेदागमांची निर्मिती। तीच ज्ञानधारा वाहती। अजूनि आहे जगात॥११७॥ आम्हा शिवगणांनाच। शिवे सूत्रे बोधिली पाच। मूळ उगम ठरली तीच। विश्वज्ञानसागराचा॥११८॥ रज-तमोगुण रोधी। आणि शिवतत्त्व बोधी। शिवज्ञानाचा जो जलधी। तोच गुरू जाणावा॥११९॥ गुण-रूपापलीकडे। ज्याचे अस्तित्व रोकडे। नेतसे त्या परशिवाकडे। तोच गुरू जाणावा॥१२०॥ स्वये करी आचरण। तेच करवी शिष्यांकडून। असा असे शिवासमान। तोच गुरू जाणावा॥१२१॥ ज्याची केल्यावरी पूजा। गमे पूजिले नंदिध्वजा। साह्य होई भक्तकाजा। तोच गुरू जाणावा॥१२२॥ हृदयी करुणेचा पूर। षड्विकार राहिले दूर। शिवध्यानात जो तत्पर। तोच गुरू जाणावा॥१२३॥ सत्यवक्ता धर्मपरायण। शिवतत्त्वविवेकी पूर्ण। ज्यास अंग-लिंगस्थलज्ञान। तोच गुरू जाणावा॥१२४॥ कुमार्ग अनाचार टाळी। शुद्ध त्रिपुंड्र रेखे भाळी। मुखी शिवनामावळी। तोच गुरू जाणावा॥१२५॥ भूषवी रुद्राक्षांनी शरीर। भस्मोद्धूलनात तत्पर। जणू भासे कर्पूरगौर। तोच गुरू जाणावा॥१२६॥ इष्टलिंग रुळते कंठी। मधुर मंगल शब्द ओठी। षड्गुणांचे ऐश्वर्य गाठी। तोच गुरू जाणावा॥१२७॥ फेडूनि अज्ञानाची काजळी। हृदयी ज्ञानदीप उजळी। करी परमसुखाची दिवाळी। तोच गुरू जाणावा॥१२८॥

मातले षड्विकारासुर। घेऊनि वैराग्यतलवार। त्यांचा सत्वर करी संहार। तोच गुरू जाणावा॥१२९॥ सर्व जनांस सांगे विवेक। असा सर्वलोकशिक्षक। सन्मार्गाचा उपदेशक। तोच गुरू जाणावा॥१३०॥ अशा श्रीगुरूच्या अनुग्रहाने। मलत्रयाचे उखडे ठाणे। आणि सामरस्याचे केणे। हाती येई शिष्याच्या॥१३१॥ त्याची करिता सेवा निष्ठे। मोक्ष दारातचि तिष्ठे। विश्वरूपे शिव प्रकटे। दृष्टीपुढे भक्ताच्या॥१३२॥ वेधादीक्षा देऊनि आधी। शिवतत्त्वाकडे वेधी। मंत्रोपदेश कर्णांमधी। करूनि देतो मंत्रदीक्षा॥१३३॥ आज्ञा-उपमादी संस्कार करून। करवी शिष्यास लिंगधारण। अशी क्रियादीक्षा देऊन। सांगे लिंगमाहात्म्य॥१३४॥ दीक्षा, शिक्षा आणि ज्ञान। मिळे एकाच श्रीगुरूकडून। एकातच एकवटले पूर्ण। दीक्षा-शिक्षा-ज्ञानगुरू॥१३५॥ अवधारा उषा अनिरुद्ध। दुजे आवरण करितो विशद। ज्या चैतन्यमय सागरी बुद्बुद्। होऊनि भ्रमती ब्रह्मांडे॥१३६॥ ज्यातून विश्व पावते उदय। ज्यात विश्वाचा होतो विलय। असे शिवतत्त्व एकमेव। त्याला 'लिंग' संबोधिती॥१३७॥ शक्तियुक्त शिवाचे प्रतीक। शिवलिंगचि जाणा सम्यक्। शिव शक्ती तत्त्वे एक-। रूप झाली लिंगात॥१३८॥ भक्तांसाठी शिव महान। इष्टलिंगरूपे झाला सान। जो अगम्य अगोचर विश्वोत्तीर्ण। तो स्थित झाला करपीठी॥१३९॥ वारूनि संसाररूपी अनिष्ट। देतसे सामरस्यरूपी इष्ट। तेणे 'इष्टलिंग' हे श्रेष्ठ।

नाम दिले अन्वर्थक॥१४०॥ शिवकला आणि जीवकलांस। इष्टलिंगात स्थापूनि नि:शेष। शिवजीवकलायुक्त लिंगास। श्रीगुरू देती शिष्यकरी॥१४१॥ ते प्राणासमान जपावे। शरीरी सर्वदा धारण करावे। देहापासून वियुक्त न व्हावे। किंचित्ही कदाकाळी॥१४२॥ ते हरवता पडता किंचित्काळ। प्राणत्यागाची येते वेळ। म्हणूनि अखंड सर्वकाळ। प्रमादरहित वर्तावे॥१४३॥ लिंगाठायी वसतो शिव। असाच असावा दृढ भाव। लिंगाला ठेवू नये नाव। जड पाषाण म्हणूनी॥१४४॥ लिंगपूजन हे नित्य व्रत। ते आचरावे प्रमादरहित। होता जन्ममृत्यू काही गृहात। ते कदापि त्यागू नये॥१४५॥ स्त्री जरी झाली ऋतुमती। अथवा झाली असता प्रसूती। त्या काळीही तिने लिंग प्रीति-। पूर्वक पूजिले पाहिजे॥१४६॥ स्त्री असो वा असो पुरुष। ज्याच्या देहावर वसे महेश। अमंगल अस्पृश्यता त्यास। कदाकाळी स्पर्शेना॥१४७॥ ज्याचा देहचि देवालय। त्याला सूतकांचे कसले भय?। म्हणूनि पूर्ण होऊनि निर्भय। लिंगपूजन करावे॥१४८॥ त्रिकाळ करावे लिंगार्चन। शिवचिंतन-मनन-ध्यान। परशिवाच्या चिंतनाविण। एकही क्षण दवडू नये॥१४९॥ भ्रमरचिंतने निरंतर। अळीच पूर्ण होते भ्रमर। तसा लिंगध्यानाने नर। होतो पूर्ण लिंगरूप॥१५०॥ बिल्वादींनी पूजावे इष्टलिंग। भावसुमनांनी प्राणलिंग। प्रेमे पूजावे भावलिंग। 'मी शिवरूप' भावनेने॥१५१॥ देहावरी वसतो

शिव। असा ज्याचा दृढभाव। त्याच्या हातून असंभव। घडणे काही दुराचार॥१५२॥ लिंग हाच जीवप्राण। लिंग हेच आपुले जीवन। जो वर्ततो लिंगावाचून। तो पिशाच्च जाणावा॥१५३॥ लिंगधारणव्रत महान। शिव देहावर हे असावे भान। लिंगासाठीच भोजन शयन। वेषभूषा सर्वकाही॥१५४॥ होवो सुखदु:ख हर्षखेद। तो मानावा लिंगप्रसाद। असा जुळावा भावबंध। पूर्णतया लिंगाशी॥१५५॥ लिंगासी सर्वस्व अर्पिणे। म्हणजे 'लिंग आयत्त' होणे। आयत्त संस्कार केला गुरूने। म्हणून व्हावे 'लिंगायत्त'॥१५६॥ शरीरावरी इष्टलिंग। प्राणाठायी प्राणलिंग। भावनेत भावलिंग। मानूनि व्हावे लिंगरूप॥१५७॥ सर्वस्वे लिंगरूप झाला। त्याचा सफल जन्म झाला। मृत्यू त्याच्यापुढे हरला। तो ठरला जीवन्मुक्त'॥१५८॥ सर्वेंद्रिये आणूनि कर्णी। ऐकती जगद्‌गुरूंची वाणी। शब्दन् शब्द ठेविती जपूनी। हृदयसंपुटी आपुल्या॥१५९॥ जगद्‌गुरू बोलती पुढती। 'ऐका जंगमाची महती। ज्याची पावले सदैव भ्रमती। त्याला जंगम म्हणावे॥१६०॥ जो जन्ममरणातूनि मुक्त। जो नि:स्पृह अहंकाररहित। आयुष्य वेचितो जनहितार्थ। त्याला जंगम म्हणावे॥१६१॥ सर्व देवांचा देव शिव। असा बाळगे दृढतर भाव। शिवाविण अन्य मानीना देव। त्याला जंगम म्हणावे॥१६२॥ अखंड जशी तैलधार। तसा शिवचिंतनात चूर। मनचि वैराग्याचे घर। त्याला

जंगम म्हणावे॥१६३॥ शिवाविषयी निष्ठाभक्ती। ज्वलंत जागे ज्याच्या चित्ती। आगमाभ्यासात ज्याची गती। त्याला जंगम म्हणावे॥१६४॥ कामक्रोधाची मोडे कंबर। अहंममतेस करी दिगंबर। शिवनिंदकास दावितो अंबर। त्याला जंगम म्हणावे॥१६५॥ अलिप्त परस्त्री-द्रव्यापासून। मानी ब्रह्मादींचे ऐश्वर्य तृण। शिवकार्यास्तव वेची प्राण। त्याला जंगम म्हणावे॥१६६॥ जो शिवज्ञानाचा जलधी। डुंबे पुन:पुन्हा शिवानंदी। गणाधीश्वरांचा वंशज अनादी। त्याला जंगम म्हणावे॥१६७॥ चालते बोलते लिंग जंगम। परशिवाचे मुख जंगम। पूर्ण तृप्त होताच जंगम। शिव, विश्व तृप्त होती॥१६८॥ स्वय, पर, चर जंगम। अशा जंगम अवस्था तीन। जीवमात्री स्व-रूप पाहे पूर्ण। तो स्वयजंगम जाणावा॥१६९॥ लोकप्रबोधन करण्यास्तव। जो भ्रमतो गावोगाव। त्या जंगमावस्थेस नाव। चरजंगम असे हे॥१७०॥ शिवज्ञानामुळे जिवंत। असताक्षणीच झाला मुक्त। त्या श्रेष्ठ जंगमावस्थेप्रत। परजंगम नाव असे॥१७१॥ वर्णिल्या जरी अवस्था तीन। तरी त्या एका जंगमी विलीन। तोच स्वय, चर, पर होऊन। वावरतो जगात॥१७२॥ गुरू, लिंग, जंगम तीन। रूपे दिसण्यापुरती भिन्न। एक शिवतत्त्वचि त्यामधून। प्रकट झाले जाणावे॥१७३॥ 'लिंग'रूपे आराध्य होतो। 'गुरु'रूपाने दीक्षा देतो। 'जंगम' होऊनि बोध करितो। शिवाद्वैतज्ञानाचा॥१७४॥ पातळ

असो वा थिजलेले। तूपचि दोन्ही ठायी भरले। तसे गुरू जंगम नसती वेगळे। शिवस्वरूप जाणावे॥१७५॥ तिन्ही रूपांठायी एक। पूज्यबुद्धी असावी चोख। ज्ञानोपदेश करूनि देख। जंगम भक्ता रक्षितो॥१७६॥ दीक्षासमयी शिवविचार। गुरू बोधिती सविस्तर। कालांतरे तो होणे धूसर। शिष्यहृदयी शक्य हे॥१७७॥ निखाऱ्यावरी राख येऊनी। तो विझू पाहे क्षणोक्षणी। परि फुंकर घालिता कोणी। पुन्हा उठे तेजाळून॥१७८॥ तसे गुरूने जे बोधिले। ते कालगतीने धूसर झाले। जंगम पुन्हा बोधूनि सगळे। तेच करितो प्रज्वलित॥१७९॥ असा जंगमरूपाने शिव। शिष्य-भक्तांस रक्षितो सदैव। म्हणूनि त्याचे घ्यावे नाव। श्रद्धा-भक्तिपूर्वक॥१८०॥ आता पादोदक-प्रसाद। ते कसे घ्यावे करावे सिद्ध। याचा करीन थोडा बोध। लक्षपूर्वक अवधारा॥१८१॥ गुरू लिंग जंगम तीन। मूर्ती मानूनि एकसमान। त्यांचे पादोदक सिद्ध करून। श्रद्धापूर्वक सेवावे॥१८२॥ गुरु-जंगमांचे पादतीर्थ। हाच पादोदकाचा शब्दार्थ। पद प्रक्षाळिले ते समस्त। तीर्थ नव्हे जाणावे॥१८३॥ 'पाद' गुरुमूर्ती सुरेख। 'उदक' जिज्ञासू शिष्य देख। गुरु-शिष्य होता एक। तेच जाणावे पादोदक॥१८४॥ 'पा' म्हणजे पाप सकळ। 'दो' म्हणजे दोष निखळ। 'क' म्हणजे कर्ममळ। 'द' दहन करणारे॥१८५॥ पाप दोष कर्म समस्त। जे करिते पूर्ण भस्मसात। तेच पादोदक हा अर्थ।

तत्त्ववेत्ते सांगती॥१८६॥ गुरुचरणांठायी देख। भावूनि शिवमूर्ती अनेक। मंत्रपूर्वक अभिषेक। विधियुक्त करावा॥१८७॥ दोन्ही पदांगुष्ठांवर। जलाभिषेक करूनि पवित्र। ते जल केल्यावरी एकत्र। सिद्ध होय पादोदक॥१८८॥ ते परम श्रद्धाभावे। इष्टलिंगावरी घालावे। उच्छिष्टसूतक त्यागूनि सेवावे। विधिपूर्वक भक्तांनी॥१८९॥ पादोदकप्राशनामुळे। अहंकाराचा वृक्ष उन्मळे। विनयाचा गंध दरवळे। भक्तमानसी सर्वकाळ॥१९०॥ गुरु-जंगम नसतील तर। इष्टलिंगपूजनानंतर। इष्टलिंगावरीच नीर। तीन वेळा घालावे॥१९१॥ गुरुपादोदक असे उच्चारावे। एक पळी जल घालावे। असे लिंग-जंगमांच्या नावे। जल अर्पावे लिंगासी॥१९२॥ तेच सिद्ध पादोदक। सेवन करावे श्रद्धापूर्वक। अशी पादोदकाची देख। रीत पूर्ण जाणावी॥१९३॥ प्रतिदिन घालिता पाणी। वृक्ष बहरे क्षणोक्षणी। तसे पादोदकसेवने मनी। बहरे वृक्ष भक्तीचा॥१९४॥ गुरु-जंगमांच्या पादतीर्थात। अद्भुत भरले आहे सामर्थ्य। पावित्र्य लाभूनि होय मुक्त। रोगदोषांपासूनी॥१९५॥ जीवात्म्यास देणे मुक्ती। अशी पादोदकात शक्ती। गंगानदीची गाती कीर्ती। मुक्तिदात्री म्हणूनी॥१९६॥ ती देतसे जरी मुक्ती। तरी तेथे बुडण्याची भीती। न बुडविता मनुष्याप्रती। पादतीर्थ उद्धरिते॥१९७॥ गुरु-लिंग-जंगमतीर्थ। जो सेवितो सदोदित। त्यास रक्षिते करिते मुक्त। असे हे

मुक्तिप्रदायक॥१९८॥ आता प्रसाद आवरण। त्याचे सांगेन महिमान। वीरशैवाचाराचे विशेष लक्षण। असे प्रसाद-पादोदक॥१९९॥ स्थावरलिंगास पूजिणे। विभूती रुद्राक्ष धारण करणे। आदी सामान्य असती लक्षणे। सर्व शिवभक्तांची॥२००॥ परि करणे इष्टलिंगधारण। आणि पादोदक-प्रसादसेवन। ही असती केवळ विलक्षण। लक्षणे वीरशैवांची॥२०१॥ गुरु-जंगमांस शिवाप्रमाणे। मानूनि त्यांची पादपूजा करणे। भावे त्यांचा तीर्थप्रसाद घेणे। वीरशैवांचे वैशिष्ट्य॥२०२॥ शिवास जो पदार्थ अर्पिला। तोचि प्रसाद म्हणविला। अर्पिताच शुद्ध झाला। उरले नाही पदार्थत्व॥२०३॥ शिवाचा अनुग्रह सर्व। त्याला प्रसाद असे नाव। मनी प्रसन्नतेचा ठाव। तिलाही म्हणती प्रसाद॥२०४॥ मनुष्य जसे भक्षितो अन्न। तसेच त्याचे घडते मन। मन म्हणजेच अन्नाचा पूर्ण। सूक्ष्म असे परिणाम॥२०५॥ दूषित अन्न भक्षिता देख। मनही बनते वैषयिक। शुद्धान्न सेविता होई सात्त्विक। येई अनुभव सर्वांना॥२०६॥ शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध। हे इंद्रियांचे आहार प्रसिद्ध। ते शिवार्पित करिता सिद्ध। होतो प्रसाद त्यांचाही॥२०७॥ मग ते विषय भोगिताही। त्यांची बाधा होणे नाही। अशी बाहू उभारूनि ग्वाही। वीरशैवधर्म देतसे॥२०८॥ अन्नातील मोठा दोष। ममत्व हाच असे विशेष। 'हे माझे, ते माझे' घोष। मनुष्य करितो सर्वदा॥२०९॥ अन्न करिता शिवार्पण। त्यातील

ममत्व जाय सरून। मग उरे तो प्रसाद पूर्ण। शुद्ध शिवप्रभूंचा॥२१०॥ प्रसादाचे सेवन करिता। मनी दरवळे प्रसन्नता। अवघे मनचि प्रसन्न होता। ग्रंथी गळती अविद्येच्या॥२११॥ उपभोगार्थ जे संपादावे। ते सर्व शिवासी अर्पावे। प्रसाद म्हणूनि उपभोगावे। ते न बाधे कदापि॥२१२॥ सुखदु:ख-हर्षखेदादिक। सर्वचि शिवप्रसाद देख। मानूनि सेविता मनी नि:शंक। सुखचि भरे आगळे॥२१३॥ प्रसाद जाणावी शुद्धौषधी। नाशिते जन्ममृत्युव्याधी। आणि नेऊनि मोक्षपदी। बसवी भक्तास निश्चित॥२१४॥ त्रिमल त्रिताप नाशती दोष। विद्येचा पूर्ण होई विकास। शिवज्ञानाने उजळे नि:शेष। हृदयकोश भक्ताचा॥२१५॥ शिवप्रसादाचा किंचित् कण। सांडू नये हे असावे भान। म्हणूनि भोजनपात्रही धुऊन। त्यातील प्राणी प्राशावे॥२१६॥ गुरूस अर्पिलेला 'शुद्धप्रसाद'। इष्टलिंगास अर्पिता 'सिद्धप्रसाद'। जंगमास अर्पिलेला 'प्रसिद्धप्रसाद'। असे प्रसाद त्रिविध हे॥२१७॥ मनी प्रसन्नता राहे भरून। तेथे दु:खास नाही स्थान। असे प्रसादाचे महिमान। निरूपिले तुम्हांस॥२१८॥ आता सांगेन भस्म-रुद्राक्ष। सावधपणे द्यावे लक्ष। 'शिवभक्तचि हा' गर्जून साक्ष। देणारी शुभलक्षणे॥२१९॥ विभूतीवाचून मिरवे भाळ। ते धिक्करणीयच केवळ। भस्म-रुद्राक्ष देई बळ। सदाचरण करावया॥२२०॥ भस्म लेपितो सर्वांगावर। शोभे शंकर कर्पूरगौर। 'महाभस्म' ही साद

मनोहर। ऋषी घालिती शिवाला॥२२१॥ विभूती, भसित, क्षार। भस्म, रक्षा हे पंचप्रकार। ऐश्वर्य प्रदान करी अपार। म्हणून म्हणती 'विभूती'॥२२२॥ करी शिवतत्त्वाचे प्रकाशन। म्हणूनि 'भसित' अभिधान। त्रिताप-क्षय करिते म्हणून। 'क्षार' असे संबोधिती॥२२३॥ पातकांचे भर्त्सन करिते। म्हणूनि 'भस्म' नाव शोभते। भूतप्रेतांपासून रक्षिते। तेणे म्हणती 'क्षार' असे॥२२४॥ शिवाच्या पंचमुखांतून। झाल्या पाच गायी उत्पन्न। त्यांच्या गोमयांपासून। सिद्ध झाली पंच भस्मे॥२२५॥ सप्त स्नानांत अत्यंत। भस्मस्नान श्रेष्ठ पुनीत। बाह्य आभ्यंतर मल निवृत्त। होती भस्मस्नानाने॥२२६॥ भस्माचे अंगी उधळण। त्यास म्हणती भस्मोद्धूलन। भस्मकणांचे सर्वांगी लेपन। भस्मस्नान ते असे॥२२७॥ मस्तक, कपाळ, कंठ, कर्ण। वक्ष, भुजा, नाभी, मान। पाठ, बाहू, मनगटे जाण। अशा पंधरा स्थानांवर॥२२८॥ मनोभावे प्रणवोच्चार। करीत रेखावे त्रिपुंड्र सुंदर। तेणे सुशोभित दिसे शरीर। मनही होई निर्मळ॥२२९॥ जो रेखितो त्रिपुंड्र अखंड। तो प्रत्यक्ष जाणा चंद्रचूड। असो पातकी नास्तिक प्रचंड। भस्मधारणे उद्धरतो॥२३०॥ भस्मासमान रुद्राक्षही। धारण करावे सर्वदेही। रुद्रनेत्रांतून पाही। उत्पन्नले रुद्राक्ष॥२३१॥ किती मुखांचे रुद्राक्ष किती। धारण कोणत्या अंगावरती। करावे ही गुरूकडून रीती। सर्व घ्यावी समजूनी॥२३२॥ रुद्राक्षधारणे स्थूल दृष्टी। जाऊन लाभे

रुद्रदृष्टी। दृष्टिपुढे समग्र सृष्टी। दिसे शिवरूपात॥२३३॥ रुद्राक्षाचे स्पर्शन पूजन। करी कोणी स्मरण दर्शन। तो असो अज्ञ, पतित वा ब्राह्मण। जाई उद्धरून निश्चित॥२३४॥ भस्म-रुद्राक्ष बाह्य लक्षण। तेणे अंतरी होय परिवर्तन। पात्र बाहेर करिता उष्ण। आतील जल तापते॥२३५॥ ज्यास चोरीना कोणी तस्कर। असे हे सात्त्विक अलंकार। ते हरवतीना जीवनभर। सदैव करिती संगत॥२३६॥ सुवर्ण भूषणे लादून सर्वांग। धनप्रदर्शनाचे करिती सोंग। तसे नव्हती, ही असती अव्यंग। अंतरंग दाखविती॥२३७॥ भस्म-रुद्राक्ष करिता धारण। निर्मल होई अंत:करण। शुद्धान्त:करणी उमटे पूर्ण। आत्मबिंब सहजचि॥२३८॥ ज्याला आत्मलाभ झाला। त्याच्या जवळी शिवच आला। शिवाचा शोध घ्यावयाला। जाणे नलगे कोठेही॥२३९॥ असे भस्म-रुद्राक्षधारण। मनाच्या निर्मलतेस कारण। आता आठवे आवरण। मंत्र कसे ते अवधारा॥२४०॥ परब्रह्म शिवाचा वाचक। महामंत्र पंचाक्षरी नामक। जापकास लाभे शिवलोक। आणि लिंगांगसामरस्य॥२४१॥ जगी अष्टादश विद्या उत्कृष्ट। त्यात चार वेद श्रेष्ठ। चतुर्वेदांत श्रीरुद्र बलिष्ठ। त्यात अष्टम अनुवाक्॥२४२॥ अष्टम अनुवाकी 'नम: शिवाय च'। हा मंत्र श्रेष्ठ मानिती साच। मंत्रात 'शिव' ही द्व्यक्षरेच। श्रेष्ठ वर्णिती शिवरूप॥२४३॥ ही द्व्यक्षरे गुंफिली ज्यात। तो पंचाक्षरी श्रेष्ठ विख्यात।

म्हणूनि सप्तकोटी मंत्रांत। पवित्र मंत्र पंचाक्षरी।।२४४।। शिव हे ब्रह्माचे प्रकाशक नाव। दाखवी शिवरूपाचे वैभव। ते ज्यात ओविले तो एकमेव। श्रेष्ठ असे पंचाक्षरी।।२४५।। जो जपतो पंचाक्षरी पवित्र। त्याने न जपावे अन्य मंत्र। मुक्तिप्रदायक एकमात्र। पंचाक्षरी जाणावा।।२४६।। मूल, विद्या, शैवसूत्र। शिव आणि पंचाक्षर मंत्र। अशी पाच नावे पवित्र। असती महामंत्राची।।२४७।। हा सर्व मंत्रांचे असे मूळ। म्हणूनि संबोधिती 'मूल'। प्राप्त होती विद्या सकल। तेणे म्हणती 'विद्यामंत्र'।।२४८।। हा मंत्र शिव-भक्तांतील सूत्र। म्हणूनि नाम 'शैवसूत्र'। मंगलकारक म्हणूनि 'शिवमंत्र'। नाव साजे यास हे।।२४९।। पाच अक्षरांनी घडला। तेणे 'पंचाक्षरी' म्हणती याला। मंत्राआधी ॐकार लाविला। तरी हा होय षडक्षरी।।२५०।। तीन अक्षरे प्रणवातील। बोधिती शिवरूप 'निष्कल'। पंचाक्षर बोधी 'सकल'। रूप परशिवाचे।।२५१।। सकल-निष्कल रूपे दोन। षडक्षरीत सामावली पूर्ण। षडक्षर जपता शिवच संपूर्ण। लाभे जपकर्त्याला।।२५२।। श्रीगुरूकडून मंत्र घ्यावा। मग तो प्रेमपूर्वक जपावा। जपाआधी शिव चिंतावा। उमेसह एकाग्र।।२५३।। मंत्र स्पष्टपणे ऐकती लोक। त्या जपास म्हणती 'वाचिक'। ओठ हलती परि शब्द एक। नकळे तो जप 'उपांशू'।।२५४।। ओठही न हलता किंचित्। जप चाले आतल्या आत। त्यास 'मानस जप' म्हणती संत। श्रेष्ठ सर्व जपांमध्ये।।२५५।।

मंत्र दिसे जरी सान। तरी अत्यंत शक्तिमान। लहान अंकुश नियंत्रण। ठेवी महाहत्तीवरी॥२५६॥ ठिणगी लहान दिसे जरी। कापूसढीग भस्म करी। तसा लहान पंचाक्षरी। पापराशी जाळितो॥२५७॥ शुद्धस्थळी शुद्ध मानसे। मानसजप करावा उल्हासे। शिवालयी घुमती नाद मंदसे। तसा संथ लयीत॥२५८॥ मंत्र जपणे मन:पूर्वक। म्हणजे शिवास मारणे हाक। पुन:पुन्हा जपता जगन्नायक। शिव देती प्रतिसाद॥२५९॥ हृदयस्थ शिवास आवाहन। करणे हेच मंत्राचे प्रयोजन। म्हणून त्याचे प्रदर्शन। ओरडून करू नये॥२६०॥ 'नम:' शब्दाचा अर्थ जीव। 'शिव' शब्दाचा अर्थ परशिव। आहे म्हणजेच 'अय'। 'मी शिव आहे' हा मंत्रार्थ॥२६१॥ हा मंत्रार्थ जाणून नीट। मगच करावा मंत्रपाठ। तत्काळ फलद्रूप होई श्रेष्ठ। असा हा मंत्र पंचाक्षरी॥२६२॥ असे समग्र अष्टावरण। निरूपिले उभयतांलागून। ते मनी मुरवून आचरण। प्रमादरहित करावे'॥२६३॥ जगद्गुरूंची वाणी ऐकता। मनी दरवळली प्रसन्नता। उषा म्हणे 'ठरलो आता। आम्ही पूर्ण भाग्यवंत॥२६४॥ कोण्या जन्मी पुण्य केले। वाटे तेच आज फळले। जगद्गुरूंनी स्वये बोधिले। पांग फिटले जन्माचे॥२६५॥ मनी स्मरून आपुले चरण। करू शुद्ध वीरशैवाचरण। मुक्त होणे गुरुऋणातून। शक्य नसे जन्मोजन्मी॥२६६॥ मनात एक इच्छा उदेली। ती निवेदिते तुम्हाजवळी। एक सुंदर या रम्य

स्थळी। भव्य मठ बांधावा॥२६७॥ गुरुचरणाची किंचित् सेवा। घडून आनंद होईल जिवा। देऊन अनुमती आज करावा। आम्हांवरी अनुग्रह'॥२६८॥ उषामुखीचे ऐकून शब्द। जगद्गुरूंस झाला आनंद। म्हणती 'तुज परमपद। लाभेल सत्कार्याने ह्या'॥२६९॥ मग आणून कारागीर। उषेने बांधविला मठ सुंदर। तेणे 'उषामठ' अशी सर्वदूर। प्रसिद्धी झाली मठाची॥२७०॥ जपतपाचरण करीत सकल। उषेने पतीसह कंठिला काळ। अशी उखीमठाची समूळ। कथा श्रोतिया निवेदिली॥२७१॥ कलियुगी केदारपीठाधिपती। होते एकोरामाराध्य शिवमूर्ती। ते भ्रमले उत्तर आर्यावर्ती। जना बोधीत शिवाचार॥२७२॥ अंती उद्भवस्थानी गेले। रामनाथलिंगी लीन झाले। परि पीठ पुढती राहिले। अखंडपणे गाजते॥२७३॥ केदारपीठपरंपरेत। होऊनि जगद्गुरू गेले ख्यात। तपस्वी योगसिद्ध महंत। असे तीनशे तेवीस॥२७४॥ तीनशे चोविसावे आचार्य। जगद्गुरू श्रीभीमाशंकरलिंग शिवाचार्य। त्यांचे लोकप्रबोधनकार्य। चालू आहे अद्यापि॥२७५॥ जनमेजय परीक्षितसुत। असता हस्तिनापुरी राज्य करीत। त्याची भक्ती होती बहुत। श्रीकेदारपीठावरी॥२७६॥ जगद्गुरू आनंदलिंग शिवाचार्य। होते केदारपीठावर आचार्य। तेव्हा राजा जनमेजये। लिहून दिला ताम्रपट॥२७७॥ मंदाकिनी, क्षीरगंगा, सरस्वती। या सरितांच्या मध्यावरती। केदारक्षेत्र नामक

होती। भूमी अति विशाल॥२७८॥ ती जनमेजये केली दान। दिले ताम्रपटावर लिहून। केदारेश्वर पूजादी कार्य जाण। उत्पन्नातून करावया॥२७९॥ एकोननव्वद युधिष्ठिर शकवर्षी। प्लवंग संवत्सर मार्गशीर्ष मासी। सूर्यग्रहणपर्वी अमावस्या दिवशी। दिले जनमेजये दान हे॥२८०॥ या ताम्रशासनामुळे। केदारपीठाचे प्राचीनत्व कळे। आचार्य परंपरेचे आगळे। ध्यानी येई माहात्म्य॥२८१॥ चोळदेशीचे भुकुंडलिंग। त्यांच्यानंतर गणेशलिंग। अशी चालत आली अभंग। केदारपीठ परंपरा॥२८२॥ टेहरी राजकुलाची अनन्य। या पीठावरी निष्ठा पूर्ण। 'रावल' हे बिरूद जाण। राजे देती जगद्गुरूंना॥२८३॥ गावे एकशे त्रेचाळीस। त्यांचे उत्पन्न होते पीठास। कालीमठ गौरीकुंडादी क्षेत्रे बावीस। होती आधिपत्याखाली॥२८४॥ एक सहस्र गावांवर। होता पीठाचा अधिकार। आंग्ल शासकांनी नंतर। ठेविली एकशे त्रेचाळीस॥२८५॥ स्वतंत्र भारत होता गेली। तीही भारत शासनाखाली। आता केवळ चार उरली। क्षेत्रे पीठाआधीन॥२८६॥ गुप्तकाशी, केदारनाथ। मध्यमहेश्वर, उखीमठ। यांचा क्षेत्राधिकार फक्त। आता केदारपीठाकडे॥२८७॥ दाक्षिणात्य जंगम लोक। केदारपीठात असती पूजक। दक्षिणेकडील कोणी एक। विराजे आचार्यपदावरी॥२८८॥ तीनशे एकोणिसावे पीठाधिपती। होते श्रीविश्वलिंग शिवाचार्य यती। त्यांच्या काळी पीठावरती।

ऋण बहुत जहाले॥२८९॥ पीठास करावे ऋणमुक्त। यास्तव भ्रमले गावागावांत। स्थिरावली उज्जयिनीपीठात। जीवनयात्रा अचानक॥२९०॥ तीनशे विसावे पीठाचार्य। श्रीनीलकंठलिंग शिवाचार्य। त्यांनी ऋणमुक्त करूनि कार्य। केले बहुतापरीचे॥२९१॥ होसपेठ, बळ्ळारी प्रांतांत। स्थापिली पाठशाळा संस्कृत। 'पंचाचार्यप्रभा' पत्रिकेप्रत। दिला आर्थिक आशीर्वाद॥२९२॥ 'बळ्ळारी वीरशैव विद्यावर्धक। संघ' स्थापन केला एक। तोच विस्तारूनि झाला सुरेख। आज त्याचा वटवृक्ष॥२९३॥ स्थापिले उत्तराखंड विद्यापीठ। शिकविती आयुर्वेद, हिंदी, संस्कृत। नीलकंठ शिवाचार्यांची मूर्ती अमृत। तेथे आहे स्थापिली॥२९४॥ पुढे चिद्‌घनलिंग गुरुवर। यांना दिला उत्तराधिकार। त्यांनी प्रांतोप्रांती करूनि संचार। केले कार्य पीठाचे॥२९५॥ परंतु अत्यल्प काळात। त्यांना लिंगैक्य झाले प्राप्त। तीनशे एकविसावे 'रावल' नियुक्त। झाले विश्वनाथलिंग॥२९६॥ एकवीस वर्षे निरंतर। ते रावलपदीच राहिले स्थिर। नाही मिळाला पीठाधिकार। नंतर झाले लिंगैक्य॥२९७॥ तीनशे बाविसावे पीठाचार्य। झाले श्रीशांतलिंग शिवाचार्य। चौदा वर्षे पीठसंवर्धनकार्य। करूनि झाले लिंगैक्य॥२९८॥ पुढती पाच वर्षेपर्यंत। केदारपीठ राहिले रिक्त। श्रीसिद्धेश्वरलिंग शिवाचार्यांप्रत। मिळाला पीठाधिकार॥२९९॥ पीठाचार्य तीनशे तेविसावे। होऊनि केली पीठकार्ये। सतरा वर्षे

गावोगावे। अखंड केला संचार॥३००॥ पुढे प्रकृती झाली अस्थिर। तेणे सोपविला पीठाधिकार। श्रीभीमाशंकरलिंग यांच्यावर। जगद्गुरुपदी विराजले॥३०१॥ विद्यमान तीनशे चोविसावे। हेच जगद्गुरू असती नवे। षडक्षर शिवाचार्य या नावे। होते शिराढोण मठावरी॥३०२॥ नांदेड नगरीत दशमुखाश्रम। त्यांनी एक स्थापिला उत्तम। शक्तिविशिष्टाद्वैताचे अध्ययन। करूनि झाले 'आचार्य'॥३०३॥ केली पूजा-अनुष्ठाने। हिंदी मराठी आशीर्वचने। पंचाचार्यांच्या साक्षीने। पीठाधिकार स्वीकारिला॥३०४॥ संघटनशक्ती क्रियाशीलता। दूरदर्शित्व परिश्रमशीलता। यांमुळे उखीमठाचा पुरता। झाला कायापालट॥३०५॥ कंथा नीलवर्ण पवित्र। वेणुदंड, भृंगिगोत्र। लोहकमंडलू, लंबनसूत्र। बीजमंत्र 'शि'कार॥३०६॥ असे केदारपीठ प्रख्यात। त्याची परंपरा व्हावी ज्ञात। म्हणून येथे केला संक्षिप्त। कथनाचा प्रयास हा॥३०७॥ श्रीकाशीज्ञानसिंहासनाधीश्वर। जगद्गुरू महास्वामी श्रीचंद्रशेखर। त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर। रचितो शेषनारायण॥३०८॥ श्रीजगद्गुरू पंचाचार्य विजय रसाळ। परिसोत भाविक भक्त प्रेमळ। शिवभक्त मने व्हावी प्रफुल्ल। सप्तमोऽध्याय गोड हा॥३०९॥

॥ श्रीजगद्गुरु पंचाचार्यार्पणमस्तु॥

# अध्याय आठवा

## श्रीशैलपीठ, सूर्यसिंहासन (पूर्वार्ध)

मंगलाचरण (ओवी १-६), श्रीमल्लिकार्जुनलिंग : प्रकटनकथा (७-५०), श्रीपर्वतावरील तीर्थस्थाने (५१-५४), भ्रमरांबा कथा (५५-६७), श्रीशैलाचे माहात्म्य व इतिहास (६८-७३), श्रीशैलपीठ (७४-७८), ज० धेनुकर्णांचे लिंगावतरण, भक्तांशी संवाद, पीठारोहण (७९-१०२), सूत्रबोधाचा निश्चय, म० सानंदांच्या आश्रमात आगमन (१०३-१०६), ज० धेनुकर्ण-म० सानंद संवाद (१०७-१२१), मुक्तागुच्छसूत्रोपदेश (१२२-१७१), म० सानंदाची धन्यता (१७२-१७६), उपसंहार (१७७-१८३)

# अध्याय आठवा

॥ श्रीगणेशाय नमः॥ श्रीजगद्गुरु धेनुकर्णाचार्याय नमः॥

आता नमू शिवा गणनाथा। प्रजापते त्रिमूर्ते शाश्वता। पाशविमोचका अनंता। परा हरा अव्यग्रा ॥१॥ देवा तुझ्या प्रकाशामुळे। अवघे ब्रह्मांडचि उजळे। परिभ्रमे हले डोले। प्रेरणेने तुझ्याच॥२॥ दिसत कोणाशीच नाही। पण तुझ्याविण चालेना काही। वारे सरिता वाहती सर्वही। तुझीच शक्ती घेऊनी ॥३॥ नाकारिले तुलाच जर। विश्व निष्प्राण कलेवर। बुद्धिवंतास कळे आधार। तुझाच आहे विश्वाला॥४॥ म्हणूनि तुला मायबापा। शरण आलो करी कृपा। आणि माझा मार्ग सोपा। करावा ग्रंथरचनेचा॥५॥ तुझा म्हणवितो पोसणा। तोच जगी खरा शहाणा। येर बुद्धिभ्रमे नाना। संसारविषयी अडकती॥६॥ आता श्रीशैलपीठाची कथा। निवेदीन श्रोतिया बुद्धिमंता। जेथे मल्लिकार्जुन जगत्पिता। वसे भक्ता उद्धराया॥७॥ कथा वर्णिल्या स्थलपुराणी। त्याच सांगेन संक्षिप्त करूनी। दक्षिण कैलास अशी भुवनी। कीर्ती गाजे क्षेत्राची॥८॥ द्वादश ज्योतिर्लिंगांत एक। मल्लिकार्जुन लिंग सुरेख। 'पर्वतमल्लय्या' नामे लोक। संबोधिती बाहती॥९॥ लिंगाचे मल्लिकार्जुन अभिधान।

त्याचे करावया स्पष्टीकरण। लोकप्रतिभेतून निर्माण। काही कथा जहाल्या॥१०॥ त्या आधी सांगून पुढे। श्रीशैलपीठाचे गाईन पवाडे। श्रोतियांनी कथेकडे। दिले पाहिजे अवधान॥११॥ शिवपार्वतीचे नंदन। एक तुंदिल तनू गजानन। दुसरा जहाला कृत्तिकांपासून। षडानन कार्तिकेय॥१२॥ दोघे येताच वयात। स्त्रीप्रीती उद्भवली मनात। वाटे आता विवाह निश्चित। आपुला झाला पाहिजे॥१३॥ मातापित्यापुढती जाऊन। म्हणती आम्ही झालो तरुण। आता आमुचा द्यावा करून। विवाह सुंदर स्त्रियांशी॥१४॥ गणपती म्हणे 'माझा प्रथम। विवाह करणे राहील उत्तम'। क्षणी षडानन सावध होऊन। म्हणे 'मी ज्येष्ठ सुत आहे॥१५॥ ज्येष्ठ सुताचा पहिला मान। चालत आली रूढी महान। म्हणूनि आधी माझेच लग्न। द्यावे करूनि सत्वर'॥१६॥ गणपती म्हणे 'याचा कराल। आधी विवाह, तरी मी स्थूल। कोण सुंदरी मजला वरील?। आधी माझा करावा'॥१७॥ 'आधी माझे, माझे आधी'। अशी चालली वादावादी। कलह पाहूनि करिती संधी। शिव पार्वती दोघांत॥१८॥ शिव म्हणती 'पृथ्वीभोवती। एक प्रदक्षिणा करूनि पुरती। जो प्रथम येईल मागुती। त्याचा आधी विवाह'॥१९॥ कार्तिक स्वामी अति चपळ। धावू लागे न दवडता काळ। गजाननाचा देह स्थूल। तो बसून तेथे राहिला॥२०॥ मनी विचार करी गणपती। आपण वेगे धावलो किती। तरी कार्तिकियास

निश्चिती। मागे टाकणे अशक्य॥२१॥ परि बुद्धी त्याची प्रखर। शिवपार्वतीस बसविले समोर। त्यांना पुजूनि भोवती फेर। सात वेळा घातला॥२२॥ पुजून वंदून मातापिता। त्यांना प्रदक्षिणा घालिता। पृथ्वीप्रदक्षिणेचे पुण्य हाता। येते शास्त्रवचन हे॥२३॥ या शास्त्रवचनाप्रमाणे। पृथ्वीपरिक्रमा केली गजानने। म्हणूनि शंकरपार्वतीने। त्याचा योजिला विवाह॥२४॥ सिद्धी, बुद्धी सुंदर कामिनी। गजाननाच्या झाल्या पत्नी। क्षेम आणि लाभ दोन्ही। पुत्ररत्ने लाभली॥२५॥ कार्तिके अनेक वर्षे धावून। पृथ्वीपरिक्रमा केली पूर्ण। शिवपार्वतीपुढती येऊन। हर्षे उभा राहिला॥२६॥ तेव्हा गजाननाची करणी। त्याच्या समग्र आली ध्यानी। मग रुसूनि गेला वनी। क्रौंचपर्वती राहिला॥२७॥ त्याचा शांत कराया क्रोध। मायबापे धाडिला नारद। त्यांचेही अव्हेरूनि शब्द। नाही आला परतूनी॥२८॥ परि आईचे हृदय कोमल। रुसूनि गेला आपुला बाळ। त्यास भेटावया उतावीळ। झाली वत्सलभावनेने॥२९॥ शिवास सवे घेऊनि पर्वती। गेली कोमलहृदयी पार्वती। ते येताच जाऊनि पुढती। बसला तीन योजने॥३०॥ तेथेच क्रौंचपर्वतावर। शिव लिंगरूपे झाले स्थिर। मल्लिकार्जुन नामे सर्वदूर। जगी प्रसिद्धी पावले॥३१॥ शिलाद मुनीचा पुत्र पर्वत। शिवदर्शनास झाला उत्कंठित। त्याने तपाचरण केले अद्भुत। बसूनि क्रौंचपर्वती॥३२॥ असा बहुत लोटला काळ। संतुष्ट झाला

जाश्वनीळ। प्रसन्न होऊन म्हणे 'मनातील। सांग हेतू काय तुझा?'॥३३॥ कर जोडूनि म्हणे पर्वत। 'देवा चरणी जडले चित्त। मजला नित्य लिंगरूपात। दर्शन द्यावे इथेच'॥३४॥ 'तथास्तु' बोलून उमारमण। लिंगरूपात देई दर्शन। म्हणूनि त्याचे अभिधान। 'पर्वतमल्लय्या' जहाले॥३५॥ एकदा महारथी अर्जुन। श्रीपर्वतावर राहिला येऊन। मल्लिकापुष्पांनी शिवार्चन। केले भक्तिभावाने॥३६॥ मल्लिका म्हणजे जाईजुई। त्या पुष्पांनी तो पूजे प्रत्यही। शिवे प्रकटून त्याच्यावरही। अपार कृपा वर्षिली॥३७॥ ज्या भक्ताने केले अर्चन। त्याचे नाव व्हावे चिरंतन। अर्पिली जी फुले वेचून। तीही व्हावी अमर॥३८॥ म्हणूनि मल्लिका आणि अर्जुन। ही दोन्ही नावे करूनि धारण। प्रसिद्ध झाले 'मल्लिकार्जुन'। नामे शिव पृथ्वीवरी॥३९॥ मल्लिकार्जुनाच्या नामकथा। अशा मोहविती भक्तचित्ता। लोकस्मृतीने जपूनि सर्वथा। केल्या त्याही चिरंतन॥४०॥ अशीच आणखी लोककहाणी। स्थानपोथीत वर्णिली देखणी। चंद्रगुप्त राजाची राजधानी। होती पर्वतासमीप॥४१॥ त्याची कन्या चंद्रावती। रूपगर्विता लावण्यवती। पित्याने नरसंहार अती। केला म्हणूनि क्षोभली॥४२॥ राजवैभव सर्व त्यागून। पर्वतराजास गेली शरण। दुग्ध कंदमुळे भक्षून। तेथे विचरे सर्वदा॥४३॥ तिने पाळिली कपिला गाय। तिच्या मागे वनात जाय। गोदुग्धावर पोसला देह। प्रीती करी अपार॥४४॥ गाईचे

त्या करूनि दोहन। कोणी दूध पिते चोरून। या शंकेने पाळत ठेवून। काही काळ राहिली॥४५॥ संयोगवशे अंधारात। दिसता कोणी तिला दोहत। क्रोधे मारण्या गेली धावत। परि न कोणी सापडला॥४६॥ पाहू लागली न्याहाळून। तव लिंग दिसले तेजोघन। पाहताच ते आनंदून। गेली अपार मनात॥४७॥ मनी म्हणे हे दुजे कोणी। नसे, प्रत्यक्ष त्रिशूलपाणि। दूध कपिलेचे प्राशूनी। कृपापाखर घालितो॥४८॥ मग मल्लिकापुष्पेकरून। मनोभावे केले लिंगार्चन। त्यावर मंदिर केले निर्माण। अतिसुंदर देखणे॥४९॥ तेव्हापासून मल्लिकार्जुन नावे। ज्योतिर्लिंग प्रसिद्धी पावे। अशा प्रकटनकथा भक्तिभावे। सांगती मल्लिकार्जुनाच्या॥५०॥ मल्लिकार्जुनाच्या संगती। भ्रमरांबा रूपे वसे शक्ती। अष्टादश शक्तिपीठांत गणती। करिती या पीठाची॥५१॥ श्रीशैलम् आणि श्रीपर्वत। या नावे हे क्षेत्र विख्यात। अटकेश्वर-शिखरेश्वरादी स्थित। येथे अनेक दैवते॥५२॥ पंचधारा, पल्लधारा तीर्थ। पाताळगंगा वाहे पुनीत। गणपती भीमनकोळ्ळादी येथ। पूजनीय स्थाने पवित्र॥५३॥ शीलवंत-घंटाकर्ण मठ। सारंग-विभूति-रुद्राक्षमठ। नंदी-पट्टसिद्ध-चंद्रगुंड-कमरीमठ। आदी असती दर्शनीय॥५४॥ भ्रमरांबेच्या कथा अनेक। भक्त सांगती श्रद्धापूर्वक। अरुणासुर नामे एक। असुरे केली तपश्चर्या॥५५॥ ब्रह्मदेव होता प्रसन्न। असुरे मागितले वरदान। ‘मला न यावे कधी मरण।

शस्त्र अथवा अस्त्राने॥५६॥ स्त्री पुरुष आदी प्राणी। द्विपाद अथवा चतुष्पाद कोणी। माझा मृत्यू त्यांच्या हातूनी। होऊ नये कदापि'॥५७॥ 'तथास्तु' म्हणूनि ब्रह्मदेवे। वर देताच असुरा फावे। त्याने मृत्युतांडव नवे। भयकारी मांडिले॥५८॥ नर पशू जीवयोनी। पडे तयाच्या भक्ष्यस्थानी। मला न वधीच आता कोणी। म्हणूनि झाला उन्मत्त॥५९॥ असा वर्तला हाहाकार। ऋषिमुनींस पडला घोर। असुराचा ह्या हिंसाचार। कसा आता थांबावा?॥६०॥ मग शंकरा गेले शरण। भावे प्रार्थिला उमारमण। त्यांचे जाणूनि दु:ख दारुण। अंबा वधा प्रवर्तली॥६१॥ अरुणासुराशी युद्ध करिता। तो हटेचिना मागुता। नऊ दिवसपर्यंत पुरता। घोर जहाला संघर्ष॥६२॥ ध्यानी घेऊनि त्याचा वर। भ्रामरी शक्ती निर्मिली अपार। कोट्यनुकोटी जन्मले भ्रमर। गेले चालून असुरावरी॥६३॥ येता प्रचंड भ्रमरसेना। राक्षससेनेची उडाली दैना। जीवभयाने पळाले नाना। वाटांनी ते राक्षस॥६४॥ भ्रमररूपाने देवी दणकट। येऊनि चिरला असुरकंठ। निष्प्राण होऊन पडला विराट। असुर निश्चेष्ट भूमीवरी॥६५॥ असुराचा होता अंत। आनंदले प्राणिजग समस्त। मग भ्रमरांबा नामे स्थित। अंबा झाली त्याठायी॥६६॥ अशी शक्तिरूपिणी जगदंबा। श्रीपर्वती झाली भ्रमरांबा। भयकारी रूपाची शोभा। दाखवीत जगाला॥६७॥ जो पाताळगंगेत करी स्नान। त्याला अश्वमेध केल्याचे पुण्य। जो

करी श्रीशैलशिखर दर्शन। त्यास लाभे सायुज्यमुक्ती॥६८॥ 'काश्यां मरणान्मुक्तिः'। हे वचन प्रसिद्ध असे जगती। परि सहज लाभे सायुज्यमुक्ती। श्रीशैलशिखरदर्शने॥६९॥ मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंगासमोर। नम्र झाली राजकुले समग्र। दर्शना आले राय हरिहर। सम्राट विजयनगरचे॥७०॥ सुवर्ण शिखरासहित एक। मंडप बांधिला सुरेख। साडे चार शतकांआधी देख। कार्य झाले संपन्न॥७१॥ मराठी साम्राज्याचे अधिपती। श्रीशिवाजीराजे छत्रपती। त्यांनी उत्तर गोपूरनिर्मिती। करूनि बांधली धर्मशाळा॥७२॥ प्रज्ञापुरुष आद्य शंकराचार्य। आले मल्लिकार्जुन दर्शनास्तव। दर्शन घेताच स्फुरले काव्य। तेच 'शिवानंदलहरी' असे॥७३॥ याच श्रीशैलक्षेत्री विख्यात। आहे वीरशैवांचे धर्मपीठ। सूर्यसिंहासन, श्रीशैलपीठ। नावे ज्ञात जगामध्ये॥७४॥ मल्लिकार्जुन लिंगातून। धेनुकर्णांनी अवतरून। युगायुगांत केले प्रबोधन। वीरशैव तत्त्वांचे॥७५॥ कृतयुगात चतुरक्षर। त्रेतायुगात चतुर्वक्त्र। द्वापरी धेनुकर्ण शिवाचार्यवर। पंडिताराध्य कलियुगी॥७६॥ अशी नावे धारण केली। शिवभक्ती वृद्धिंगत केली। दाक्षिणात्य जनांस दिधली। लिंगदीक्षा सर्वत्र॥७७॥ धेनुकर्ण शाखा, वृषभगोत्र। न्यग्रोधदंड, मुक्तागुच्छसूत्र। श्वेत ध्वज-कंथा पवित्र। बीजमंत्र 'वा'कार॥७८॥ द्वापरयुगात प्रात:काळी। सुधाकुंडक्षेत्री मल्लय्या राऊळी। दर्शन घेऊनि भक्तमंडळी। करू लागली जयघोष॥७९॥

जय जय शिवा उमारमणा। सद्भक्तवरदा कामदहना। शिवशंकरा पंचानना। त्रिमलदहना आशुतोषा॥८०॥ विश्वव्यापका अपरिमिता। अहंकारदमना शिवा अनंता। भूताधिपते अमूर्तामूर्ता। परमानंदा परब्रह्मा॥८१॥ भवभयहरणा भाललोचना। भस्मोद्धूलिता भुजगभूषणा। पशुपते पाशनिखंदना। ब्रह्मानंदा सदाशिवा॥८२॥ आपुल्या कृपेची सदैव पाखर। घालिशी आम्हा शिवभक्तांवर। मानव दानव नर सुरवर। तुझ्या चरणी नत सदा॥८३॥ आमुचे चुकले कुठे पाऊल। अथवा जहाली दिशाभूल। तरी देवा सावर तत्काळ। कृपा करून आम्हांवरी॥८४॥ असे भक्त करिती स्तुती। हर्षे नाचती टाळ्या पिटती। 'हर हर शंभो' घोष करिती। होऊनि भक्तिविभोर॥८५॥ क्षणात तेथे घडले अघटित। लिंगी दाटले तेज अद्भुत। कडकडून विद्युल्लताच तेथ। जणू झाली अवतीर्ण॥८६॥ प्रकाशध्वनीच्या कल्लोळे। कर्ण बधिरले दीपले डोळे। काय घडले तेच नकळे। क्षणभर सर्व भक्तांना॥८७॥ हळूहळू प्रकाश मंदावला। ध्वनिकल्लोळही विरून गेला। तेज:पुंज शिवगणाला। उभे पाहिले सामोरी॥८८॥ भस्मभूषित गौर कांती। वदनी फाकली चंद्रदीप्ती। शुभ्रवसन कटीभोवती। करी दंड कमंडलू॥८९॥ कंठ बाहू मनगटे दोन्ही। शोभिवंत रुद्राक्षांनी। इष्टलिंग मस्तकस्थानी। विलसे अति साजिरे॥९०॥ नयनी पाहता दिव्यमूर्ती।

विस्फारिली नेत्रपाती। धावूनि भक्त चरणी लागती। भक्तियुक्त मनाने॥९१॥ देऊनिया उच्चासन। गौरविले महाशिवगण। भक्त वंदूनि म्हणती 'कारण। सांगा स्वामी प्रकटनाचे'॥९२॥ सौम्य कटाक्ष सर्वांवरती। टाकूनि हास्यमुखे बोलती। 'धेनुकर्ण मी शिवगण धरती-। वरी आलो शिवाज्ञेने॥९३॥ द्वापरयुग झाले सुरू। मानवबुद्धी लागली फिरू। त्यांना उपदेशाया लागे गुरू। हाक अशी ही युगाची॥९४॥ युगीयुगी मल्लिकार्जुन। लिंगातून होतो अवतीर्ण। चतुरक्षर हे नाम घेऊन। कृतयुगात प्रकटलो॥९५॥ त्रेतायुगात चतुर्वक्त्र। नामे अवतरलो साचार। विचरूनि शिवतत्त्वविचार। लोकमानसी रूढविला॥९६॥ आता द्वापरयुगी धेनुकर्ण। नामे अवतरलो लिंगातून। याच श्रीशैलक्षेत्री महान। आहे आमुचे सूर्यपीठ॥९७॥ ह्या प्राचीन पीठाद्वारे। जनप्रबोधन करीन सारे। दुर्विचारांचे चंड वारे। योगबळे रोधीन॥९८॥ मानवाठायी बुद्धिबळ। तेणे अनर्थ घडती सकळ। शिवविचार प्रेरिता निर्मळ। बुद्धी शुद्ध होईल॥९९॥ अविचारापासून परावृत्त। जेव्हा होईल मानवजात। तेव्हा सर्व सुखशांतीचे येथ। नांदू लागेल साम्राज्य'॥१००॥ अशी जगद्गुरूंची वाणी। ऐकूनि धन्यता दाटली मनी। वारंवार चरण वंदूनी। भक्त करिती जयघोष॥१०१॥ भक्ता आशीर्वाद

दिले। उपरी श्रीपीठात गेले। सूर्यसिंहासन भूषविले। व्यक्तित्वाने अलौकिक॥१०२॥ शिवे बोधिले जे सूत्र। ते मुक्तागुच्छसूत्र पवित्र। कोणास उपदेशावे क्षणमात्र। विचार करिती मनात॥१०३॥ सानंदमुनींचे झाले स्मरण। ते शिवाद्वैतज्ञानसंपन्न। त्यांनी तप:सामर्थ्येकरून। जीव नारकी उद्धरिले॥१०४॥ त्यांना सूत्रबोध करिता। ते करतील प्रसार सर्वथा। तेणे नारीनरा समस्ता। आत्मलाभचि होईल॥१०५॥ असा निश्चय करूनि मनात। मनोवेगे आले आश्रमात। पाहती पर्णकुटीपुढे ध्यानस्थ। सानंद ऋषी बसलेले॥१०६॥ नेत्र मिटून करिती ध्यान। आणि अचानक आले भान। पाहती तो प्रत्यक्ष शिवगण। उभे दृष्टीसामोरी॥१०७॥ क्षणी उठून चरण वंदिले। पर्णकुटीत घेऊनि गेले। उच्चासन देऊनि गौरविले। बसले नम्र समोर॥१०८॥ म्हणती ‘आज भाग्य उदेले। शिवगण स्वये आश्रमी आले। संचित पुण्यचि माझे फळले। जन्मजन्मांतरीचे॥१०९॥ बसलो होतो लावूनि ध्यान। शिव-शक्तीचे करीत चिंतन। कसा झाला असेल उत्पन्न। ब्रह्मांडपसारा अफाट?॥११०॥ स्वेदज, उद्भिज आणि अंडज। कसे जन्मले प्राणी जारज?। रूपरसगंधाने कशी सहज। नटली सृष्टी साजिरी?॥१११॥ स्थूल सूक्ष्म हे असंख्य जीव। कसा घडला आगळा

मानव?। स्त्रीपुरुषदेहांतून अभिनव। कसे बाल्य प्रकटते?॥११२॥ जड देही नांदते चेतन। ते जाता देह अचेतन। कसे घडते याचे चिंतन। करूनि शिणली मम बुद्धी॥११३॥ चराचर जे दिसे दृष्टीस। ते सत्य असे की केवळ आभास?। मायेमागे कसा महेश। लपला तेही कळेना॥११४॥ कृपा करावी गुरुदेवा। संदेह मनीचा निवारावा। तेणे मनीचा भ्रम आघवा। जाईल माझा निरसूनी'॥११५॥ ऐकूनि सानंद ऋषींचे शब्द। हास्य मुखावर फुलले मंद। म्हणती 'सानंदा तू सबंध। शास्त्रे पूर्ण जाणसी॥११६॥ ब्रह्मांडपसारा हा विराट। असे अनादी आणि जुनाट। सागरावरी यावी लाट। तसा दिसे सामोरी॥११७॥ विश्वनिर्मिती, स्वरूप ज्यात। ते मुक्तागुच्छसूत्र पुनीत। तेच तुज बोधायाप्रत। सानंदा आलो इथवरी॥११८॥ शिवमुखीचे रहस्य गूढ। जगती पूर्ण कराया रूढ। तुझीच येथे केली निवड। तुजला बोधीन स्वये मी॥११९॥ लिंगदीक्षा तुजला देईन। उपरी सूत्रबोध करीन। ते ऐकल्यावरी निरसून। जाईल मनीचा संभ्रम'॥१२०॥ इष्टलिंगदीक्षा विधियुक्त। दिधली सानंद ऋषीप्रत। मग तेथे रंगला अद्भुत। सोहळा बोध-श्रवणाचा॥१२१॥ जगद्गुरू बोलती स्पष्ट। 'सानंदा सागर आणि लाट। रूपे दोन परि एकवट। जसे असती सर्वदा॥१२२॥ तसे विश्व आणि

शिव। दोन्ही एकरूपचि सदैव। दृष्टीपुढे जे दिसे सर्व। ते शिवरूपच सर्वथा॥१२३॥ दृश्यादृश्य विश्व समस्त। असे छत्तीस तत्त्वयुक्त। सांगेन आता तुजप्रत। तत्त्वे कोणकोणती॥१२४॥ शिव आणि शक्तीपासून। हे विराट विश्व झाले निर्माण। निमित्त आणि उपादान। कारण हेच विश्वाचे॥१२५॥ सृष्टिआधी अवस्थित। एकचि होते शिवतत्त्व। चिच्छक्ती ही अविभक्त। होती त्याच्याठायीच॥१२६॥ ज्याचा होईनाच विच्छेद। तोच अविनाभावसंबंध। जसे असती एकसंध। चंद्र आणि प्रभा ते॥१२७॥ गोडी साखरेपासून। वेगळी काढू शकेल कोण?। तसे शिव शक्ती अभिन्न। तत्त्व एक जाणावे॥१२८॥ शिव शक्ती नामभेद। तत्त्व एकचि स्वयंसिद्ध। असा अविनाभावसंबंध। असे शिव-शक्तीत॥१२९॥ सृष्टिनिर्मितीचे स्फुरण। होता शिवाठायी उत्पन्न। शक्तिसामर्थ्याने भिन्न। झाला दोन ठिकाणी॥१३०॥ एक भाग झाला 'लिंग'। दुजा भाग झाला 'अंग'। चिच्छक्तीही दोन भाग। होई त्याच्यासमान॥१३१॥ एक भाग 'कला'शक्ती। दुजा भाग 'भक्ति'शक्ती। कला राहे 'लिंगा'संगती। भक्ती राहे 'अंगा'सवे॥१३२॥ 'लिंग' म्हणजे परशिव। 'अंग' म्हणजे जगी जीव। दोघे समरसून एकजीव। होता 'लिंगांगसामरस्य'॥१३३॥ जसे स्फुल्लिंग

अग्नीचे। अथवा थेंब सागराचे। ते अग्नी आणि समुद्राचे। अंश असती पूर्णत: ॥१३४॥ तसे असंख्य जीव पूर्ण। हे शिवाचेच अंश जाण। अनादी अविद्येमुळे भिन्न। शिवापासूनि भासती॥१३५॥ जीवाच्या उपभोगासाठी। उत्पन्न झाली सकल सृष्टी। शक्तिविलासे शिवपरमेष्ठी। सृष्टिरूपे विराजला॥१३६॥ जसा कवचामधूनि कासव। बाहेर आपुले काढी अवयव। तसा शक्तिविकासे शिव। विश्वरूप जहाला॥१३७॥ शक्तिविकासे सृष्टी घडे। तिचा संकोच होता विघडे। शक्तीसहचि शिव पुढे। उभा सृष्टिरूपाने॥१३८॥ शाखा फुले पर्णसंभार। घेऊनि डोले वृक्ष समोर। तसा परशिवचि झाला साकार। सृष्टिरूप घेऊनी॥१३९॥ सानंदा हे घ्यावे ध्यानी। सृष्टी अथवा जीवयोनी। भिन्न नसेचि शिवाहूनी। असे शिवस्वरूप॥१४०॥ हे चराचर विश्व आघवे। छत्तीस तत्त्वांतच सामावे। त्याच तत्त्वांची आता नावे। तुजला निरूपीन मी॥१४१॥ त्यात पाच तत्त्वे शुद्ध। सात असती शुद्धाशुद्ध। चोवीस तत्त्वे अशुद्ध। अशी तत्त्वे छत्तीस॥१४२॥ ज्यापासूनि सर्व पावे विस्तार। आणि ज्यात विस्तारते समग्र। त्याला तत्त्व नामे चतुर। संबोधिती सानंदा॥१४३॥ पहिले शिवतत्त्व हेच मूल। त्यातूनि विस्तार पावती सकळ। अंती येता प्रलयकाळ। सामावती शिवतत्त्वात॥१४४॥ शिव,

शक्ती, सदाशिव। ईश्वर, शुद्धविद्यातत्त्व। ही पाच तत्त्वे सर्व। शुद्ध तत्त्वे जाणावी॥१४५॥ माया, कला, विद्यातत्त्व। राग, काल, नियतितत्त्व। आणि सातवे पुरुषतत्त्व। ही जाणावी शुद्धाशुद्ध॥१४६॥ अशुद्ध तत्त्वे जाण चोवीस। प्रकृती, महत्, अहंकार, मनस्। पंचेंद्रिये-पंचविषय-पंचभूतांस। जोडिता चोवीस पूर्ण होती॥१४७॥ श्रोत्रतत्त्व, त्वक्तत्त्व। चक्षुतत्त्व, जिव्हातत्त्व। आणि पाचवे घ्राणतत्त्व। ही पंच ज्ञानेंद्रिये॥१४८॥ वाक्तत्त्व, पाणितत्त्व। पादतत्त्व, पायुतत्त्व। आणि पाचवे उपस्थतत्त्व। ही पंच कर्मेंद्रिये॥१४९॥ शब्दतत्त्व, स्पर्शतत्त्व। रूपतत्त्व, रसतत्त्व। आणि पाचवे गंधतत्त्व। पंच विषय प्रसिद्ध॥१५०॥ आकाशतत्त्व, वायुतत्त्व। अग्नितत्त्व, जलतत्त्व। आणि पाचवे पृथ्वीतत्त्व। अशी पंच महाभूते॥१५१॥ अशी छत्तीस तत्त्वांची वीण। म्हणजेच हे विश्व महान। छत्तीसांत न सामावे ते जाण। नसे काहीच ब्रह्मांडी॥१५२॥ शिवापासून झाले जगत्। शिवाइतुकेच तेही सत्य। नव्हे मिथ्या, आभास, असत्य। जाण पूर्ण सानंदा॥१५३॥ झाला विश्वरूप तरीही। शिव विकारी झाला नाही। दूध विरजले त्याचे दही। होते तसे येथे नव्हे॥१५४॥ न सोडिता गुण रूप। सोने होई भूषणरूप। तसे परशिवाचे मूलरूप। कदापिही भंगेना॥१५५॥ सोने होऊनि अलंकार। नेत्रा सुख

देई अपार। तसे नटूनि चराचर-। रूपे शिव सुखवितो॥१५६॥ जसा मोतियांचा गुच्छ। वेधी रसिकांचे लक्ष। तसाच तत्त्वमुक्तागुच्छ। जाण सर्व ब्रह्मांड हे॥१५७॥ हे विशाल दरी, डोंगर। फुले घमघमती वृक्षलतांवर। वनशोभेचे वस्त्र सुंदर। वेढूनि सृष्टी नटलेली॥१५८॥ मानव, पशू, जीव सान। चराचर सृष्टीमधून। त्या शिवतत्त्वाचे स्पंदन। मंद हलके जाणवे॥१५९॥ दृष्टीत भरता शिव पूर्ण। तोच दिसतो स्थिरचरातून। अंतर्बाह्य राहे व्यापून। असाच येई अनुभव॥१६०॥ शिवाठायी विमर्शशक्ती। ती विकासता विश्वनिर्मिती। तिचा संकोच होता अंती। विलीन विश्व तिच्यात॥१६१॥ शिव-शक्तीतून विशाल। विश्वाएवढे जन्मले बाळ। असा अद्भुत मांडला खेळ। थक्क जहाले ब्रह्मज्ञ॥१६२॥ चौतीस तत्त्वरूपी मोती। जिच्यामधून जन्म घेती। जणू शिंपलीच विमर्शशक्ती। शिवाची असे सानंदा॥१६३॥ त्या तत्त्वरूपी मोत्यांचा गुच्छ। तेच सूत्र हे मुक्तागुच्छ। जगत्स्वरूपचि वर्णिले स्वच्छ। पूर्णपणे ह्या सूत्रात॥१६४॥ शिवातून झाली सृष्टी। शिवमय असे सर्व सृष्टी। शिवमुखातून वाङ्मयी सृष्टी। झाली वेदागमांची॥१६५॥ असे शिवसृष्टीच्या रहस्याचे। जे प्रतिपादन करिते साचे। मुक्तागुच्छ त्या सूत्राचे। नाम आहे सानंदा॥१६६॥ ते तुजसी पूर्ण बोधिले। तुझ्या

मनोकाशी प्रकाशले। तेणे तुझे संदेह निमाले। हे मी पूर्ण जाणतो॥१६७॥ या सूत्राचा धरेवर। करावास तू पूर्ण प्रसार। तेणे उद्धरतील नारी नर। आणि लाभेल मन:शांती॥१६८॥ शिवचि कर्ता करविता। तोचि वावरे पुढे मागुता। त्याची व्यापून आहे सत्ता। यत्र तत्र सर्वत्र॥१६९॥ असा दृढावता मनी विचार। जीवनच अवघे होते सुंदर। मग सुखदु:खादींनी अंतर। डहुळेना कदापि॥१७०॥ अपार लाभता मन:शांती। अंतरी उजळे आत्मज्योती। लिंगांगसामरस्याकडे ती। सहज जाई घेऊनी'॥१७१॥ धेनुकर्णांची वाणी ऐकून। फुलले ऋषीचे अंत:करण। पुन:पुन्हा वंदूनि चरण। म्हणे 'धन्य झालो मी॥१७२॥ छत्तीस तत्त्वांपलीकडे। जे अगोचर परतत्त्व गाढे। तेच प्रकटले दृष्टीपुढे। मुक्तागुच्छ होऊनी॥१७३॥ परशिवाचा जगद्‌विलास। नाकळेच सामान्य बुद्धीस। तेच बोधूनि केले डोळस। आज महास्वामींनी॥१७४॥ सूत्र बुद्धीत प्रकाशले। माझे संदेह सर्व निमाले। वंदूनि जगद्‌गुरूंची पाउले। खराच कृतार्थ मी झालो॥१७५॥ आज्ञेप्रमाणे करीन निश्चित। सूत्रप्रसार मी जगात'। असे बोलूनि चरणांप्रत। सानंदे पुन्हा वंदिले॥१७६॥ त्यास आशीर्वाद दिला। पूजोपचार स्वीकारिला। आणि आपुला मार्ग धरिला। धेनुकर्णांनी तेधवा॥१७७॥ मग भ्रमूनि ठायी ठायी।

शिवभक्ती प्रेरिली पाही। अंती आले गर्भगृही। मल्लिकार्जुनलिंगाच्या॥१७८॥ भक्तगणांच्या जयघोषात। लिंगी विलीन झाले क्षणात। ज्योतीमध्ये मिळावी ज्योत। तसे झाले एकरूप॥१७९॥ अशी द्वापरयुगीची कहाणी। श्रीशैलपीठाची मनोहारिणी। भाविक शिवभक्तांलागूनी। निवेदिली साक्षेपे॥१८०॥ श्रीशैलपीठाचा इतिहास। पुढील अध्यायी आहे सुरस। शांतवाया भक्तचित्तांस। तोही पूर्ण निवेदीन॥१८१॥ श्रीकाशीज्ञानसिंहासनाधीश्वर। जगद्गुरू महास्वामी श्रीचंद्रशेखर। त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर। रचितो शेषनारायण॥१८२॥ श्रीजगद्गुरू पंचाचार्य विजय रसाळ। परिसोत भाविक भक्त प्रेमळ। शिवभक्त मने व्हावी प्रफुल्ल। अष्टमोऽध्याय गोड हा॥१८३॥

॥ श्रीजगद्गुरु पंचाचार्यार्पणमस्तु॥

□□

# अध्याय नववा

## श्रीशैलपीठ, सूर्यसिंहासन (उत्तरार्ध)

मंगलाचरण (ओवी १-७), श्रीशैलपीठ : पूर्वसूत्र (८-२८), ज० सदानंद शिवाचार्य (२९-३५), भक्त पिंगळ : कुष्ठरोगहरण कथा (३६-८५), पिंगळाची धन्यता व प्रार्थना (८६-९०), पिंगळास षट्स्थलसिद्धान्तोपदेश (९१-१७१), पिंगळाचे मनोगत (१७२-१७५), श्रीशैलपीठ माहात्म्य (१७६-१८२), ज० श्रीशैलपीठाधिपती व त्यांचे कार्य (१८३-२६३), उपसंहार (२६४-२६६)

# अध्याय नववा

॥ श्रीगणेशाय नमः॥ श्रीजगद्गुरु पंडिताराध्याय नमः॥

जय जय शिवा महेश्वरा। सदाशिवा गंगाधरा। मृत्युंजया कामारी शंकरा। खंडपरशुधरा अव्यया॥१॥ तुझे करिता संकीर्तन। नाचती भक्त संतजन। वय विद्या देहभान। जाती विसरून सर्वही॥२॥ ते न मागती मुक्ती मोक्ष। त्यांचे संकीर्तनात लक्ष। भक्तिस्वादासाठी लक्ष। जन्म घ्यावया सिद्ध ते॥३॥ भजन तुझे गोड इतुके। तेथे अमृतही पडे फिके। नामामृताएवढे निके। दुजे नाही जगात॥४॥ तुझ्या नामी जे तल्लीन होती। त्यांच्या दारीच तिष्ठे मुक्ती। ते न भोळे कधी गणती। योग-तपश्चर्येला॥५॥ तुझे रूप पाहता डोळा। दाटूनि येई त्यांचा गळा। अशा भक्तांमुळेच तुला। जगी थोरवी लाभली॥६॥ ज्ञानी नव्हे मीही भक्त। मागतो तुझा वरदहस्त। कृपा करूनि चालवी ग्रंथ-। यात्रा पुढे पुढे ही॥७॥ गताध्यायीचे कथासूत्र। बोधूनि मुक्तागुच्छ सूत्र। सानंद ऋषींचे जीवन पवित्र। केले धेनुकर्णांनी॥८॥ लिंगदीक्षा देऊनि जगती। रूढ केली शिवभक्ती। मल्लिकार्जुन लिंगात अंती। झाले पूर्ण विलीन॥९॥

श्रीशैलपीठाची परंपरा। अक्षुण्ण वाहत राहे धारा। सूर्यसिंहासन भूषवूनि धरा। बोधिली किती आचार्यांनी॥१०॥ सरले द्वापरयुग पुढे। वाजले कलियुगाचे चौघडे। पुन्हा बहकूनि मानव वेडे। दुराचारा प्रवर्तले॥११॥ वीरशैव धर्म पुन:स्थापन। करावया झाले अवतरण। मल्लिकार्जुन लिंगातून। अवतरले जगद्‌गुरू॥१२॥ श्रीजगद्‌गुरू पंडिताराध्य। या नामे जहाले प्रसिद्ध। मुक्तागुच्छ सूत्रबोध। करूनि तारिले ऋषिमुनी॥१३॥ लिंगदीक्षा शिवसंस्कार। देऊनि उद्धरिले नारीनर। शिवभक्तीचा अद्‌भुत प्रसार। केला दक्षिण प्रांतात॥१४॥ मानवाठायी आत्मभाव। जागविणे सर्वथैव। हेच मानिले जीवनध्येय। तसे वर्तले निष्ठेने॥१५॥ सदाचाराच्या वाटेवरती। ज्याची पावले सदैव चालती। तोच संस्कार शिष्यांस देती। त्यांना म्हणती आचार्य॥१६॥ उताराकडे वाहे पाणी। तसाच तरल मानवप्राणी। सहज जाई स्खलित होऊनी। निषिद्ध दुराचाराकडे॥१७॥ असत्य बीभत्स बोलायला। शिकवी न कोणती पाठशाला। न शिकविताच सर्व त्याला। तसे जमते बोलणे॥१८॥ श्लोक ओवी शिकविण्यासाठी। करावी लागते आटाआटी। ते शिकताना मात्र कष्टी। होतो माणूस पुन:पुन्हा॥१९॥ सहज ओठी येते शिवी। पाठ करावी लागे ओवी। संस्काराची हीच थोरवी। गाती शास्त्रे सर्वदा॥२०॥

वानराचा करणे नर। सामर्थ्य संस्काराचे थोर। त्या नराचाही करणे ईश्वर। हे सामर्थ्य सद्गुरूचे॥२१॥ म्हणूनि दीक्षा देऊन बोधून। लागे करावे परिवर्तन। तेणेचि साधणे मानवकल्याण। होई सफल पूर्णत:॥२२॥ अंतरी जागता आत्मबळ। सुतासारखा होतो सरळ। त्याची पावले पडती निर्मळ। तेव्हा मुक्तिवाटेवरी॥२३॥ आपुल्या हृदयी वसतो शिव। नसे त्याला किंचित् जाणीव। त्याच्या अंतरी शिवभाव। जागविती आचार्य॥२४॥ द्वेष-क्रोधाचे राज्य समस्त। शिवभावाने होते ध्वस्त। समाज पूर्णत: होतो स्वस्थ। मिळे कलहास तिलांजली॥२५॥ हे सर्व घडवावयासाठी। आचार्य सांगती धर्मगोष्टी। धर्मामुळेच लोकराहाटी। निर्विघ्नपणे चालते॥२६॥ असे धर्मप्रबोधन युगीयुगी। जगद्गुरूंनी केले जगी। पंडिताराध्य भ्रमले वेगी। जना बोधीत शिवाचार॥२७॥ कार्य पूर्णत्वास गेले। तेव्हा मल्लय्या-मंदिरी गेले। लिंगी एकरूप झाले। संपविला अवतार॥२८॥ श्रीसदानंद जगद्गुरुवर। यांना मिळाला पीठाधिकार। उल्लेखिले व्यासांनी चतुर। स्कंदपुराणी श्रीशैल-खंडात॥२९॥ तस्मिन् श्रीपर्वते पुण्ये। संसारभयभेषजे। आस्ते लिंगांगसंबंधी। सदानंदाह्वयो मुनि:॥३०॥ श्रीपर्वती लिंगांगज्ञानी। वसती श्रीसदानंदमुनी। सर्व उपनिषदांचे त्यांनी। केले पूर्ण

मंथन॥३१॥ शिवध्यानात परायण। सर्वांगी विभूतिलेपन। रुद्राध्याय जपात मग्न। रुद्राक्ष-माळाभूषित॥३२॥ पाशुपत व्रताचरणी। योगी अतिवर्णाश्रमी। रत इष्टलिंगार्चनी। जीवन्मुक्त जगद्गुरू॥३३॥ भस्म-त्रिपुंड्रधारक। पंचाक्षर मंत्रजापक। असे श्रेष्ठ जगद्गुरू एक। सदानंद महास्वामी॥३४॥ स्कंदपुराणी श्रीशैलखंडात। त्यांची वर्णिली महिमा अद्भुत। तीच पुराणाधारे श्रुत। करितो सुज्ञ श्रोत्यांना॥३५॥ श्वेत नामे एक धनिक। पूर्ण शुद्धाचरणी सात्त्विक। त्याला पिंगळ नामे एक। होता पुत्र देखणा॥३६॥ गृही राबती ऋद्धिसिद्धी। खेळे सुख आणि समृद्धी। स्पर्शचि झाला नव्हता कधी। दु:ख आणि व्यथेचा॥३७॥ भार्या सुंदर सुलक्षणी। पुत्र पिंगळ गोंडस गुणी। अशी वर्षे वर्षांमागूनी। गेली हसता खेळता॥३८॥ द्वादश वर्षांचा होता कुमार। अंगी एकदा भरला ज्वर। केला वैद्याने उपचार। परि उतार पडेना॥३९॥ श्वेत होऊनि चिंताक्रांत। म्हणे लिहिले काय दैवात। कळेचना का पडला सुत। असा रुग्णशय्येवरी?॥४०॥ नशिबाला लावूनि बोल। विमनस्कपणे बडवी कपाळ। पुढे लोटता काही काळ। पडला उतार ज्वराला॥४१॥ ज्वर उतरला हळूहळू। मुखी आनंद लागला खेळू। तोच पुन्हा आला कवळू। कुष्ठरोग पुत्राला॥४२॥ सर्वांगात भरले कुष्ठ। श्वेत

जहाले वदन ओष्ठ। पुन्हा अंतरी भोगी कष्ट। श्वेत धनिक धर्मात्मा॥४३॥ म्हणे चाललो सन्मार्गाने। आचरिली तपव्रताचरणे। तृषितांसाठी मार्गामार्गाने। पाणपोया बांधल्या॥४४॥ नाही केले कधी दुरुत्तर। दुखविले नाही कोणाचे अंतर। दु:ख घेऊनि दारावर। आला त्याला सावरले॥४५॥ साधुसंता भावे पूजिले। क्षुधार्तांना भोजन दिले। विन्मुख नाही पाठविले। दारी आलेले भिक्षुक॥४६॥ संकटकाळी मारिता हाका। झालो त्याचा पाठीराखा। तरीही असा प्रसंग बाका। आला कसा मजवरी?॥४७॥ किंवा गेल्या जन्मातले। केले मजला आज भोवले?। काय झाले तेच नकळे। बोलूनि कष्टी जहाला॥४८॥ द्यावया पुत्रासी औषध। देशोदेशीहूनि आणले वैद्य। त्यांनी वनौषधी दिल्या सिद्ध। केले बहू प्रयास॥४९॥ खवळावा शांत सागर। तसा वाढू लागला विकार। श्वेतकुष्ठासवे देहभर। रक्तकुष्ठही संचरले॥५०॥ व्याधी जशी लागे वाढू। तशी बोटे लागती झडू। जीवन झाले अवघे कडू। सुख न उरले कशात॥५१॥ झाडपाले वैदू सारे। मंत्रउतारे ताईत दोरे। देवदेवतांचे अंगारे। झाले सारे करूनी॥५२॥ सर्व उपाय करूनि थकला। दैवा बोल लावूनि बसला। म्हणे एकुलता एक गेला। पुत्र हातून आपुल्या॥५३॥ सरावी रजनी काळी दाट। आणि फुटावी हळू

पहाट। तसा उगवला सुदिन सुभट। एक त्याच्या जीवनी॥५४॥ हरिप्रिय नामे भक्त भला। श्वेत धनिकासी भेटला। म्हणे 'पुत्रासी घेऊनि चला। श्रीशैलपर्वतावरी॥५५॥ तेथे श्रीशैलपीठी सिद्ध। वसती जगद्गुरू सदानंद। परम कारुणिक ज्ञानवृद्ध। महातपस्वी समर्थ॥५६॥ त्यांच्या पादोदक-प्रसादात। शक्ती वसते अत्यद्भुत। महाव्याधींपासूनि मुक्त। झाले भक्त असंख्य'॥५७॥ जन्मांधास मिळाले डोळे। तृषितापुढे झरा झुळझुळे। की भुकेने मरता आले। ताट पंचपक्वान्नाचे॥५८॥ तसे वाटले श्वेता सहज। निष्प्राण नेत्री आले तेज। म्हणे 'चला लगेच आज। करू प्रस्थान पीठाकडे'॥५९॥ सवे घेऊनि विकल सुत। श्रीशैलपीठास आला श्वेत। साष्टांग घातले दंडवत। दु:ख सांगे रडूनी॥६०॥ म्हणे 'महाराजा पुत्र झाला। वाटले स्वर्गच गृही आला। बाल्य पाहता कधी सरला। काळ तेही कळेना॥६१॥ नेत्री दाटला अपार मोद। फुलासारखा जपला अलगद। द्वादश वर्षांउपरी दु:खद। पाऊल वाजे व्यथेचे॥६२॥ ज्याचे पाहिले गोंडस रूप। तोच आता झाला विरूप। उपाय केले किती अमूप। सर्व व्यर्थ जहाले॥६३॥ आणून ठेविले चरणांपुढे। तरी थांबेना माझे रडे। बाप म्हणून तुटे आतडे। दु:ख पाहून सुताचे॥६४॥ आता तारा किंवा मारा। आपुल्या चरणाचाच निवारा'। बोलता

बोलता अश्रुधारा। नेत्री दाटून वाहती॥६५॥ शांत बोलती सदानंद। ‘श्वेता आता होई सावध। अवघा संसारचि दु:खद। असे शास्त्र सांगते॥६६॥ वेढूनि सुखाचे वस्त्र सुंदर। दु:खच तिष्ठे दारासमोर। म्हणून सारासारविचार। करावा लागे माणसाला॥६७॥ आज ज्यात दिसते सुख। तेच टोचते होऊनि दु:ख। हेच निश्चित आहे सुख। शक्य नव्हे सांगणे॥६८॥ एक पुत्रासाठी रडे। दुसरा पुत्रामुळे तडफडे। पुत्र नसला असला तरी रडे। नशिबी आहे भोगणे॥६९॥ तुझा देखणा पुत्र पिंगळ। महाव्याधीने झाला विकल। प्रारब्धाचे फळ हे केवळ। दुजे कारण दिसेना॥७०॥ सर्व देवांचाही देव। येथे वसतो मल्लय्या शिव। त्याचे मनोभावे आर्जव। करशील तर तरशील तू॥७१॥ अपराध जरी केला काही। पडावे लागेच कारागृही। परि राजाज्ञा प्रबळ पाही। सोडवू शकते तेथूनी॥७२॥ जन्ममरण महाव्याधी। निवारिते जी महौषधी। तीच येथे कृपानिधी। तिष्ठे मल्लय्या नामाने॥७३॥ गुरुप्रसाद-पादोदकांत। सामर्थ्य भरले आहे अद्‌भुत। ते नित्य सेविता मुक्त। होती आधिव्याधीतूनी॥७४॥ श्रीपर्वती दाटले अपार। वनौषधींचे प्रखर भांडार। त्यायोगेही होईल सत्वर। व्याधिमुक्त सुत तुझा॥७५॥ शिवकरुणा, पादोदक-प्रसाद। श्रीपर्वतीचे सेविता औषध। मुक्त

होईल पुत्र दु:खद। मरणप्राय व्याधीतूनी' ।।७६।। जगद्गुरूंची ऐकूनि वाणी। आशाकिरणे जागली नयनी। वारंवार लागे चरणी। शोकविव्हल पिता तो।।७७।। उपरी लिंगदीक्षा घेऊन। पीठात राहिले दोघेजण। नित्य मल्लिकार्जुनाचे अर्चन। करिती भक्तिभावाने।।७८।। गुरुचरणाचे पवित्र उदक। गुरुप्रसाद व्याधिमोचक। नित्य सेविती श्रद्धापूर्वक। आणि वनौषधीही।।७९।। क्षणाक्षणाने भ्रमत भ्रमत। सूर्य चढतो आकाशात। तशी त्यांची वृद्धिंगत। भक्ती होऊ लागली।।८०।। जगद्गुरूंची कृपा अपार। मनी अनुभविती वारंवार। हळूहळू पडू लागला उतार। महाव्याधीस पिंगळाच्या।।८१।। झडून काजळी वाढे दीप्ती। तशी तेजस्वी झाली कांती। पूर्वस्थितीत अंगे येती। आनंदती उभयता।।८२।। मनी म्हणती नवलच घडले। सर्व उपाय होते थकले। जगद्गुरूंनी प्रेमे रक्षिले। दिधले नवे जीवन।।८३।। डोळ्यांपुढती दिसता मरण। तोच जहाले अमृतसिंचन। धन्वंतरीच आले धावून। जगद्गुरूंच्या रूपाने।।८४।। मग पिंगळे वंदिले चरण। म्हणे 'धन्य केले जीवन। जन्मजन्मांतरी हे ऋण। फिटणे नाही गुरुदेवा।।८५।। कामधेनूची ऐकिली कीर्ती। परंतु कधी पाहिली नव्हती। तुमच्या रूपे नेत्रांपुढती। झाली समूर्त संपूर्ण।।८६।। व्याधीमुळे कळले शरीर। किती अस्थिर आणि भंगुर। या शरीरापलीकडे

स्थिर। काय आहे बोधावे॥८७॥ व्याधी जरी दुःखदायक। तरी जागा करिते विवेक। देहभोगापल्याड अधिक। काही आहे हे दाखविते॥८८॥ देहातीत जे स्वयंसिद्ध। त्याचा का घ्यावा शोध। कसे साधावे, ते शब्दबद्ध। करून सांगा गुरुदेवा'॥८९॥ शिष्यास आले आत्मभान। तोषले आचार्य मनोमन। म्हणती 'एक शांत बसून। तुजला सर्व निरूपितो॥९०॥ देह केवळ वरची खोळ। हृदयी तेवते ज्योत निर्मळ। तिच्या प्रकाशात सकळ। चालती देहव्यापार॥९१॥ राहूनि देहामध्ये स्थिर। देहाद्वारे करी व्यवहार। देहकर्मांचा जो साक्षीदार। त्याला म्हणती जीवात्मा॥९२॥ तो जोवरी असे देहात। तोवरी देह राहे जिवंत। तो देहाबाहेर जाता मृत। लोक म्हणती देहाला॥९३॥ देह आणि मनाद्वारे। शुभ अशुभ कर्म आचरे। पापपुण्याचे बांधूनि भारे। घेऊनि हिंडे जन्मोजन्मी॥९४॥ संचित प्रारब्ध क्रियमाण। हे कर्माचे प्रकार तीन। जे साठले जन्मजन्मांतून। त्याला म्हणती संचित॥९५॥ भाग जितुका संचितातला। भोगण्यासाठी पक्व झाला। जन्म मिळतो जे भोगायला। त्याला म्हणती प्रारब्ध॥९६॥ आणि जन्म घेतल्यावरी। तो करील जी कर्मे सारी। त्याला क्रियमाण असे चतुरी। नाव दिले जाणावे॥९७॥ असे कर्मचक्र फिरे। तेणे घडती जन्मफेरे। सुखदुःख भोगती

बिचारे। जीव जन्मजन्मांतरी ॥९८॥ अशी जीवाची जन्मकथा। सांगता ही सरे न गाथा। जन्म हीच खरी व्यथा। किती भोगिता सरेना ॥९९॥ कर्मभोगाचे गाठोडे। आपुली कधी न पाठ सोडे। ज्याला हे कळे तोच पडे। चक्रातूनि बाहेर ॥१००॥ जन्मभरी पुण्यकर्मे। करी शुद्ध मनोधर्मे। मग हळूहळू पाप शमे। मन होई परिशुद्ध ॥१०१॥ करिता पुण्यसंपादन। पापपिंजरा होई क्षीण। गंगोत्रीसारखे अंत:करण। होई नितळ तयाचे ॥१०२॥ नवपल्लवे रोप अंकुरे। तशी श्रद्धाभक्ती स्फुरे। भक्तस्थलात संचरे। शुद्ध पिंड जीव तो ॥१०३॥ पिंगळा सर्व शिवागमांत। प्रतिपादिला षट्स्थलसिद्धान्त। अध्यात्मप्रवास केला ग्रथित। सांगोपांग भक्ताचा ॥१०४॥ भक्तस्थल, माहेश्वरस्थल। प्रसादिस्थल, प्राणलिंगिस्थल। शरणस्थल, ऐक्यस्थल। अशी षट्स्थले ही ॥१०५॥ अंगषट्स्थल लिंगषट्स्थल। असे द्विभाग षट्स्थल। त्यांची उपस्थले मिळूनि सकल। एकोत्तरशत स्थले ॥१०६॥ जन्मफेऱ्यांचा आला शीण। तेणे उदास ज्याचे मन। असा शुद्ध जीवात्मा क्रमण। करी मार्गावरी ह्या ॥१०७॥ ज्याने पुण्य संपादिले। ज्याचे नष्ट पाप झाले। त्याचीच वळती पाउले। पिंगळा या मार्गाकडे ॥१०८॥ श्रद्धाभक्ती मनी फुले। मग भक्तस्थली डोले। त्याला जाणवे की सगळे। चाले शिवामुळे विश्व ॥१०९॥

जीवाहृदयी राहूनि महेश। होई प्रेरक सर्व कर्मांस। चंद्रकांत मण्यात वास। जसा असे जलाचा॥११०॥ सूर्याठायी वैश्वानर। धान्यबीजात वसे अंकुर। तसा वसे महेश्वर। सर्व जीवहृदयांत॥१११॥ जीव, जगत् आणि ईश्वर। असा त्रिविध रूपांत शंकर। होई एकलाच खरोखर। भोक्ता, भोज्य, प्रेरक॥११२॥ जीव शिवांशचि मुळात। धरिली अविद्येची संगत। तेणे जीवभावे सतत। भ्रमती जन्मजन्मांतरी॥११३॥ शिवज्ञानहीन होऊनी। भोगिती चौऱ्यांशी लक्ष योनी। देव मानव पक्षी प्राणी। घेती जन्म असंख्य॥११४॥ पुण्य पक्व होता पूर्ण। वर्षती शिवकृपेचे घन। मुक्ती मिळे वासनेपासून। जागे भक्ती मनात॥११५॥ थेंब जसा पद्मदलावर। तसे संसारसुख अस्थिर। जो जन्मला त्याला नंतर। मृत्यू येणे निश्चित॥११६॥ नाना रोगांनी देह जळे। राग-द्वेषांनी मानस पोळे। दु:खव्यथांनी तळमळे। छळती ग्रहप्रेते ती॥११७॥ स्वर्ग असो वा असो भूलोक। नाही नाही कोठे सुख। देह-मनामुळेच दु:ख-। भोग लागती भोगावे॥११८॥ मित्र आप्त द्रव्य वंश। क्षणिक त्यांचा होतो विनाश। अशा विवेके संसारी उदास। होतो जाण भक्त तो॥११९॥ आनंदाचा निर्झर शंकर। करितो संसारदु:ख दूर। त्या शिवाची भक्ती दृढतर। वसे त्याच्या मनात॥१२०॥ मग श्रीगुरूस

जाई शरण। दीक्षा घेऊनि करी लिंगधारण। इष्टलिंगार्चन-चिंतन। यांत रमे सर्वदा॥१२१॥ भस्मरुद्राक्षे भूषवी शरीर। त्रिपुंड्र रेखी भाळावर। मुखे सदोदित पंचाक्षर। मंत्र जपे मनोभावे॥१२२॥ पंचाक्षरी मंत्रजपामुळे। त्याचे पाप समूळ जळे। शिवावाचून अन्य सगळे। देव वर्जी निष्ठेने॥१२३॥ गुरुलिंगजंगम पादोदक। नित्य सेवितो निष्ठापूर्वक। प्रसादसेवन करूनि चोख। होई पूर्ण अंत:करण॥१२४॥ स्वकष्टाने मिळवी काही। अर्ची गुरुजंगमाठायी। निरपेक्षपणे दान देई। गुरुजंगमयोग्यांसी॥१२५॥ असा भक्तस्थलीचा भक्त। होता पक्व सहजदानात। तोच पुढे माहेश्वरस्थलात। सहज प्रवेशे पिंगळा॥१२६॥ माहेश्वरस्थली जाऊन। मुक्त होई आकांक्षेपासून। ब्रह्मादी पदांविषयी पूर्ण। होय विरक्त मानसी॥१२७॥ सर्व देवांचाही देव। केवळ एक आहे शिव। असा दृढ धरितो भाव। त्याविण देव न मानी॥१२८॥ अखंड तैलधारेसमान। मनी करी शिवचिंतन। श्रद्धाभक्ती परिवर्तून। तीच होई निष्ठाभक्ती॥१२९॥ शिवनिंदा साहेना किंचित्। निंदकाचा करी नि:पात। शिवलिंग जंगम शिवभक्त। यांना रक्षी सर्वदा॥१३०॥ लिंगपूजेविण काही। मुखी अन्न घेणे नाही। शिवदीक्षेआधीचे सर्वही। टाळी पूर्वाचरण॥१३१॥ शिव असे आपुले दैवत। आपण केवळ त्याचे

भक्त। दृढ भावना अशी मनात। सदासर्वदा वागवी॥१३२॥ इष्टलिंगाठायीच केवळ। शिव वसतो सर्वकाळ। अशी दृढ निष्ठा सबळ। त्याच्याठायी नांदते॥१३३॥ भोगता भोगता भक्तिसुख। वृत्ती होई अंतर्मुख। हृदयातच दिसे मोहक। रूप परशिवाचे॥१३४॥ पिंगळा हाच माहेश्वर। जाई प्रसादिस्थलात नंतर। प्रसन्नतेने त्याचे अंतर। जाई व्यापून पूर्णत:॥१३५॥ लिंगास अर्चन केल्याविण। मुखी घेईना अन्नकण। पदार्थ करिता लिंगार्पण। प्रसादरूप पावती॥१३६॥ भवरोगनिवारक वैद्य। शिव त्रिजगती प्रसिद्ध। त्याचा प्रसाद हेचि शुद्ध। असे दिव्य रसायन॥१३७॥ त्रिमल त्रिताप नाशूनि दोष। विद्या पूर्ण पावे विकास। खुले ज्ञानाचे द्वार नि:शेष। वाढे आरोग्य वैराग्य॥१३८॥ सांडू नये प्रसादकण। याकडे पूर्ण देई अवधान। तेणे निष्ठाभक्तीचे परिवर्तन। होई अवधानभक्तीत॥१३९॥ शिवप्रसाद सेविता भक्त। शिवचि दिसे ब्रह्मांडात। पुढे तोच प्राणलिंगिस्थलात। करी सहज प्रवेश॥१४०॥ प्राण-अपानाचे होऊनि घर्षण। नाभिस्थानी ज्योत होई उत्पन्न। तेच ज्योतिर्मय पूर्ण। असे जाण प्राणलिंग॥१४१॥ प्राणलिंगार्चनी रत। होई प्राणलिंगिस्थली भक्त। करूनि भावफुले अर्पित। पूजी प्राणलिंगासी॥१४२॥ क्षमारूपी शुद्ध

उदक। तोच प्राणलिंगास अभिषेक। नित्यानित्यविवेक चोख। वस्त्र अर्पी लिंगाला॥१४३॥ सत्यवचन अलंकार। अर्पी वैराग्यपुष्पहार। मनोवृत्ती निरहंकार। त्याच अर्पी अक्षता॥१४४॥ समाधिस्थिती हेच गंध। दृढ श्रद्धेचा धूप मंद। दिव्य दीप आत्मबोध। लावी प्राणलिंगापुढे॥१४५॥ भ्रांतिनिवृत्तीचा दाखवी नैवेद्य। मौनधारण हा घंटानाद। विषयसमर्पण हा सिद्ध। करून तांबूल अर्पी तो॥१४६॥ विषयभ्रमास पूर्ण त्यागणे। हीच जणू प्रदक्षिणा घालणे। बुद्धी लिंगाकार होणे। हाच त्याचा नमस्कार॥१४७॥ अशा भावपुष्पेकरून। करी सर्वदा प्राणलिंगार्चन। बाह्यपूजेहूनि जाण। श्रेष्ठ अंतर्लिंगपूजा॥१४८॥ बीज सुप्त अंकुरात। आणि अंकुर वसे बीजात। तसे 'अंगा'त 'लिंग' व्याप्त। 'लिंगा'त असे 'अंग' ते॥१४९॥ असा शिवजीव-ऐक्यानुभव। प्राणलिंगी घेतसे सदैव। म्हणूनि त्याच्याठायी अनुभव-। भक्ती होय सुस्थिर॥१५०॥ प्राणलिंगपूजाक्रियेत तत्पर। होता समाधीत होई स्थिर। राहे तल्लीन निरंतर। शिवयोगसमाधीत॥१५१॥ हाच प्राणलिंगिस्थली। पुढे जातो शरणस्थली। त्याची लक्षणे आता सगळी। पिंगळा तुज निरूपीन॥१५२॥ 'लिंग' हाच आपुला पती। आपण 'अंग' त्याची सती। असा सतिपतिभाव चित्ती। दृढ शरणभक्ताच्या॥१५३॥ पतिव्रता

जशी अन्य। पुरुषाचे न करीच चिंतन। तसा एका शिवावाचून। तो जाणेना कोणासी॥१५४॥ ज्याला धनाचे मिळे गाठोडे। तो कशाला काचेसाठी धडपडे?। द्रव्यहंड्यावरी बसून रडे। भिकेसाठी कोण वेडा?॥१५५॥ गंगा संथ वाहता समोर। कोण मृगजळासाठी फोडी ऊर?। तसा ज्याच्या हृदयी शंकर। तो अन्य देवा मानीना॥१५६॥ किंचित् उरला तमोगुण। तो शरणस्थलात जाई निघून। अज्ञानाची उरेना खूण। उजळे ज्ञान अंतरी॥१५७॥ षड्रिपूंनी चित्त न मळे। अहंकार ममत्व उन्मळे। जे मळले जन्म-कर्मांमुळे। ते मन होई निर्मल॥१५८॥ जे जे करी ते शिवासाठी। शिवाविण नाही ओठी पोटी। शिवानेच पूर्ण भरे दिठी। असा शरण शरणागत॥१५९॥ असा घेई आनंदानुभव। आनंदभक्तीत रमे सदैव। या शरणास पुढे ठाव। मिळे ऐक्यस्थलात॥१६०॥ शरणस्थलीचा शरणभक्त। जाता पुढे ऐक्यस्थलात। त्याची धावाधाव समस्त। जाई सरून त्या स्थली॥१६१॥ गंगा सागरात मिळे। मग सागर होऊनि खेळे। ती न पुन्हा मागे वळे। तसे घडे स्थळी या॥१६२॥ सिंधूमध्ये मिळता बिंदू। बिंदू स्वत:च होतो सिंधू। तसा समरसे जीवबिंदू। पूर्ण शिवसिंधूत॥१६३॥ किती भोगिली जन्मांतरे। किती घेतले जन्मफेरे। जपातपाचे किती भारे। वाहिले याच

क्षणासाठी॥१६४॥ जीव शिवाची होता मिळणी। सरते जन्ममृत्यूची कहाणी। वर्णाश्रम-जातीची गाऱ्हाणी। इथे सर्व मावळली॥१६५॥ दूध दोन भांड्यांतले। सर्व एका भांड्यात ओतले। ते पुन्हा करणे वेगळे। आधीसारखे शक्य नव्हे॥१६६॥ तसे शिव जीव एक होती। जन्ममरणाची थांबते गती। लिंग अंग समरस होती। हेच लिंगांगसामरस्य॥१६७॥ आता हर्ष नाही नाही खेद। दु:ख नाही नाही मोद। मावळले भेदाभेद। सर्व ऐक्यस्थलात॥१६८॥ पिंगळा अशी षट्स्थले। लंघूनि जीवा शिवत्व मिळे। हेच साधण्यासाठी आले। जीव मनुष्यजन्मांत॥१६९॥ अशी अद्भुत ज्ञानवाट। भासे अवघड आणि अफाट। गुरुकृपेने होऊनि स्पष्ट। क्रमिता येते सहज॥१७०॥ ज्याने लंघिले षट्स्थल। त्याचा जन्म झाला सफल। तुझा निमाला असेल समूळ। संभ्रम ऐकून षट्स्थले'॥१७१॥ सदानंदांची अमृतवाणी। ऐकूनि श्रवण धाले दोन्ही। हर्षभराने लागे चरणी। पिंगळ जगद्गुरूंच्या॥१७२॥ म्हणे 'खरेच धन्य जीवन। देहदु:ख हरिले दारुण। मनोव्याधीही आज संपूर्ण। दूर झाली गुरुदेवा॥१७३॥ व्याधीमुळे झाली तळमळ। धुसफुसलो मी कितीक काळ। परि तिनेच ही आनंदवेळ। माझ्या पदरी टाकली॥१७४॥ तिनेच तुमच्या चरणी आणले। आणि जीवन

सार्थक झाले। उपदेश श्रवूनि मन निवाले। ठरलो भाग्यवंत मी'॥१७५॥ पुन:पुन्हा असे बोलून। मोदे वंदी जगद्गुरूंचे चरण। सदानंदांचे हे महिमान। वर्णिले स्कंदपुराणी॥१७६॥ तीच श्रीशैल-खंडातली कथा। निवेदिली श्रोत्यांस आता। शब्दविस्तार करूनि पुरता। रंजवाया तुम्हांप्रती॥१७७॥ श्रीशैलपीठाचे आचार्यवर। असे प्रसिद्ध झाले भूवर। पीठसंवर्धनकार्य धुरंधर-। पणे केले निष्ठेने॥१७८॥ देवस्थानाच्या उत्तरद्वारी। पंचमूर्ती दंडकमंडलुधारी। पुढे बसली भक्तमंडळी सारी। असे शिल्प कोरलेले॥१७९॥ अन्य चतुराचार्य आले। पंचाचार्यांचे उत्सव झाले। त्याचेच हे शिल्प ठरले। चिरस्थायी स्मारक॥१८०॥ केदारपीठाचा घंटाकर्णमठ। उज्जयिनीपीठाचा नंदीमठ। काशीपीठाचा रुद्राक्षीमठ। सारंगमठ रंभापुरीचा॥१८१॥ हे मठ असती विद्यमान। कथिती श्रीशैलपीठाचे महिमान। चारही पीठांशी पुरातन। संबंध होता पीठाचा॥१८२॥ अनेक आचार्यनावे लुप्त। झाली काळाच्या उदरात। सत्तावीस उरली फक्त। परंपरा सांगावया॥१८३॥ आचार्य अठ्ठाविसावे प्रसिद्ध। श्रीचन्नसिद्धराम पंडिताराध्य। पीठावर शोभती अगाध। ज्ञानसंपन्न व्यक्तित्वाने॥१८४॥ जगद्गुरू सदानंदांनंतर। विराजले जंगम मल्लिकार्जुन जगद्गुरुवर। नन्ने चोळदेव हा नृपवर। होता आंध्रदेशात॥१८५॥ ख्रिस्ताब्द नऊशे चाळिसात। त्याने रचिला तेलुगू ग्रंथ। 'कुमारसंभव' नामे

तो समर्पित। केला जंगम मल्लिकार्जुनांसी॥१८६॥ जगद्गुरूंचे असाधारण। पांडित्य आणिक महिमान। त्याने वर्णिले या ग्रंथातून। पूर्ण भक्तिभावाने॥१८७॥ ख्रिस्ताब्द नऊशे ऐंशीत जन्मले। दहाशे चाळिसात शिवैक्य झाले। त्या मुदनुरी दासिमय्यांनीही पत्करले। श्रीशैलपीठाचे शिष्यत्व॥१८८॥ अनेक पीठाचार्य विद्वान। त्यांनी भूषविले सूर्यसिंहासन। तेणे श्रीशैलपीठाचे महिमान। गाजत राहिले भूलोकी॥१८९॥ पीठावरी जे आचार्य झाले। त्यात तिघे पंडित ठरले। 'पंडितत्रय' बिरुदे गौरविले। सर्व आंध्रजनांनी॥१९०॥ जगद्गुरू श्रीपती पंडिताराध्य। जगद्गुरू मंचण पंडिताराध्य। जगद्गुरू मल्लिकार्जुन पंडिताराध्य। यांचे प्रसिद्ध पांडित्य॥१९१॥ या पंडितत्रयीत पहिले। श्रीपती पंडिताराध्य ठरले। त्यांनी ब्रह्मसूत्रावर रचिले। 'श्रीकरभाष्य' संस्कृत॥१९२॥ बादरायणकृत ब्रह्मसूत्रावर। भाष्य हे वीरशैवसिद्धान्तपर। गुणवैशिष्ट्यांनी वेधी समग्र । हृदये संस्कृतज्ञांची॥१९३॥ अग्निस्तंभन सिद्धी प्राप्त। होती श्रीपती पंडितांप्रत। ठेविला होता रेशीमवस्त्रात। अग्नी त्यांनी बांधूनी॥१९४॥ विजयवाडा मल्लेश्वर देवस्थान। तेथे शमीवृक्षास ठेविला टांगून। ही घटना शिलालेखातून। कोरविली पल्लकेत नृपाने॥१९५॥ श्रीबसवेश्वरांनी बिज्जल राजाप्रत। ऐकविले श्रीपती पंडितांचे हे सामर्थ्य। केले 'बसवपुराणा'त ग्रथित। पाल्कुरिकी

सोमनाथाने॥१९६॥ श्रीमल्लिकार्जुन पंडितरचित। 'शिवतत्त्वसारमु' तेलुगू ग्रंथात। श्रीपती पंडितांचे विख्यात। वर्णिले आहे माहात्म्य हे॥१९७॥ ख्रिस्ताब्द दहाशे साठ साली। श्रीकरभाष्याची रचना झाली। भाष्यात जी ग्रंथनामावली। त्यात असे श्रीसिद्धान्तशिखामणी॥१९८॥ श्रीशैलपीठ श्रीपती पंडित। आणि श्रीसिद्धान्तशिखामणी ग्रंथ। यांचे सिद्धच प्राचीनत्व। यात नसे संदेह॥१९९॥ जगद्गुरू मल्लिकार्जुन पंडिताराध्य। तेलुगू साहित्यात प्रसिद्ध। त्यांनी अनेक ग्रंथ सिद्ध-। हस्ते रचिले आपुल्या॥२००॥ गणसहस्रनामावली, शिवतत्त्वसारमु। रूपमहिमे, लिंगोद्भव देवमद्दमु। अमरेश्वराष्टक, पर्वतवर्णनमु। आदी ग्रंथ रचिले हे॥२०१॥ ख्रिस्ताब्द अकराशे पंच्याण्णवात। तेलुगू कवी पाल्कुरिके सोमनाथ। त्याने 'मल्लिकार्जुन पंडिताराध्य' ग्रंथ। तेलुगू भाषेत रचियेला॥२०२॥ गुरुराज कवीने संस्कृतात। रचिला 'पंडिताराध्य चरित्रम्' ग्रंथ। असे मल्लिकार्जुन पंडिताचे चरित। ग्रंथबद्ध झालेले॥२०३॥ गणपतिराय वंशसंबंधित। श्रीप्रतापरुद्र ख्रिस्ताब्द तेराशेत। श्रीशैलसाम्राज्य हस्तगत। करूनि झाला अधिपती॥२०४॥ ईश्वर शिवाचार्य जगद्गुरुवर। यांच्या पदी होऊनि नम्र। शिष्यत्व पत्करूनि सत्वर। सत्तर गावे दान दिली॥२०५॥ मल्लिकार्जुनाचे नित्यपूजन। नैवेद्यादी दीपाराधन। ते व्हावे श्रीशैलपीठाधिपतींकडून। असा कोरविला

शिलालेख॥२०६॥ श्रीशैलक्षेत्रामध्ये विद्यमान। शिलालेख तो आहे अजून। पेनकोंड काचक्षीपालाकडून। मिळाले पीठास ताम्रपत्र॥२०७॥ त्या ताम्रपटावरून। श्रीशैलजगद्गुरू तत्कालीन। पट्टद प्रमथेश्वर देवरूंचे महिमान। सहज ध्यानी येतसे॥२०८॥ श्रीशैलजगद्गुरू जडेशंकर। गेले तुंगभद्रेच्या तीरावर। शिष्यांसह बसूनि कंबलासनावर। पैलतीरी गेले योगबळे॥२०९॥ कदंब, विजयनगर भूपती। यांनी भजिले श्रीशैलपीठाधिपती। पुढे मुक्तिमुनी, सिद्धभिक्षावृत्ती। झाले श्रीशैलजगद्गुरू॥२१०॥ तपोनिष्ठ शिवपूजाधुरंधर। म्हणूनि प्रसिद्धी पावले सर्वदूर। नागलोटी भिक्षावृत्ती हे त्यानंतर। विराजले सूर्यसिंहासनी॥२११॥ शिवयोगसंपन्न सात्त्विक वृत्ती। संचारले आंध्र, महाराष्ट्र, कर्नाटक प्रांती। श्रीशैलपीठाची महत्कीर्ती। त्यांनी केली वृद्धिंगत॥२१२॥ ख्रिस्ताब्द एकोणिसशे अठरात संपन्न। काशीपीठात झाले पंचाचार्य संमेलन। त्यात सहभागी होऊन। केले आशीर्वचनही॥२१३॥ जगद्गुरुपदी विराजमान। झाले वागीश पंडिताराध्य महान। त्यांच्या कार्यकालास अभिधान। श्रीशैलपीठाचा सुवर्णकाळ हे॥२१४॥ ख्रिस्ताब्द एकोणिसशे आठात जनन। केले कन्नड संस्कृत अध्ययन। काशी गुरुकुलात राहून। झाले उच्चविद्या-विभूषित॥२१५॥ साहित्य, वेदान्त परीक्षांत। केले आचार्यत्व प्राप्त। स्थापिला श्रीकाशीपीठात।

काशीवीरशैव विद्वत्संघ॥२१६॥ महानारायणोपनिषद् ग्रंथ। श्रीसिद्धान्तशिखामणी संस्कृत। शक्तिविशिष्टाद्वैत सिद्धान्त। हे ग्रंथ केले प्रसिद्ध॥२१७॥ साहित्यदर्पण, मृच्छकटिक। मुद्राराक्षस आदी ग्रंथ वेधक। त्यांचा कन्नड भाषेत सुरेख। केला त्यांनी अनुवाद॥२१८॥ खिस्ताब्द एकोणिसशे छत्तीसात। महात्मा गांधीच्या मीठ सत्याग्रहात। सहभागी होऊनि केले प्राप्त। प्रेम महात्मा गांधींचे॥२१९॥ खिस्ताब्द एकोणिसशे चाळिसात। श्रीशैलपीठी झाले अधिष्ठित। वागीश पंडिताराध्य नामे विख्यात। झाले सर्वदूर दूर॥२२०॥ केली श्रीशैल वीरशैव महासभा स्थापित। पीठकीर्ती केली वृद्धिंगत। केंद्र राज्यशासन साहाय्याने निर्मित। श्रीशैलास केला राजमार्ग॥२२१॥ गुंतकल्ल, आत्मकुरास। निर्मिला अन्नदासोह, यात्रानिवास। राष्ट्रपती राजेंद्रप्रसादांस। श्रीशैलास आणूनि सन्मानिले॥२२२॥ पाताळगंगेस एक धरण। बांधून विद्युत्केंद्र स्थापन। करावयास केला प्रयत्न। पूर्ण झाले कार्य ते॥२२३॥ भारत राष्ट्रपती राधाकृष्णन्। गेले श्रीशैलपीठात येऊन। जगद्गुरूंचा आशीर्वाद घेऊन। असे कार्य जगद्गुरूंचे॥२२४॥ जगद्गुरू पंडिताराध्य पीठोद्धार। वागीश पंडिताराध्य नित्यान्नमंदिर। श्रीशैल जगद्गुरू यात्रानिवास मंदिर। अशा निर्मिल्या सुखसोयी॥२२५॥ भाषाविशारद शास्त्रपारंगत। श्रेष्ठ कवी अशी कीर्तिप्राप्त। जगद्गुरूंनी केली स्थापित। ठायीठायी

विद्याकेंद्रे ॥२२६॥ गुंतकल, संते बेन्नूर। शिराळकोप्प, क्षेत्र हरिहर। येथे शाळा, विद्यालये सुंदर। स्थापिले महाविद्यालय ॥२२७॥ आयोजिले पंचाचार्य संमेलन। पाचारिले कन्नड, मराठी, तेलुगू विद्वान। चर्चासत्रे आयोजून जागरण। केले भाषाबंधुत्वाचे ॥२२८॥ 'बेळगु पंचाचार तत्त्ववे। बेळगु बसवन भक्तितत्त्ववे। बेळगु विस्तार शून्यतत्त्ववे। सर्व समतेयोळु' ॥२२९॥ असे बोधूनि आचार्य-विरक्त। वादातील दाविले निरर्थकत्व। वागीश पंडिताराध्याचे समदर्शित्व। दृढ होते असे हे ॥२३०॥ ख्रिस्ताब्द एकोणिसशे शाह्यांशीत। त्यांना लिंगैक्य झाले प्राप्त। अखंड शेहेचाळीस वर्षे अविरत। केला पीठ-समाजोद्धार ॥२३१॥ वागीश पंडिताराध्यांच्या पश्चात्। उमापती पंडिताराध्य पीठाधिष्ठित। जन्मूनि बसवन बागेवाडीत। राहिले शिवयोगमंदिरी ॥२३२॥ काशी विश्वाराध्य गुरुकुलात। राहूनि आचार्यत्व केले प्राप्त। हिंदी संस्कृत विषयांत। घेतल्या पदव्युत्तर पदव्या ॥२३३॥ प्रयाग विश्वविद्यालयातून। 'साहित्यरत्न' केली संपादन। सभासंमेलने गाजवून। केली कन्नड प्रवचने ॥२३४॥ श्रीशैलपीठाचे बटू म्हणून। निवडिले वागीश पंडितांनी स्वतःहून। त्यांच्या पश्चात् केला ग्रहण। पीठाधिकार श्रीशैलाचा ॥२३५॥ आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्रात। केली विद्याकेंद्रे स्थापित। मंगलभवन, मंदिर निर्माणाप्रत। प्रवृत्त केले भक्तांना ॥२३६॥ कन्नड, तेलुगू, हिंदीत। केली आशीर्वचने बहुत।

गावोगावी भ्रमूनि भक्त। आकर्षिले पीठाकडे॥२३७॥ शरन्नवमी दसरा दरबार। महाशिवरात्रीस यात्रा भरते फार। गुढीपाडव्यास येती नारी नर। पीठात दर्शनासाठी ॥२३८॥ असे पीठसंवर्धन कार्य करून। झाले उमापती पंडिताराध्य शिवलीन। त्यांच्या कर्तृत्वाचे स्मरण। आहे जागृत अद्यापि॥२३९॥ त्यानंतर चन्नसिद्धराम पंडिताराध्य। विद्यावारिधी प्रवचनपटू सिद्ध। त्यांनी भूषविले आचार्यपद। श्रीशैल सूर्यसिंहासनाचे॥२४०॥ ख्रिस्ताब्द एकोणिसशे एकाहत्तरात। हिप्परगी गावी कर्नाटकात। मडिवाळय्या-शारदा यांच्या उदरात। जन्मले बाळ देखणे॥२४१॥ तेच श्री सिद्धराम देवरू। पुढे झाले श्रीशैलजगद्गुरू। हिप्परगीतच झाले सुरू। प्रारंभिक शिक्षण॥२४२॥ इलकलचा विजय महांतेश्वर। मठ प्रख्यात सर्वदूर। तेथे गिरविले धडे सुंदर। गेले शिवयोग मंदिरी॥२४३॥ तेथे घेतले प्रौढ शिक्षण। संस्कृत-वेद-योगाध्ययन। केले पूर्ण ज्ञानार्जन। घेतला स्वामित्व संस्कार॥२४४॥ उच्च शिक्षण घ्यावयासी। गाठली विद्यानगरी काशी। जंगमवाडी मठात निवासी। होऊनि राहिले तेरा वर्षे॥२४५॥ वीरशैव आणि वेदान्त दर्शन। शास्त्रग्रंथांचे केले अध्ययन। शास्त्री, आचार्य परीक्षा उत्तीर्ण। झाले प्रथम क्रमांकाने॥२४६॥ सर्वप्रथम आले म्हणून। मिळाली सुवर्णपदके तीन। ती उपराष्ट्रपतींच्या हातून। स्वीकारिली त्यावेळी॥२४७॥ काशी हिंदू विश्वविद्यालयात। भगवद्गीता

श्रीसिद्धान्तशिखामणी ग्रंथ। यांचा तौलनिक अभ्यास समस्त। करूनि लिहिला प्रबंध॥२४८॥ दर्शन चक्रवर्ती पदवी। संपादिली सर्वोच्च बरवी। अशी ज्ञानक्षेत्रात थोरवी। असे श्रीशैल-पीठाचार्यांची॥२४९॥ ख्रिस्ताब्द वीसशे तीनात। हिप्परगी हिरेमठाचा पट्टाधिकार प्राप्त। यडूर काडसिद्धेश्वर मठात। आठ साली पट्ट झाला॥२५०॥ यडूर वीरभद्रेश्वर देवस्थान। त्याचे स्वामित्व लाभले पूर्ण। विकासकार्ये चालली अजून। हिप्परगी-यडूर स्थानांत॥२५१॥ पूर्वजगद्गुरूंच्या संकल्पानुसार। मिळाला श्रीशैलपीठाचा अधिकार। ख्रिस्ताब्द वीसशे दहात सुंदर। पट्टाभिषेक जहाला॥२५२॥ श्रीसद्धर्मसिंहासनाधीश्वर। आणि श्रीज्ञानसिंहासनाधीश्वर। यांच्या सान्निध्यात पट्टाधिकार। लाभला श्रीशैलपीठाचा॥२५३॥ श्री चन्नसिद्धराम पंडिताराध्य शिवाचार्य। या नामे झाले प्रसिद्ध आचार्य। श्रीशैलपीठाचे विकासकार्य। करिती मन:पूर्वक॥२५४॥ केला पीठाचा पृष्ठभाग नूतन। जगद्गुरू जंगम मल्लिकार्जुन। यांच्या संजीवन समाधीचे संरक्षण। जीर्णोद्धार करूनि केले॥२५५॥ केला ध्यानमंदिराचा जीर्णोद्धार। भक्तनिवास, जगद्गुरू निवास सुंदर। इष्टलिंग महापूजा मंटप मनोहर। या भव्य वास्तू निर्मिल्या॥२५६॥ दावणगेरीत पूर्वपीठाधीश्वर। उमापती पंडिताराध्य जगद्गुरुवर। यांचे निर्मिले समाधिमंदिर। पवित्र आणि सुरेख॥२५७॥ वागीश

जगद्‌गुरूंनी केले स्थापन। पंचाचार्य विश्वधर्म विद्यापीठ संस्थान। तिच्याद्वारा तंत्रनिकेतन। उभारिले हरिहरात॥२५८॥ कारणागमाचा तेलुगूत। अनुवाद केला प्रकाशित। 'षट्स्थल चिंतन' कन्नड ग्रंथ। रचिला पूर्वाश्रमात॥२५९॥ त्याचा तेलुगू अनुवाद। करवूनि ग्रंथ केला सिद्ध। पीठाद्वारे केला प्रसिद्ध। अशी केली प्रकाशने॥२६०॥ 'वीरशैव सदाचार संग्रह' ग्रंथ। त्यावरी चर्चा केली आयोजित। केले शोधनिबंध प्रकाशित। विद्वानांचे त्यावरचे॥२६१॥ वीरशैवांतील मतभेद। दूर होऊनि साधावा संवाद। यास्तव आषाढ मासी विविध। स्थानी करिती आशीर्वचने॥२६२॥ श्रीशैलपीठाची महती। वाढविण्यास कष्ट घेती। आशीर्वचनांमधून बोधिती। शिवाद्वैत भक्तांना॥२६३॥ अशी श्रीशैलपीठाची कहाणी। निवेदिली श्रोतियांलागूनी। आता पुढे अवधान देऊनी। काशीपीठाची ऐका कथा॥२६४॥ श्रीकाशीज्ञानसिंहासनाधीश्वर। जगद्‌गुरू महास्वामी श्रीचंद्रशेखर। त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर। रचितो शेषनारायण॥२६५॥ श्रीजगद्‌गुरू पंचाचार्य विजय रसाळ। परिसोत भाविक भक्त प्रेमळ। शिवभक्तमने व्हावी प्रफुल्ल। नवमोऽध्याय गोड हा॥२६६॥

॥ श्रीजगद्‌गुरु पंचाचार्यार्पणमस्तु॥

□□

# अध्याय दहावा

## श्रीकाशीपीठ, ज्ञानसिंहासन (पूर्वार्ध)

मंगलाचरण, प्रास्ताविक (ओवी १-११), काशीक्षेत्र माहात्म्य (१२-३४), ज्ञानसिंहासन (३५-४०), ज० विश्वकर्णांचे लिंगावतरण व रूपवर्णन (४१-५८), राजा दिवोदासाचे आश्चर्योद्गार (५९-६४), अवतरणाचे कारण (६५-८२), दिवोदासाची प्रार्थना व त्याला लिंगदीक्षा (८३-११४), राजा दिवोदासास उपदेश (११५-१३९), ज्ञानसिंहासनारोहण (१४०-१४५), सूत्रबोधाचा विचार (१४६-१५०), म० दुर्वासाची कथा (१५१-२१३), ज० विश्वकर्ण - म० दुर्वास भेट, लिंगदीक्षा (२१४-२३३), म० दुर्वासास पंचवर्णमहासूत्रोपदेश (२३४-३१६), म० दुर्वासाची धन्यता (३१७-३२४), ज० विश्वकर्णांचा संचार, कार्य, अवतारसमाप्ती (३२५-३२७), उपसंहार (३२८-३३१)

# अध्याय दहावा

॥ श्रीगणेशाय नम:॥ श्रीजगद्‌गुरु विश्वकर्णाचार्याय नम:॥

ॐ शिवाय नम: पिनाकिने। पंचवक्त्राय नम: खट्वांगिने। कृत्तिवाससे नम: कपालिने। गिरिधन्वने नम: भगवते॥१॥ वीरभद्राय नम: कृपानिधये। हिरण्यरेतसे नम: मृगपाणये। गिरिशाय नम: पुरारातये। पूषदंतभिदे नम: स्थाणवे॥२॥ शिवा तुजला करिता वंदन। मनी आनंदाला येई उधाण। मधचि पाझरे मोहोळातून। तसा येतो अनुभव॥३॥ ह्दी भरूनि तरल गंध। पवन वाहावा मंद मंद। स्पर्शूनि करावे तन मन धुंद। तुझे नाम तसे हे॥४॥ नामानंदी नाचता नाचता। हरे अवघी संसारचिंता। तूच उभा पुढे मागुता। दिससी भक्तमेळ्यात॥५॥ नामी भरली किती गोडी। ती न सांगता येई थोडी। कणभर गूळ जिभेवर सोडी। अपरंपार माधुर्य॥६॥ तसे एकचि नाम पुरे। स्वाद जीवनी भरूनि उरे। योगयागाचे अवजड भारे। शिरी कशाला वागवू?॥७॥ हळूहळू देवा कळसाकडे। ग्रंथलेखन चालले पुढे। तेही पूर्ण करूनि वेडे। मन माझे शांतवी तू॥८॥ चार पीठांची कथा पूर्ण। अवतरली आर्ष

शब्दांतून। जेवढे होते शब्दधन। कामी आले तेवढे॥९॥ माझी शिवा कुवत केवढी। जमे न लांब मारणे उडी। होती माझी शक्ती जेवढी। तेवढी पणा लाविली॥१०॥ आता काशीपीठाची महती। वर्णावयास देई शक्ती। तुझिया बळे होईल सरती। वाट पुढती दयाळा॥११॥ काशीक्षेत्र परम पवित्र। तेथे जगाचे जीवनसूत्र। ज्योतिर्लिंगरूपे वसे त्रिनेत्र। शिवशंकर सर्वदा॥१२॥ आर्यावर्ती परमपावन। तीर्थक्षेत्रे जितुकी महान। त्यात काशीस पहिला मान। काशीखंडात वर्णिले॥१३॥ गंगा येथे उत्तरवाहिनी। पापतापाच्या हरिते गोणी। गंगास्नाने तरून प्राणी। जाती मोक्षपदासी॥१४॥ 'काश्यते प्रकाश्यते इति काशी'। देई ज्ञानप्रकाश अहर्निशी। सहज म्हणता काशी काशी। पुण्य लाभे जपाचे॥१५॥ मोक्षदायिनी सप्त पुरी। त्यात श्रेष्ठ काशीनगरी। सहज हिंडता मार्गावरी। तरी ती झाली प्रदक्षिणा॥१६॥ काशीत सहज बोले बोल। बोलास लाभे जपाचे मोल। काशीत वदनी घेता कवळ। नैवेद्य होय शिवाचा॥१७॥ निद्रा घेता सहज काशीत। घडे साष्टांग प्रणिपात। काशीयात्रा घडता मुक्त। होतो सर्व पापांतूनी॥१८॥ येथे सत्संग केल्यावर। खुले मुक्तीचे महाद्वार। काशी काशी म्हणता त्रिवार। घडे काशीयात्राच॥१९॥ काशीवास, विश्वनाथदर्शन। आणि त्रिकाळ गंगास्नान। ज्याला घडे तो पुण्यवान। त्यासम नाही अन्य कोणी॥२०॥ काशीमध्ये येता मरण।

त्याचे चुके जन्ममरण। तो धर्मात्माच परतून। पुन्हा न ये मृत्युलोकी॥२१॥ अन्नपूर्णेसह विश्वनाथ। येथे सदैव नांदतो सुखात। तो त्यागीना काशीस तेणे अविमुक्त। क्षेत्र म्हणती काशीला॥२२॥ शिवास आनंददायी म्हणून। आनंदवन, आनंदकानन। म्हणती आणिक महास्मशान। शिव वसे म्हणूनी॥२३॥ वरुणा नदी आणि असी। संगमक्षेत्री वसली काशी। तेणे म्हणती वाराणसी। लोक काशीक्षेत्राला॥२४॥ स्वर्गीहूनि भगीरथाने। गंगा आणली सायासाने। उत्तरवाहिनी होऊन तिने। अनंत जीवा उद्धरिले॥२५॥ देवदेवता बहुवस। काशीक्षेत्री करिती वास। तेणे काशीविषयी विशेष। प्रीत नांदे भक्तमनी॥२६॥ ज्ञानी तपस्वी संत मुनी। इथेच रमले शंकरध्यानी। कठोर तपाचरणे करूनी। गेले मोक्षपदासी॥२७॥ ज्ञान-विद्वत्तेचे माहेर। काशी प्रसिद्ध सर्वदूर। शास्त्रार्थ झडले थोर थोर। याच पुण्यनगरीत॥२८॥ काशीत मिळता विद्वन्मान्यता। तो मान्यचि होई जगता। पांडित्याची येथे सुबत्ता। मान्यता धर्मपीठाची॥२९॥ अपार झाल्या ज्ञानगोष्टी। इथे जन्मली ग्रंथसृष्टी। प्रस्थानत्रयीवर रचिली मोठी। भाष्ये दार्शनिकांनी॥३०॥ आले संत एकनाथ। रचिले मराठी भागवत। गौरवूनि विद्वज्जनांनी येथ। हत्तीवरूनि मिरविले॥३१॥ वेदज्ञ व्युत्पन्न पंडित भले। इथे जन्मले इथेच वसले। कर्मभूमी मानूनि केले। त्यांनी येथे ज्ञानार्जन॥३२॥ विश्वनाथाचे घ्यावया दर्शन। करावया

पवित्र गंगास्नान। भक्त येती, इथेच मरण। मागती विश्वनाथाला॥३३॥ अशी ज्ञानविद्येची नगरी। मोक्षदायिनी अविमुक्तपुरी। गाजत राहिली सर्व भूवरी। अनादी कालापासून॥३४॥ याच काशीक्षेत्री महान। जंगमवाटिका पुरातन। तेथे ज्ञानसिंहासन। शोभले विश्वाराध्यांचे॥३५॥ वीरशैवांचे पंचपीठ। त्यातील एक हे ज्ञानपीठ। भक्त जंगमवाडी मठ। असे आज संबोधिती॥३६॥ याच ज्ञानपीठातून। प्रकाशले शिवाद्वैतज्ञान। तेणे ऋषी भक्त धन्य। युगीयुगी जहाले॥३७॥ श्रीविश्वाराध्य शिवयोगी। येथे प्रकटले युगीयुगी। धर्मप्रबोधन करूनि जगी। शिवभक्ती प्रसारिली॥३८॥ पंचाक्षर नामे कृतयुगात। पंचवक्त्र नामे त्रेतायुगात। विश्वकर्ण नामे द्वापरयुगात। कलियुगात विश्वाराध्य॥३९॥ असे युगायुगांत प्रकटून। केला वीरशैवधर्म स्थापन। बोधूनि शिवाद्वैतज्ञान। जन असंख्य उद्धरिले॥४०॥ आता द्वापरयुगीची कथा। आणीन श्रोतियांच्या श्रवणपथा। विश्वनाथमंदिरी जमला होता। शिवभक्तमेळा तेधवा॥४१॥ महाशिवरात्रीचे मंगल पर्व। शिवनामघोषात रमले सर्व। गर्जती हर हर महादेव। जय जय शंभो विश्वनाथा॥४२॥ निशी दाटली घनघोर। नंदादीपांनी उजळले मंदिर। ऐन मध्यरात्रीचा प्रहर। आनंदविभोर नाचती॥४३॥ विश्वनाथ जगत्पती। त्याची प्रेमे करिती स्तुती। 'शिवा अंगी चर्चूनि विभूती। कर्पूरगौर झालासी॥४४॥ विभूती चर्चूनि झाला विभूत। तरी

भोवती नाचे भूत। आणि भूतांवरी अविरत। कृपावर्षाव करितोस॥४५॥ क्रोधे जाळिला देवा मदन। तरी झालास पार्वतीरमण। भक्ता देशी अमृत, पान। तू विषाचे करितोस॥४६॥ संगरहित तू जरी असंगा। तरी जटेत ठेविली गंगा। खेळवतोस सर्पभुजंगा। गळ्यामध्ये प्रीतीने॥४७॥ समस्त पोषितो जीवमात्र। तरीही हाती भिक्षापात्र। समदृष्टी असून त्रिनेत्र। तुझे विचित्र वर्तन॥४८॥ उभा जाळिला नेत्रे काम। तरी भक्तांचे पुरविसी काम। संहारक रुद्र तुझेच नाम। तरी पोषितो विश्वाला॥४९॥ जय जय शिवा गंगाधरा। नीलकंठा करुणासागरा। विरूपलोचना पतितोद्धारा। विश्वपते विश्वनाथा'॥५०॥ शिवहर शंभो जय जगदीश। असा घुमला अपूर्व घोष। तत्क्षणी लिंगातून प्रकाश। अपरंपार फाकला॥५१॥ कोसळून पडले नभोमंडळ। की डळमळले अवघे भूतळ। तसा प्रचंड झाला कल्लोळ। थक्क भक्त जहाले॥५२॥ प्रकाशवर्तुळ लिंगाभोवती। उत्सुकतेने भक्त पाहाती। हळूहळू तेथे दिव्यमूर्ती। तेज:पुंज अवतरली॥५३॥ भस्मविभूषित शुभ्र शरीर। कटीस पीतवसन सुंदर। शिरी शोभे घन जटाभार। ज्यावरी विराजे इष्टलिंग॥५४॥ सहस्र चंद्राची प्रकटे द्युती। तशी मुखावर शीतल दीप्ती। सुवर्णासम तळपे कांती। नेत्र दीपती भक्तांचे॥५५॥ तनू देखणी बलदंड। करी कमंडलू बिल्वदंड। मुखी पंचाक्षर जप अखंड। घुमे मंद घन जसा॥५६॥ नेत्री करुणा दाटली

अपार। भिजले भावकोवळे अंतर। शिवगण पाहता हर्षविभोर। भक्त सर्व जहाले॥५७॥ धावूनि भक्त वंदिती चरण। स्पर्शे अनुभविती धन्यपण। मग देऊनि उच्चासन। वरी बसविले शिवगणा॥५८॥ वार्ता कळता त्वरित गती। धावत आला काशीनृपती। दिवोदास नाम जगती। ज्याचे अती गाजले॥५९॥ ज्ञान-वैराग्य-ऐश्वर्यसंपन्न। राजा दिवोदास होता महान। त्याच्या राज्यात प्रजाजन। पुण्यवान सर्व होते॥६०॥ त्याने श्रद्धापूर्वक वंदिले। म्हणे 'महाराजा अपूर्व घडले। विश्वनाथलिंगातूनि झाले। आज अवतरण आपुले॥६१॥ वाचली वेदपुराणे किती। ग्रंथसंभार वाहिला माथी। पूजिले साधू ऋषी यती। त्यांच्या गोष्टी ऐकिल्या॥६२॥ परि लिंगातून कोणी। प्रकटले नाही आले कर्णी। आपण अवतारी श्रेष्ठ मुनी। यात नसे संदेह॥६३॥ विश्वनाथाच्या या नगरीत। आपुले करितो हर्षे स्वागत। येऊनि माझ्या प्रासादात। मज उपकृत करावे'॥६४॥ सकला देऊनि आशीर्वाद। शिवगण बोलती गंभीर शब्द। शिवाज्ञेने आमचे पद। पडले तुझ्या नगरीत॥६५॥ आलो येथे कैलासाहून। नाम आमचे विश्वकर्ण। जंगमवाटिकेत पुरातन। ज्ञानसिंहासन आमचे॥६६॥ कृत आणि त्रेतायुगात। आम्ही अवतरलो होतो येथ। लोकांस बोधूनि शिवाद्वैत। तेव्हा होते स्थापिले॥६७॥ त्रेतायुग आता सरले। भूवरी द्वापर युग अवतरले। पुनश्च बोधायास सगळे। यावे

लागले इथे नृपा॥६८॥ ज्ञानपीठाचे पुनरुज्जीवन। आता नव्याने पुन्हा करीन। ऋषी आणि जनांस बोधून। पूर्ण उजळीन शिवाचार॥६९॥ दर्पणावरी साठता धुके। प्रतिबिंब मग होते फिके। मूळ बिंब जरी न झाके। तरी दिसे धूसर॥७०॥ तसे अंत:करण निर्मळ। त्यावरी साठता विकारधूळ। आत्मतत्त्वाचे रूप मूळ। दिसेना जनलोकांस॥७१॥ भेदभ्रांतीने ग्रासून जाती। अहंकार-ममत्वाने फुगती। वर्णजातीचा गर्व वाहती। अन्या दुखविती कटू शब्दे॥७२॥ सर्व मुळात असूनि एक। भेद पोसती अनेकानेक। दुसऱ्यास देऊनि परम दु:ख। आनंद करिती साजरा॥७३॥ कामवासनेच्या भरे। एकमेकांची फोडिती शिरे। उद्ध्वस्त करी वादळ सारे। तसे अन्यास नाशिती॥७४॥ विचाराचे अंगी बळ। तरी विकार होती प्रबळ। सिंचिती पुन:पुन्हा मूळ। जन्मतरूचे कर्मांनी॥७५॥ शिवे निर्मिली अद्‌भुत सृष्टी। शस्त्रे घेऊनि लागती पाठी। मुक्या जीवांस हानी मोठी। करिती जिव्हालौल्याने॥७६॥ निसर्गराहाटी विपरीत। वागे मानवच विक्षिप्त। दुर्विचाराच्या कृमी अगणित। बुद्धीत त्याच्या वळवळती॥७७॥ जरी लाविले वळण सारे। तरी विस्मरतो कालांतरे। जसा निजला नाग फुत्कारे। निद्रा मोडिल्यावर पुन्हा॥७८॥ म्हणूनि बदलता कालगती। शिव अवतराया आज्ञा देती। पुन्हा आणावी मानवजाती। सदाचार मार्गावरी॥७९॥ घालो कितीही कोणी घाव। फलित

होणे वृक्षस्वभाव। सरिता आपुली जीवनधाव। जशी कदापि रोधेना॥८०॥ तसा बिघडो कितीही मानव। अखंड वाहे ज्ञानप्रवाह। खंडेचिना बोधे सदैव। सदाचार पुन:पुन्हा॥८१॥ तेच कराया आलो भूवर। उपदेशाया नारी नर। तुम्ही भक्तीत रमता थोर। पाहून मनी तोषलो'॥८२॥ विश्वकर्णांची ऐकूनि वाणी। राव परम तोषला मनी। म्हणे 'धन्य  चरण पाहूनी। आम्ही आज जहालो॥८३॥ आपण राजमंदिरी यावे। आम्हा लिंगदीक्षित करावे। कृपा करूनि उपदेशावे। पूर्ण शिवाद्वैतज्ञान'॥८४॥ दिवोदासाने गौरविले। राजपथावरी मिरवीत नेले। रत्नसिंहासनी बैसविले। केले भावे पूजन॥८५॥ जोडूनिया दोन्ही हस्तक। बसला होऊनि नतमस्तक। विश्वकर्णांनी लक्षपूर्वक। पाहिली शक्तिपात-चिन्हे॥८६॥ भस्मरुद्राक्षे अलंकृत। शरीर जहाले शोभिवंत। मग मस्तकी ठेवूनि हस्त। वेधादीक्षा दिधली॥८७॥ म्हणती 'राजा मीच शिव। असा मनात वागवी भाव। शिवभक्तांशी मानूनि बांधव। प्रेम करी सर्वदा॥८८॥ शरीर आणिक संसार। हे मुळात असती अस्थिर। हे जाणूनि त्यागावे, निरंतर। व्हावे लीन शिवपूजेत॥८९॥ त्रितापयुक्त संसारातून। मन बाहेर काढी पूर्ण। अंग-लिंगतत्त्वे जाणून। जाण त्यांचे सामरस्य॥९०॥ लिंगात प्राण प्राणात लिंग। समरस करी पूर्ण अभंग। आणि आपुले इष्टलिंग। प्रेमपूर्वक सांभाळी॥९१॥ पंचेंद्रिये आणि मन। यांत षड्लिंगे वसती जाणून।

त्यांना आधी करूनि अर्पण। पंचविषय भोगावे॥९२॥ सच्चिदानंद ब्रह्म शिव। मीच निरंतर हा असावा भाव। या भावलिंगाचे मनी सदैव। चिंतन करावे आपुल्या'॥९३॥ अशी वेधादीक्षा देऊन। आणवमल निरसिला मनातून। मग मायामलाचे निरसन। केले देऊनि मंत्रदीक्षा॥९४॥ गूढपणे दक्षिण कर्णी। मंत्र बोधिला जगद्‌गुरूंनी। म्हणती 'पंचाक्षरीचा मनी। जप करावा सदोदित॥९५॥ मी चिद्‌रूपचि आहे ऐसे। मंत्रजपाने हृदयी प्रकाशे। चिदाहंता हेचि असे। जाण तुझे प्राणलिंग॥९६॥ मन:पूर्वक मंत्र जपता। मायामल निरसे सर्वथा। लिंगार्पण करूनि पुरता। भोग घ्यावा वीरशैवाने॥९७॥ करिता इष्टलिंगपूजन। अन्य कोणते न करावे चिंतन। इष्टलिंगपूजाव्रत आमरण। प्रमादरहित आचरावे॥९८॥ लिंग पती आपण सती। हा दृढ भाव असावा चित्ती। इष्ट, प्राण, भावलिंगांप्रती। तन, मन, भाव अर्पावा॥९९॥ सर्व प्राण्यांस आत्मवत्। मानूनि न व्हावे हिंसारत। आणिक ठेव निष्ठा नितांत। परब्रह्मस्वरूप लिंगावरी॥१००॥ करिता लिंगरूपाचे चिंतन। मनचि करावे त्यात विलीन। संशयरहित मने गुरुवचन। अंगीकारी श्रद्धेने'॥१०१॥ अशी देऊनि मंत्रदीक्षा। उपरी दिधली क्रियादीक्षा। आज्ञा-उपमादी सप्तदीक्षा-। संस्कार केले रायावरी॥१०२॥ सदाचाराचा त्याग करून। न करावे स्वेच्छावर्तन। असे शिष्यांस बोधणे पूर्ण। असे आज्ञादीक्षा ही॥१०३॥ पूर्वाचार्यांप्रमाणे

तूही। पूर्ण आचारसंपन्न होई। या उपदेशास नाव पाही। असे उपमादीक्षा हे॥१०४॥ पंचगव्य, पंचामृताने। पंचकलशांतील जलाने। अंग-लिंगांस अभिषेक करणे। ही कलशाभिषेक दीक्षा॥१०५॥ शिष्याच्या सर्व अवयवांत। सहा कला करणे स्थापित। स्वस्तिकारोहण दीक्षा याप्रत। नाव आहे शास्त्रामध्ये॥१०६॥ गोमयनिर्मित भस्मे श्रीगुरूने। शिष्यास भस्मस्नान भस्मोद्धूलन करणे। आणि भाळी त्रिपुंड्र रेखणे। यास नाव भूतिपट्टदीक्षा॥१०७॥ अंगुष्ठमात्र इष्टलिंग संस्कारित। श्रीगुरूंनी स्वकरी ठेवूनि स्थित। 'शिष्या तू हो लिंग आयत्त'। बोधणे ही आयत्त दीक्षा॥१०८॥ स्वकरीच्या इष्टलिंगास। शिष्यास करूनि मंत्रोपदेश। त्याच्या स्वाधीन करणे विशेष। यास नाव स्वायत्त दीक्षा॥१०९॥ क्रियादीक्षेमुळे जाण। नाशतो कार्मिक मल पूर्ण। आणि शिष्यदेहास अभिधान। मिळे मंत्रपिंड असे॥११०॥ संस्कारहीन देहाप्रती। ज्ञानी मांसपिंड म्हणती। संस्कार होता देहावरती। तो होतो मंत्रपिंड॥१११॥ असे सप्त दीक्षासंस्कार करून। राजास केले लिंगधारण। त्याने साष्टांग केले नमन। चरणी जगद्गुरूंच्या॥११२॥ दीक्षागुरू, शिक्षागुरू। आणि तिसरा ज्ञानगुरू। असे तिन्ही रूपांत जगद्गुरू। लाभले भाग्यवंत राजासी॥११३॥ दिवोदास बोले नम्रतेने। 'त्रिमल निरसिले त्रयदीक्षेने। मलत्रयाचे रूप स्पष्टपणे। मज बोधावे गुरुदेवा'॥११४॥ विश्वकर्ण म्हणती नृपास।

‘राया तू असशी ज्ञानलालस। ज्ञानानेच मुक्ती जीवास। लाभते जाण निश्चित॥११५॥ जे पंचवर्णसूत्र बोधायास। मी अवतरलो काशीस। त्या सूत्राचाच एक अंश। असे प्रश्न तुझा हा॥११६॥ शक्तिविशिष्ट परशिव एक। चराचर सृष्टीचा असे जनक। अंगातील द्रव्याने देख। कोळी जाळे निर्मितो॥११७॥ तसे परशिवासवे युक्त। अभिन्न शक्तितत्त्व असत। शक्तिविकास करूनि जगत्। निर्मिले परशिवाने॥११८॥ शिव, शक्ती आणिक चौतीस। अशी तत्त्वे असती छत्तीस। छत्तीस तत्त्वांचेच विशेष। जगत्स्वरूप हे जाणावे॥११९॥ इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती। आणि तिसरी क्रियाशक्ती। अशी त्रिविध विमर्शशक्ती। वसे परशिवासवे॥१२०॥ इच्छा, क्रिया आणि ज्ञान। शिवाठायी ह्या शक्ती महान। परि त्या जाती संकोचून। क्षीण होती जीवाठायी॥१२१॥ मूळ तीन शुद्ध शक्ती। त्याच मलत्रय होती। आणि जीवात्म्यास भ्रमविती। चौऱ्यांशी लक्ष योनींत॥१२२॥ इच्छाशक्ती संकोचली। तीच आणवमल झाली। जीवास वाटे आहे आपुली। धाव देहापुरतीच॥१२३॥ देह म्हणजेच आपण। देहाइतुके आपण लहान। असा अणुभाव रुजे पूर्ण। जीवात्म्याच्या हृदयात॥१२४॥ आणवमल दिवोदासा। जीवात्म्यास घाली फासा। रानी हरीण हिंडे जसा। तसा भ्रमवी जन्मोजन्मी॥१२५॥ संकोचता ज्ञानशक्ती। बुद्धीत करी भेदनिर्मिती। मी तू शिव जग भिन्न असती।

भेद हा रुजवी बुद्धीत॥१२६॥ मी वेगळा तू वेगळा। विश्व निराळे शिव निराळा। असे भिन्नत्व दिसे डोळा। तिला नाव मायामल॥१२७॥ क्रियाशक्ती संकोचली। तीच कार्मिक मल झाली। शुभाशुभ वासना होऊनि आली। जीवास कर्मी गुंतवाया॥१२८॥ जेव्हा कर्म करितो नर। तेव्हा संस्कार उमटे मनावर। शुभ अशुभ असे संस्कार। त्यास म्हणती वासना॥१२९॥ शुभ वासनासंस्कारे। मानव पुण्यकर्मचि आचरे। अशुभ वासनेच्या भरे। रुते दुष्कर्ममार्गात॥१३०॥ अशा इच्छा, ज्ञान, क्रिया। जीवाठायी संकोचती राजया। आणव, कर्म आणि माया। मल होऊनि छळती त्या॥१३१॥ वेधा, मांत्री, क्रिया दीक्षेने। या त्रिमलाचे उखडे ठाणे। त्या विकासता पूर्णपणे। होशील स्वये शिव तू॥१३२॥ दिधल्या दीक्षा ज्या त्रिविध। नसती सामान्य हास्यास्पद। त्या जीवास दाखवूनि शिवपद। त्यावर नेऊनि बसविती॥१३३॥ म्हणूनि दीक्षा लिंगधारण। अंधपणे न करावे जाण। त्याचा अर्थ पूर्ण जाणून। प्रमादरहित वर्तावे'॥१३४॥ होऊनि पूर्ण प्रसन्नचित्त। दिवोदास झाला रोमांचित। म्हणे 'गुरुराया मजला निश्चित। आपण आज तारिले॥१३५॥ आणव, माया, कार्मिक मल। यांचे रूप दाविले सकल। आणि मनातूनि समूळ। ते निरसिले माझिया॥१३६॥ जरी चर्मपादुका करूनी। प्रेमे अर्पिल्या तुमच्या चरणी। तरी हे ऋण जन्मांतूनी। फिटणे नाही गुरुदेवा॥१३७॥ देहात्मबुद्धी आता

विरली। आणि आत्मौपम्य दृष्टी लाभली। शुभ वासनाच केवळ उरली। आता माझ्या मनात॥१३८॥ दाखविला वीरशैवमार्ग। तोच आचरीन यथासांग। आणिक साधेन लिंगांग-। सामरस्य ह्या जन्मी'॥१३९॥ राजाराणीने नमस्कारिले। सकला शुभाशीर्वाद दिले। सर्वांसह जगद्गुरू गेले। मग जंगमवाटिकेत॥१४०॥ राजपरिवार जंगम ब्राह्मण। आणि मिळूनि सर्व प्रजाजन। यांनी जलशिंपण करून। ज्ञानसिंहासन शुद्ध केले॥१४१॥ झाला अपूर्व जयजयकार। दुमदुमले अवघे अंबर। मंत्रघोषात ज्ञानसिंहासनावर। आरूढले विश्वकर्ण॥१४२॥ 'जयोऽस्तुते' सर्व गर्जती। पुष्पे बिल्वदले वर्षती। भक्तजन रोमांचित होती। पाहूनि आनंदसोहळा॥१४३॥ काशीच्या कणाकणांतून। आणि वाहत्या वाऱ्यातून। शिवाद्वैताचे ज्ञानकण। जणू मंद वाहती॥१४४॥ ज्ञानसिंहासनाधिपती। झाले विश्वकर्ण शिवमूर्ती। हळूहळू गंधासम कीर्ती। त्यांची लागली दरवळू॥१४५॥ जगद्गुरू करिती विचार। शिवे बोधिले पंचवर्णसूत्र। ते कोणास उपदेशावे साचार। आता द्वापरयुगात॥१४६॥ विचार करिता स्मरले चित्ती। दुर्वास ऋषी क्रोधमूर्ती। काशीक्षेत्री तपस्या करिती। वसूनि बिल्ववनात॥१४७॥ प्रसन्न होता देती वर। क्रोध येता शापिती सत्वर। असे शापानुग्रहसमर्थ थोर। दुर्वास प्रसिद्ध विश्वात॥१४८॥ त्यांना करिता सूत्रबोध। शांत होईल अपार क्रोध। त्यांच्याद्वारे होईल प्रसिद्ध।

पंचवर्णमहासूत्र॥१४९॥ असा पूर्ण केला निश्चय। बिल्ववनाकडे वळले पाय। पुढती तेथे वर्तले काय। निवेदीन ते श्रोत्यांना॥१५०॥ श्रोतेहो काही क्षण थांबूनी। दुर्वास मुनींची सांगेन कहाणी। त्यांच्या क्रोधपूर्ण कथांनी। रंगूनि गेली पुराणे॥१५१॥ अत्रि-अनसूयेचा सुत। दुर्वास मुनी जगी प्रख्यात। क्रोध येताच शापी क्षणात। अशी त्यांची प्रसिद्धी॥१५२॥ शीघ्रकोपी माणसाला। पाहताच म्हणती 'दुर्वास आला'। असा बोलीभाषेत सामावला। क्रोध मुनी दुर्वासाचा॥१५३॥ देवासुरांचे समुद्रमंथन। सर्वज्ञात ही कथा पुरातन। परंतु त्याचे ठरले कारण। क्रोधी ऋषी दुर्वास॥१५४॥ एकदा शिवदर्शनासाठी। दुर्वास गेले कैलासकपाटी। वंदूनि शंकरा केल्या गोष्टी। मग परतले माघारी॥१५५॥ शिवाने दुर्वासाच्या कंठी। घातली पुष्पमाला गोमटी। निघाले न्याहाळत शिवसृष्टी। करीत चाळा माळेशी॥१५६॥ परत येता मार्गावरी। आली देवेंद्राची स्वारी। ऐटीत बसूनि ऐरावतावरी। निघाला होता कैलासी॥१५७॥ दुर्वासास पाहताक्षणी। उतरला ऐरावतावरूनी। आणि नम्र होऊनि चरणी। केले भावे वंदन॥१५८॥ दुर्वास झाले प्रसन्नचित्त। काढली पुष्पमाला त्वरित। घातली देवेंद्राच्या कंठात। दिधला शुभाशीर्वाद॥१५९॥ वळले आपुल्या मार्गाने। तोच इंद्राने सहजपणे। टाकिली पुष्पमाला प्रेमाने। हत्तीच्या गंडस्थलावरी॥१६०॥ गंडस्थली पडता माला। ऐरावत किंचित्

शहारला। त्याने खाली टाकून माला। पायातळी रगडिली॥१६१॥ हा पाहता सर्व प्रकार। प्रचंड संतापले मुनिवर। क्रोधे कापला देह थरथर। नेत्री अंगार दाटला॥१६२॥ म्हणती 'मूर्खा देवेंद्रा। तुझी पाहिली आज मुद्रा। शिवप्रसादाचा अभद्रा। केला घोर अवमान॥१६३॥ शिवे दिधली जी पुष्पमाला। ती मी घातली तुझिया गळा। तू फेकिलीस गंडस्थला-। वरी एका पशूच्या॥१६४॥ पशूच तो बुद्धिहीन। टाकिली पायदळी रगडून। शिवप्रसादाचा अवमान। शतमूर्खा तू केलास॥१६५॥ ऐश्वर्य संपत्ती अगणित। तेणे झालास मदोन्मत्त। कळेनाच हित अहित। तुला आंधळेपणाने॥१६६॥ तुला शापितो क्षणार्धात। तुझे ऐश्वर्य संपत्ती समस्त। बुडेल क्षीरसागरात। होशील भणंग आता तू' ॥१६७॥ दुर्वासाची शापवाणी। ऐकता दचकला इंद्र मनी। क्षणात लागला त्यांच्या चरणी। म्हणे 'घडला अपराध॥१६८॥ जाणिवपूर्वक नाही केले। सहजचि हे वर्तन घडले। मनात पाप नव्हते आले। प्रसाद अव्हेरण्याचे॥१६९॥ वंदावया शिवचरण। मीच निघालो मार्गावरून। त्यांचा प्रसाद अव्हेरीन। धाष्टर्य नाही मजपाशी॥१७०॥ सहजभावे फेकिली माला। तिचा सन्मान करावयाला। वर्तेल यापरी पशू मजला। नाही आले अनुमान॥१७१॥ तरी महर्षे होऊनि उदार। उःशाप आपण द्यावा सत्वर। रक्षावे सुर आणि नर। अन्यथा अनर्थ ओढवेल' ॥१७२॥ ऐकता इंद्राचे बोल विनीत।

दुर्वास मानसी झाले लज्जित। मनी म्हणती घडला अनर्थ। केवढा क्रोधे आपुल्या॥१७३॥ मग म्हणती 'इंद्रा ऐक। देव असुर होऊनि एक। समुद्रमंथन करिता देख। पुन्हा लाभेल संपत्ती'॥१७४॥ दुर्वासास नमस्कारून। इंद्र मार्गे गेला निघून। शापामुळे झाले उद्विग्न। मनी दुर्वास आपल्या॥१७५॥ शकुंतला कण्वबाळी। दुष्यंतावर मोहित झाली। सर्वस्व अर्पूनि त्याला बसली। त्याचे करीत चिंतन॥१७६॥ दुर्वास आले आश्रमात। तरी ती व्यग्र चिंतनात। हाक मारिताही विचलित। चित्त नाही जहाले॥१७७॥ महाक्रोधी दुर्वास मुनी। क्षणार्धात शापिले त्यांनी। 'तू रमलीस ज्याच्या चिंतनी। तोच तुला विस्मरेल'॥१७८॥ अचानक येता भान। शकुंतलेने धरिले चरण। नम्रतेने करुणा भाकून। मागून घेतला उ:शाप॥१७९॥ और्व ऋषीची कन्या कंदली। दुर्वासाची पत्नी झाली। एकदा कार्य करिता चुकली। तिला शापूनि भस्म केले॥१८०॥ राजा अंबरीष विष्णुभक्त। त्याला दुर्वासे केले त्रस्त। सुदर्शन पाठी लागता त्वरित। अंबरीषा शरण गेले॥१८१॥ दुर्वास गेले द्वारकेत। श्रीकृष्णाने केले स्वागत। सत्त्वहरण करावया उद्युक्त। झाले क्रोधी दुर्वास॥१८२॥ रुक्मिणीस म्हणती 'सत्वर। मज हवी उष्ण खीर। स्वहस्तेच करावी रुचिर। तरीच भक्षीन मी स्वत:'॥१८३॥ राणी रुक्मिणी स्वये राबली। स्वहस्ते खीर शिजविली। महर्षीस भक्षावया दिली।

सुवर्णपात्री उत्तम॥१८४॥ तिची घेऊनि किंचित चव। दुर्वास दाविती आपुले लाघव। म्हणती 'कृष्णा ही खीर लाव। सर्वांगावर तुझिया'॥१८५॥ कृष्णे प्रेमे सर्वांगावर। फासली उष्ण उष्ण खीर। परि तळपायाचा पडला विसर। तेथे नाही लाविली॥१८६॥ दुर्वास म्हणती 'कृष्णा त्वरित। मला बसवूनि आता रथात। तुम्ही उभयता ओढीत रथ। मार्गावरून मिरवावे॥१८७॥ मग रथात बसले मुनी। अश्वांऐवजी कृष्ण-रुक्मिणी। रथ ओढीत मार्गावरुनी। निघाले द्वारका नगरीच्या॥१८८॥ पाहती लोक होऊनि चकित। म्हणती आज घडले अद्‌भुत। जुंपूनि राजाराणीस, रथात। भ्रमती क्रोधी दुर्वास॥१८९॥ भीमककन्या रुक्मिणी कोवळी। रथ ओढता मध्येच थकली। आसूड मारून विव्हल केली। दुर्वासाने तेधवा॥१९०॥ लोक टकमका पाहती। परि न शब्द उच्चारती। क्रोधी दुर्वासाची भीती। मनामनांत दडलेली॥१९१॥ त्यांची सहनशक्ती पाहून। दुर्वास ऋषी झाले प्रसन्न। कृष्णास म्हणती तुज वरदान। देतो प्रसन्न चित्ताने॥१९२॥ प्रसाद म्हणूनि उष्टी खीर। तू लाविली सर्वांगावर। वज्रासमान तुझे शरीर। तेणे झाले जाणावे॥१९३॥ परि तळपाय विसरले। ते खिरीवाचून राहिले। तेथे लागता शस्त्र ठरले। मरण मात्र निश्चित'॥१९४॥ दुर्वास-क्रोधकथा समस्त। गाजल्या ह्या सर्व जगात। परि अनुग्रहही केले क्वचित्। दुर्वासांनी

भक्तांवरी॥१९५॥ पांडवमाता पृथा कुंती। तिने विवाहाआधी प्रीति-। पूर्वक अर्चिले दुर्वासाप्रती। ऋषी झाले प्रसन्न॥१९६॥ त्यांनी पूर्ण संतोषून। केली देवहूती विद्या प्रदान। विद्याप्रयोगे प्राप्त केले संतान। कुंतीने कर्ण, पांडव॥१९७॥ सरितेमध्ये करिता स्नान। दुर्वासवस्त्र गेले वाहून। तेणे लज्जित मनोमन। दुर्वास झाले तेधवा॥१९८॥ नदीप्रवाहाच्या वरती। स्नान द्रौपदी करीत होती। तिने पाहून त्यांची स्थिती। वस्त्र फाडून वाहविले॥१९९॥ दुर्वासाच्या ते हाती लागून। त्यांचे झाले लज्जारक्षण। त्यांच्या वरदाने शीलरक्षण। तिचे झाले कौरवांपुढे॥२००॥ अशा अनुग्रहकथा तुरळक। पुराणांतरी विखुरल्या एकेक। परि क्रोधामुळेच देख। प्रसिद्ध झाले दुर्वास॥२०१॥ दुर्वास विचार करिती अगाध। केवढा अंगी भरला क्रोध। क्रोधामुळेच जगती प्रसिद्ध। ज्ञात नाव जहाले॥२०२॥ क्रोध जावा निखंदूनी। असा हट्ट धरिला मनी। शरण गेले शिवालागूनी। विचारिला उपाय॥२०३॥ शिव म्हणती 'काशीक्षेत्र। तेथे बिल्ववनी पवित्र। शांत मिटूनि दोन्ही नेत्र। आरंभावी तपश्चर्या॥२०४॥ तेणे निर्मल होऊनि मन। क्रोध जाईल मनातून। जे मन झाले अतीव प्रसन्न। तेथे विकार थांबतीना॥२०५॥ मी शिव तुज होईन प्रसन्न। देईन तुजला वरदान'। अवश्य म्हणूनि बिल्ववन। गाठले मुनी दुर्वासांनी॥२०६॥ ध्यान लावूनि मिटले नेत्र। आरंभिले घोर तप:सत्र। काळ किती

लोटला मात्र। शिव प्रसन्न होईना॥२०७॥ भ्रमत चालली कालगती। मनी क्रोधास आली भरती। ऋषीची चढली भृकुटी वरती। नेत्र झाले तांबडे॥२०८॥ म्हणे 'स्वत:स समजतो कोण। हा शिव प्रसन्न होईना अजून। त्यालाच शापितो' म्हणता धावून। आले शिव सामोरी॥२०९॥ म्हणती 'वत्सा होई सावध। तुझा क्रोधच इतुका अगाध। त्याला घालावयास बंध। शक्य न तपश्चर्येसी॥२१०॥ इथेच निवास करावा पुढे। तप आचरावे जमेल तेवढे। शिवगण येतील तुझ्याकडे। विश्वकर्ण नावाचे॥२११॥ पंचवर्ण महासूत्रबोध। ते तुज करितील नि:संदिग्ध। त्याचे मनन करिता क्रोध। तुझा शांत होईल'॥२१२॥ अंतर्धानले शिव क्षणात। दुर्वास राहिले बिल्ववनात। स्मरता हे सर्व हसले मनात। विश्वकर्ण जगद्‌गुरू॥२१३॥ आकाशमार्गे केले गमन। उतरले बिल्ववनी येऊन। दुर्वास बसले लावूनि ध्यान। बिल्ववृक्षाखालती॥२१४॥ कानी येता थोडी चाहूल। उघडिला एक नेत्र विशाल। पाहती तो समोर निश्चल। उभी मूर्ती साजिरी॥२१५॥ मुखावरती चंद्रदीप्ती। ब्रह्मतेजे उजळली कांती। दंड कमंडलू शोभे हाती। पीत कंथा देहावरी॥२१६॥ विश्वातील करुणाजल। भरले असे नेत्र विशाल। चैतन्यच जणू सोज्वळ। मूर्तिमंत पुढे उभे॥२१७॥ दुर्वास उघडूनि दोन्ही नेत्र। रोखूनि पाहती क्षणमात्र। फुलले त्यांचे गात्रन् गात्र। स्वेद-रोमांचकळ्यांनी॥२१८॥ मनातला

क्रोधभाव। हळूच काढता घेई पाय। तरंगू लागे भक्तिसाय। हृदयी प्रेमदुग्धावरी॥२१९॥ कधी नव्हे ते भरले डोळे। प्रेमाश्रूंचे थेंब गळले। मनात म्हणती नवलच घडले। हृदय झाले कोमल॥२२०॥ डोळे उघडताक्षणीच आधी। क्रोध वर्षावा ही होती व्याधी। अवचित आज झाली गर्दी। येथे कशी अश्रूंची?॥२२१॥ मग उठले क्षणार्धात। साष्टांग घातले दंडवत। म्हणती शिवे कथिले ते साक्षात्। आज पाहिले नेत्रांनी॥२२२॥ आपण प्रत्यक्ष शिवगण। जगद्‌गुरू श्रीविश्वकर्ण। ज्ञानसूर्यच तेजोघन। ज्ञानसिंहासनावरी॥२२३॥ पाहताक्षणी रूप सोज्वळ। गळाले मनोमालिन्य सकळ। बुद्धीतले दृढ मूळ। क्षीण झाले क्रोधाचे॥२२४॥ क्रोधे वर वळावी भृकुटी। खदिरांगारे भरावी दृष्टी। अनुभव इतुकाच होता गाठी। आजवरी गुरुदेवा॥२२५॥ डोळ्यांत प्रेमजळाला स्थान। असते हे नव्हते भान। कृपाजलाचे पूर्ण सिंचन। करणे नाही जमलेच॥२२६॥ परि आपुली होता भेट। मनी प्रेमोर्मी उठल्या दाट। वाटे व्यर्थच तुडविली वाट। आजपावेतो क्रोधाची॥२२७॥ तरी स्वामिया आश्रमी यावे। बोधूनि जन्मसाफल्य द्यावे। मनीचे काजळ दूर दवडावे। धन्य करावे मजलागी'॥२२८॥ जगद्‌गुरूंस आश्रमी नेले। यथासांग पूजन केले। पादपूजा करूनि घेतले। पादोदक पवित्र॥२२९॥ दुर्वासास म्हणती विश्वकर्ण। आधी करवीन लिंगधारण। वीरशैवतत्त्वे प्रथम बोधीन। आधी तुजला

साक्षेपे॥२३०॥ लिंग अंग म्हणजे काय। 'स्थल' हे कशास आहे नाव। सामरस्य षट्स्थलादी सर्व। पंचाचार अष्टावरण॥२३१॥ हे आधी आकळिल्यावरी। सूत्रबोध करिता उपरी। तो सहज तुझ्या अंतरी। परिपूर्ण प्रकाशेल'॥२३२॥ लिंगदीक्षा दिधली पूर्ण। कथिले षट्स्थल अष्टावरण। मग आरंभिले बोधन। पंचवर्णसूत्राचे॥२३३॥ चित्तवृत्ती करूनि शांत। दुर्वास झाले एकचित्त। सर्वेंद्रिये आणूनि कर्णात। श्रवण करू लागले॥२३४॥ विश्वकर्ण म्हणती 'भली। शिवे पंचसूत्रे उपदेशिली। ती पंच शिवगणांनी बोधिली। तपोनिष्ठ ऋषींना॥२३५॥ पडविडिसूत्र, वृष्टिसूत्र। लंबनसूत्र, मुक्तागुच्छसूत्र। पाचवे पंचवर्णमहासूत्र। अशी पंचसूत्रे ही॥२३६॥ पडविडी वर्णिते आचाररूप। वृष्टी बोधिते जीवस्वरूप। लंबन प्रकाशे शिवस्वरूप। सृष्टिनिर्मिती मुक्तागुच्छ॥२३७॥ जीव-शिवातला अभेद। पंचवर्णसूत्र करी विशद। शिव जीव सृष्टी त्रिविध। यांतील एकत्व सांगते॥२३८॥ दुर्वासा देई पूर्ण अवधान। बोधितो पंचवर्णसूत्र महान। 'शिव एवात्मा' हे जाण। पंचवर्णमहासूत्र॥२३९॥ यात वर्ण पाच म्हणून। यास 'पंचवर्ण' अभिधान। शिव, एव, आत्मा ही पदे तीन। शिवजीवैक्य बोधिती॥२४०॥ आत्मा म्हणजे जीवात्मा। शिव म्हणजे परम आत्मा। परमात्माच असे जीवात्मा। असा अर्थ सूत्राचा॥२४१॥ मग प्रश्न पडेल गहन। शिवतत्त्व इतुके महान। ते जीवरूपाने लहान।

कसे झाले, का झाले?॥२४२॥ केवळ जाणून शब्दार्थ। काही होणे नाही प्राप्त। म्हणूनि सूत्राचा गूढार्थ। तुज सांगेन दुर्वासा॥२४३॥ शिवतत्त्व असे स्वतंत्र। त्यावाचून सर्व ते परतंत्र। दृष्टीस दिसे जे सर्वत्र। ते परतंत्र जाणावे॥२४४॥ ज्यास मलाचा नसे स्पर्श। जे अत्यंत निर्मल नि:शेष। कल्याणगुणांचा निधी विशेष। त्यास म्हणती शिवतत्त्व॥२४५॥ ते सर्वज्ञ सर्वैश्वर्यसंपन्न। सर्वानुग्राहक कलंकविहीन। सर्व कर्मांचे आराध्य पूर्ण। मंगलगुणसमुद्र॥२४६॥ इच्छा-ज्ञान-क्रियायुक्त। शक्ती अभिन्नत्वे वसे त्यात। जशी प्रभा वसे चंद्रात। एकरूप होऊनी॥२४७॥ त्याला जाणता लाभे शांती। होई अमरपदाची प्राप्ती। आराधनेने अभीष्टपूर्ती। होय जीवमात्राची॥२४८॥ सत्-चित्-आनंदलक्षण। असे शिवपरब्रह्म विलक्षण। चराचरातून त्याचे स्पंदन। अप्रतिहत चाललेले॥२४९॥ सर्व जीवांचे जे जन्मगाव। ते हाच परमानंद शिव। साधना करिती धावाधाव। हेच गाव गाठावया॥२५०॥ परशिव ब्रह्म स्वयंप्रकाशित। जे छत्तीस तत्त्वांच्या अतीत। ते शक्तिस्फुरणाने विभक्त। होते छत्तीस तत्त्वांमध्ये॥२५१॥ परशिवात अभिन्न जी शक्ती। तिचे नाव इच्छाशक्ती। तिचे अंतरंग असे ज्ञानशक्ती। क्रियाशक्ती हे बहिरंग॥२५२॥ परशिव ज्ञानशक्तीत प्रवेशून। करी शिवतत्त्वाचे रूप धारण। हे शिवतत्त्वचि निमित्तकारण। असे सर्व सृष्टीचे॥२५३॥ परशिव क्रियाशक्तीत प्रवेशे।

आणि शक्तितत्त्वरूपे विलसे। हे शक्तितत्त्वचि जगताचे असे। उपादानकारण॥२५४॥ ज्ञानशक्तीच्या उद्रेकावस्थेत। प्रविष्ट होता शक्तितत्त्व। करी इदंतेला आच्छादित। अहंतेने पूर्णत:॥२५५॥ जलात भिजले हरभरे। तशी इदंता अंकुरोन्मुख रूप धरे। तिला अहंता झाकी पुरे। गर्भ-आवरणाप्रमाणे॥२५६॥ मग विश्वस्फुरणाचे ठरे कारण। तेच सदाशिवतत्त्व जाण। पुढती तेच ईश्वररूप होऊन। विश्वस्फूर्तिरूपे भासे॥२५७॥ बीज पेरल्यावरी भूमीत। आधी अंकुरोन्मुख होत। मग ते होई अंकुरित। नंतर अंकुर प्रकटतो॥२५८॥ तशी ज्ञानप्रधान अवस्थेत। शक्ती अंकुरोन्मुख होत। त्या स्थितीस नाव येथ। असे सदाशिवतत्त्व॥२५९॥ क्रियाप्रधान अवस्थेत। शक्ती होई अंकुरित। म्हणती या स्थितीप्रत। ईश्वरतत्त्व असे॥२६०॥ रुद्रतत्त्व, सादाख्य अशी। दुजी नामे सदाशिवतत्त्वासी। दुजे नाव ईश्वरतत्त्वासी। नारायणतत्त्व असे॥२६१॥ ईश्वरतत्त्वचि परिवर्तित। होई शुद्धविद्यातत्त्वात। तेव्हा इदंता-अहंतेत। भास होई ऐक्याचा॥२६२॥ सागराचा तरंग अंगे। सागराचे रूप सांगे। तसे दोहोंत भासू लागे। पूर्ण एकरूपत्व॥२६३॥ मयूरीच्या अंड्यात सुप्त। वसती मोराचे अवयव समस्त। तसे शुद्धविद्यातत्त्वात। वसे विश्व सूक्ष्मरूपे॥२६४॥ शुद्धविद्येच्या ठायी प्रधान। भेदबुद्धी होई उत्पन्न। भेदबुद्धीच्या प्राधान्याने जाण। तीच होई मायातत्त्व॥२६५॥

शुद्धविद्येचा विशेष परिणाम। त्याचेच माया असे नाम। मी शिव नाही हा भ्रम। उत्पन्न करी जीवाठायी॥२६६॥ जीव स्वभावत: असे शुद्ध। मायाप्रभावे होई बद्ध। संसारी होऊनि अनिर्बंध। फिरे लक्ष चौऱ्यांशीत॥२६७॥ स्वये शिव असून मुळात। शिवापासूनि समजे विभक्त। त्याचे ऐश्वर्य अपहृत। माया करी सहजचि॥२६८॥ सर्वकर्तृत्व सर्वज्ञत्व। परिपूर्णत्व आणि नित्यत्व। आणि पाचवे व्यापकत्व। ह्या असती पंचशक्ती॥२६९॥ त्या जीवाठायी संकोचून। क्रमश: कला, विद्या, राग जाण। काल आणि नियती होऊन। मूलरूपास झाकिती॥२७०॥ सर्वकर्तृता शक्ती संकोचता। जीव होई अल्पकर्ता। त्या शक्तीस संबोधती आता। कलातत्त्व नामाने॥२७१॥ सर्वज्ञता शक्ती संकोचून। जीव अल्पज्ञ राहे होऊन। तेच विद्यातत्त्व जाण। ज्ञान करी मर्यादित॥२७२॥ पूर्णता शक्ती होई अपूर्णता। माला चंदन आणि वनिता। आदी विषयी आसक्त करी सर्वथा। तेच रागतत्त्व असे॥२७३॥ नित्यता शक्ती संकोचून। भूत भविष्य वर्तमान। असे देई कालभान। कालतत्त्व ते जाणावे॥२७४॥ सरूनि सर्वव्यापकता। मी हे करीन, ते करीन आता। अशी नियंत्रणबुद्धी होता। तेच जाणावे नियतितत्त्व॥२७५॥ कलेपासूनि नियतीपर्यंत। पंचतत्त्वे आच्छादिती जीवाप्रत। लोपिती मूलरूप तेणे प्राप्त। नाव यास कंचुक हे॥२७६॥ कंचुक म्हणजे वस्त्र पाही। ते मूळ अंग झाकूनि

ठेवी। तसे जीवात्म्याचे शुद्ध रूप ही। तत्त्वे पाच झाकिती॥२७७॥ शिवांश जीव मायाशक्तीमुळे। स्वत:स मानी शिवावेगळे। तेच पुरुषतत्त्व म्हणविले। आच्छादिले कंचुकाने॥२७८॥ स्फुल्लिंग जन्मती अग्नीतून। तसे असंख्य जीवात्मे शिवातून। जन्मूनि मलत्रयाने वेष्टून। संसारात परिभ्रमती॥२७९॥ कथन केली जीवनिर्मिती। दुर्वासा सांगेन विश्वनिर्मिती। प्रतिस्फुरण पावता इच्छाशक्ती। प्रकृतितत्त्व जन्मते॥२८०॥ सुख-दु:ख-मोहात्मक। सत्त्व-रज-तम नामक। हे त्रिगुण मिळूनि देख। असे प्रकृतितत्त्व हे॥२८१॥ तिन्ही गुण समसमान। ती प्रकृतीची साम्यावस्था जाण। त्यांचे विघडता प्रमाण। होई उत्पन्न सृष्टी ही॥२८२॥ पुढती अहंकारापासून। पृथ्वीपर्यंत तेवीस तत्त्वे उत्पन्न। होती त्यांचे मूलकारण। असे हीच प्रकृती॥२८३॥ हा मी आणि हे माझे जाण। असा उत्पन्न होय अभिमान। तो अहंकार, जे निश्चय करी पूर्ण। ते असे बुद्धितत्त्व॥२८४॥ संकल्प-विकल्पाचे साधन। ते मनस्तत्त्व होई उत्पन्न। मन, बुद्धी, अहंकार मिळून। अंत:करण म्हणती त्यास॥२८५॥ श्रोत्र-त्वक् आदी पंच ज्ञानेंद्रिये। वाक्-पाणि आदी पंच कर्मेंद्रिये। शब्दस्पर्शादी पंचविषय। आकाश-पृथ्व्यादी पंच महाभूते॥२८६॥ अशी वीस तत्त्वे होती। एकूण छत्तीस तत्त्वांची गणती। शिवशक्ती तत्त्वातून निर्मिती। झाली चराचर सृष्टीची॥२८७॥ मूलतत्त्व जे शिव। तेच जगती भासे जीव।

आपुल्या शिवत्वाची जाणीव। नसे किंचित् जीवाला॥२८८॥ म्हणूनि भान द्यावया जीवांस। शिवाने केला सूत्रोपदेश। 'शिव एव आत्मा' हेच रहस्य। असे जीव-सृष्टीचे॥२८९॥ अभेदत्व, व्यापकता त्यागून। भेददृष्टीच्या होई आधीन। तेव्हा इच्छाशक्ती संकोचून। अपूर्ण होई जीवात्मा॥२९०॥ आपण केवळ आहो देह। देह जाता नाशते सर्व। या स्थितीस असे नाव। आणवमल दुर्वासा॥२९१॥ ज्ञानशक्ती संकोचून। भेदज्ञानाने भरे मन। अल्पज्ञत्व मांडे ठाण। पूर्ण जीवबुद्धीत॥२९२॥ जीवाला अल्पज्ञतेमुळे। दिसे जीव, शिव, जगत् वेगळे। भेदबुद्धीने जळे तळमळे। याचे नाव मायामल॥२९३॥ संकोचता क्रियाशक्ती। सरे सर्वकर्तृत्वशक्ती। किंचित् कर्तृत्वाचा जगती। धनी होऊनि वावरे॥२९४॥ मग कर्मेंद्रियांद्वारे। जगती शुभाशुभ कर्मे आचरे। कर्मांस जे कारण ठरे। तोच जाण कार्मिक मल॥२९५॥ सर्वकर्तृत्व, सर्वज्ञत्व। पूर्णत्व आणि नित्यत्व। आणि पाचवे व्यापकत्व। ह्या शक्ती होती संकुचित॥२९६॥ संकोचूनि ह्या शक्ती। कला, विद्या, राग, काल, नियती। या नामे जीवाठायी वसती। तेणे जीवभाव दृढावे॥२९७॥ होता शक्ती संकुचित। त्रिमलाने होऊनि आवृत्त। जीवात्मा संसारी राहे भ्रमत। शक्तिदरिद्र होऊनी॥२९८॥ ह्या शक्तींचा करिता विकास। आणि तोडिता त्रिमलाचे पाश। जीव पावे मूलरूपास। होई स्वये शिवरूप॥२९९॥ शक्ती संकोचती ज्या क्रमाने।

त्याच विकसती विपरीत क्रमाने। शक्तिविकास होता पूर्णपणे। होई लिंगांगसामरस्य॥३००॥ हे साधावया भक्तिपूर्वक। शिवाराधना करणे एक। हाचि उपाय असे देख। अन्य नसे कोणता॥३०१॥ विवेक जिज्ञासा वैराग्य पूर्ण। अंगी आपुल्या दृढ बाणवून। शुद्ध करूनि अंत:करण। श्रीगुरुचरणी बसावे॥३०२॥ अंग-लिंगतत्त्व जाणावे। गुरूकडूनि लिंगधारण करावे। इष्ट, प्राण, भावलिंगपूजनी रत व्हावे। जपावा सर्वदा पंचाक्षरी॥३०३॥ भस्मरुद्राक्ष, त्रिपुंड्रधारण। करूनि सुशोभित करावे तन। पंचाचार जाणूनि पूर्ण। ते आणावे आचरणी॥३०४॥ अष्टावरण अंगीकारावे। षट्स्थलांस उमजूनि घ्यावे। भक्तस्थली प्रवेशूनि भावे। करावा षट्स्थलप्रवास॥३०५॥ सूर्य हळूहळू चढे आकाशी। साधना पक्व होई तशी। स्थले लंघीत ऐक्यपदासी। क्रमाक्रमाने पोहोचावे॥३०६॥ तेथे जीव शिवा होय भेट। जन्ममरणाचे तुटे चऱ्हाट। लाभे मूळ शिवरूप विराट। जीवात्म्यास आपुले॥३०७॥ जीवाचा झाल्यावरी शिव। पुसे भेदबुद्धीचे नाव। जीव, शिव, जगत् हे सर्व। काही काही उरेना॥३०८॥ जन्मोजन्मीची धावाधाव। तेथे अवघी होते वाव। उरेचिना नाव गाव। केवळ शिव संचला॥३०९॥ जेथूनिया आला जीव। तेथेच पुन्हा झाला शिव। शिव होण्यावाचून प्राप्तव्य। नसेच अन्य जीवाला॥३१०॥ 'शिव एवात्मा' हे सूत्र। हाच जाणवा महामंत्र। मीच आत्मरूपे

सर्वत्र। व्याप्त आहे हे बोधितो॥३११॥ हे पंचवर्णमहासूत्र। शिवजीवैक्याचे सूत्र। त्याचा भूवरी सर्वत्र। करी प्रसार दुर्वासा॥३१२॥ दृढ होता हे शिवज्ञान। आप पर उरेना कोण। क्रोधासाठी लागे कारण। मी आणि पर हे॥३१३॥ जेथे उरलाच नाही पर। तेथे रागवावे कोणावर?। क्रोध भेदबुद्धीचा कुमर। सत्य जाण दुर्वासा॥३१४॥ जरी पुढती दुसरा कोणी। उभा तरीच भडके क्रोधाग्नी। जर जळी स्थळी काष्ठी पाषाणी। तूच तू एक संचला॥३१५॥ मग येईल कसा क्रोध?। क्रोध जीवाची करी पारध। गळता जीवाचे भेदबंध। क्रोधा स्थान उरेना'॥३१६॥ जगद्‌गुरूंच्या अमृतबोले। झाले ऋषींचे नेत्र ओले। सात्त्विक भावे सर्वांग फुलले। अश्रू गळले कपोली॥३१७॥ दंडवत करूनि प्रणाम। म्हणे 'जहालो मी पूर्णकाम। जीवमात्रांचे परमधाम। तेच आज बोधिले॥३१८॥ धन्य झाले जन्मा येणे। फिटले कर्णांचे पारणे। शिवजीवैक्याचे केणे। आज दिसले दृष्टीला॥३१९॥ संतयोग्यांचे जे जिव्हार। देवीदेवतांचे माहेर। आज केले दृष्टिगोचर। जगद्‌गुरूंनी कृपेने॥३२०॥ खराच झालो आज धन्य। क्रोध पळाला मनातून। शिवाद्वैताने पूर्ण प्रकाशून। गेले माझे अंतर॥३२१॥ डोई ठेवणे केवळ पायी। भान इतुकेच माझ्याठायी। जन्मोजन्मी होणे नाही। उतराई गुरुऋणातून॥३२२॥ आपण सूत्र दिले हाती। ते मी प्रसारीन जगती। माझ्याच भाग्याचा मजप्रती। हेवा वाटे

गुरुदेवा' ॥३२३॥ असे बोलूनि वारंवार। दुर्वास करिती नमस्कार। आशिष देऊनि निघाले सत्वर। विश्वकर्ण जगद्‌गुरू॥३२४॥ वर्षानुवर्षे भ्रमूनि भूवर। अप्रतिहत केला संचार। लिंगदीक्षा देऊनि नारी नर। केले लिंगदीक्षित॥३२५॥ जगती शिवाचार रूढविला। शिवभक्तीचा गजर केला। महिमा वृद्धिंगत केला। काशीज्ञानपीठाचा॥३२६॥ अंती काशीक्षेत्री आले। अवतारकार्य पूर्णत्वास गेले। विश्वनाथलिंगात विलीन झाले। कार्य मागे ठेवूनी॥३२७॥ पुढे द्वापरयुग सरले। भूवरी कलियुग आले। लिंगातून पुन्हा अवतरले। विश्वाराध्य नावाने॥३२८॥ ती काशीपीठाची कथा। पुढील अध्यायी वर्णीन आता। एकवटूनि आपुल्या चित्ता। अवधारावी श्रोत्यांनी॥३२९॥ श्रीकाशीज्ञानसिंहासनाधीश्वर। जगद्‌गुरू महास्वामी श्रीचंद्रशेखर। त्यांच्या आज्ञेने ग्रंथ मधुर। रचितो शेषनारायण॥३३०॥ श्रीजगद्‌गुरू पंचाचार्य विजय रसाळ। परिसोत भाविक भक्त प्रेमळ। शिवभक्तमने व्हावी प्रफुल्ल। दशमोऽध्याय गोड हा॥३३१॥

॥ श्रीजगद्‌गुरु पंचाचार्यार्पणमस्तु ॥

□□

# अध्याय अकरावा

## श्रीकाशीपीठ, ज्ञानसिंहासन (उत्तरार्ध)

मंगलाचरण, प्रास्ताविक (ओवी १-१३), कलियुगातील अनर्थ (१४-१९), ज० विश्वाराध्यांचे लिंगावतरण (२०-२५), काशीनरेशाची प्रार्थना (२६-३१), जगद्गुरूंचे उत्तर (३२-३४), राजास लिंगदीक्षा, सिंहासनारोहण व कार्य (३५-३९), ज० विश्वाराध्यांचा उपदेश (४०-६५), संचार, धर्मकार्य (६६-६९), प्रयागक्षेत्रात पंचाचार्यांचे आगमन (७०-७१), प्रयागमाहात्म्य (७२-८६), संगमस्नान, पूजा, उपदेश (८७-९१), काशीत सत्कार, ज्ञानपीठात आगमन (९२-९३), काशीराजाची धन्यता (९४-९७), पूजा, प्रसाद, उपदेश (९८-१११),काशीवासियांची धन्यता (११२-११५), पंचाचार्यांचा संवाद (११६-१२१), लिंगस्थापना, लिंगस्थापनेची प्रथा (१२२-१२९), चार आचार्यांचे प्रस्थान (१३०-१३१), ज० विश्वाराध्यांचे कार्य व अवतारसमाप्ती (१३२-१४१), काशीपीठ : गोत्राचे स्पष्टीकरण (१४२-१४९), गोत्रपुरुष स्कंद : कथा (१५०-२३०), ज० काशीपीठाधिपती व त्यांचे कार्य (२३१-३४९), ग्रंथाचा उपसंहार (३५०-३९०)

# अध्याय अकरावा

॥ श्रीगणेशाय नमः॥ श्रीजगद्‌गुरु विश्वाराध्याय नमः॥

ॐ शिवाय नमः भुजंगभूषणाय। शूलपाणये नमः चारुविक्रमाय। अहिर्बुध्न्याय नमः अव्यव्रताय। जगद्रूपिणे नमः भगनेत्रहृते॥१॥ ॐ शिवाय नमः रुद्राय। जगद्‌गुरवे नमः महासेनजनकाय। ॐ शिवाय नमः तारकाय। नमः शिवाय परमात्मने॥२॥ नमो शुद्धसुगंधसुलेपिता। कनक-महामणिभूषिता। सिद्धसुरासुरनरवंदिता। ज्योतिर्मयस्वरूपा ॥३॥ नमो अनंत ब्रह्मांडनायका। नमो अष्टदरिद्रविनाशका। नमो संचितपापविनाशका। सच्चिदानंदस्वरूपा॥४॥ नमो परमात्मया परात्परा। कामदहना करुणाकरा। नमो दिनकरकोटिप्रभाकरा। सर्वसमुद्भवकारणा॥५॥ सर्व भक्तांची तू माऊली। धरिशी भक्तांवरी कृपासावली। तुझ्या कृपेनेच ही आली। ग्रंथयात्रा कळसाकडे॥६॥ तुझ्या नामी लावूनि लक्ष। राहिलो वाटचालीत दक्ष। कधी आले अखेर लक्ष्य। तेही नाही कळाले॥७॥ तुझ्या पायी प्रेमनिष्ठा। ठेविता अर्पिशी तू प्रतिष्ठा। अशी महिमा नीलकंठा। आली माझ्या प्रत्यया॥८॥

नाव कीर्ती संपादिणे। नव्हेच यासाठी हे लिहिणे। बांधवांसी समजावणे। चार गोष्टी युक्तीच्या॥९॥ नियतीने काही भार। टाकिला आपुल्या खांद्यावर। तो जमेल तेवढा वाहणे दूर। हाती इतुके माझिया॥१०॥ कळते जेवढे ते सांगावे। आपुले कार्य पूर्ण करावे। कोणी घेवो नाव ठेवो नावे। काही नसे कर्तव्य॥११॥ शिवाबाई माझी माय। लिहवी आता कळसाध्याय। आरंभिलेले लेखनकार्य। करवूनि घेई पूर्ण तू॥१२॥ श्रोतेहो गताध्यायी ऐकिले। विश्वकर्णांनी दुर्वासा बोधिले। आणि प्रबोधन करूनि संपविले। अवतारकार्य आपुले॥१३॥ कालचक्र राहिले भ्रमत। दिस मास गेले सरत। उलटली संवत्सरे अगणित। आले कलियुग भूवरी॥१४॥ पुनश्च जहाले सैरभैर। पृथ्वीवरती नारी नर। अनिर्बंध स्वैराचार। पुन्हा माजला भूलोकी॥१५॥ रक्ताची विसरली नाती। स्त्री पुरुष उरल्या जाती। अहंगंडाने हीन लेखती। परस्परांना माणसे॥१६॥ साधुसंत जे होते थोडे। त्यांना म्हणती सर्व वेडे। संतसज्जनांचे धिंडवडे। निघती मार्गामार्गावरी॥१७॥ सुशील होत्या स्त्रिया काही। त्यांना वाली उरला नाही। दुर्वर्तनाचीच गाजे द्वाही। कोणी नसे कोणाचे॥१८॥ चोऱ्यामाऱ्या कलह तंटे। यांचे आले पूर मोठे। जो तो जीवावरती उठे। क्रोध येता दुसऱ्याच्या॥१९॥ असा भूवरी होता अनर्थ। आज्ञा देती कैलासनाथ। विश्वेशलिंगातूनि अवतरित। पुन्हा जहाले जगद्गुरू॥२०॥

महाशिवरात्री मंगल काळी। भक्त गाती शिवनामावली। ऐन मध्यरात्री अवतरली। लिंगातूनि शिवमूर्ती॥२१॥ कटीस कंथा पीतवर्ण। सर्वांगी शुभ्र भस्मलेपन। भाळी शोभे त्रिपुंड्र सघन। कंठी रुद्राक्षमालिका॥२२॥ शिरी कृष्ण जटाभार। विलसे इष्टलिंग मनोहर। शोभती साजिरे दोन्ही कर। दंड-कमंडलूंनी॥२३॥ उत्तरीय वेढिले पीत। मुखावरी शीतल स्मित। नेत्री वाहे करुणास्रोत। भिजवू पाहे भक्तमना॥२४॥ अशी प्रशांत सौजन्यमूर्ती। पाहूनि लोचन धन्य होती। श्रद्धाभारे भक्त लोटती। चरणांवरी शिवगणाच्या॥२५॥ सभाजन घेऊनि संगती। दर्शना आला काशीनृपती। वंदूनि म्हणे 'धन्य जगती। कीर्ती गाजे क्षेत्राची॥२६॥ आधीच हे क्षेत्र महान। येथे नांदतो उमारमण। काशीस विसंबेना एक क्षण। म्हणूनि अविमुक्त काशी ही॥२७॥ येथे ज्ञानी विद्वज्जन। होऊनि गेले तपस्वी महान। सर्व देवदेवतांनी स्थान। दृढ केले या ठायी॥२८॥ सुवर्ण व्हावे सुगंधित। की गंगाजल व्हावे अमृत। तसाच घडला सुयोग येथ। आपुल्या प्रकटनाने॥२९॥ आधीच हे ज्ञानतीर्थ। त्यात आपण झाला अवतरित। आपुल्या श्रीमुखे शिवाद्वैत। झरेल नगरीत ह्या'॥३०॥ असे बोलूनि वंदी भावे। म्हणे 'राजप्रासादी यावे। उपदेशूनि धन्य करावे। आम्हा शिवभक्तांना'॥३१॥ शिवगण हसले प्रसन्नपणे। म्हणती 'राया झाले येणे। कलियुगी शिवाचार बोधणे। अवघ्या मानवमात्रांसी॥३२॥

जंगमवाटिकेत महान। आहे आमुचे ज्ञानसिंहासन। तेथूनीच केले प्रवर्तन। शिवाचाराचे युगीयुगी॥३३॥ प्रासादातच नव्हे केवळ। भ्रमीन अवघे भूमिमंडळ। लिंगदीक्षा देऊनि सबळ। करीन शिवाद्वैत हे' ॥३४॥ सन्मानूनि जगद्‌गुरूंस। मिरवीत नेले राजगृहास। दिली राजपरिवारास। लिंगदीक्षा तयांनी॥३५॥ मग राजा-भक्तांसमवेत। आले जंगमवाटिकेत। झाले जगद्‌गुरू अधिष्ठित। ज्ञानसिंहासनावरी॥३६॥ गंध दरवळवा सर्वदूर। तसे शिवज्ञान वितरे भूवर। दर्शना असंख्य नारी नर। येऊनि धन्यता अनुभवती॥३७॥ करवूनि इष्टलिंगधारण। पंचाचार अष्टावरण। आणि षट्स्थलसिद्धान्त महान। बोधिती भक्तजनांसी॥३८॥ स्वैराचारी होते रमले। ते सन्मार्गावरती आले। विश्वाराध्यांचे अनुभविले। तप:सामर्थ्य सकलांनी॥३९॥ जगद्‌गुरू जना बोधिती। 'स्त्री भोगाची नव्हे मूर्ती। जशी शिवासवे वसे पार्वती। तशी वंद्य मानावी॥४०॥ ती बाळाला जन्म देते। पाळते पोसते लळे पुरविते। तिच्या कुशीतच बाल्य खेळते। अवघ्या जीवजगताचे॥४१॥ पत्नी माता दुहिता भगिनी। अशा रूपांनी येते जीवनी। सर्वमांगल्याची जननी। रूप जगन्मातेचे॥४२॥ स्त्री असो वा पुरुष कोण । सतीत्व अंगी बाणल्याविण। शिवसामरस्याचे स्थान। प्राप्त होणे शक्य नव्हे॥४३॥ शिव पती भक्त सती। असाच भाव असावा चित्ती। स्त्रीसती झाल्याविण गती। नाही

वीरशैवधर्मात॥४४॥ जन्मे सतीरूपाने स्त्री। म्हणूनि मानावी मुक्तिदात्री। मानखंडना दिनरात्री। करू नये कदाही॥४५॥ हेच भक्तांना बोधावयाला। शिव अर्धनारीश्वर झाला। शक्तिसहित शिव स्वीकारिला। वीरशैव धर्माने॥४६॥ फांद्या फुले पर्णसंभार। घेऊनि वृक्ष डोले समोर। तसा विश्वरूपाने गोचर। शिव झाला जाणावे॥४७॥ शिव आहे तरी कोठे?। असा आक्रोश करणे खोटे। अंत:चक्षू उघडिता भेटे। शिव भोवती सर्वत्र॥४८॥ पशू पक्षी जलचर प्राणी। सूक्ष्म अतिसूक्ष्म जीवयोनी। अवघ्या स्थिरचर सृष्टीतूनी। तोच हसतो दृष्टीपुढे॥४९॥ पर्णांवरी नाचता थेंब। तोच बोलतो 'येतो थांब'। भिजता पाऊसधारांत चिंब। तोच बिलगतो अंगाशी॥५०॥ गंध घेऊनि वायूसंगे। तोच सुखवी अंगोपांगे। पुत्रपौत्ररूपांनी बिलगे। तोच अतीव प्रेमाने॥५१॥ पर्ण वाऱ्याने मंद हलते। तेव्हा त्याची चाहूल कळते। सागरगाज कानी पडते। तोच बोलतो गंभीर॥५२॥ असा अवतीभोवती शिव। स्पष्ट उभा असतो सदैव। त्याला शोधाया धावाधाव। वेडा मानव करितो हा॥५३॥ शिवमयचि सर्व जगत्। तत्त्व हे बोधितो वीरशैवसिद्धान्त। दृष्टीत दृढ होता शिवाद्वैत। भेद मुळी उरेना॥५४॥ काळा गोरा उच्च नीच। या भेदांसी अर्थ नसेच। प्रकटे केवळ शिव एकच। सर्व स्थिरचर सृष्टीतूनी॥५५॥ मग वर्ण नि जात काढूनी। का कोणास हिणवावे कोणी?। स्त्री-पुरुषांस भिन्न

मानूनी। व्यर्थ कशाला छळावे?॥५६॥ रूपगर्विता, कुरूप हीन। विशाल हत्ती, मुंगी सान। अष्ट दरिद्री वा धनवान। उच्चकुलीन वा पतितही॥५७॥ या सर्वही रूपांतून। प्रकटे एकचि शिव महान। म्हणूनि आदरभावे पूर्ण। प्रत्येकाशी वर्तावे॥५८॥ मी आहे उच्चकुलीन। हा व्यर्थ असे अभिमान। सर्वच शिवरूप समसमान। मानिले वीरशैवधर्माने॥५९॥ देहावरती रुळते लिंग। जाणीव ही असावी अभंग। शिवाचाराचा होईल भंग। असे वर्तन करू नये॥६०॥ हातामध्ये आहे बळ। म्हणूनि करू नये छळ। प्राणी जीवजंतू दुर्बळ। मारू चिरडू नये कधी॥६१॥ विरोधरहित तो वीरशैव। असा दृढ धरावा भाव। भिन्नमार्गी म्हणूनि नाव। कोणा कधी ठेवू नये॥६२॥ भिन्न मार्गे सरिता वाहती। अंती सागरातच मिळती। म्हणूनि अन्य देवा वंदिती। त्यांना कधी निंदू नये॥६३॥ विरोधभावना मनातून। समूळ टाकावी छेदून। आणिक समभावाने वर्तन। सदासर्वदा करावे'॥६४॥ विश्वाराध्यांचे अमृतशब्द। ऐकूनि मनी भरे आनंद। तोषूनि जन वंदिती पद। म्हणती धन्य जगद्गुरू॥६५॥ असे बोधीत नारी नर। जगद्गुरू भ्रमती भूमीवर। पूर्व आणि पश्चिमोत्तर। आर्यावर्तात हिंडले॥६६॥ आकाशमार्गे नेपाळात। जाऊनि तेथे जहाले ख्यात। वेधिले बोधिले अनंत। तेथे भक्तजनांसी॥६७॥ तेथे मठ स्थापिला सुंदर। जंगम-भक्तांस केले स्थिर। नेपाळ देशी भक्तपूर। तेथे मठ असे हा॥६८॥

चेतविली मनामनांत। शिवभक्तीची निर्मल ज्योत। अंती परतूनि ज्ञानपीठात। अन्य आचार्यांस आमंत्रिले।।६९।। रंभापुरीचे रेवणाराध्य। उज्जयिनीचे मरुळाराध्य। केदारचे एकोरामाराध्य। पंडिताराध्य श्रीशैलम्चे।।७०।। काशीचे विश्वाराध्य शिवगण। उतरले प्रयागक्षेत्री महान। त्रिवेणी संगमी मंगलस्नान। केले अतीव आनंदे।।७१।। गंगायमुना सरस्वती। ह्या तीन सरिता तेथे मिळती। त्या क्षेत्राची अपार महती। वर्णिली पुराण-ग्रंथांतरी।।७२।। श्रोतेहो समुद्रमंथन झाले। तेव्हा अमृत हाती आले। सुरांसवेच असुरही धावले। अमृतकुंभ घेण्यासी।।७३।। जरी असुरा अमृत लाभेल। तरी ते अवघे अमर होतील। आणि अनंत काळ छळतील। देव-मानवादिकांस।।७४।। म्हणूनि विष्णूने गरुडास। सोपवूनि अमृतकलश। तो स्वर्गी न्यावयास। आज्ञा दिली चातुर्ये।।७५।। गरुडाने धरूनि अमृतकुंभ। पंखबळे गाठले नभ। परि अमृताचे पडले थेंब। चार ठायी कलंडूनी।।७६।। हरिद्वार, प्रयाग, उज्जयिनी। आणि नाशिक ह्या चहुस्थानी। कुंभातील थेंब पडले म्हणूनी। तेथे भरतो कुंभमेळा।।७७।। द्वादश वर्षांनी माघमासी। महाकुंभ भरतो प्रयागासी। देशोदेशीचे साधुसंन्यासी। जमती भक्तिभावनेने।।७८।। गंगायमुना तेथे मिळती। एक होऊनि वाहती पुढती। गुप्त असे सरस्वती। म्हणती त्रिवेणी संगम।।७९।। तसे सर्व सांप्रदायिक। कुंभमेळ्यात येती सात्त्विक। पुराण-प्रवचने

करिती तात्त्विक। तीच जणू सरस्वती॥८०॥ अशी सरस्वती गुप्त। गंगा-यमुनेचे ओघ मूर्त। तिन्ही समरस होऊनि वाहत। भेद पुढे दिसेना॥८१॥ तसे विविध धर्म संप्रदाय। भिन्न दिसे त्यांचे कार्य। परि त्यांचे अंतिम ध्येय। असे एकच निश्चित॥८२॥ असेच जणू त्रिवेणी। संगम बोधितो सर्वांलागूनी। कुंभ-महाकुंभांतूनी। हाच आशय भरलासे॥८३॥ प्रतिवर्षी माघमासी। लोक राहती त्रिवेणी तीरासी। कल्पवास म्हणती तयासी। करिती अध्यात्मसाधना॥८४॥ करावे रात्रंदिन शिवचिंतन। मूठभर धान्य खावे शिजवून। अशी द्वादश वर्षे होता पूर्ण। मग घेती संन्यास॥८५॥ ही परंपरा भक्तिपूर्वक। अद्यापि पाळिती भक्त भाविक। असे स्थानमाहात्म्य देख। असे प्रयागक्षेत्राचे॥८६॥ अशा पवित्र संगमात। महाकुंभाचे करूनि निमित्त। पंचाचार्य झाले सुस्नात। प्रसन्न झाले अंतरी॥८७॥ मग गंगातीरीच्या विख्यात। आले जंगमवाडी मठात। तेथे प्रयागराज मंदिरात। बिल्व-फुले वाहिली॥८८॥ पंचाचार्य आले आले। असे भक्ता विदित झाले। दर्शनास्तव सर्व जमले। भक्तिभावे प्रयागी॥८९॥ रम्य झाला पूजासोहळा। आनंदूनि गेला भक्तमेळा। पादोदक प्रसाद घेऊनि झाला। तृप्त धन्य अंतरी॥९०॥ मग वाणीतून स्रवले अमृत। जनांस बोधिले शिवाद्वैत। श्रवूनि झाले परम तृप्त। लोटले आचार्यचरणांवरी॥९१॥ तीन दिवस तेथे क्रमिले। उपरी काशीक्षेत्री आले। काशीराजाने सन्मानिले।

मिरवीत नेले पालखीतूनी ॥९२॥ आले सर्व आचार्य गण। परस्परांशी नमस्कारून। करांमध्ये कर मिळवून। आले पीठाभीतरी ॥९३॥ काशीनरेशाने पुष्पहार। अर्पूनि केला सत्कार। साष्टांग केला नमस्कार। पंचाचार्य चरणांवरी ॥९४॥ म्हणे 'धन्य झाले जीवन। पंचाचार्यांचे वंदिले चरण। वाटे प्रत्यक्ष पंचानन। दृष्टीपुढे अवतरला ॥९५॥ पंचमुखी विश्वेश्वर। जणू जहाला सगुण साकार। एकेठायी पंच गुरुवर। पाहूनि झालो रोमांचित' ॥९६॥ अशी धन्यता व्यक्त करून। वंदिले पंचाचार्यचरण। असंख्य जमले भक्तगण। त्यांनी चरण वंदिले ॥९७॥ मग काशीपीठात रंगला। पंचाचार्यांचा पूजासोहळा। भक्तनेत्री आनंदजळा। पूर दाटला अनिवार ॥९८॥ हर्षे करिती जयजयकार। शिवस्तोत्रे गाती मधुर। करिती शिवनामगजर। जय जय शंभो हर शंभो ॥९९॥ जयघोषाने झाला कल्लोळ। दुमदुमले अवघे अंतराळ। असा अपूर्व वाद्यताल। की ज्ञानपीठचि गजबजले ॥१००॥ वेदज्ञ आले आले पंडित। जमले सर्व ऋषी महंत। जणू शिवगणांच्या मेळ्यात। बसले पंचपरमेश्वर ॥१०१॥ वीरवृत्ती, सद्धर्मसाज। प्रखर वैराग्य, सूर्यतेज। आणि प्रशांत ज्ञान सहज। जणू तेथे एकवटले ॥१०२॥ पंचाचार्यांची पादपूजा। सप्रेमे करी काशीराजा। प्रसादपादोदक घेऊनि प्रजा। आणि राजा धन्य झाले ॥१०३॥ पंचाचार्यांच्या जयजयकारे। गर्जले काशीनगर सारे। अंगावरती आले शहारे। अपूर्व

पाहूनि सोहळा॥१०४॥ उपरी सर्व ऋषी महंत। राजा आणि भक्त समस्त। श्रवण करिती बोधामृत। जगद्गुरूंचे शांतपणे॥१०५॥ पडविडी सूत्राचा आधार। घेऊनि बोधिला पूर्ण शिवाचार। रेवणाराध्यांनी केले सुंदर। भाष्य पहिल्या सूत्रावरी॥१०६॥ वृष्टिसूत्र सांगूनि गहन। बोधिले जीवस्वरूप पूर्ण। मरुळाराध्यांनी अर्थपूर्ण। केले विवेचन सूत्रावरी॥१०७॥ सांगूनिया लंबनसूत्र। शिव प्रकाशतो एकमात्र। त्याचे स्वरूप वर्णिले समग्र। एकोरामाराध्यांनी॥१०८॥ सृष्टिनिर्मितीचे रहस्य। मुक्तागुच्छ सूत्राधारे विशेष। बोधिले सर्व भक्तजनांस। प्रेमे पंडिताराध्यांनी॥१०९॥ जीव-शिवात नसे भेद। त्यांच्यातला पूर्ण अभेद। विश्वाराध्यांनी केला विशद। पंचवर्णसूत्राधारे॥११०॥ पंचाचार्यांची अमृतवाणी। ऐकूनि तृप्त झाले कर्णी। देहलता रोमांचांनी। बहरून गेली सकलांची॥१११॥ म्हणती 'आम्ही धन्य पूर्ण। काशीपुरीचे सकल जन। पंचाचार्यांचे एकेठायी दर्शन। झाले आम्हा काशीजना॥११२॥ या महद्भाग्याशी तुळावे असे। अन्य कोणते पुण्यचि नसे। पूर्वपुण्याचे पाउलठसे। उमटले हेचि जाणवे॥११३॥ संत ऋषी योगीश्वर। काशीत वास करिती निरंतर। आज आले पंचपीठाधीश्वर। कळस चढला सुवर्णाचा'॥११४॥ अशी धन्यता पूर्ण अंतरी। अनुभवूनि गेले घरोघरी। मग पंचाचार्यांची वैखरी। सिद्धान्त चर्चू लागली ॥११५॥ अपार ज्ञानचर्चा

झाली । हृदयकपाटे मोकळी केली । प्रत्यक्ष शिवानेच भूतली । धाडिले जना बोधाया ॥११६॥ शंकर जरी पंचमुख । तरी पंचमुखांतील स्वर एक । तसे आचार्य दिसती अनेक । तरी सिद्धान्त एकचि ॥११७॥ सूत्रे जरी दिसती पाच । सर्व मिळूनि आशय एकच । म्हणूनि सर्वत्र एकमुखेच । धर्मप्रवर्तन करावे ॥११८॥ पाच पीठे पंचरंगी । पण सूत्र एकचि अंतरंगी । जशी फुले विविध रंगी । एका सूत्रात ओविली ॥११९॥ म्हणूनि करावी वज्रमूठ । आक्रमावी एकच वाट । जन करावे शिवाचारनिष्ठ । असा एकचि निर्धार ॥१२०॥ असा जहाला मुक्त संवाद । मनी दाटला परमानंद । नमस्कारी आचार्यवृंद । परस्परांशी सप्रेमे ॥१२१॥ मग आचार्यांनी मिळून । गंगास्नान, विश्वनाथदर्शन । करूनि केली लिंगे स्थापन । ज्ञानपीठाभीतरी ॥१२२॥ रंभापुरीचे सोमेश्वरलिंग । उज्जयिनीचे सिद्धेश्वरलिंग । केदारचे केदारेश्वरलिंग। मल्लिकार्जुनलिंग श्रीशैलचे ॥१२३॥ पंचाचार्य आले पीठात । याची स्मृती राहावी जागृत । म्हणूनि स्वहस्ते केली स्थापित । लिंगे स्वये आचार्यांनी ॥१२४॥ श्रोतेहो काशीपीठात अजून । भक्त घेती या लिंगांचे दर्शन । काशीपीठात लिंगस्थापन । करणे झाली परंपरा ॥१२५॥ दिवंगत आप्तांची स्मृती । लिंगे स्थापून जागृत ठेविती । ही प्रथा पुरातन अती । आचार्यांनी आरंभिली ॥१२६॥ म्हणूनि काशीक्षेत्री यावे । भावे पवित्र गंगेत

न्हावे। विश्वनाथाचे दर्शन घ्यावे। यावे ज्ञानपीठात ॥१२७॥ तेथे पूर्वजांच्या नावे। विधिपूर्वक लिंग स्थापावे। काशीयात्रा घडली जाणावे। शिवैक्यानंतर त्यांनाही ॥१२८॥ प्रथा असे ही दृढमूल। काशीपीठात करिती सकळ। झाली काशीयात्रा सफल। असे भाविती अंतरी ॥१२९॥ असो संवाद झाल्यावरती। नमस्कारूनि परस्परांप्रती। चारही आचार्य गेले मागुती। आपापल्या पीठाकडे ॥१३०॥ कलियुगात घडला रम्य। असा सोहळा अनुपम्य। पंचाचार्यसरितांचा संगम। झाला काशीपीठात ॥१३१॥ एक सहस्र एक शत। वर्षे भूवरी राहिले सतत। केल्या लीला अगणित। विश्वाराध्य जगद्गुरूंनी ॥१३२॥ वीरशैव धर्मसिद्धान्त। जनांस सुलभ केला अत्यंत। त्यांना करूनि लिंगदीक्षित। सन्मार्गावरी आणिले ॥१३३॥ तीरावरील वृक्ष पोषीत। पशुपक्ष्यांना जीवन देत। सरिता जशी वाहे अविरत। तसे भ्रमले जगद्गुरू ॥१३४॥ सिंहासनाचे नाव ज्ञान। म्हणूनि करणे ज्ञानदान। अंतरी अशी दृढ खूण। बाणली होती जगद्गुरूंच्या ॥१३५॥ शिव-जीवात जसे सूत्र। तसे माणसामाणसांत मैत्र। असावे असाच केला सर्वत्र। जगद्गुरूंनी उपदेश ॥१३६॥ कळलेच नाही कधी अकराशे। कार्ये करिता उलटली वर्षे। मग अवतारसमाप्तीचा हर्षे। केला मनी निश्चय ॥१३७॥ मल्लिकार्जुन नामे शिष्यांस। केला शिवसिद्धान्तोपदेश। शिरी ठेवूनि स्वकरास।

त्यास केला अभिषेक॥१३८॥ ज्ञानपीठाचा अधिकार। पूर्ण सोपविला त्यांच्यावर। विश्वनाथमंदिरी सत्वर। गेले शिष्य-भक्तांसह॥१३९॥ शिवनामाच्या गजरात। ज्योतीमध्ये मिळावी ज्योत। तसे झाले ज्योतिर्लिंगात। विलीन पूर्ण विश्वाराध्य॥१४०॥ ज्ञानगंधाने घमघमले। एक सुगंधी जीवन सरले। आणि मूल रूपात गेले। शिवगण होऊनि कैलासी॥१४१॥ श्रोतेहो काशीपीठ क्षेत्र। त्याची लक्षणे सांगेन पवित्र। बिल्वदंड, स्कंदगोत्र। कमंडलू सुवर्णाचा॥१४२॥ ऊर्ध्व दिशा, पीत वस्त्र। पंचवर्ण हे असे सूत्र। 'य'कार हा बीजमंत्र। तत्त्व जाणा आकाश॥१४३॥ पंचपीठांची सूत्रे पाच। पंचपीठांची गोत्रे पाच। सर्व जाणूनि घ्यावे साच। वीरशैव भक्तांनी॥१४४॥ जसे जाति कुल गोत्र। तसे नव्हेचि हे गोत्र। हे वीरशैवांचे गुरुगोत्र। पूर्ण ध्यानी धरावे॥१४५॥ कुल घराणी भिन्न भिन्न। जंगम असो वा भक्त कोण। ज्या पीठाचे शिष्य आपण। ते पीठगोत्र आपुले॥१४६॥ वीरगोत्र रंभापुरीचे। नंदिगोत्र उज्जयिनीपीठाचे। भृंगिगोत्र केदारपीठाचे। श्रीशैलपीठाचे वृषभगोत्र॥१४७॥ तसे काशीपीठाचे गोत्र। त्याचे नाव स्कंदगोत्र। ही नावे जाणा पवित्र। असती शिवगणांची॥१४८॥ गोत्रपुरुषांस जे पशू म्हणती। ते बुद्धिहीन जाणावे जगती। त्यांना वीरशैवधर्म संस्कृती। नसे ठाऊक किंचित्॥१४९॥ श्रीकाशीपीठाचा गोत्रपुरुष। स्कंद पुराणी प्रसिद्ध विशेष। त्याची संक्षिप्त कथा

श्रोत्यांस। निवेदीन या ठायी॥१५०॥ तारक नामे एक असुर। त्याने तपाचरण केले घोर। प्रसन्न झाले त्याच्यावर। सृष्टिकर्ते ब्रह्मदेव॥१५१॥ म्हणती 'वत्सा तुझ्या मनात। जे असेल ते माग त्वरित। तुझी तपश्चर्या अद्‌भुत। पाहूनि हर्षित झालो मी'॥१५२॥ तारक म्हणे 'मी अजर अमर। आणि अजेय होईन हा वर। देऊनि देवा माझे अंतर। पूर्ण संतुष्ट करावे'॥१५३॥ ब्रह्मा म्हणती 'तारक बाळा। जन्मे त्याला मृत्यू आला। तो टळेचिना कोणाला। राजा रंक संतांनाही॥१५४॥ देहधर्म हे जरा-मरण। त्यातूनि सुटला नाही कोण। म्हणूनि तुला हे वरदान। देणे शक्य नसेचि'॥१५५॥ तारक म्हणे 'होईन अजिंक्य। हा वर मजला द्यावा एक। ब्रह्मा म्हणती 'सोडूनि बालक। सर्वांकडूनि अजेय तू'॥१५६॥ असा वर होताच प्राप्त। तारकासुर झाला उन्मत्त। देवमानवांस करूनि त्रस्त। प्रलय दारुण मांडिला॥१५७॥ आरंभिले मानवसत्र। गोमांसे नद्या केल्या अपवित्र। देवांगना धरूनि समग्र। सभेमध्ये नाचविल्या॥१५८॥ ब्रह्मा विष्णू आणि इंद्र। एकत्र बसूनि करिती विचार। ब्रह्मवराने उन्मत्त असुर। कसा आता मारावा?॥१५९॥ ब्रह्मा म्हणे 'बालकाहातून। त्याचे निश्चित आहे मरण। पण झाला पाहिजे नंदन। एक शिव-पार्वतीसी॥१६०॥ सती भस्म झाली यज्ञात। तेणे उदास शिवाचे चित्त। कैलासी बसले एकान्तात। ध्यानमग्न होऊनी॥१६१॥ सतीच पार्वतीरूपे

आली। हिमालयाची कन्या झाली। सेवा करीत शिवाजवळी। तिष्ठे होऊनी सेविका॥१६२॥ परि जहाले नाही लग्न। तरी कसा होईल नंदन?'। ब्रह्मदेवाचे बोल ऐकून। इंद्र उत्साहे बोलला॥१६३॥ म्हणे 'मदन आणि रती। असती सदैव माझ्या संगती। त्यांना धाडूनि कामवृत्ती। शंकरमनी जागवू॥१६४॥ तेणे होऊनि शंकर मोहित। पार्वतीशी होतील रत। त्यांना सुत होता त्वरित। मग संहारू तारकाला'॥१६५॥ शचीपतीचे ऐकूनि बोल। विष्णू हसले काही वेळ। म्हणती 'इंद्रा जाश्वनीळ। तुवा नाही ओळखिला॥१६६॥ विश्वचालक तो विश्वपती। त्याची चाळवील मनोवृत्ती। असे सामर्थ्य कवणाहाती?। करी मनास येईल ते'॥१६७॥ मग इंद्राची आज्ञा घेऊन। कैलासी रतीसह गेला मदन। शिवास पाहूनि ध्यानमग्न। कामबाण सिद्ध केले॥१६८॥ पार्वतीरूप घेऊनि रती। कामातुर होऊनि अती। उभी राहिली शंकरापुढती। दृष्टी रोखूनि त्यांच्यावरी॥१६९॥ फुलले वसंतवैभव वनी। पक्षी करिती मंजुळ ध्वनी। मदने कामशर सोडूनी। शंकरहृदय भेदिले॥१७०॥ शंकरमनी झाली गजबज। त्यांचे उघडले नेत्र सहज। पाहती समोर शृंगारसाज। लेऊनि उभी पार्वती॥१७१॥ क्षणैक चित्त झाले विचलित। तिला पाहता झाले मोहित। दक्षिणेकडे उभा मन्मथ। पाहताक्षणी संतापले॥१७२॥ याने तपासी केले विघ्न। म्हणूनि उघडिता तृतीय लोचन। क्षणार्धात

झाली जळून। रक्षा मदनदेहाची॥१७३॥ रती शोक करी अपार। म्हणे ‘जाळिला माझा भ्रतार। देवकार्यासाठी उदार। होऊनि आला प्राणावरी’॥१७४॥ शिव म्हणती ‘कृष्णावतारी। येईल रुक्मिणीच्या उदरी’। मग शंकरापुढे सुरवरी। येऊनि करुणा भाकली॥१७५॥ ‘तारकासुरे केले त्रस्त। शिवा तुम्हास होता सुत। तोच संहारील क्षणात। म्हणूनि केला व्याप हा’॥१७६॥ शिव म्हणती ‘करावे काय। याचा स्वये घेईन निर्णय। पार्वतीस परीक्षून निश्चय। पुढे करीन विवाहाचा’॥१७७॥ परतले स्वगृही सुरगण। शंकर जहाले ध्यानमग्न। पार्वतीने तप दारुण। हिमालयात आरंभिले॥१७८॥ शिवास प्राप्त करावया। करी खडतर तपश्चर्या। अन्न फळे सर्व त्यागूनिया। भक्षी पर्णे कोवळी॥१७९॥ मग तीही त्यागिली तिने। भक्षी केवळ सुकली पर्णे। तीही त्यागिता पूर्णपणे। ‘अपर्णा’ नाव लाभले॥१८०॥ तप पाहता कठोर अद्भुत। देवांनी प्रार्थिला कैलासनाथ। म्हणती ‘शिवा अधिक अंत। पाहू नका जगाचा’॥१८१॥ शिव बटुवेष घेऊनि चतुर। गेले पार्वतीच्या समोर। म्हणती ‘बाले कशास कठोर। तपाचरण करितेस?’॥१८२॥ गिरिजा म्हणे ‘कैलासनाथ। पती होऊनि यावा जीवनात। यास्तव आचरिते येथ। तपस्या मी स्वामिया’॥१८३॥ बटू म्हणे ‘शंकर विक्षिप्त। स्मशानी राहे भूतमेळ्यात। महाक्रोधी असा क्षणात। जाळील वाटे

ब्रह्मांड॥१८४॥ फिरतो गळ्यात घेऊन सर्प। स्मशानाचा अंगी दर्प। क्रोधानेच याने कंदर्प। क्षणामध्ये जाळिला॥१८५॥ कातड्याचे वस्त्र अमंगल। हाती त्याच्या नरकपाल। भूतपिशाच्च प्रेते सकल। त्याचे जिवलग सांगाती॥१८६॥ अशा अमंगल जोग्यावरती। कशी सुंदरी बसली प्रीती?। काय ओस पडले जगती। सधन पुरुष देखणे?॥१८७॥ कन्या इच्छिते देखणा पती। पाहता अन्य युवती-चित्ती। मत्सर जागावा, हा तर अती। विरूप आणि विरूपाक्ष॥१८८॥ याला पाहता कोण शहाणा। म्हणेल की हा आहे देखणा। याचे रूप पाहता वदना-। वरी हसू उमटते॥१८९॥ वधूमाता म्हणे जामात। असावा कुबेरच श्रीमंत। हा तर दिगंबर अत्यंत। भिक्षुक आणि कंगाल॥१९०॥ वधूपिता म्हणतो पूर्ण। जावई असावा कुलवान। पण याचे मायबाप कोण। नसे कोणा ठाऊक॥१९१॥ असा विरूप दिगंबर कुलहीन। त्याच्याशी कसे करिशी लग्न?। गिरिजे तुझी झाली पूर्ण। बुद्धी भ्रष्ट वाटते॥१९२॥ इत:पर लग्न झाले जरी। तरी कंकण बांधावे लागेल करी। त्याच्या गळ्यातला सर्प जहरी। डसेल तुला कोमले॥१९३॥ लग्नातच येईल मरण। मग कसले संसारस्वप्न?। आनंदावर पडेल विरजण। सर्व प्रिय जनांच्या॥१९४॥ समज सारे घडले नीट। तरी वधू-वराची वस्त्रगाठ। बांधणे हा विधी स्पष्ट। सांग कसा करावा?॥१९५॥ तुझे रेशीम वस्त्र दुकूल। त्याचे गजचर्म

ओंगळ। याची कशी गाठ बसेल। सांग तूच गिरिकन्ये?॥१९६॥ लग्नानंतर निघेल वरात। तेव्हा घडेल किती अद्‌भुत। बैलावरी बसून मिरवीत। नेईल तुला कैलासी॥१९७॥ भूतप्रेते त्याचे सहचर। नाचतील डमरूच्या तालावर। पाहूनि हसतील सारे सुरवर। करी विचार जरासा॥१९८॥ म्हणूनि भणंग शंकरा त्याग। सधन विष्णूच्या मागे लाग। मग असा हास्यास्पद प्रसंग। येणार नाही तुझ्यावरी'॥१९९॥ अशी ऐकता शिवनिंदा। संतापून गेली प्रमदा। म्हणे 'जोगड्या कोसळो विपदा। तुझ्या डोईवर या क्षणी॥२००॥ इथे वेंगाडू नकोस दात। इथून चालता होई क्षणात। नातरी शिक्षा करीन अत्यंत। करी तोंड काळे तू'॥२०१॥ पार्वतीचा दृढ निर्धार। पाहूनि संतोषले शंकर। प्रकट केले रूप सुंदर। पाहताक्षणी आनंदली॥२०२॥ सलज्ज होऊनि म्हणे 'देवा। आपुल्या चरणी ठाव द्यावा। माझ्यासहचि तुमचा धावा। पुढे करावा भक्तांनी'॥२०३॥ 'तथास्तु' बोलूनि गेले शंकर। सप्तर्षींस धाडिले सत्वर। हिमालयाशी बोलूनि नंतर। विवाह केला निश्चित॥२०४॥ चैत्रमासी अष्टमीला। निश्चित केली मंगलवेला। सुरगणांसहित शिवमेळा। पातला लग्नमंडपी॥२०५॥ शिवरूप पाहता नयनी। नवल करिती वऱ्हाडी मनी। म्हणती दिसतो सुलक्षणी। पुराणपुरुष अनादी॥२०६॥ नवरा निर्गुण दिसे केवळ। नवरी सगुणरूपे सोज्वळ। लग्नघटिका येता जवळ। मंगलाक्षता

टाकिल्या॥२०७॥ यथाविधी लागले लग्न। संतुष्ट झाले देवगण। पार्वतीस सवे घेऊन। शंकर आले कैलासी॥२०८॥ एकान्ती रमती दोघेजण। असे लोटले कितीक दिन। डोळ्यांमध्ये आणूनि प्राण। देव वाट पाहाती॥२०९॥ स्वर्ग करूनि पादाक्रांत। तारकासुराने केला अनर्थ। देवस्त्रिया धरूनि बहुत। दासी म्हणून राबविल्या॥२१०॥ देव शंकरा शरण गेले। तव ते दोघे एकान्ती रमले। मग सर्व बाहेर तिष्ठले। आत जावया धजतीना॥२११॥ भिक्षुकवेषे अग्नी गेला। हाक देऊनि उभा राहिला। शिव म्हणती वाढ याला। भिक्षा म्हणूनि रेत हे॥२१२॥ पार्वतीने तसेच केले। रेत ओंजळीत दिले। अग्नीने ते प्राशन केले। आणि झाला गरोदर॥२१३॥ परम लज्जित झाला मनी। तोंड चुकवून हिंडे रानी। एकदा गंगातीरी कामिनी। सहा कृत्तिका देखिल्या॥२१४॥ गर्भ काढूनि उठाउठी। घातला साही जणींच्या पोटी। अनुभवूनि त्या झाल्या कष्टी। म्हणती घडले विपरीत॥२१५॥ लज्जेने गर्भ काढिला। साहींनी एकेठायी त्यागिला। सर्व एकत्र होऊनि घडला। देह कार्तिकियाचा॥२१६॥ सहा मुखे द्वादश हस्त। शरीर देखणे शोभिवंत। शंकरास कळला वृत्तांत। आणूनि दिले पार्वतीसी॥२१७॥ सप्त वर्षे करी पालन। देवांस कळले वर्तमान। इंद्राने सेनापतित्व पूर्ण। येऊनि दिले बालका॥२१८॥ सवे घेऊनि सेनाभार। चालूनि गेला तारकावर। तारकाने शरवर्षाव अपार।

केला स्वामी स्कंदावरी॥२१९॥ नाना शस्त्र-अस्त्रप्रयोगे। परस्परांची भेदिती अंगे। मग उतरूनि दोघे वेगे। भिडले एकमेकांशी॥२२०॥ आरंभिले मुष्टियुद्ध। सुर गर्जती जय जय शब्द। आवेशाने भूवरी अलगद। असुरा पाडिले स्कंदाने॥२२१॥ पडती पाडती उभे राहती। धरूनि परस्परा भोवंडिती। गर्जून गर्जून आदळिती। क्षितीवरती क्रोधाने॥२२२॥ हळूहळू असुर झाला क्षीण। स्कंदे धरिले दोन्ही चरण। गरगर गरगर फिरवून। धरणीवरी आपटिला॥२२३॥ फुटूनि घटाचे व्हावे चूर्ण। तसा असुर झाला छिन्न। क्षणात कुडीतून गेले प्राण। देव लागले नाचावया॥२२४॥ देवांगना देवकामिनी। मुक्त केल्या बंदीतूनी। जयवाद्यांचा घोष गगनी। अविरत घुमू लागला॥२२५॥ स्कंदे जाऊनि वाराणसीस। वंदिले शिवपार्वतीस। पुत्रपराक्रम पाहूनि संतोष। झाला मायपित्यासी॥२२६॥ मग लग्नाचे झाले निमित्त। स्कंद रुसूनि गेला वनात। श्रोतेहो श्रीशैलपीठ माहात्म्यात। मागे कथा कथिली ही॥२२७॥ शिवपार्वतीचा सुत स्कंद। षण्मुख षडानन नामे प्रसिद्ध। कार्तिकेय, कुमार, स्वामी याही सिद्ध। ओळखती नामांनी॥२२८॥ पुढे स्कंदे शिवाधर्मोत्तर शास्त्र। अगस्त्य ऋषीस बोधिले पवित्र। हा स्कंदचि असे गोत्र-। पुरुष काशीपीठाचा॥२२९॥ म्हणूनि वीरशैवांनी भावे। सिद्धान्त परंपरा जाणूनि घ्यावे। आणि प्रमादरहित करावे। धर्माचरण पवित्र॥२३०॥ श्रोतेहो ठेवूनि

अनुराग। पुढील ऐकावा कथाभाग। घडले विश्वाराध्यानंतर मग। काय काशीपीठात?॥२३१॥ विश्वाराध्ये स्वये आपण। पट्टशिष्य मल्लिकार्जुन। त्यांचे करूनि पीठारोहण। लिंगी लीन जहाले॥२३२॥ ख्रिस्तपूर्व वीसशे चाळीस। हे पीठारोहणाचे वर्ष। असे सांगतो इतिहास। काशीज्ञानपीठाचा॥२३३॥ महास्वामी मल्लिकार्जुन। योगविद्येत होते प्रवीण। तीनशे अकरा वर्षे देहधारण। करून राहिले पीठावरी॥२३४॥ संजीवन समाधीचा योग। साधूनि केला देहत्याग। त्यांच्या समाधीस म्हणते जग। कर्तृस्वामी, गादी स्वामी॥२३५॥ जगद्‌गुरू मल्लिकार्जुन ख्यात। स्वकर्तृत्वाने झाले जगात। तेणे पुढील पीठाधिकारी समस्त। त्याच नावे गौरविले॥२३६॥ जगद्‌गुरू मल्लिकार्जुनानंतर। जे जगद्‌गुरू झाले सत्त्याहत्तर। त्यांना मिळता पीठाधिकार। नाम ठेविले मल्लिकार्जुन॥२३७॥ एक्कावन्नावे पीठाधिपती। जगद्‌गुरू मल्लिकार्जुन असती। त्याकाळी होते काशीनृपती। राजा जयनंददेव हे ॥२३८॥ ख्रिस्ताब्द पाचशे त्रेपन्नपासून। सहाशे चौऱ्याहत्तरपर्यंत पूर्ण। होते जगद्‌गुरू विराजमान। काशीज्ञानपीठावरी॥२३९॥ जयनंददेवाने दिली दान। विशाल गोचरभूमी गायरान। कर्दमेश्वर देवस्थानापासून। गंगातीरापर्यंत॥२४०॥ विक्रम संवत् सहाशे एकतीस। वर्षे झाली चौदाशे चाळीस। या दिनी लिहूनि दिले विशेष। दानपत्र जगद्‌गुरूंना॥२४१॥

हे प्राचीन आणि पवित्र। पीठात अजून आहे पत्र। काशीनरेश प्रभुनारायणसिंहांनी ताम्रपत्र। तेच पुनश्च लिहून दिले॥२४२॥ ख्रिस्ताब्द एकोणिसशे सोळात। काशी हिंदू विद्यापीठ झाले स्थापित। त्यास्तव भूमी केली अर्पित। जंगमवाडी मठाने॥२४३॥ विद्यापीठ परिसरात। दोन आचार्य समाध्या अवस्थित। 'जंगमबाबा' नावे समस्त। ओळखिती, पूजिती॥२४४॥ विद्यापीठाच्या मागीलकडे। 'जंगमपूर' नामक खेडे। जंगमवाडी मठाचे पवाडे। गात अजूनि आहे उभे॥२४५॥ प्रयागक्षेत्री गंगाकाठ। तेथे मान करूनि ताठ। जंगमवाडी शाखामठ। आहे उभा अजूनी॥२४६॥ गयाक्षेत्री सिसोदिया गल्लीत। ख्रिस्ताब्द एकोणिसशे बत्तीसपर्यंत। जंगमवाडी शाखामठ अवस्थित। होता पीठाच्या अधीन॥२४७॥ नेपाळ देशी भक्तपूर। तेथे शाखामठ असे स्थिर। जंगम मठ नावे सर्वदूर। झाला असे प्रसिद्ध॥२४८॥ विक्रम संवत् आठशे ब्याण्णवात जाण। नेपाळराजा विश्वमल्लाने भूमिदान। केले तो शिलालेख अजून। आहे नेपाळ मठामध्ये॥२४९॥ ख्रिस्ताब्द पंधराशे तीसपासून। सोळाशे अडुसष्टपर्यंत पूर्ण। मोगल सम्राटांनी केली भूमी दान। चौदाशे चाळीस एकर॥२५०॥ हुमायूं, अकबर, शहाजहां। जहांगीर, औरंगजेब, महंमदशहा। यांची सतरा फर्माने पाहा। असती सुरक्षित पीठामध्ये॥२५१॥ औरंगजेबाच्या फर्मानात। एक घटना आहे ग्रथित। ती श्रोत्यांस करितो

श्रुत। शांतवाया जिज्ञासा॥२५२॥ काशीविश्वनाथ मंदिर समस्त। औरंगजेबाने केले ध्वस्त। आला जंगमवाडी मठात। आवेशाने सेनेसह॥२५३॥ मठ उद्‌ध्वस्त करावा पूर्ण। अशी कांक्षा मनी धरून। उभा राहिला येऊन। पीठाच्या महाद्वारात॥२५४॥ तोच समोर आली विशाल। मूर्ती काळीकुट्ट विक्राळ। नेत्री अंगार लालेलाल। गिळू पाहाया धावली॥२५५॥ ज्याने वधिले निरपराध। मूर्तिपूजक भाऊबंद। त्याची वाचा बसून नि:शब्द। क्षणार्धात जहाला॥२५६॥ अंगी दाटला घर्मपूर। देह कापला थरथर। पाऊल मागे घेऊनि दूर। मठापासून पळाला॥२५७॥ होऊनि भयग्रस्त पूर्ण। मठास लिहूनि दिले फर्मान। त्यात ही घटना नोंदवून। वरी केली स्वाक्षरी॥२५८॥ सर्व सतरा फर्मानांत। फर्मान हे आहे सुरक्षित। काशीपीठाने केली मुद्रित। सर्व मोगल फर्माने॥२५९॥ ख्रिस्ताब्द अठराशे पंचविसात। एकोणऐंशीवे जगद्‌गुरू विराजित। हरेश्वर शिवाचार्य चौपन्न वर्षेपर्यंत। होते काशीपीठावरी॥२६०॥ मैसूरराजे कृष्णराज वडियर। येऊनि, बारा माहेश्वर। बटूंची प्रसाद-व्यवस्था निरंतर। दिली करून पीठाला॥२६१॥ सहाशे रुपये प्रतिवर्षी। पाठवीत राहिले वाढदिवशी। तसे ताम्रपत्रही मठाशी। दिले त्यांनी लिहूनी॥२६२॥ ख्रिस्ताब्द अठराशे शहात्तरात। ऐंशीवे जगद्‌गुरू वीरभद्र पीठाधिष्ठित। त्यांनी परिश्रम घेतले बहुत। पीठसंवर्धनासाठी॥२६३॥ केली विश्वाराध्य बँक

स्थापन। विद्यार्थ्यांसाठी निवास, भोजन। भक्तांसाठी प्रसाद जाण। पूर्ण केली व्यवस्था॥२६४॥ त्यांच्या पश्चात् एक्यांऐंशीवे। जगद्गुरू विराजले नवे। राजेश्वर महास्वामी नावे। आले आंध्रामधूनी॥२६५॥ महातपस्वी प्रशांत मूर्ती। उदारहृदयी अशी कीर्ती। 'जंगमराजा' नामे प्रीति-। पूर्वक म्हणती काशीजन॥२६६॥ वीरशैव ग्रंथ 'लिंगधारणचंद्रिका'। त्यावर लिहिली 'शरन्नामिका'। शिवकुमार मिश्रांनी संस्कृत टीका। वीरशैवसिद्धान्तपर॥२६७॥ ख्रिस्ताब्द एकोणिसशे पाचात। काशीपीठाकडून हा ग्रंथ। केला काशीजगद्गुरूंनी प्रकाशित। विद्वानांनी प्रशंसिला॥२६८॥ जगद्गुरू राजेश्वर उदार। बँकेतील धन वाटिती समग्र। दोनशे बटू आणले माहेश्वर। आंध्र-कर्नाटक-महाराष्ट्रांतूनी॥२६९॥ त्यांची प्रसाद-निवास व्यवस्था केली। धर्मकार्यार्थ पुंजी वेचिली। बँकेची अवस्था बिकट झाली। तरी राहिली चालत॥२७०॥ राजेश्वर महास्वामीनंतर। शिवलिंग महास्वामी आले पीठावर। न्यायशास्त्रपंडित चतुर। असे महाराष्ट्रातूनी॥२७१॥ ख्रिस्ताब्द एकोणिसशे सातात। ब्यांऐंशीवे पीठाधिपती झाले ख्यात। करूनि पंचाचार्यांस आमंत्रित। घेतले पंचाचार्य संमेलन॥२७२॥ विश्वाराध्य गुरुकुल स्थापून। केले कार्य महत्त्वपूर्ण। जागृतपणे केला संपूर्ण। पंचवीस वर्षे व्यवहार॥२७३॥ ख्रिस्ताब्द एकोणिसशे एकतिसात। तासगावच्या पंचाक्षरी

स्वामीप्रत। त्र्याऐंशीवे जगद्गुरू करूनि पश्चात्। झाले बत्तीसात लिंगैक्य॥२७४॥ जगद्गुरू महास्वामी पंचाक्षर। यांनी सांभाळिला पीठाधिकार। विश्वाराध्य बँकेची गंभीर। स्थिती होऊ लागली॥२७५॥ पीठाची मालमत्ता विकून। ठेवी परत मिळाव्या पूर्ण। केली ठेवीदारांनी मिळून। न्यायसंस्थेस विज्ञापना॥२७६॥ जगद्गुरूंचे कार्य थोर। त्यांनी सर्व दानपत्रे केली सादर। दानप्राप्त मालमत्तेचा व्यवहार। करणे न शक्य, सिद्ध केले॥२७७॥ पीठाची मालमत्ता सगळी। अशी जगद्गुरूंनी वाचविली। पीठाच्या उत्पन्नातून केली। ठेवपरतीची व्यवस्था॥२७८॥ पीठाची दानपत्रे समस्त। केली न्यायसंस्थेने प्रमाणित। ती सर्वही सत्य पूर्णतः। असा दिला निर्णय॥२७९॥ जगद्गुरू पंचाक्षर शिवाचार्य। यांचे हे कार्य वंदनीय। काशीपीठाची मालमत्ता सर्व। टिकली त्यांच्यामुळे ही॥२८०॥ जगद्गुरू वीरभद्र शिवाचार्य। झाले चौऱ्यांशीवे पीठाचार्य। त्यांचे संशोधन-लेखनकार्य। विद्वज्जनांनी वाखाणिले॥२८१॥ चिदिरेमठ नागभूषण शास्त्री। पत्नी श्यामला वीरगोत्री। जन्मले यांच्या पवित्र उदरी। शके अठराशे सव्विसात॥२८२॥ हिंदी, मराठी, संस्कृत। कन्नड, तेलुगू, पाली, प्राकृत। असे बहुभाषा-पारंगत। होते वीरभद्र जगद्गुरू॥२८३॥ या भाषांतील त्यांचे ग्रंथ। जहाले पूर्वीच प्रकाशित। उर्दू, बंगाली, तमिळ, आंग्ल भाषांत। सहजतेने बोलती॥२८४॥ विद्यारत्न,

विद्यानिधी। या संपादिल्या उपाधी। साहित्यविशारद-धर्माचार्यादी। पदव्या याही संपादिल्या॥२८५॥ वेदतीर्थ, काव्यतीर्थ, स्मृतितीर्थ। दर्शनतीर्थ आदी परीक्षांत। उत्तम प्राविण्य केले प्राप्त। विद्यार्थिदशेत काशीमध्ये॥२८६॥ काशीपीठात अध्ययनकाळी। वीरशैव विद्वत्संघाची स्थापना केली। त्यात व्याख्याने करूनि संपादिली। वक्तृत्वकला विद्यार्थ्यांनी॥२८७॥ दूर कराया अनिष्ट प्रथा। हिंदीमधून लिहिल्या कथा। विद्वत्तापूर्ण व्याख्यानांनी वक्ता। अशी मिळविली प्रसिद्धी॥२८८॥ वैद्यनाथक्षेत्र परळीला। ज्योतिर्लिंगास रुद्राभिषेक केला। सिद्ध सर्वांसमक्ष केला। वेदाधिकार वीरशैवांचा॥२८९॥ प्राचीन लिप्यांचे होते ज्ञान। तेणे पुरातत्त्व विभागात होता मान। शक्तिस्तंभावरील लिपी वाचून। अर्थ केला उत्तरकाशीस॥२९०॥ ताम्रपट शिलालेखादिक। त्यांनी अभ्यासिले अनेकानेक। आणि त्यांवरी उत्तम लेख। लिहूनि केले प्रसिद्ध॥२९१॥ यादगिरी संस्कृत महाविद्यालय। तेथे काही काळ होते प्राचार्य। पुढे गुरुकुल स्थापूनि कार्य। केले सिकंदराबादेस॥२९२॥ बहु भाषांतील अनेक ग्रंथ। हस्तलिखिते केली संग्रहित। 'शैवभारती भवन' स्थापित। केले तेथे ग्रंथालय॥२९३॥ तेलुगूत 'विभूति' नामक। पत्रिका सुरू केली सुरेख। आणि सांभाळिले संपादक-। पदही स्वये पत्रिकेचे॥२९४॥ लेखांसवे कविता रचिती। तेणे लोक बालकवी म्हणती। आंध्र-कर्नाटक-महाराष्ट्र

प्रांती। भ्रमूनि केली व्याख्याने॥२९५॥ काशीजगद्गुरू पंचाक्षर शिवाचार्य। यांच्यावर होता त्यांचा प्रभाव। इच्छापत्रात वीरभद्र शास्त्रींचे नाव। ठेविले होते लिहूनी॥२९६॥ ते लिंगैक्य झाल्यानंतर। वीरभद्र झाले ज्ञानपीठाधीश्वर। बांधले भव्य 'ज्ञानमंदिर'। प्रथम काशीपीठात॥२९७॥ सिकंदराबादचे ग्रंथ संग्रहित। आणूनि ठेविले ज्ञानमंदिरात। प्रकाशित अप्रकाशित ताडपत्र ग्रंथ। होते दहा सहस्र॥२९८॥ काशीनगरीत मूल्यवान। ग्रंथालय असा मिळाला मान। होते ग्रंथप्रेमच विलक्षण। वीरभद्र जगद्गुरूंचे॥२९९॥ स्थापूनि 'शिवधर्म ग्रंथमाला'। ग्रंथप्रकाशनास आरंभ केला। मनी सदैव विचार बाळगला। वीरशैव विश्वकोशाचा॥३००॥ पीठास करावया ऋणमुक्त। सायास चालविले सतत। परि एकोणिसशे अठ्ठेचाळिसात। अकस्मात झाले लिंगैक्य॥३०१॥ त्यांच्या इच्छापत्रानुसार। कर्नाटकात मठ क्यासनूर। तेथील जयगुरू शिवाचार्यास अधिकार। मिळाला काशीपीठाचा॥३०२॥ उज्जयिनी जगद्गुरू श्रीसिद्धेश्वर। रंभापुरी जगद्गुरू वीरगंगाधर। यांच्या अमृतहस्ते ज्ञानपीठावर। विराजले जगद्गुरू॥३०३॥ श्रीविश्वेश्वर शिवाचार्य नावे। झाले आचार्य पंच्याऐंशीवे। दीर्घकाल राहूनि कार्ये। पार पाडिली पीठाची॥३०४॥ ख्रिस्ताब्द एकोणिसशे सतरा वर्षी। जन्मले परमेश्वरय्या-रुद्रम्मा उदरासी। लाभला अवघ्या तिसाव्या वर्षी। काशीपीठाचा

अधिकार॥३०५॥ येईपर्यंत अंतिम क्षण। पाहिले पीठ-समाजाचे कल्याण। त्यास्तव श्रमले रात्रंदिन। अथकपणे जगद्‌गुरू॥३०६॥ रट्टीहळ्ळी, कडेनंदीहळ्ळीत। सोलापुरास मद्वीरशैव पाठशाळेत। केले प्राथमिक अध्ययन संस्कृत। गेले काशीपीठामध्ये॥३०७॥ न्यायशास्त्र आणि साहित्य। यांत संपादिले प्रभुत्व। अध्ययन करिताच जगद्‌गुरुत्व। प्राप्त झाले तयांना॥३०८॥ होता बारा गावचा अधिकार। तो गेला नव्या नियमानुसार। ऋण होते पीठावर। लक्षावधी रुपयांचे॥३०९॥ असा कठीण असता प्रसंग। धैर्य मात्र होते अभंग। लाभला भक्तांचा सहयोग। पीठ झाले ऋणमुक्त॥३१०॥ केली बांधकामे काही। विद्यार्थ्यांस्तव केल्या सोयी। यात्रेकरू भक्तांचीही। केली प्रसाद-व्यवस्था॥३११॥ महाराष्ट्री करूनि संचार। जागृत केले नारी नर। पुणे आणि मंगळवेढे नगर। येथे स्थापिली निलये॥३१२॥ औरंगाबाद-नागपूरला। विश्वाराध्य निवास स्थापायाला। महाराष्ट्रभर संचार केला। मिळविले अर्थसाहाय्य॥३१३॥ संपूर्णानंद विश्वविद्यालयात। शक्तिविशिष्टाद्वैत वेदान्त। शाखा स्थापूनि पूर्ण दृष्टिपथात। वीरशैवशास्त्र आणिले॥३१४॥ जगद्‌गुरू चंद्रशेखर विद्यमान। यांनीच केले तेथे अध्यापन। शास्त्री-आचार्य परीक्षांसाठी मुद्रण। केले पाठ्यपुस्तकांचे॥३१५॥ संस्कृत प्राकृत अनेक ग्रंथ। पीठाकडून केले मुद्रित। येथे अध्ययन करूनि झाले ख्यात। अनेक

जगद्गुरू, शिवाचार्य॥३१६॥ एकेचाळीस वर्षे निरंतर। पीठ-समाजकल्याणी राहिले तत्पर। वृद्धावस्थेने होऊनि जर्जर। पुणेमठात झाले लिंगैक्य॥३१७॥ ख्रिस्ताब्द एकोणिसशे एकोणनव्वदी। काशीत झाली क्रियासमाधी। एक नि:स्पृह निर्मल आनंदी। जीवन शिवात विलीनले॥३१८॥ उत्तराधिकारी न नेमता गेले। विश्वेश्वर जगद्गुरू शिवैक्य झाले। परि त्यांच्या मनाप्रमाणेच घडले। पुढे पीठारोहण॥३१९॥ पीठाचे श्याहांशीवे आचार्य। झाले श्रीचंद्रशेखर शिवाचार्य। काशीपीठाचे विकासकार्य। झाले अत्यंत गतिमान॥३२०॥ काशीपीठाचा सुवर्णकाळ। आला म्हणती भक्त सकळ। शोभले ज्ञानपीठावरी निर्मल। ज्ञानसंपन्न व्यक्तिमत्त्व॥३२१॥ रंभापुरी, उज्जयिनीपीठ। श्रीशैलपीठ, हिमवत्केदारपीठ। या आचार्यांनी ठेविला किरीट। जगद्गुरूंच्या शिरावरी॥३२२॥ कर्नाटकात तोगुणसी ग्रामी। पुराणमठ श्रीसिद्धय्या स्वामी। सावत्रम्मा त्यांची धर्मपत्नी। यांच्या पवित्र उदरात॥३२३॥ श्रावणमास शुद्ध द्वादशी। शके अठराशे एकोणसत्तराव्या वर्षी। बाळ जन्मले शुभदिवशी। नाव ठेविले शेखरय्या॥३२४॥ 'कुलं पवित्रं जननी कृतार्था। वसुंधरा पुण्यवती च तेन' सर्वथा। अशीच झाली जणू अवस्था। बाळजन्माने सकलांची॥३२५॥ शिक्षण, सर्व धर्मसंस्कार। बालपणीच लाभले समग्र। तेराव्या वर्षी उत्तराधिकार। झाला अमरेश्वर मठावरी॥३२६॥ सोलापुरी

वीरशैव गुरुकुलात। आणि वारद संस्कृत पाठशाळेत। संस्कृताध्ययन करूनि काव्यतीर्थ। परीक्षेत झाले उत्तीर्ण॥३२७॥ ख्रिस्ताब्द एकोणिसशे सत्तरात। अमरेश्वर मठावरी अधिष्ठित। झाले कोवळ्या तरुण वयात। वयाच्या तेविसाव्या वर्षी॥३२८॥ पुढे काशीपीठात गेले। षट्शास्त्रे, वेदान्त अभ्यासिले। संस्कृत वेदान्ताचार्य झाले। सुवर्णपदके संपादिली॥३२९॥ 'श्रीसिद्धान्तशिखामणिसमीक्षा' लिहून। प्रबंधलेखन केले पूर्ण। 'विद्यावारिधी' पदवी मिळवून। झाले डॉक्टरेटही॥३३०॥ महाप्रबंध लिहूनि पुढती। झाले 'विद्यावाचस्पती'। यास डी.लिट्. पदवी म्हणती। सर्वोच्च विद्यापीठात॥३३१॥ कन्नड, मराठी, हिंदी, संस्कृत। प्रकाशित झाले अनेक ग्रंथ। वानगीदाखल काही येथ। नावे त्यांची नोंदवितो॥३३२॥ संस्कृत 'वीरशैव तत्त्वत्रयविमर्श'। हिंदी 'वीरशैवदर्शन कोश'। कन्नड 'पंचपीठ परंपरे' विशेष। संस्कृत 'शिवाद्वैतपरिभाषा'॥३३३॥ 'शिवाद्वैतमंजरी' संस्कृत। 'अष्टावरणविज्ञान' हिंदीत। 'जन्म हा अखेरचा' मराठीत। बहुचर्चित लोकमान्य॥३३४॥ श्रीसिद्धान्तशिखामणी कन्नड-मराठी। प्रवचनप्रभे कन्नड गोष्टी। अशी विपुल ग्रंथसृष्टी। जगद्गुरूंनी निर्मिली॥३३५॥ श्रीसिद्धान्तशिखामणी धर्मग्रंथ। अनुवादूनि घेतला षोडश भाषांत। करूनि घेतला भाषांतरित। नेपाळी, रशियन भाषांतही॥३३६॥ देऊनि ग्रंथकारांस प्रेरणा। करवूनि घेतली ग्रंथरचना। रसाळ

आशीर्वचनांनी भक्तजना। अपार दिला आनंद॥३३७॥ गांभीर्य माधुर्य प्रसादयुक्त। जणू कुंभचि भरला अमृत। प्रवाही शैलीतूनि सिद्धान्त। वीरशैवांचा बोधिला॥३३८॥ भक्ता व्हावया सिद्धान्तबोध। केला परीक्षांचा प्रबंध। आणि वीरशैवांचे शोधप्रबंध। प्रसिद्ध केले आगमग्रंथ॥३३९॥ नेपाळ, रशिया देशी भ्रमले। भक्तांस लिंगदीक्षित केले। पश्चिमोत्तर दक्षिण-पूर्वेतून मेळविले। असंख्य जंगम-भक्तगण॥३४०॥ शैवभारती शोधप्रतिष्ठान। स्थापूनि केले ग्रंथप्रकाशन। विश्वाराध्य जनकल्याण प्रतिष्ठान। स्थापूनि समाजकार्य केले॥३४१॥ विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती। निर्मिली वसतिगृहे किती। गौरविल्या विद्वान मूर्ती। देऊनि सन्मान पुरस्कार॥३४२॥ वधूवर सूचक, बालसंस्कार। विद्यालये, निसर्गोपचार। कुटिरोद्योग, अनुसंधान केंद्र। बहुजनोपयोगी कार्य केले॥३४३॥ काशीपीठाचा केला विकास। बांधविले उत्तम भक्तनिवास। अन्नदासोहाची विशेष। व्यवस्था केली भक्तांसाठी॥३४४॥ आंध्र-महाराष्ट्र-कर्नाटकी भ्रमून। भक्तांस दिले पूर्ण शिवज्ञान। आणि भक्तांतरी वास करून। शुभ कार्यास प्रेरिले॥३४५॥ केली पूजा अनुष्ठाने। महामंत्रजप, बिल्वार्चने। आयोजिली ग्रंथपारायणे। घडविला भक्तसमाज॥३४६॥ केला देशसंचार धर्मप्रसार। निर्मिले विश्वाराध्य ज्ञानमंदिर। 'विभूती' पत्रिकेचा पुनरुद्धार। केला 'विभूतिवैभव' चालवूनी॥३४७॥

अशी बहुविध कार्ये किती। केली त्यांची नाही गणती। बोलता बोलता मुके होती। शब्द येथे श्रोतेहो॥३४८॥ असे काशीपीठाद्वारे कार्य। करिती श्रीचंद्रशेखर शिवाचार्य। जणू अवतरले नवे पर्व। वीरशैवांच्या भाग्याने॥३४९॥ अशी पंचपीठांची कहाणी। निवेदिली श्रोतियांलागूनी। जगद्गुरूंनी प्रेरणा मनी। मानसी माझ्या जागविली॥३५०॥ त्यांच्या कृपेने ग्रंथकार्य। सिद्धीस गेले आहे सर्व। म्हणूनि वंदितो त्यांचे पाय। आज अतीव श्रद्धेने॥३५१॥ पंचपीठांचे कार्य महान। ते महाराष्ट्री विस्तारले परिपूर्ण। त्यासाठी ठरले कारण। सर्व पूज्य शिवाचार्य॥३५२॥ पंचपीठांचे सर्वदूर। शाखामठ असती सुस्थिर। तेथील शिवाचार्यांनी प्रसार। केला वीरशैवधर्माचा॥३५३॥ मूल पंचाचार्यांनी जे कथिले। ते भक्तांच्या हाती दिले। ह्या महत्कार्यासाठी ठरले। शिवाचार्य वंदनीय॥३५४॥ गावोगावी जंगममूर्ती। त्याही ज्ञानोपदेश करिती। स्वकार्याने देती गती। धर्मप्रसार कार्यासी॥३५५॥ महाचार्य शिवाचार्य जंगम। यांनी वृद्धिंगत केला धर्म। स्वत्वाचे पोषण करूनि परम। रक्षिला प्राणपणाने॥३५६॥ महाचार्य अत्युच्च स्थानी। धर्मोपदेश करिती ज्ञानी। परि ते ज्ञान पाझरूनी। खाली लागे आणावे॥३५७॥ ते कार्य शिवाचार्य करिती। वीरशैव अस्मिता पोषिती। ज्ञानदाने भक्तांस मुक्ती। देती कृपा करूनी॥३५८॥ गावोगावीचे माहेश्वर। तेच प्रचारिती निरंतर।

ह्या सकलांविषयी अंतर। भरले कृतज्ञबुद्धीने॥३५९॥ महाचार्यांसह सर्व शिवाचार्य। आणि ज्ञानी जंगम सर्व। ह्या सर्वांचे वंदितो पाय। भावभरल्या मनाने॥३६०॥ महाराष्ट्रात दृढमूल। असे आचार्य परंपराच केवळ। मन्मथादी संतांनी सकळ। साहित्य निर्मूनि घट्ट केली॥३६१॥ गेली युगे मन्वंतरे। किती वाहूनि गेले वारे। तरी दिशादर्शक तारे। आचार्यचि आपुले॥३६२॥ तेच प्रेमे बोधितील। पाठ आपुली थोपटतील। तेच सन्मार्ग दावितील। घनगर्द अंधारी॥३६३॥ मन्मथस्वामी शांतलिंग। शिवदास लक्ष्मण बसवलिंग। यांनी बोधिला जो मार्ग अभंग। तोच आम्हा सुखदायी॥३६४॥ म्हणूनि घेऊ त्यांचे नाव। त्याच वाटेवरी घेऊ धाव। सर्वांतरी पाहू शिव। अन्य न लगे आम्हांस॥३६५॥ मराठी वीरशैवांच्या मनी। वसती आचार्यचि अजूनी। त्यांचे स्थान घेणे कोणी। शक्य नाही त्रिवार॥३६६॥ ही भूमी समन्वयाची। आचार्यांची संतकवींची। येथे गर्जली मन्मथांची। वाणी शिवतेजाने॥३६७॥ या संतांची मराठी रचना। आम्हा देते सदैव प्रेरणा। अन्य कोणाकडे याचना। करणे न लगे आम्हांसी॥३६८॥ असा पूर्ण करूनि निश्चय। बळकटपणे टाकावे पाय। कोणाचेही बाळगू नये भय। किंचित् वीरशैवांनी॥३६९॥ 'मन्मथ आलासे भूलोका। आता कोणी भिऊ नका'। अशा फोडिल्या ज्याने हाका। पाठीराखा आमुचा तो॥३७०॥ आचार्य-संतांसी स्मरून। निर्भय

करू आचरण। वागू विरोधरहित होऊन। अशी करू प्रतिज्ञा॥३७१॥ या ग्रंथाचे करिता पठण। पाठकास येईल आत्मभान। कळेल की आहोत आपण कोण। ज्यास म्हणती वीरशैव॥३७२॥ स्वधर्माचा कळेल इतिहास। ग्रंथपाठक होईल डोळस। आणि संदेहांचा निरास। होईल सर्व मनातल्या॥३७३॥ ज्याला इतिहास कळेल। तोच इतिहास घडवील। तोच उजळून घेईल। जीवन ज्ञानप्रकाशाने॥३७४॥ श्रोतेहो संपले ग्रंथलेखन। कृतार्थतेने भरले मन। श्रीकाशीजगद्गुरूंनी करवून। घेतला पूर्ण ग्रंथ हा॥३७५॥ कैलासमंटपी शोभायमान। श्रीविश्वाराध्य ज्ञानसिंहासन। तेथेच पूर्णत्वास गेले लेखन। श्रीपंचाचार्य-कृपेने॥३७६॥ शके एकोणिसशे सदतीस। मन्मथसंवत्सर चैत्रमास। शनिवारी कृष्ण सप्तमीस। मध्याह्नकाळी पूर्ण झाला॥३७७॥ जन्मोजन्मीचे पुण्यफळ। मातापित्यांचे संस्कार प्रेमळ। आणि श्रीगुरुकृपेचे बळ। लाभले जन्मसाफल्य॥३७८॥ अक्षरांशी जडले नाते। ग्रंथकार व्हायचे होते। तेच पूर्ण झाले येथे। श्रीजगद्गुरुकृपेने॥३७९॥ शिवाच्या पंचमुखांतून। जे उत्पन्नले पंचाक्षरासमान। त्या जगद्गुरू पंचाचार्यांनी गहन। पंचसूत्रे बोधिली॥३८०॥ त्या पंच शिवसूत्रांतून। अवघे प्रकाशले शिवज्ञान। त्या मूल आणिक विद्यमान। वंदन पंचाचार्यांसी॥३८१॥ वीरशैवधर्म संस्थापक। पंचाचार्य पंचसूत्रबोधक। यांच्या चरणी भक्तिपूर्वक।

समर्पिला ग्रंथ हा॥३८२॥ श्रीकाशीज्ञानसिंहासनावर। होऊनि गेले जे आचार्य थोर। त्यांना वंदन केले त्रिवार। भक्तिपूर्ण मनाने॥३८३॥ मूर्तिमंत ज्ञानभास्कर। जगद्‌गुरू महास्वामी श्रीचंद्रशेखर। त्यांच्या चरणी निरंतर। नमस्कार असो माझा॥३८४॥ वत्सगुल्म नगरी पुरातन। सांप्रत वाशीम अभिधान। सन्निध केकतउमरा लहान। जन्मगाव माझे असे॥३८५॥ श्रीसिद्धरामेश्वरांचे जे नगर। ती माझी कर्मभूमी सोलापूर। जन्म-कर्मभूमीस नमस्कार। करितो कृतज्ञभावनेने॥३८६॥ देवाप्पा नामे प्रेमळ पिता। विठाबाई सत्त्वसंपन्न माता। त्यांच्या पदी ठेवितो माथा। पूर्ण प्रेमादराने॥३८७॥ कुलगुरु-संत-श्रोत्यांस वंदन। धन्य माझे झाले जीवन। आणखी एक ग्रंथलेखन। शिवकृपेने पूर्ण झाले॥३८८॥ श्रीकाशीज्ञानसिंहासनाधीश्वर। जगद्‌गुरू महास्वामी श्रीचंद्रशेखर। त्यांच्या आज्ञेने रचिला मधुर। ग्रंथ शेषनारायणाने॥३८९॥ श्रीजगद्‌गुरू पंचाचार्य विजय रसाळ। परिसला भाविक भक्तांनी प्रेमळ। शिवभक्तमने झाली उत्फुल्ल। एकादशोऽध्याय गोड हा॥३९०॥

॥ श्रीजगद्‌गुरु पंचाचार्यार्पणमस्तु॥ शुभं भवतु॥

□□

एकूण ओवीसंख्या २८५३

## श्रीजगद्गुरू पंचाचार्यांची आरती

मंगलमय महालिंगोद्भव गुरु शिवांग पंचाचार्यांना।
लिंगविभूषित भंगभवाब्धी मंगल आरती करू त्यांना ॥धृ.॥

जन्ममरणभय हरण करूनि पावन करिसी भक्तांना।
तन मन भावे अर्पण करितो सिद्ध रेणुकाचार्यांना... ॥१॥

थोर घोर भव दूर कराया सुरवर भाकिती तव करुणा।
वीरशैवमतवारिधिशशिधर स्मरा दारुकाचार्यांना... ॥२॥

लोकदयाळा सर्वव्यापका अससी बोधक सकलांना।
शोकनाशका भाकितो करुणा एकोरामाराध्यांना... ॥३॥

चंडमताशी खंडन करूनि बोधिशी ब्रह्माखंडाना।
पिंडिब्रह्मांडी गुरू व्यापका नमितो पंडिताराध्यांना... ॥४॥

विश्वेश्वर लिंगोद्भव होशी विश्वपालका दयाघना।
ईश्वरभक्तीसी शाश्वत करी त्या स्मरितो विश्वाराध्यांना...॥५॥

अज्ञ बांधवा सुबोध कराया नमितो पंचाचार्यांना।
वीरगोत्रोद्भव सांब विनवितो कृपा करावी या दीना... ॥६॥

-सांबप्पा बापूआप्पा ब्याळे

|| श्रीजगद्गुरू पंचाचार्य विजय ||

समाप्त

## विद्यमान जगद्गुरू पंचाचार्य

प०पू० श्रीमद् रंभापुरीवीरसिंहासनाधीश्वर श्री १००८ जगद्गुरू **श्री प्रसन्नरेणुक वीरसोमेश्वर शिवाचार्य महास्वामीजी**
बाळेहोन्नूर, जि० चिक्कमगळुर (कर्नाटक) 577 112 / Mob. No. 09448451828 / Email- rambhapuripeetha@gmail.com

प०पू० श्रीमद् उज्जयिनीसद्धर्मसिंहासनाधीश्वर श्री १००८ जगद्गुरू **श्री सिद्धलिंग राजदेशिकेंद्र शिवाचार्य महास्वामीजी**
उज्जयिनी, जि० बळ्ळारी (कर्नाटक) 572 171 / Mob. No. 09620411008 / Email- srs1008ujjaini@gmail.com

प०पू० श्रीमद् हिमवत्केदारवैराग्यसिंहासनाधीश्वर श्री १००८ जगद्गुरू **श्री रावल भीमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामीजी**
उखीमठ, जि० रुद्रप्रयाग (उत्तराखंड) 246 469 / Mob. No. 09448464044 / Land Line- 01364-264521

प०पू० श्रीमद् गिरिराजसूर्यसिंहासनाधीश्वर श्री १००८ जगद्गुरू **डॉ० चन्नसिद्धराम पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी**
श्रीक्षेत्र श्रीशैल, जि० कर्नूल (आंध्र प्रदेश) 518 102 / Mob. No. 09483251008 / Email- cspsswamiji@gmail.com

प०पू० श्रीमत् काशीज्ञानसिंहासनाधीश्वर श्री १००८ जगद्गुरू **डॉ० चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी**
श्रीक्षेत्र काशी, वाराणसी (उत्तरप्रदेश) 221 001 / Mob. No. 09448128564 / Email- kashipeeth28@gmail.com

### ग्रंथ मिळण्याचे ठिकाण

## शैवभारती शोधप्रतिष्ठानम्

**जंगमवाडी मठ, वाराणसी, फोन : (०५४२) २४५०५४६**

---

### श्रीमद् जगद्गुरू पंचाचार्य यांचे सेवक

## श्रीधर श्रीराम पैलवान

**१७०४, सोमवार पेठ, भवानी गल्ली, तासगांव**
**जि. सांगली, चरभाष : ९५२७८०६७५०, ९०२८२३५१३५, ९३७२१४८०९६**

---

## श्रीमद् जगद्गुरू पंचाचार्य बुक स्टॉल
## व कॅसेट सेंटर अँड नॉवेल्टी

**शाहिर वस्ती, प्लॉट नं. ५५/४०, भवानी पेठ, सिद्धेश्वर बालक मंदिर जवळ, सोलापुर**
**फोन : (०२१७) २७२७२२१ मोबाईल : ०९९६०२२२१५१, ९४२१०३३७०६, ९४०४३०४२२१**